**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रमेश शेंडगे)**

**पृ.शी.**: राज्यात स्त्रीभ्रूण हत्यांचे वाढते प्रमाण

**मु.शी.**: राज्यात स्त्रीभ्रूण हत्यांचे वाढते प्रमाण या विषयावर सर्वश्री विनायक मेटे, सुभाष चव्हाण, अशोक उर्फ भाई जगताप, हेमंत टकले,राजन तेली, रमेश शेंडगे, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री किरण पावसकर, मोहन जोशी, सतीश चव्हाण, उल्हास पवार, सुभाष भोईर, श्रीमती विद्या चव्हाण यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु....)

**तालिका सभापती** : नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा आपण पुढे सुरु करीत आहोत. या प्रस्तावावर सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांचे भाषण अपूर्ण होते. त्या आज सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले हे भाषण करतील.

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे, सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण आणि आम्ही संगळयांनी मिळून नियम 260 अन्वये अतिशय महत्वाच्या विषयावर या सभागृहामध्ये चर्चा उपस्थित केलेली आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते मला म्हणाले की, हा विषय पुरुषांचा नाहीच, हा विषय सासवांचा आहे. सासू सांगते, ती काय करायला लावते, असा हा एक कौटुंबीक घटकातला भाग त्यांनी प्रकर्षाने मला जाणवून दिला. मला काही अंशी हे मान्य आहे की त्या परंपरेतून जरी आपण येत असू तरी शेवटी आपण हा विचार करणे आवश्यक आहे की, हे सगळे जे चित्र आज उभे रहाते ते चित्र असेच पुढे चालू ठेवायचे काय आणि भविष्यकाळात त्यामधून समाजाच्या एकजिनशीपणाला काय काय तडे जावू शकतात, कुठे विध्वंस होऊ शकतो, कुठे युद्ध सुरु होऊ शकते, कुठे आणखीन काही तरी होऊ शकते. म्हणून मला वाटते की, कोणत्याही प्रश्नाच्या बाबतीत समाजातील कोणत्या तरी एका घटकाची ती जबाबदारी आहे असे वर्गीकरण न करता

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

आपण समाजाच्या एकसंधपणाचा विचार करण्याची गरज आहे आणि त्यादृष्टीने या विषयामध्ये आपण सगळयांनी सहभागी होऊन याबाबतीत आपणाला जे काही वाटते ते या ठिकाणी जरुर मांडावे.

सभापती महोदय, मी माझ्या बोलण्याची सुरुवात करीत असताना एका महिलेला सलाम करतो, एका गो-या महिलेला सलाम करतो. कारण या महिलेचे नाव आहे लेफ्टनण्ट कर्नल सारा वेस्ट, वय वर्षे 39. ब्रिटीश रॉयल नेव्ही मधील एका युध्द नौकेची प्रमुख म्हणून तिची निवड झाली. तिच्या हाताखाली 185 पुरुषांचा स्टाफ आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ब्रिटीश रॉयल नेव्हीच्या 500 वर्षाच्या इतिहासातील ही पहिली महिला कमाण्डण्ट आहे. मला वाटते स्थित्यंतरे, परिवर्तने होत असतात. ती कालमापनावर बघायला गेलो तर 500 वर्षाच्या एका साम्राज्यात एका महिलेला ब्रिटीश युद्ध नौकेची प्रमुख होण्याचा मान मिळणे ही निश्चितच अभिनंदनीय गोष्ट आहे असे मला वाटते. त्याच बरोबर महिला कितीही प्रमाणात सक्षम झाल्या, कितीही संधी त्यांना उपलब्ध झाल्या तरी प्रत्यक्ष त्यांचा पुढचा प्रवास कसा असतो याबद्दल निश्चित आपल्याला आकलन होऊ शकेल.

सभापती महोदय, मला दुसरा उल्लेख करावयाचा आहे तो आपल्या देशात जन्माला आलेल्या पहिल्या टेस्टट्यूब बेबीचा. डॉ. इंदिरा हिंदुजा यांच्या संशोधनातून आणि अथक परिश्रमातून हे विज्ञानाने दिलेले वरदान आपल्या देशात जेव्हा प्रथम उमलले त्या घटनेला याच महिन्यामध्ये 25 वर्षे पूर्ण झाली. आनंद यासाठी व्यक्त करतो की ही पहिली जन्माला आलेली टेस्टट्युब बेबी मुलगी होती. अगदी आदम आणि इव्ह पासून सुरुवात केली तरी मानवाच्या उत्क्रांतीमध्ये काय काय घडले आणि त्यामध्ये स्त्री या पृथ्वीतलावर किती आवश्यक आहे हे आदिम काळापासून अधोरेखित झालेले आहे. संस्कृतीच्या प्रगतीकडे पहात असताना अगदी पूवीच्या काळी माणसे डोंगर द-यात रहात असतील, त्यांनी पशुसारखे कळपानेसुध्दा राहाण्यास सुरुवात केली असेल, कुणी तरी बलाढ्य त्यांचा प्रमुख होत असेल, टोळयांची युद्धे होत असतील, त्यामधून काही तरी एक निश्चित समाज रचना व्हावी म्हणून एक व्यवस्था निर्माण झाली असेल, त्या व्यवस्थेतून स्त्री-पुरुष असा विचार करताना त्यांना समाजासाठी जे आवश्यक वाटले असेल त्यामुळे कदाचित लग्न ही संकल्पना, कुटुंब ही संकल्पना पुढे आली असेल आणि अशा उत्क्रांतीतून जाताना पुढे समाजाची रचना कशी घडत गेली हेही आपण बघत गेलो. विज्ञानाची देखील त्यांच्या बरोबरीनेच

श्री. हेमंत टकले....

प्रगती झाली. मानवाचे जीवन सुखकर करण्यासाठी, सुरक्षित करण्यासाठी नवनवे संशोधन, औषधे, उपचार करण्यात येऊ लागले. एक प्रकारे समाज सुदृढ होण्यासाठी, समाज सुस्थितीत येण्यासाठी या रचनेतून आपण पुढे जायला लागतो.

हे होत असताना आपण पुन्हा एकदा पुराण काळात पाहिले तर मोठमोठ्या राजांच्या राज्यकन्येचे विवाह जे आपण रामायण, महाभारत अशा पुराणात वाचतो, ते स्वयंवर म्हणजे स्वयंवरात राजकन्येला जिंकणारा, इथपासून जेव्हा आपण विचार करतो त्यावेळी स्त्रीकडे बघण्याचा दृष्टीकोन आपला नक्की काय आहे, काय असायला हवा याबाबत आपण एका वेगळया देशेने विचार करायला प्रवृत्त होतो. अपरिहार्यपणे पुराणात किंवा ज्याला आपण पवित्र ग्रंथ मानतो अशा महाभारतामध्ये सुध्दा ज्या काही गोष्टी आलेल्या आहेत त्या आपण स्वीकारलेल्या आहेत. महाभारतामध्ये असेही आलेले आहे की, कौरव 100 होते. 100 पुत्रांची कुणी एक माता होती. कल्पनेच्या विलासात आपण ते घटकाभर गृहीत धरु की असेल. पण कौरवांच्या बहिणीचा कधी कुठे उल्लेख झाल्याचे मला आठवत नाही. पांडव 5 होते. पांडवांनी स्वयंवरामध्ये जो काही पण होता तो जिंकला आणि पाच पांडवांची द्रौपदी झाली. पाच पांडवांची द्रौपदी होणे हे कदाचित आपण त्या दैवतांविषयी बोलताना मान्य करतो. पण हा विचार आज आपल्याला अस्वस्थ निश्चित करतो. काय परिस्थिती असेल कल्पना नाही. परंतु अशा प्रकारचे सुध्दा दाखले इतिहासामधून आपल्याला पहावयास मिळतात. त्यामुळे असे वाटते की आज आपल्या देशामध्ये आणि राज्यामध्ये हा जो प्रश्न निर्माण झालेला आहे, ही जी स्त्री-पुरुषांच्या प्रमाणात सातत्याने घट आपल्या समोर येत आहे यामुळे आपल्याला विज्ञान कुठे तरी थांबवायचे आहे काय ? यावर एकच उपाय सगळे जण सुचवितात. जसे काही तरी हाती लागले की त्याला बडवत सुटायचे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले......

सभापती महोदय, अशा प्रकारची रचना झाल्यामुळे आपल्या लक्षात येते की, हा प्रश्न आज आपण चर्चेच्या स्वरुपात घेत असताना सोनोग्राफी मशिन सापडले, ते बंद केले म्हणजे हा प्रश्न आपण सोडवू शकू अशा प्रकारची जी मानसिकता झालेली आहे ती अत्यंत चुकीची आहे. ही मानसिकता पहिल्यांदा बदलण्याची आवश्यकता आहे. कारण जन्माला येणारे बालक मग तो मुलगा असो वा मुलगी, त्या गर्भाची वाढ व्यवस्थितपणे होते की नाही हे बघण्यासाठी ज्या काही चाचण्या करणे आवश्यक असतात त्या चाचण्यांवर बंदी घालणार का? एकीकडे हा प्रश्न सोडविताना आपण आपल्या समाज व्यवस्थेमध्ये इतर प्रश्न निर्माण करणार आहोत का? या प्रश्नांचा या चर्चेच्या निमित्ताने विचार व्हावयास पाहिजे असे मला सुचवावेसे वाटते. हा भेदाभेद आपण पाहतो तो आपल्या राज्यातील मानव विकास निर्देशांक ज्या ज्या जिल्हयात कमी आहे त्या ठिकाणी आहे का? काही जिल्हयांची उदाहरणे फार प्रकर्षाने पुढे येतात. सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्हयामध्ये हे प्रमाण हेल्दी आहे. कदाचित तेथे मुलींचे प्रमाण 1000 वर गेले आहे. तेथे जर प्रमाण वाढू शकते तर इतर जिल्हयांमध्ये का वाढत नाही? कुटुंबाची सांपत्तिक स्थिती हा त्यातील घटक असू शकतो का? याचाही विचार केला तरी हा सर्वदूर पसरलेला प्रश्न आहे असे लक्षात येते.

सभापती महोदय, कदाचित आज चर्चेच्या वेळेला या प्रश्नाचे गांभीर्य आणि त्यामधून उद्‌भवणारे धोके आपल्यासमोर फार प्रकर्षाने येणार नाहीत, अनेक उपाययोजना सुचविण्यात येतील. मूलत: मला हे सुचवावयाचे आहे की, याबाबत इच्छा असली तरी शासन एकटेच उपाय करु शकणार नाही हे सत्य आहे. या सत्याचा आपण मोकळेपणाने स्वीकार केला पाहिजे. यावरच पुढील सगळी रचना अवलंबून आहे. आपल्याला काही करण्याची मनापासून इच्छा असली तरी समाजाचे परिवर्तन जोपर्यंत होत नाही तोपर्यंत, कदाचित पुढे जाऊन मी तर असे म्हणेन की, महिलांचे 50 टक्के आरक्षण कालांतराने 40 टक्क्यावर, 30 टक्क्यावर, 25 टक्क्यावर आणण्याची वेळ येईल. हा उलटा प्रवास करावयाचे आपण ठरविले तर तो थांबण्याची शक्यता यामध्ये दिसून येत नाही. म्हणून समाजाला संपूर्णपणे सामील करुन घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, काही वर्षांपूर्वी एड्स संदर्भात जनजागृतीची मोहीम शासनाकडून घेण्यात आली. त्याचप्रमाणे हा जो प्रश्न आहे त्यासाठी एक व्यापक मोहीम आखण्याची आवश्यकता आहे. विशेषकरुन समाजशास्त्र शिकविणारी जी विद्यालये आहेत, विद्यापीठे आहेत किंवा खाजगी संस्था

..2..

श्री.हेमंत टकले......

आहेत, त्यामध्ये टाटा इन्स्टिटट्यूट ऑफ सोशल सायन्सेस व एसएनडीटी महिला विद्यापीठ यासारख्या संस्था असतील, या सर्व संस्थांना एकत्रित करुन अभ्यासक्रमामध्ये या विषयाची नोंद घ्यावी लागेल. मध्यंतरी एक SMS प्रसारित होत होता. त्या SMSच्या फक्त चार ओळी आहेत. त्याचा आशय असा होता की, ही एक गर्भाची डायरी आहे. या डायरीतील SMS मी वाचून दाखवितो.

मी गर्भाशयाला जाऊन चिकटले,
आई माझ्या अस्तित्वाच्या जाणीवेने मोहरली,
आईने बाबांना ही गोड बातमी सांगितली,
आज मी अल्ट्रासाऊंड मशिनचा अनुभव घेतला,
त्या मशिनने माझे लिंग ओळखले,
मी आता मुलगी म्हणून जन्माला येणार, हो!
कुणीतरी मला हळूच खुरडले, माझे अस्तित्वच संपले.
प्रत्येकाला आई हवी असते, बायकोही हवी असते,
गर्लफ्रेंड हवी म्हणून प्रत्येक मुलगा आसुसलेला असतो,
मग मुलगी का नको असते?

असा हा SMS आहे. ब-याच मुद्यांना स्पर्श करणे आवश्यक होते. परंतु वेळेअभावी ते शक्य होताना दिसत नाही. मला कुसुमाग्रजांची एक कविता आठवते. "रात्रीच्या गर्भात असे उद्याचा उष:काल....." या गर्भाची जी संकल्पना आहे त्या संकल्पनेकडे अधिक तीव्रतेने पाहिले पाहिजे. आपण जर हे केले नाही तर कवि सुरेश भट यांनी म्हटल्याप्रमाणे, "उष:काल होता होता काळ रात्र झाली....." अशी अवस्था होईल. त्यामुळे या प्रश्नावर आपण सगळ्यांनी गांभीर्याने मार्ग काढण्यासाठी उठाव करण्याची नितांत गरज आहे एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

-----



अप्रकाशित / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, एका अत्यंत महत्वाच्या प्रश्नावर सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी चर्चा घडवून आणली आहे, त्या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी आणि माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, समाजामधील या सगळ्या व्यवस्थेकडे पहात असताना पुरुषांनी अतिशय गांभीर्याने पहावे असे एक चित्र निर्माण झाले आहे. स्त्री आणि पुरुषांमधील गुणोत्तराचे प्रमाण उत्तरोत्तर वाढत जात आहे याला ती माता आणि डॉक्टर्स कारणीभूत ठरु शकतात. हे प्रकार आजच घडत आहेत असे नसून अनेक वर्षापासून चालत आलेली ही प्रक्रिया आहे. बीड जिल्हयामधील काही डॉक्टरांबद्दल खाजगीमध्ये असे बोलले जाते की, गर्भपात करावयास येणाऱ्या ज्या महिला आहेत त्यांच्या परिस्थितीचा फायदा काही डॉक्टरांनी घेतला आहे. ही परिस्थिती महाराष्ट्रात अनेक ठिकाणी दिसून येते. त्यामुळे शासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने पहावे अशी सूचना मी करु इच्छितो. ही पांढरपेशी समाजाची गुन्हेगारी आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

सभापती महोदय, हे गुप्त कत्तलखाने बंद करण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. त्यांनी ती पार पाडली पाहिजे. माननीय आरोग्यमंत्र्यांनी राज्यात अनेक ठिकाणी बैठका घेतल्या आणि मार्गदर्शन केले, त्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. परंतु बैठका घेऊन मार्गदर्शन करण्याने हा प्रश्न सुटणार नाही. या प्रश्नाच्या खोलात जावे लागेल आणि त्यातून मार्ग काढावा लागेल. महिलांना गर्भपात करण्यास प्रवृत्त करणारी शक्ती ही एक तर सासू, सासरे किंवा त्यांचे नातेवाईक असतात. त्या महिलेला त्यांच्याकडून गर्भपातास प्रवृत्त केले जाते. तुझ्या पोटात असेलला गर्भ हा मुलीचा आहे, स्त्रीचा आहे, कन्येचा आहे असे सांगून तो गर्भ काढून टाकण्यास तिच्यावर मानसिक दबाव टाकला जातो, त्यामुळे ती महिला गर्भपात करण्यास प्रवृत्त होते आणि तो गर्भ काढून टाकला जातो. माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी उत्तम प्रकारचा SMS सभागृहाला वाचून दाखविला. एक गर्भ आपल्या आईशी संवाद करीत आहे. आई मी तुझ्याशी बोलणार आहे, संवाद साधणार आहे. बाहेरच्या जगात आल्यानंतर बाबा काय करतात, त्यांच्याशी मी बोलणार आहे. अनेक कथा बाबांनी तुला सांगितल्या, गर्भामध्ये त्या मी ऐकल्या. त्या तुझ्या कानावर घालणार आहे असा संवाद तो गर्भ करीत आहे. त्या मातेचे कर्तव्य असते. ज्याप्रमाणे घार हिंडते आकाशी, लक्ष तिचे पिल्लापाशी अशी स्थिती मातेची असावी अशी अपेक्षा आहे. परंतु

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले........

हे घडताना दिसत नाही. दुर्दैवाने तीच माता वैरी होते. तेव्हा या मातेचे काय करायचे हा प्रश्न निर्माण होतो. सामाजिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे त्यांनी या गोष्टीला आळा घालण्याचा प्रयत्न करावा अशी मी आग्रहाची विनंती करतो.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.टकले यांनी महाभारतातील प्रसंगांचा उल्लेख केला आहे. द्रौपदी ही पाच पांडवाची पत्नी होती. त्यांचा संसार ती करीत होती. या देशात, अनेक राज्यातील ऐतिहासिक नोंदी पाहिल्या तर त्यातून असे आढळून येते की......

नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले ........

की ज्या काळात स्त्रियांची वानवा होती, प्रमाण कमी होते तेव्हा एका स्त्रियाच्या पाठीमागे दोन दोन पती अशी संकल्पना रुढ झालेली होती. ही त्या काळात समाजातील रीत-भात होती. हे प्रमाण असे वाढत गेले तर मला वाटते की, शासन व प्रशासनाला सुध्दा स्त्रियांचा शोध घ्यावा लागेल आणि मग स्त्रिया सापडणार नाही आणि तेव्हा ही समाजव्यवस्था ढळल्याशिवाय राहणार नाही. माझ्या माहितीप्रमाणे आजही जैन बांधवांमध्ये मुलींचे प्रमाण अतिशय कमी आहे. माझे अनेक मित्र हे जैन बांधव आहेत त्यामुळे मला वस्तुस्थितीची जाणीव आहे. या धर्मामध्ये मुलींची संख्या कमी असल्यामुळे त्यातील काही लोक आश्रमात जाऊन त्यातून मुली शोधून आणतात व त्यांच्याशी लग्न करतात व ही एक प्रकारे उदार मनस्कता आहे. माननीय मंत्री श्री. राजेंद्र दर्डा हे सभागृहात उपस्थित आहेत, ते खाली बसूनच मानेने "नाही" असे म्हणत आहेत पण ही वस्तुस्थिती आहे व तिला भविष्यात आपणा सर्वांनाच सामोरे जावे लागणार आहे. माझ्या सासऱ्याला एकूण 7 मुली आहेत, नंतर मुलाचा जन्म झाला. तोपर्यंत अत्यंत उदार मनस्कतेने त्या पठ्ठयाने वाट पाहिली, अशा लोकांचे कौतुक केले पाहिजे. मी त्यांचा सर्वात ज्येष्ठ जावई आहे, माझ्या नंतर मला सहा मेहुण्या आहेत. आमच्या सासऱ्याचा हा एक मोठा पराक्रम मी "याचि देही याचि डोळा" अनुभवला आहे. तेव्हा सांगायचे तात्पर्य एवढेच की या समाजामध्ये ज्यांच्या घरात दोन किंवा अधिक मुली असतील तर त्यांचाही गौरव केला पाहिजे अशी आग्रहाची विनंती मी करणार आहे.

महोदय, या निमित्ताने मी असेही सुचविणार आहे की, या कामामध्ये आपल्याला अनेक सामाजिक संस्था अतिशय उत्तम प्रकारे मदत करु शकतात. समाजाचे प्रबोधन करण्याचे काम अशा संस्थांवर आपण सोपविले तर त्या उत्तम प्रकारे हे काम करु शकतात. त्याचप्रमाणे वारकरी संप्रदायातील संत, महंत, कीर्तनकार किंवा प्रवचनकार यांच्यावरही ही जबाबदारी टाकली तरी देखील स्त्रिया भ्रूण हत्या खंडित करण्यासाठी ही एक प्रभावी उपाययोजना ठरु शकेल. त्याचा परिणाम म्हणून एक उत्तम प्रकारचे सामाजिक स्वास्थ्य आणि आरोग्य समाजाला लाभू शकते. आमच्या बीडकरांना आणि विशेष करुन परळीकरांना ठोकण्याचे प्रयत्न गेल्या अनेक दिवसांपासून चालले आहेत. स्त्रिया भ्रूण हत्या बीड जिल्ह्यात जास्त होत आहेत असे नेहमीच सांगण्यात येते. पण माझ्याकडे जी आकडेवारी आहे त्यानुसार पाहिले तर आपल्या लक्षात येईल की, कोणत्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .......

जिल्ह्यात हे प्रमाण जास्त आहे. या आकडेवारीमध्ये ठाणे जिल्ह्यात 22171, नाशिक जिल्ह्यात 29916, जळगांव जिल्हा 33110, अहमदनगरमध्ये 33110 आणि पुण्यामध्ये तर 45215 म्हणजे राज्यात सर्वात जास्त स्त्रिया भ्रूण हत्यांचे प्रमाण आहे.

सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे आता सभागृहात उपस्थित नाहीत, मी त्यांना सांगू इच्छितो की, सुसंस्कृत अशा पुणे जिल्ह्यातच स्त्रिया भ्रूण हत्यांचे प्रमाण सर्वात जास्त आहे. आमच्या बीड जिल्ह्याचे प्रमाण मात्र 28934 एवढे आहे. यावरुन बीड आणि पुणे जिल्ह्यातील तफावतही आपल्या लक्षात आली असेलच. प्रश्न असा आहे की, "पुणे तिथे काय ऊणे" असे आपण नेहमी म्हणतो पण या क्षेत्रात देखील पुणे पुढेच आहे. हे चित्र बदलण्यासाठी शिताफीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. मी केवळ पुण्यालाच दोष देत नाही किंवा परळीकर माननीय श्री. मुंडे साहेबांनाही दोष देत नाही पण ही एक प्रकारची सामाजिक विकृती असून ती दूर करणे अगत्याचे आहे. प्रस्ताव चर्चेला आणला ते माननीय श्री. विनायक मेटे साहेब सुध्दा सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांनी "अजात बालिका संरक्षण योजना" या नावाची योजना जाहीर केली. माझी या निमित्ताने त्यांना विनंती आहे की, या स्त्रियांवर पुरुषांचे आक्रमण कशासाठी ? मग तेथे स्त्रिलिंगी शब्द वापरुन "पृथ्वी बालिका संरक्षक अभियान" असा शब्दप्रयोग का केला नाही ? कारण पृथ्वी या नावात सामर्थ्य आहे, पुन्हा राज्याचे नेतृत्व सुध्दा त्याच नावाकडे आहे,....अडथळा...."अजिता" सुध्दा करता येईल. तात्पर्य इतकेच की सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी अशा प्रकारे शब्दरचनेत बदल करावा. एवढे बोलून या विषयावर उदार मनस्कतेने मला अधिक वेळ वाढवून दिला त्याबद्दल आपले आभार मानतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

------



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी राज्यात स्त्रिया भ्रूण हत्यांचे प्रमाण वाढत असल्याबद्दल जो प्रस्ताव सभागृहात चर्चेसाठी आणला आहे त्या प्रस्तावावर माझे मत मांडण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, हा प्रस्ताव सभागृहात पहिल्यांदा 2 ऑगस्ट रोजी चर्चेला ठेवला होता. त्यानंतर 3 ऑगस्ट, 4 ऑगस्ट रोजी सुध्दा कामकाज पत्रिकेमध्ये दाखविला होता पण त्यावर चर्चा होऊ शकली नाही. काल या प्रस्तावावर चर्चा सुरु झाली आणि आज अर्धवट राहिलेली चर्चा आपण करीत आहोत. 6 किंवा 7 तारखेच्या दरम्यान आणि आज चर्चेला येईपर्यंत मला असे वाटत होते की, ज्या स्त्रिया भ्रूण हत्यासंबंधी सभागृहात सत्ताधारी पक्षाकडून प्रस्ताव आला आहे तो प्रस्ताव सभागृहात येण्यापूर्वीच त्याची देखील अवस्था अशीच होते की काय ? आज मात्र टप्प्याटप्प्याने हा प्रस्ताव चर्चेला आला आहे. तीन वेळा सभागृहात येऊन चर्चा न होणे आणि काल चर्चा सुरु होऊन आजच्या कामकाजात "ऑन-लेग" हा प्रस्ताव चर्चा होत आहे म्हणून माझा शासनाला प्रश्न आहे की, खरोखरच सरकार या विषयाबाबत गंभीर आहे काय ?

महोदय, या अनुषंगाने मी एकच आकडा सांगतो व त्यावरुनच शासनाने किती गंभीर व्हावयाचे हे सभागृहानेच ठरवावे. सन 2011 च्या जनगणनेप्रमाणे आपल्या राज्यात पुरुषांचे प्रमाण 5 कोटी 83 लाख 61 हजार 357 एवढे आहे व त्यामागे स्त्रियांचे प्रमाण 5 कोटी 40 लाख 11 हजार 575 इतके आहे. स्त्रियांच्या लोकसंख्येतील फरक म्हणजे 43 लाख 49 हजार 822 इतका आहे. हा फरक मागील दहा वर्षातील आहे, म्हणजेच सन 2001 ते सन 2011 याच काळातील आहे. याचा अर्थ या दहा वर्षांच्या काळात जवळपास 45 लाख स्त्रिया भ्रूण हत्या झाल्या, ही चिंतेची बाब आहे. तरी देखील शासनाला जाग आली नाही. सन्माननीय सदस्यांनी राज्यकर्त्यांकडून या सभागृहात हा विषय उपस्थित करुन चर्चा ठेवली त्याबद्दल त्यांचे मी स्वागत करतो. उशिरा का होईना पण हा प्रस्ताव आला, त्याला उशीर का झाला असे आपण म्हणत नाही. एवढे प्रमाण कमी होत असताना आपले सरकार काय करीत होते हा प्रश्न मात्र अनुत्तरितच राहतो. मी असे म्हणत नाही की, ही जबाबदारी संपूर्णपणे शासनाची किंवा प्रशासनाचीच आहे. पण इतर राज्यांचा विचार केला तर सन 2001 मध्ये जनगणनेप्रमाणे त्या राज्यांमध्ये स्त्रिया-पुरुषांचे प्रमाण व्यस्त असल्याचे लक्षात आल्यानंतर त्या त्या राज्याच्या संवेदनशील सरकारने विविध उपाययोजना केल्या व मधल्या

...4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे .......

काळात अशा हत्या बंद देखील झाल्या. आता त्या राज्यातील स्त्रिया-पुरुष गुणेत्तराचे प्रमाण हे बरोबरीने आले आहे. पण ज्या पुरोगामी महाराष्ट्राची आपण सबंध देशभर चर्चा करतो, शाहू-फुले-आंबेडकरांचे नाव घेऊन राजकारण करतो तेथे मात्र सरकारची काय मानसिकता आहे याचा विचार करण्याची गरज आहे. महोदय, आज राज्यातील सर्वसामान्यांची मानसिकता अशी होऊन बसली आहे की, वंशाचा दिवा म्हणून मुलाकडे पाहिले जायचे. पण शासनाला किंवा सामान्य माणसाला सरकार म्हणून हे सांगणे आवश्यक वाटत नाही की, मुलगी होण्यासाठी पहिल्यांदा कोणाच्या तरी घरी मुलगी म्हणून मुलीला जन्माला यावे लागते.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे...

सभापती महोदय, ही मानसिकता हे सरकार बदलणार आहे काय ? 4.5 लाख स्त्रीभ्रूण हत्या झाल्यानंतर सुध्दा आपली मानसिकता बदलली गेली नाही ही वस्तुस्थिती आहे. वंशाला दिवा हवा या कारणासाठी पणतीला विरोध केला जात आहे. ही मानसिकता या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये असणे ही दु:खाची बाब आहे. त्यामुळे या मानसिकतेला आपण थांबविणार आहोत की नाही ? हा माझा सवाल आहे. सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले साहेबांनी या ठिकाणी त्यांच्या सास-याचे उदाहरण दिले आहे. या विषयावर बोलत असतांना मला एवढेच सांगावयाचे आहे की, मी सुध्दा दोन मुलींचा बाप आहे व त्याचा मला अभिमान आहे. मुलींच्या संदर्भात ग्रामीण भागात काय मानसिकता आहे ? मी गेल्या 15 वर्षापासून ग्रामीण भागात काम करीत आहे. स्त्रीभ्रूण हत्त्येच्या संदर्भात असंख्य नावे मला सांगता येतील. काही ठिकाणी तर मुलगा नसल्यामुळे पत्नीला डिव्होर्स सुध्दा देण्यात आलेले आहेत, त्यामुळे या गोष्टींचा आपण विचार करणार आहोत की, नाही ? पृथ्वीला आपण आईचा दर्जा दिलेला आहे. जगात सर्वश्रेष्ठ प्रेम आईचे आहे असे आपण मानतो परंतु मुलगी जन्माला आल्यानंतर आईचे प्रेम कोठे जाते ? मुलगी जन्माला आल्यानंतर आईचे प्रेम आपल्याला दिसते काय ? ज्या वेळेस आईच्या गर्भात मुलीचा गर्भ असतो त्यावेळेस आईचे प्रेम कोठे जाते ? या विषयावर बोलत असतांना माझ्या मनात असा विचार आला की, मूल जन्माला आल्यानंतर सर्वश्रेष्ठ आईचे प्रेम आणि स्त्रीभ्रूण हत्त्या होत असतांना आईचे प्रेम आईचे नाही ? त्यामुळे असे का घडते याचा विचार करणे आवश्यक आहे. स्त्री आपल्या गर्भातील स्त्रीगर्भ पाडण्याच्या मानसिकतेपर्यंत का येते ? याला जबाबदार कोण आहे ? या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले साहेबांनी सांगितले आहे की, याला जबाबदार सासू, सासरे आणि नवरा आहे. स्त्री गर्भ पाडण्यासाठी हेच स्त्रिला प्रवृत्त करीत असतात. दोन मुली झाल्या पण सासू सास-यांला आणि नव-याला मुलगाच पाहिजे असतो व स्त्रीने त्याला विरोध केला तर नवरा तिला फारकत देण्याची धमकी देतो. या महाराष्ट्रात अशी असंख्य प्रकरणे आहेत की, मुलगा नसल्यामुळे फारकती झाल्या आहेत. या मानसिकतेतून महाराष्ट्रातील सामान्य माणसाला आपल्याला बाहेर काढावे लागेल. त्याशिवाय या विषयावर ख-या अर्थाने चर्चा करुन उपयोग होणार नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे...

असे दिसून आलेले आहे. फक्त ग्रामीण भागातच हे होते अशातला भाग नाही तर अनेक रिपोर्टमध्ये उच्चभ्रू वर्ग सुध्दा यामध्ये मोठया प्रमाणात जबाबदार आहे व याचे कारण वंशाला दिवा हेच आहे.

या देशाच्या महामहीम राष्ट्रपती महिला आहेत, या देशाच्या एका आघाडी सरकारच्या मुख्य महिला आहेत, अनेक राज्याच्या मुख्यमंत्री महिला असतांना जन्माला येणा-या स्त्रीची ही परिस्थिती ? त्यामुळे या गोष्टीचा विचार होणे आता तरी आवश्यक आहे. परळीमध्ये नऊ स्त्री जातीचे अर्भक सापडल्यामुळे या विषयाची चर्चा ऐरणीवर आली. परळीच्या या घटनेची महाराष्ट्रानेच नाही तर संबंध देशाने दखल घेतली. त्यावेळेस कुठे तरी आग लागावी व आग लागल्यानंतर अग्नीशमनदल घेऊन पळावे अशी परिस्थिती सरकारची झाली आहे. ही संवेदनशीलता सरकारने सन 2001 पासून महाराष्ट्रामध्ये दाखवली असती तर 4.5 लाख स्त्रीभ्रूण हत्या झाल्या नसत्या. याचा विचार होणे फार आवश्यक आहे. आज सरकारला जाग आल्यानंतर कुठलेही नियम पाळले जात नाही. एका गावात एका रेडीओलॉजिस्टच्या किती सोनोग्राफी सेंटर्सला परवानगी द्यावी यासाठी काही नियम आहेत की, नाही ? 1.5 लाख लोकसंख्येच्या परळीमध्ये 27 सोनोग्राफी सेंटर्स आहेत त्यामुळे ही बाब शासनाच्या निदर्शनास आली नाही ? ही बाब शासनाला माहिती नव्हती ? आज अचानक परळीत स्त्रीभ्रूण हत्या, परळीत स्त्रीभ्रूण हत्त्या असा ढोल पिटवला जात आहे.

सभापती महोदय, आपण बेल वाजवू नये याचे कारण असे आहे की, स्त्रीभ्रूण हत्त्येच्या प्रस्तावाच्या संदर्भात मी नियम 93 अन्वये सूचना दिली होती त्यामुळे सर्व सन्माननीय सदस्यांपेक्षा मला 4-5 मिनिटाचा अवधी जास्त देण्यात यावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नवले साहेबांनी कुठल्या जिल्हयात सर्वात जास्त स्त्रीभ्रूण हत्त्या होते याची आकडेवारी दिलेली आहे. परळीपासून स्त्रीभ्रूण हत्त्येचे प्रकरण उघडकीस आले आहे. परंतु सर्वात जास्त स्त्रीभ्रूण हत्त्या बीड जिल्यातील शिरुर तालुक्यात होत असतात. या सर्व गोष्टीमध्ये आपल्याला जे काही महत्वाचे बदल करावयाचे असतील तर ते बदल करावयाची इच्छाशक्ती या सरकारमध्ये आहे काय हा माझा पहिला प्रश्न आहे.

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे...

सभापती महोदय, सन 2001 च्या जनगणनेमध्ये गुजरात सरकारला एकूण तालुक्यांपैकी 43 तालुक्यांमध्ये स्त्रियांचे प्रमाण कमी असल्याचे आढळून आल्यामुळे गुजरात सरकारने याबाबतीत आक्रमक पाऊल उचलले त्याचे आपण कौतुक केलेच पाहिजे. 350 इंन्स्टिट्युटने सामान्य जनतेची मानसिकता बदलण्याचे काम केले. गुजरातच्या ज्या 43 तालुक्यात स्त्रियांचे प्रमाण कमी होते त्या तालुक्याकडे गुजरात सरकारने सर्वात जास्त लक्ष दिल्यामुळे आज या 43 तालुक्यांमध्ये स्त्रियांची संख्या वाढली आहे. या कामासाठी शासनानेच नाही तर मुख्यमंत्र्यांनी तसेच सर्व पक्षाच्या आमदारांनी हा विषय स्वतःचा विषय समजून काम केले व "मुलगी बचाव" अभियान राबवल्यामुळे आज गुजरातच्या या 43 तालुक्यातील स्त्रियांचे प्रमाण इतर तालुक्यांच्या जवळ जवळ मॅचअप व्हावयास आले आहे. आपल्याकडे पीसीपीएनडीटी गर्भ लिंग निदान कायदा तसेच एमटीपी कायदा आहे. 1972 मध्ये एमटीपी कायदा आपल्या देशात लागू झाला. एमटीपी कायद्यांतर्गत 12 आठवडयाच्या गर्भपात करण्याला परवानगी दिली जाते. गर्भाची वाढ योग्य न हाणे, आईची प्रक्रृती व्यवस्थित नसणे अशावेळी एमटीपी कायद्याअंतर्गत गर्भपात करता येतो.

सभापती महोदय, स्त्रीभ्रूण हत्त्येच्या संदर्भात समाजाची मानसिकता बदलण्यासाठी सरकारने पुढे आले पाहिजे व सरकार यामध्ये जी काही पाऊले उचलेल त्यामध्ये विरोधी पक्षाचे सदस्य सुध्दा खांद्याला खांदा लावून या चळवळीत उतरतील एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे...

सभापती महोदय, या सभागृहामध्ये चर्चेमध्ये भाग घेत असतांना सन्माननीय सदस्य श्री. विनायकजी मेटे साहेबांनी एक वैयक्तिक स्वरुपाची योजना जाहीर केली. त्या योजनेचे नाव "पृथ्वी" असावे असे सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले साहेबांनी सांगितले. सभापती महोदय, योजनेचे नाव कोणते असावे याच्याशी आपल्याला देणे-घेणे नाही, परंतु आज त्या गर्भामधील एक स्त्री या सरकारला आवाज देत आहे की, "आता मला वाचवा" . या बाबतीत आपल्याला सामाजिक समतोल राखावयाचा असेल तर आपल्याला हे करावे लागेल. नाही तर या महाराष्ट्राला बहुपतीत्वासारख्या अतिशय कडवट रुढी आणि परंपरा स्वीकाराव्या लागतील इतकी वाईट परिस्थिती निर्माण झाली आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, आज या सभागृहामध्ये एका अत्यंत महत्वाच्या गंभीर विषयावर चर्चा सुरु आहे. त्या करिता सत्ताधारी पक्षाकडून हा प्रस्ताव आणला आहे त्याबद्दल मी सर्वप्रथम आपणा सर्वांचे अभिनंदन करीत आहे. अशाप्रकारच्या प्रस्तावाची जाण या सरकारला आहे, अशाप्रकारच्या समस्येची जाण या सरकारला आहे हे या प्रस्तावाच्या आशयावरुन कळते. राज्यातील स्त्रियांचे कमी होत असलेले प्रमाण हा सर्वांचा चर्चेचा विषय आहे. या प्रस्तावावर भाषण करीत असतांना अनेक सन्माननीय सदस्यांनी विचार मांडले त्यामध्ये अनेक गोष्टी पुढे आलेल्या आहेत. अनेक सन्माननीय सदस्यांनी चांगली भाषणे केली आहेत परंतु या समस्येबाबत नेमके शासनाने काय केले पाहिजे यावर अजून बोट ठेवले गेले नाही.

सभापती महोदय, शासकीय आकडेवारीनुसार 7 हजार 939 सोनोग्राफी मशीन्स आहेत, त्यापैकी 6 हजार 493 मशीन्सची तपासणी करण्यात आली व 282 मशीन्स सील करण्यात आल्या. त्याचप्रमाणे 2 हजार 95 गर्भपात केंद्रांची तपासणी करण्यात आली, त्यापैकी 79 गर्भपात केंद्राची मान्यता रद्द करण्यात आली. माझ्याकडे लेटेस्ट माहिती नसल्यामुळे ही आकडेवारी थोडया फार प्रमाणात कमी जास्त होऊ शकते. या समस्येवर आपण जी उपाय योजना करीत आहात ती केवळ मलमपट्टी आहे. बीड, परळी येथे घडलेली घटना प्रकाशात आल्यानंतर गेल्या दोन वर्षापासून राज्य सरकारने याची गंभीर दखल घेऊन राज्यामध्ये कोल्हापूर पॅटर्न लागू केला. हा कोल्हापूर पॅटर्न म्हणजे काय? यामध्ये सोनोग्राफी मशीनला एक सायलेंट ऑब्झर्व्हर जोडायचे, जीएस 250 जीबी ची हार्ड डिस्क जोडायची, ती जोडल्यानंतर गर्भातील लिंगाची तपासणी होत नाही असे मानले जात असे. या संदर्भातील राज्य सरकारचा अहवाल माझ्याकडे आहे.

सन्माननीय मंत्रीमहोदयांना मी आठवण करुन देऊ इच्छितो की, आपण डॉ. डोके यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली. त्यानुसार जितके एमओ आणि जितके सेंटर्स आहेत, जितके रेडिओलॉजिस्ट, सोनोलॉजिस्ट आहेत त्यांचे या सायलेंट ऑब्झर्व्हरबाबत मत जाणून घेतले. सभापती महोदय, कोल्हापूर पॅटर्नमुळे स्त्री भ्रूण हत्त्या कमी होऊन मुलींची संख्या वाढल्याचे कुठेही राज्य सरकारच्या अहवालामध्ये म्हटलेले नाही. अशाप्रकारे हे सायलेंट ऑब्झर्व्हर म्हणजे भ्रष्टाचाराचे एक कुरण झाले आहे. 28 हजार 250 रुपयांना किंवा 28 हजार 350 रुपयांना मिळणारे हे मशीन जिल्हाधिकाऱ्यांनी रेडिओलॉजिस्ट आणि सोनिओलॉजिस्टना 39 हजार रुपयांना विकले. तुम्ही हे सायलेंट ऑब्झर्व्हर मशीन लावले तर तुमची काहीही चूक नाही, तुमच्याकडे

डॉ. दीपक सावंत....

कुणीही येणार नाही अशी त्यांना क्लिन चीट देऊन टाकली. सभापती महोदय, ज्यावेळी हे सायलेंट ऑब्झर्व्हर प्रकाशात आले त्यावेळची आकडेवारी आणि आजची आकडेवारी ही फारशी हास्यास्पद नाही हे आपला अहवाल सांगत आहे. कोल्हापूरच्या सर्व सोनियोलॉजिस्ट आणि रेडियोलॉजिस्टना हे मशीन वापरणे सक्तीचे करण्याचे नाटक करण्यामागील राज्य सरकारचा हेतू काय आहे याचे उत्तर आपल्याला मिळाले पाहिजे. आपण या करिता जिल्हाधिकाऱ्यांना हक्क, अधिकार दिले व त्यांनी सर्वांना हे मशीन वापरणे सक्तीचे केले. त्यामधून भ्रष्टाचाराचे कुरण तयार केले आहे. ज्यावेळी आपण एखादा प्रश्न सभागृहामध्ये उपस्थित करतो त्यावेळी हे अधिकारी मात्र उत्सव साजरा करतात. कारण त्यांच्या हातामध्ये एक नवीन क्लायंट येतो तसा प्रकार या स्त्रीभ्रूण हत्त्येच्या बाबतीत आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी एफ फॉर्म दिलेला असून तो प्रत्येक सोनियोलॉजिस्ट आणि रेडियोलॉजिस्टनी ऑन लाईन भरावयाचा असतो. हा फॉर्म किती वर्षापूर्वी बनविण्यात आलेला आहे? त्यामध्ये अनेक प्रकारच्या त्रुटी आहेत हे आपण मान्य कराल. या फॉर्ममध्ये ऑन लाईन माहिती भरली गेली पाहिजे, परंतु ग्रामीण भागामध्ये विजेची खात्री नसते त्यावेळी ही माहिती कशी भरली जाणार आहे? हा फॉर्म भरणे शारीरिक दृष्टया अतिशय क्लिष्ट आहे, त्यामुळे अनेक लोक हा फॉर्म भरण्याचे टाळीत आहेत. ज्यांच्यावर आपण कारवाई केली आहे त्यापैकी अनेक लोकांचे एफ फॉर्म पूर्ण भरले गेलेले नाहीत. म्हणजे आपण स्त्रीभ्रूण हत्येला न्याय दिलेला नाही. या फॉर्ममध्ये अनेक गोष्टींची कमतरता आहे, त्या गोष्टी त्यामध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. आपली जर खरोखरच मानसिकता असेल तर आपण हा एफ फॉर्म नवीन बनविला पाहिजे. या फॉर्ममध्ये कोणत्या नवीन बाबींचा समावेश करणे आवश्यक आहे याबाबत तज्ज्ञांची मते सुध्दा आपण घेतली पाहिजेत.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. भगवानराव साळुंखे)**

सभापती महोदय, शासनाने हा पीसीपीएनटीटी कायदा म्हणजेच प्रसूतीपूर्व गर्भ लिंग निदान कायदा केला आहे, हा दात नसलेला कायदा अशाप्रकारे त्याचे वर्णन केले आहे. त्यामध्ये कोणत्याही प्रकारच्या शिक्षेची तरतूद नाही. हे माझे म्हणणे नाही तर शासकीय सेवेमध्ये काम करणाऱ्या एका सिव्हिल सर्जननी डॉ. डोके यांच्या अहवालात म्हटले आहे. गर्भपाताची मान्यता ही

अमुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

पूर्वी 12 आठवडयाची होती, ती आता 10 आठवडयांची केली आहे. 1970-71 साली कुटुंब नियोजन कार्यक्रमाची अंमलबजावणी मोठया प्रमाणात करण्याचा प्रयत्न झाला त्यावेळी लोकांना आपण "दो या तीन बस्स" असे सांगत होतो. त्यावेळी आपण लोकांवर सक्ती केली त्याचे काही ठरावीक जातीच्या लोकांनी पालन केले,काही लोकांनी केले नाही. आज या स्त्रीभ्रूण हत्या होत आहेत त्याला ठरावीक कम्युनिटी जबाबदार आहे हे मी जबाबदारीने सांगत आहे. मला कोणत्याही कम्युनिटीवर आक्षेप घ्यावयाचा नाही. आपल्याकडे हुंडा पध्दत आहे ती याला जबाबदार आहे. अशाप्रकारे समाजामध्ये हुंडाबळीचे प्रकार होत आहेत, तशाप्रकारे हा स्त्रीभ्रूण हत्येचा वेगळा प्रकार आहे. हे प्रकार पूर्वी सासरची माणसे करीत होती आज माहेरची माणसे करीत आहेत. यामुळे आपल्याला या पीसीपीएनटी कायद्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. कालपर्यंत आपण सांगत होतो की, हा गर्भपात कायदा-It is the will and wish of the parents. तसेच डिलिव्हरी करण्यास जर ती व्यक्ती फिजिकली कॅपेबल नसेल किंवा गर्भामध्ये काहीतरी संभाव्य वैगुण्य येणार असेल तर आपण गर्भपातास परवानगी देतो. याकरिता आपण 12 आठवडयावरुन 10 आठवडयावर ही मर्यादा आणली आहे. ही बाब आपण कायद्यामध्ये समाविष्ट करणे आवश्यक नाही काय? शासनाने 12 आठवडयांऐवजी 10 आठवडयानंतर गर्भपात करण्यास परवानगी दिलेली आहे असे आपण सांगत राहणार आहात काय? या करिता आपण कायदा बदलून त्यामध्ये अनेक गोष्टींचा समावेश करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, शासनाने पोर्टेबल सोनोग्राफी मशीनवर बंदी घातली आहे. या समस्येवरील हा उपाय आहे काय याचे उत्तर आपण आम्हाला द्यावे. एखादा वयोवृध्द रुग्ण अंथरुणाला खिळलेला असेल, त्याचे लिव्हर फंक्शन करीत नसेल, किडनी फंक्शन करीत नसेल व ते करीत आहे की नाही हे पाहण्यासाठी पोर्टेबल सोनोग्राफी मशीन घरी न्यावयाचे नाही काय? प्रत्येक वेळी त्या रुग्णाने तुमच्या हॉस्पिटलमध्ये यावयाचे काय?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . ..

आपण एखादी गोष्ट जाहीर करतो, माननीय मंत्री महोदय सांगतात की, आम्ही पोर्टेबल मशीन वापरावर बंदी घालणार. परंतु पोर्टेबल मशिन फक्त स्त्री-भ्रूण हत्येसाठी वापरले जाते असे नाही तर अनेक बाबींसाठी सोनोग्राफी केली जाते. पुरुषांसाठी सुध्दा ते वापरतात. मग अशा वेळी जर तुम्ही पोर्टेबल मशीन वापरावर बंदी घातली तर जे पेशंट अंथरुणावर खिळलेले आहेत, जे हॉस्पिटलमध्ये ॲडमिट नाहीत त्यांचे डायग्नोसिस कसे करणार हा प्रश्न आहे. मध्यंतरी सुप्रीम कोर्टाने, केंद्र शासनाने सांगितले होते आणि सर्व हॉस्पिटलना देखील आदेश दिले होते की, जन्माला येणाऱ्या प्रत्येक मुलाची गर्भामध्ये तपासणी होणे अत्यंत आवश्यक आहे आणि त्यासाठी रक्ताच्या चाचण्या, वेगवेगळया जेनेटीक चाचण्या, वेगवेगळया सोनोग्राफीकल चाचण्या होणे आवश्यक आहे.याबाबतीत मी सदनामध्ये देखील मुद्दा उपस्थित केला होता की, आपण हे कसे करणार आहात? आज सोनोग्राफीवरच बंदी आणली जात आहे.सोनोग्राफीमुळे स्त्री-भ्रूण हत्या होते ही एक बाजू आहे, त्याप्रमाणे त्याची ही जी दुसरी बाजू आहे त्याचा आपण कधी विचार करणार आहात हा प्रश्न आहे.

सभापती महोदय, यानंतर एका मुद्याबाबत बोलून मी माझे भाषण संपविणार आहे. आपल्या बायकोच्या पोटामध्ये स्त्रीचा अंश आहे हे समजल्यानंतर ती जोडपी जेव्हा गर्भपात करुन घेतात, त्यांना काय शिक्षा करणार आहात ? तुम्ही डॉक्टरनां, सोनोलॉजिस्टनां पकडता किंवा आणखीही कोणाला पकडाल. पण जे याला जबाबदार आहेत म्हणजे जे ॲक्च्युअल गर्भपात करतात, जे गर्भामध्ये असलेल्या बाळाचा खून करतात त्यांना कोणती शिक्षा केली जाणार आहे.शासन याबाबतीत जो पर्यंत शिक्षा जाहीर करीत नाही,तोपर्यंत या गोष्टी थांबणार नाहीत. खरे म्हणजे असे करणाऱ्यांना जरब बसली पाहिजे की, उद्या जर मी गर्भपात केला तर मला शिक्षा होईल आणि हे प्रकार थांबविण्यासाठी हेच उत्तर आहे असे मला वाटते. तसेच दुसरी गोष्ट म्हणजे हे प्रत्येक लोकप्रतिनिधीचे काम आहे, मग तो ग्रामपंचायतीमधील सदस्य असो किंवा विधानसभा, विधान परिषद किंवा लोकसभेमधील सन्माननीय सदस्य असो, ते ज्या-ज्या भागाचे प्रतिनिधीत्व करतात, त्यांची देखील याबाबतीत जबाबदारी आहे की, आपल्या भागातील स्त्री-भ्रूण हत्या कशा कमी होतील आणि ही सर्वांची सामुदायिक जबाबदारी आहे. यासाठी सर्व लोकांना विश्वासात घेऊन शासनाने हा कायदा पुन्हा मूर्त स्वरुपामध्ये आणावा यादृष्टीने कार्यवाही केली पाहिजे. सभापती महोदय, आपण मला भाषण करण्यासाठी वेळ दिला, त्याबद्दल धन्यवाद.

10-08-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) F-2
APR/AKN/KTG 10:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, आपण सांगणार आणि आम्ही ते ऐकणार ही बाब आहेच. परंतु मला आपल्याला एक गोष्ट सांगावयाची आहे. हा प्रस्ताव गेल्या सहा दिवसापासून चर्चेसाठी घेण्यात येणार होता आणि त्यापैकी तीन दिवस आम्ही सकाळी 10.00 वाजल्यापासून सदनामध्ये उपस्थित आहोत. आम्हाला एक दिवस अगोदर सांगितले जाते. या प्रस्तावावर ज्या सन्माननीय सदस्यांची नावे आहेत, त्यात माझे नाव दुसऱ्या क्रमांकावर आहे. आपण असा निर्णय घेतला की, या विषयाच्या संबंधात सन्माननीय महिला सदस्यांना अगोदर भाषण करण्याची संधी द्यावयास पाहिजे आणि आम्ही ते स्वीकारले.परंतु त्यानंतर मी सातत्याने गेले तीन दिवस सकाळी 10.00 वाजल्यापासून उपस्थित आहे आणि तरी सुध्दा असे होत असेल तर मग आम्ही ते आपल्यावरच सोडतो. मग शेवटी जर आम्हाला भाषण करण्यासाठी दोन-दोन मिनिटे मिळणार असतील मग सदरहू प्रस्ताव मांडणारे सन्माननीय सदस्य आणि त्याला समर्थन देणारे सन्माननीय सदस्य यांनी खटाटोप तरी कशासाठी करावयाचा ?

**तालिका सभापती (श्री.भगवान साळुंखे)** :मी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना सांगू इच्छितो की,सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांचे भाषण झाल्यानंतर आपलाच नंबर आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, एखाद्या सन्माननीय सदस्यांच्या भाषणानंतर माझा नंबर असेल. शेवटी द्या, काही अडचण नाही. मी येथे महत्वाचा विषय मांडलेला आहे की, सुरुवातीला सन्माननीय सदस्यांनी सदरहू प्रस्ताव मांडल्यानंतर त्याला समर्थन करणारे सन्माननीय सदस्य भाषण करतील. तो प्रस्ताव येथे मांडल्यानंतर सभागृहाची प्रॉपर्टी होते, याबद्दल दुमत नाही. समोरच्या बाकावरुन जे प्रस्ताव मांडण्यात आले, त्यावर आम्ही देखील अनेक वेळा आमचे विचार मांडलेले आहेत. परंतु याची जी काही नियमावली असेल त्यानुसार कामकाज करावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी आपले भाषण सुरु करावे.

. . . .एफ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, स्त्री स्वातंत्र्यासाठी गर्भपाताची देखील आवश्यकता आहे यासाठी युरोपामध्ये, पाश्चात्य देशात अनेक वेळा आंदोलने झाली. आज गर्भपातावर नियंत्रण आले पाहिजे यासाठी या सदनामध्ये आपण चर्चा करीत आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी सासूचा प्रश्न उपस्थित केला. पण प्रश्न सासवांचा नाही. "माता न तू वैरीणी" असे म्हणणे फार सोपे आहे, स्त्रीला दोष देणे फार सोपे आहे. पण या महाराष्ट्रातील कन्येचे शूर्पणकेचे नाक कापले गेले आणि जेव्हा तुमच्या-आमच्या सीतामाईला वनवासामध्ये धाडण्यात आले, तेव्हा पासून पुरुषी सत्ता या देशामध्ये लागू झाली आणि स्त्रीला मागे ढकलण्यात आले. रामायण आणि महाभारतानेच या देशातील मातृसत्ताक सत्ता हटविली आणि पुरुष सत्ता येथे लादली. त्यानंतर हे सगळे प्रश्न निर्माण झालेले आहेत. अशा वेळी स्त्री-भ्रूण हत्येचा प्रश्न हा स्त्री मानसिकतेचा नाही तर पुरुष मानसिकतेचा आहे आणि त्यामुळे स्त्रीला दोष देणे अतिशय चुकीचे आहे आणि याचा वारंवार उल्लेख होत आहे म्हणून मी आवर्जून याकडे लक्ष वेधतो.

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी हुंड्याबाबत उल्लेख केला. असे सांगण्यात आले की, जेथे गरिबी आहे, अज्ञान आहे तेथे या प्रथांना सुरुवात झाली. जगाचा इतिहास असे सांगतो की, जेव्हा माणूस रानटी अवस्थेतून संस्कृतीकडे वळला, सभ्यतेकडे वळला, त्याचवेळेला या सुधारलेल्या माणसाने अत्यंत रानटी, निर्दय,असंस्कृत आणि अमानुष प्रथांना सुध्दा जन्म दिला आणि या गोष्टी माणसाच्याच डोक्यातून आलेल्या आहेत. मग ती गुलामी असेल किंवा स्त्रीच्या स्वातंत्र्याचे हरण असेल. या सगळया गोष्टी पुरुषांनी जाणीवपूर्वक लादलेल्या आहेत. म्हणून हुंडा घेतल्याचे कुठे दिसते ? तर ते गरिबांच्या बाबतीत दिसत नाही. ही प्रथा श्रीमंतामुळे स्वतःच्या प्रदर्शनासाठी जन्माला आली आणि त्या संपन्नतेच्या हव्यासातून या गोष्टीला सुरुवात झ ाली आहे. स्त्री-भ्रूण हत्येचे प्रमाण संपन्न भागात अधिक आहे. आता हे प्रमाण खालपर्यंत पाझरले आहे ही गोष्टही खरी आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब सांगत होते की, भामरागड आणि गडचिरोली येथे हे प्रमाण नगण्य आहे.तेथे पुरुषांपेक्षा स्त्रियांची संख्या जास्त आहे. या देशातील जुनी मातृसत्ताक पध्दती आजही या राज्यातील, देशातील आदिम जमातीने जपून ठेवलेली आहे.जे या व्यवस्थेतून बाहेर पडले,जे स्वतःला सुसंस्कृत म्हणावणारे होते, त्यांनी स्त्रियांची हत्या केली आणि ज्यांना असंस्कृत ठरविले,ज्यांना आदिवासी ठरविले,ज्याना शहरी समाजाने तथाकथित रानटी ठरविले,त्या सगळया समाजाने आज देखील स्त्रीची सत्ता कायम ठेवली



श्री.कपिल पाटील . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. भामरागड आणि गडचिरोली मधील जो आकडा आहे, तोच ठाणे जिल्ह्यातील आदिवासी पट्टयातील आहे.

सभापती महोदय,याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी पुण्याचा बरोबर उल्लेख केला. पुण्याच्या एका नामांकित इस्पितळामध्ये 18 सोनोग्राफीची मशीन आहेत. या देशामध्ये वर्षभरामध्ये सव्वा लाख सोनोग्राफीची मशीन विकली गेली आहेत. त्यातील 25 हजार महाराष्ट्रात विकली गेली. कदाचित हा आकडा जास्तच आहे. एवढया प्रमाणात ही मशीन कशी विकली गेली याचा आपण शोध घेतला पाहिजे. याबाबत कंपन्यांनी आपला अहवाल देण्याची आवश्यकता आहे. पण ते देत नाहीत आणि त्याचा जर शोध घेतला नाही तर ते बरोबर नाही. या ठिकाणी राज्य शासनाच्या इच्छा शक्तीचा प्रश्न आहे. स्त्री-भ्रूण हत्येच्या बाबतीत जे आकडे समोर आले, हॉस्पिटलवर ज्या धाडी घालण्यात आल्या, त्या सरकारी यंत्रणेने घातलेल्या नाहीत, तर श्रीमती वर्षा देशपांडे आणि त्या चळवळीमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन पोलिसांच्या मदतीने या धाडी घातल्या तेव्हा सरकार जागे झाले. मात्र एरवी सरकार झोपलेले असते. याठिकाणी सरकारच्या इच्छाशक्तीचा प्रश्न आहे. सरकारने ठरविले तर आपल्याला या गोष्टी जरुर रोखता येतील. एक गोष्ट खरी आहे की, विज्ञानावर, तंत्रज्ञानावर बंदी घालून किंवा त्याला रोखून हे करता येणार नाही. सोनोग्राफीला किंवा पोर्टेबल सोनोग्राफीला रोखून हे थांबविता येणार नाही. यासाठी मानसिकता बदलावी लागेल आणि ती मानसिकता या राज्यात आपण बदलली पाहिजे.कारण हे राज्य सावित्रीबाई फुले, जिजामाता यांचे आहे,अहिल्यादेवींचे आहे, फातिमा शेखचे आहे, चाँदबिबीचे आहे. महाराष्ट्र राज्यात आपण एका बाजूला स्त्रीचे गोडवे गातो, परंतु आजही हा महाराष्ट्र शूर्पणकेचा आहे की, जिचे नाक आजही कापलेले आहे आणि या भ्रूण हत्येच्या माध्यमातून आपण पुन्हा एकदा सरसकट सगळया स्त्रियांचे नाक कापलेले आहे. तसेच या प्रश्नाकडे सरकार कसे पहात आहे हा मुद्दा आहे.

सभापती महोदय, या सगळयामध्ये एका मूळ प्रश्नाकडे लक्ष वेधण्याची आवश्यकता आहे की हे प्रमाण अलीकडच्या काळामध्ये का वाढले आहे ? पूर्वी मुलगी नको होती या सगळया गोष्टी आहेत. ती का नको असते याच्या कारणाबाबत सांगावयाचे तर आपण सुधारणा म्हणून ज्या काही गोष्टी केल्या त्यांनी भर घातलेली आहे आणि ती बाब म्हणजे तिसरे अपत्य नको. तिसरे अपत्य झाले तर तुम्हाला सवलती मिळणार नाहीत, रेशनकार्ड वरील सवलती कमी होतील, तुम्हाला निवडणूक लढविण्यासाठी बंदी केली जाईल आणि त्यामुळे ज्याची निवडणुकीला उभे राहण्याची पत



श्री.कपिल पाटील . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे, असा पत असलेला वर्ग स्त्री-भ्रूण हत्या करण्यास सरसावला आणि गरीब स्त्री-भ्रूण हत्या या भीतीने करतो की,तिसरे अपत्य झाले तर माझ्या सर्व सोयी-सवलती बंद होणार आहेत.एका बाजूला तिसऱ्या अपत्याच्या तथाकथित बंदीबाबत पण आपण फार सोपे उपाय शोधतो.अर्थात मी त्याच्या विरोधात नाही.परंतु कुटुंब नियोजनाच्या बाबतीत इतके सोपे उपाय शोधता येणार नाहीत. ज्या देशामध्ये विविध प्रकारची संस्कृती आहे, विविध चालीरिती आहेत, भिन्न वंशाचे, संस्कृतीचे लोक आहेत, वेगवेगळी भौगोलिक स्थिती आहे,तेथे आपण जर पाश्चात्य पध्दतीने सोपी उत्तरे शोधली तर या प्रश्नांची उत्तरे मिळणार नाहीत. तिसऱ्या अपत्याच्या अटींमुळे घोटाळा करुन ठेवला आहे, एका बाजूला मुलांचे प्रचंड कुपोषण होत आहे. हे अगदी गरीब वर्गातच नाही तर सगळया वर्गात म्हणजे वरच्या वर्गापासून कनिष्ठ वर्गापर्यंत ही स्थिती आहे. आज माणसे शिक्षणावर जास्त खर्च करतात आणि पोटासाठी कमी खर्च करतात. आईला उपाशी ठेवतात. उपास-तापास यामुळे वाढलेले आहेत.

यानंतर श्री.बरवड . .. .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ......

कोणत्या तरी देवीला प्रसन्न करण्यासाठी या राज्यातील लोक उपवास करीत नाहीत. या राज्यातील महिला रोज उपाशी राहतात, अर्धपोटी झोपतात याचे कारण त्यांना आपल्या मुलांच्या शिक्षणाची काळजी असते. आपल्या मुलांची काळजी असते. त्यातून मग मुलगा की मुलगी याचा विचार करीत असताना मुलीकडे थोडसे अधिक दुर्लक्ष होते. मग तिला उपाशी मारले जाते हा एक भाग आहे आणि दुसरा भाग असा की, त्याचा दुसरा टोकाचा परिणाम हा भ्रूणहत्येचा आहे.

सभापती महोदय, मी यातील पुरुषी मानसिकता बदलण्याची का आवश्यकता आहे हे वारंवार सांगत होतो. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले साहेबांनी रामायण आणि महाभारताचा उल्लेख केला. जेव्हा सीतामाई अहिल्येला भेटावयास गेली आणि सीतामाई अहिल्येला म्हणाली की, माते मला तुझी कथा ऐकावयाची आहे. माता म्हणाली की, तुझा नवरा किती मोकळ्या मनाचा आणि स्वतंत्र विचाराचा आहे. युगानयुगे मी शिळा होऊन पडले होते पण त्याच्या पदस्पर्शाने मी मोकळी झाले आणि मला स्वातंत्र्य उपभोगावयास मिळाले. कारण माझे मन जिवंत असले तरी माझे शरीर दगड झाले होते. पण जो स्वतंत्र विचाराचा आहे त्या तुझ्या रामामुळे मी मोकळी झाले. मग अहिल्यामाता म्हणते, सीतामाई, मला तुझी कथा सांग. त्यावर सीतामाई म्हणते, ज्या माझ्या नवऱ्याने तुला मुक्त केले त्याच माझ्या नवऱ्याने मला अग्निपरीक्षा द्यावयास लावली. दुसऱ्यासाठी स्वातंत्र्य आहे पण स्वतःच्या बायकोसाठी स्वातंत्र्य नाही. सीतेचे हे उद्‌गार ऐकल्यावर अहिल्येचे मन सुध्दा दगड बनले आणि आजही ते दगडच आहे. अहिल्या म्हणाली की, पूर्वी माझे शरीर दगड झाले होते पण आज माझे मनही दगड झाले आहे. दुःख अहिल्येला, रेणुकेला सुध्दा भोगावे लागले, या पृथ्वीवर स्त्री ही निर्मिका आहे पण ती स्वतःचे सुख निर्माण करु शकत नाही. ती वंश निर्माण करते. पण स्वतःच्या सुखाच्या बाबतीत ती वांझ आहे. म्हणून युगानयुगे अहिल्या आणि रेणुका आपल्या वेदनेमध्ये तशाच थिजून राहिलेल्या आहेत. पण त्या अहिल्येला, त्या रेणुकेला एक विश्वास आहे की, तिच्या पोटात येणारी उद्याची सीता, उद्याची द्रौपदी बंड करुन उठणार आहे. ती बंड करुन उठावी यासाठी जो महाप्रयास करण्याची आवश्यकता आहे तो आपण केला पाहिजे. तो जर आपण करु शकलो तर स्त्रीला पुन्हा एकदा मोकळे करणे, तिला पुन्हा एकदा स्वातंत्र्य देणे या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

साठी संस्काराकरिता शालेय अभ्यासक्रमापासून आपल्याला बदल घडवावे लागतील. संस्कारांमध्ये, धार्मिक रुढींमध्ये बदल घडवावे लागतील आणि सर्व धर्मांच्या लोकांना विश्वासात घ्यावे लागेल. कोणत्याही धर्माने स्त्री भ्रूणहत्येला परवानगी दिलेली नाही. सर्व धर्मांनी गर्भपाताला विरोधच केलेला आहे. ज्यावेळी मुलीचा बळी दिला जावयाचा, स्त्रीचा बळी दिला जावयाचा त्यावेळी पैगंबराने त्याला विरोध करुन सांगितले की, असा बळी देणे चुकीचे आहे आणि पहिल्यांदा त्या स्त्रीला मोकळे केले. पण रुढी अशी बनत गेलेली आहे त्यामुळे या सर्व धर्मप्रवाहांना, सर्व पंथप्रवाहांना विश्वासात घेऊन नवे बदल घडवावे लागतील आणि त्यासाठी इच्छाशक्ती हवी. एका बाजूला कायदा कडक हवा तर दुसऱ्या बाजूला सबंध शिक्षण व्यवस्थेमध्ये अमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी माननीय शिक्षण मंत्री तसेच शिक्षण राज्यमंत्री उपस्थित आहेत. माननीय शिक्षण राज्यमंत्री आरोग्य राज्यमंत्री म्हणून उत्तर देणार आहेत. पण या ठिकाणी माननीय शिक्षण मंत्रीही उपस्थित आहेत. आपल्या सबंध शिक्षणक्रमामध्ये जो लिंगभेद ठासून भरलेला आहे तो जोपर्यंत आपण दुरुस्त करीत नाही तोपर्यंत स्त्री भ्रूणहत्या होत राहील. तोपर्यंत स्त्रीवर अत्याचार होत राहील आणि आपण कितीही पुरोगामीपणाची भाषा करीत राहिलो तरी राम अहिल्येला मुक्त करील पण सीतेला मात्र वनवासात धाडील, सीतेला अग्निपरीक्षा द्यावयास लावत राहील. त्या वेळी आपण काय करणार हा माझा प्रश्न आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ AKN/ KGS/ MMP

श्री. भाई जगताप ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, आमचे सहकारी या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी अतिशय संवेदनशील विषयावर या सभागृहामध्ये जी चर्चा घडवून आणलेली आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. या विषयावर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत तसेच अनेक सन्माननीय सदस्यांनी काही सूचना केलेल्या आहेत. मला माहीत आहे की, वेळेअभावी या विषयावर सविस्तर किंवा विस्तृत बोलता येणार नाही तरी सुध्दा या अतिसंवेदनशील विषयाच्या बाबतीत काही सूचना करणार आहे तसेच समाजामध्ये आपली जी मानसिकता बदलणे आवश्यक आहे त्या बाबतीत काही गोष्टींचा या ठिकाणी उल्लेख करणार आहे.

सभापती महोदय, ज्यावेळी आपण या सगळ्या विषयाच्या बाबतीत आढावा घेत आहोत त्यावेळी सरकार कोणाचेही असले तरी ही गोष्ट आपल्याला मान्यच करुन चालावी लागेल की, जोपर्यंत सरकार काही गोष्टींच्या बाबतीत डिटरंट बंधन घालू शकेल पण ही मानसिकता नसेल तर बंधने झुगारली जातात. समाजाचा हा प्रवाह असा आहे की, त्याने अनेक वेळा ही बंधने झुगारुन क्रांती घडविलेली आहे, हे आपल्याला माहीत आहे. म्हणून आता उलटी क्रांती आवश्यक आहे असे मला वाटते. कोणत्या तरी विशिष्ट समाजाची अशी मानसिकता आहे असे मला वाटत नाही. मी एका गोष्टीचा मुद्दाम उल्लेख करीन की, ज्या सुशिक्षित समाजाचे तुम्ही आम्ही घटक आहोत त्या सुशिक्षित समाजामध्येच दुर्दैवाने या घटना जास्तीत जास्त घडत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांच्या या मताशी मी सहमत आहे. आजही आपण आदिवासी भागामध्ये गेलात किंवा गरीब लोकांच्या भागामध्ये गेलात तर त्या ठिकाणी हा प्रकार असला तरी तो अगदी नगण्य आहे. सुशिक्षित समाज या प्रवृत्तीचा होत चाललेला आहे ही जास्त चिंतेची बाब आहे. म्हणून या बाबतीत समाजाच्या माध्यमातून सरकारला जे काही कायदे असतील, त्यामध्ये ज्या काही सुधारणा करावयाच्या असतील त्या कराव्या लागतीलच. पूर्वीचे कायदे बोथट झाले आहेत म्हणून नवीन कायदे करण्याची तसेच असलेले कायदे अधिक सक्षम करण्याची आवश्यकता आहे. या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्या आणि मी सुध्दा तशी सूचना करतो.

आपण जेव्हा मानसिकतेच्या बाबतीत बोलतो तेव्हा मी आपल्याला एक साधे उदाहरण देऊ

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

इच्छितो नाशिक महानगरपालिकेमध्ये 108 सभासदांपैकी 40 नगरसेविका आहेत. हे उदाहरण फार बोलके आहे. त्या 40 नगरसेविकांपैकी 6 नगरसेविका स्थायी समितीवर सदस्य आहेत. परंतु जो सायलेंट ऑब्झर्व्हर लावावयाचा आहे तो अजून मंजूर झालेला नाही. ही जर मानसिकता असेल तर आपण काय करणार हा महत्वाचा प्रश्न राहणार आहे. सायलेंट ऑब्झर्व्हरने सगळेच काही थांबले जाईल असे मानण्याचे कारण नाही. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी याबाबत सांगितले. परंतु या गोष्टीची आपल्या मनामध्ये कोठे ना कोठे भीती म्हणा किंवा जाणीव राहते की, मी असे केले तर असे होईल आणि त्यामुळे बऱ्याच प्रमाणात फरक पडतो, हे सगळ्यांना माहीत आहे. त्याच्याही पुढे जाऊन आज ॲक्टीव ट्रॅकर म्हणून त्याच्या पुढचे आयुध किंवा मशिन तयार झालेले आहे त्याच्या माध्यमातून आपल्याला अधिक सक्षमपणे काम करता येईल. यामध्ये सरकारची जबाबदारी आहे याबद्दल दुमत नाही परंतु ज्या एन.जी.ओ. काम करतात त्यांनाही आपण बरोबर घ्यावे. हा अतिशय गुंतागुंतीचा प्रश्न आहे. हा प्रश्न इतका सरळ नाही. कोणाला कितीही दोष दिला तरी सुध्दा जोपर्यंत या सगळ्यामध्ये वेगळ्या प्रकारचा माहोल तयार होत नाही, जोपर्यंत वेगळ्या प्रकारची क्रांती होत नाही तोपर्यंत यातून फारसे काही निष्पन्न होईल असे मला वाटत नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी सांगितल्याप्रमाणे मी स्वत: दोन मुलींचा बाप आहे. पृथ्वीतलावर सगळ्यात जास्त आनंदी बाप जर कोणी असेल तर तो भाई जगताप आहे, हे मी नेहमी सांगतो. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी वर्षाताईंचा उल्लेख केला. लेक लाडकी हे अभियान आम्ही गेली दोन वर्षे संपूर्ण राज्यामध्ये राबवित आहोत. कोणतेही फोटो न काढता, तिकडे कोणत्याही मुलाखती न देता, कसल्याही प्रकारे कोणालाही भरीस न पाडता राबवित आहोत. या ठिकाणी कोल्हापूरचे उदाहरण देण्यात आले तसेच बाकीची उदाहरणे दिली गेली. आम्ही गेली दोन वर्षे सातत्याने हे काम करीत आहोत. आम्ही त्याला विशिष्ट नाव वगैरे दिलेले नाही. नाव देण्यास माझी काहीच हरकत नाही. या बाबतीत असे सांगण्यात आले की 'अजित' असे नाव असावे. 'अजित' नाव असण्यापेक्षा 'अजिता' असे नाव असेल तर ते स्त्रीदर्शक असेल. अजिता म्हणजे पृथ्वी. परंतु अशा अनेक संघटनांची आवश्यकता आहे. मला शासनाला

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ AKN/ KGS/ MMP

श्री. भाई जगताप .....

स्पेसिफिक प्रश्न विचारावयाचा आहे आणि माननीय मंत्री महोदय त्याचे उत्तर देतील अशी मला अपेक्षा आहे. आपण स्वत: एक संवेदनशील महिला आहात. सर्वच प्रश्नांच्या बाबतीत आम्ही ते पाहिलेले आहे. ज्यावेळेला या समितीची निर्मिती झाली त्यानंतर गेली दोन वर्षे आम्ही सातत्याने सांगत आहोत की, अशा सामाजिक प्रश्नांच्या बाबतीत जे कोणी काम करीत असतील त्यांना बरोबर घेण्यामध्ये शासनाची काय अडचण आहे ? श्रीमती वर्षा देशपांडे ही महिला माझ्या नात्यातील नाही.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ AKN/ MMP/ पूर्वी श्री.बरवड 11:10

श्री.भाई जगताप....

आज या राज्यामध्ये अतिशय प्रभावीपणे काम करुन त्यांनी ही प्रकरणे उघडकीस आणली आहेत. त्या आमच्या भगिनीने या कामात पुढाकार घेतला आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना मी सांगू इच्छितो की, आपण आपले भाषण आटोपते घ्यावे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मी आताच माझ्या भाषणाला सुरुवात केलेली आहे.

**तालिका सभापती** : आपण भाषण सुरु करुन 7 मिनिटे झालेली आहेत. या प्रस्तावावर आणखी काही सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. परंतु मी सर्व सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, काल या प्रस्तावावर दीड तास व आज आतापर्यंत सव्वा तास म्हणजे एकूण पावणे तीन तास चर्चा झालेली आहे. या विशेष बैठकीतच या प्रस्तावावरील चर्चा मंत्री महोदयांच्या उत्तरासहित पूर्ण करावयाची आहे. तेव्हा मी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना विनंती करतो की, आपण आपले भाषण दोन मिनिटात संपवावे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, मी एक अत्यंत महत्वाची बाब आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा सुरु करताना प्रथम बोलणाऱ्या सन्माननीय सदस्यांना साधारणपणे 20 ते 30 मिनिटांचा वेळ दिला जातो. परंतु शेवटच्या सन्माननीय सदस्यांना मात्र 2 ते 5 मिनिटांचा वेळ दिला जातो. ही जी प्रथा आहे ती आपण बदलली पाहिजे. काँग्रेस पक्षाच्या वाट्याला जेवढा वेळ आलेला आहे तेवढा वेळ आम्हाला मिळाला पाहिजे. काँग्रेस पक्षाकडून केवळ मी बोललो आहे आणि आता सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप हे बोलत आहेत. माझी आपल्याला विनंती आहे की, आपण वेळेचे समान वाटप करावे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.नवले यांच्या माहितीसाठी सांगतो की, काँग्रेस पक्षातील सन्माननीय सदस्या श्रीमती अलकाताई देसाई, श्रीमती दीप्तीताई चवधरी यांची भाषणे झालेली आहेत. मी आपल्या भावना माननीय सभापतींच्या कानावर घालतो.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, ठीक आहे, मी माझे भाषण लवकर संपवितो. सभापती महोदय, या प्रश्नावर खूप चर्चा करण्यापेक्षा या प्रश्नाची सोडविण्यासाठी काय सुधारणा करणे आवश्यक यावर बोलणे अधिक महत्वाचे आहे. आम्ही काय झेंडे गाडले हे मी सांगण्याचा प्रयत्न

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केलेला नाही. त्या कमिटीमध्ये संवेदनशील माणसांना घेण्याचा प्रयत्न करावा. त्या माणसांच्या विरोधामध्ये सरकारी अधिकारी आहेत. कारण त्या भगिनीने त्यांच्या सर्व चोऱ्या उघडकीस आलेल्या आहेत. त्या भगिनीने प्रचंड काम केलेले आहे. अशा संवेदनशील माणसांना, अशा सदस्यांना त्या कमिटीत घ्यावे अशी नम्रपणे विनंती करतो. यासाठी दोन गोष्टी आवश्यक आहेत. आतापर्यंत शासन 39 केसेसमध्ये हरले आहे. शासनाने या केसेसच्या विरोधात अपील करणे आवश्यक आहे. अपील करण्यापूर्वी त्या केसेसमध्ये शासनाची हार का झाली त्याची कारणमीमांसा शोधणार की नाही ? त्या केसेस योग्य पध्दतीने कोर्टात मांडण्यात आल्या नाहीत, हे त्याचे कारण आहे. अधिकाऱ्यांनी कोर्टाला पुरेशी माहिती दिली नाही. सरकारी वकिलांना यातील काही माहिती नसते. म्हणून या विभागात काम करणाऱ्या वकिलांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. शासनाने अशा कितीही केसेस दाखल केल्या तरी त्या कोर्टात टिकणार नाहीत. त्यातून त्या लोकांचे फावणार आहे. हे लोक त्याचा फायदा घेऊन असे म्हणतील की, बघा आम्ही सुटलो आहोत. म्हणून यासाठी सरकारला यंत्रणा उभी करावी लागेल.

सभापती महोदय, आपल्याकडे रुग्णालयातील सोनोग्राफी मशीन्स तपासण्याची यंत्रणा आहे त्याबाबत माझी सरकारला विनंती आहे. सरकारी रेडिओलॉलिस्टवर खाजगी प्रॅक्टीस करण्यावर बंदी घालण्याचे आदेश काढण्यास काहीच हरकत नाहीत. ही बाब शासनाच्या अखत्यारितीत आहे. त्यांच्या दुकानदारीला शासनाने थांबविले पाहिजे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी असे म्हटले की, आतापयंत किती सोनोग्राफी मशिन्सची विक्री झाली आहे ते सांगावे. सोनोग्राफी सेंटर्स बंद करुन चालणार नाही. कारण तेथे केवळ गर्भनिदानाचे काम चालते असे नाही. शरीराच्या इतर तपासण्या सुध्दा तेथे केल्या जातात. त्याचे स्वरुप मोठे असते. पण या सोनोग्राफी सेंटर्सवर कायद्याचे बंधन टाकू शकतो. ज्या ठिकाणी या मशिन्स जातात त्यांचे ट्रॅक रेकॉर्ड ठेवण्यास काहीच हरकत नाही.

सन्माननीय सदस्यांनी 'एफ' फॉर्मचा उल्लेख केला आहे. आपल्याकडे असलेल्या ज्या क्लिष्ट पध्दती आहेत त्या सोप्या करण्याचा प्रयत्न विभागाने केला पाहिजे. त्या दृष्टीने प्रयत्न कराल अशी मला खात्री वाटते. अनेक मुद्दे मांडावयाचे होते. परंतु वेळेअभावी मी ते मांडणार नाही. अशा अप्रवृत्तींना आळा घालण्यासाठी सध्या पीसीपीएनडीटी किंवा जे प्रचलित दोन कायदे आहेत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...

त्या कायद्यात कडक तरतूद करणे आवश्यक आहे.  जेणे करुन या लोकांना त्याचे भय वाटेल. 8 केसेस अशा आहेत की, ज्यामध्ये डॉक्टरांना जबाबदार धरण्यात येऊन अटक करण्यात आलेली आहे.  अशा केसेसमध्ये डॉक्टर जबाबदार राहणारच आहे, परंतु आई-वडील हे सुध्दा त्याला जबाबदार आहेत. गर्भपात हा सदोष मनुष्यवधाचा गुन्हा समजून त्याच्याशी संबंधित मग डॉक्टर असेल, महिला असेल किंवा तिचा पती असेल किंवा तिला उद्युक्त करणारे जे कोणी असतील त्या सगळयांना आरोपी करावे. त्यांच्याविरुध्द सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची कायद्यात तरतूद करावी अशी विनंती करतो आणि या ठिकाणी थांबतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

------

**तालिका सभापती** :  आता मंत्री महोदयांचे उत्तर सुरु होईल.

श्री.मनीष जैन : सभापती महोदय,  अपक्ष सदस्यांना आपण किमान 2-2 मिनिटे बोलण्याची संधी द्यावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

**तालिका सभापती** :  मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराला सुरुवात करावी.

4.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ AKN/ MMP/

प्रा.फौजिया खान ( सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी नियम 260 अन्वये महत्वाच्या विषयावर चर्चा उपस्थित केलेली आहे. या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्या सर्वश्रीमती दीप्ती चवधरी, शोभा फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्रीमती अलका देसाई, विद्याताई चव्हाण, सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले, प्रा.सुरेश नवले, श्री.धनंजय मुंडे, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री कपिल पाटील व भाई जगताप या सर्वांनी भाग घेतलेला आहे. मी या सर्वांची अतिशय आभारी आहे.

सभापती महोदय, समाजात ही एक सामाजिक जी विकृती निर्माण झालेली आहे या विकृतीसंबंधी सन्माननीय सदस्यांनी चर्चा घडवून आणली त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करते. या सर्व सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगल्या सूचना केलेल्या आहेत, चांगले विचार मांडलेले आहेत. या चर्चेच्या निमित्ताने एक गोष्ट समोर आलेली आहे. हा एक सोशल इव्हिल आहे. त्याला तोंड देण्यासाठी आपण उपाय शोधत आहोत, परंतु ते तेवढे सोपे नाही. सर्वांच्या मदतीने एक समाज म्हणून या अपप्रवृत्तीच्या विरोधात आपण एकसंघपणे उभे राहिलो तर या विकृतीला सामोरे जाता येईल. समाजामध्ये सोशल इव्हिल्स यापूर्वीही होते. सती जाणे, बालविवाह पध्दत, अस्पृश्यता, महिलांना शिक्षण न देणे अशी त्याबाबतची काही उदाहरणे देता येतील. या प्रवृत्तींच्या विरोधात अनेक समाज सुधारकांनी काम केले होते. या समाज सुधारकांना शासनाची व कायद्याची मदत सुध्दा मिळाली होती. मग राजा राममोहन रॉय असोत, महात्मा ज्योतिबा फुले असोत, राजर्षी शाहू महाराज असोत, डॉ.बाबासाहेब आंबेडकर असोत. या लोकांनी पुढाकार घेऊन काम केलेले आहे. त्यामुळे समाजातील या सोशल इव्हिलला आपल्याला हाताळता आले. कायद्याच्या अंमलबजावणी बरोबरच समाजाची मानसिकता बदलण्याची गरज येथे व्यक्त करण्यात आली. 2011 मध्ये झ ाालेल्या जनगणनेतून जी आकडेवारी समोर आलेली आहे. खरोखर शासनाला सुध्दा वाटले की, आता आपल्याला विशेष प्रयत्न करण्याची गरज आहे, विशेष लक्ष देण्याची गरज आहे. त्या दृष्टीने शासनाने पाऊल उचलले आहे. प्रीपोन्ड ॲप्रोच घेण्याची शासनाची स्ट्रॅटेजी आहे. राज्यात पीसीपीएनडीटी व एमटीपी ॲक्ट अस्तित्वात आहे.

यानंतर श्री.शिगम....

MSS/ MMP/ AKN/ पूर्वी श्री. खंदारे 11:20

प्रा. फौजिया खान....

या कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने शासनाने प्रयत्न सुरु केलेले आहेत. त्याच प्रमाणे या बाबतीत लोकप्रबोधन करण्याची, लोकामध्ये नवीन प्रकारचा विचार रुजविण्याची गरज असून शासनाने लोकप्रबोधनाच्या कामाचे नियोजन केलेले आहे.

सभापती महोदय, कायदा हा कधीच फूलप्रूफ नसतो. कालानुरुप कायद्यामध्ये बदल करण्याची गरज असते. त्यामुळे त्या दिशनेही शासनाने पावले उचललेली आहेत. मी सांगितले की हा प्रश्न सोपा नाही. अनेक गुंतागुंतीचा हा प्रश्न आहे. या विषयावर सभागृहामध्ये अभ्यासपूर्ण चर्चा झाली. सर्व सन्माननीय सदस्यांनी मौलिक सूचना केल्या. या प्रश्नाच्या संदर्भात शासनाने समुचित प्राधिकारी नियुक्त केलेले आहेत. आरोग्य विभागाचे जिल्हा शल्य चिकित्सक, महानगरपालिका क्षेत्रामध्ये जिल्हा आरोग्य अधिकारी, तालुका स्तरावर वैद्यकीय अधीक्षक यांची समुचित अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे. महसूल यंत्रणेला देखील याबाबतीत सोबत घेतलेले आहे. जिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी, प्रांत अधिकारी, नायब तहसीलदार, तसेच महानगरपालिकेचे आयुक्त, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची समुचित प्राधिकारी म्हणून नियुक्ती केलेली आहे. राज्यामध्ये पर्यवेक्षक मंडळ स्थापन केलेले असून या मंडळाच्या 5-6 बैठका झालेल्या आहेत. या मंडळाची बीडमध्ये बैठक झाली. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा सल्लागार समिती स्थापन केलेल्या आहेत. तालुकास्तरावर देखील अशा समित्या स्थापन केलेल्या आहेत. एक विशेष कक्षही स्थापन केलेला आहे. कायदेशीर बाबी तपासण्यासाठी स्टेट लेव्हल कमिशन फॉर फॅमिली वेल्फेअर निर्माण केलेले आहे. जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्स निर्माण करण्याचे ठरविलेले आहे. याबाबत केन्द्र सरकारला कळविलेले आहे. हे सर्व करीत असताना 8 सर्कलमध्ये 9 इन्व्हेस्टिगेशन सेल निर्माण करण्याचा प्रस्ताव केन्द शासनाकडे पाठविलेला आहे. यामध्ये निवृत्त पोलीस उपायुक्त, मिलिटरी ऑफिसर, जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्ह्याचे पब्लिक प्रासिक्युटर यांचा समावेश असणार आहे. या इन्व्हेस्टिगेशन सेलसाठी 98 लाख रु. खर्च अपेक्षित आहे.

सभापती महोदय, आपण स्टिंग ऑपरेशनद्वारे अनेक सोनोग्राफी सेंटरवर धाडी टाकून मशिन्स सील केल्या आहेत. त्यांच्या विरुध्द कोर्टात केसेस दाखल केलेल्या आहेत. विविध प्रकारे कारवाई करण्याचा शासनाने प्रयत्न केलेला आहे. राज्यस्तरीय पथकाने औरंगाबाद, लातूर, बीड,

..2..

प्रा. फौजिया खान...

वाशिम, धुळे, जळगाव अशा अनेक जिल्ह्यामध्ये डिकॉय केसस केलेल्या आहेत. आरसीएफ फंडातून 284.40 लाख रु.ची तरतूद या उपक्रमासाठी करण्यात आलेली आहे. माननीय मंत्री महोदयांनी कंपनी मॅन्युफॅक्चरर्स् बरोबर बैठका घेण्याचे ठरविलेले आहे. या प्रश्नासंबंधी शासनाकडून कोणकोणते उपक्रम राबविले जात आहेत यासंबंधीचे उत्तर मंत्री महोदयांनी विधानसभेमध्ये देखील दिलेले आहे. कौटुंबीक प्रबोधन करण्यासंबंधीचा आराखडा करण्यासंबंधी राज्य पर्यवेक्षक मंडळाच्या दोन-तीन बैठका झाल्या. सिनेकलाकर सचिन पिळगावकर आणि सुप्रिया यांना ब्रॅण्ड ॲम्बॅसॅडर केलेले आहे. होर्डिंग्ज लावलेले आहेत, कार्यशाळा घेण्यात येत आहेत. पथनाटय, सी.डी. फिल्म, रॅलीज असे अनेक उपक्रम राबविण्यासंबंधी एक नियोजनबद्ध आराखडा आपण करीत आहोत.

डॉ. दीपक सावंत : हे जनजागरणाचे उपक्रम कुठे कुठे चालू आहेत याचे एक उदाहरण सांगावे.

प्रा. फौजिया खान : मी सांगितले की, राज्य पर्यवेक्षक मंडळ स्थापन केलेले आहे. जनजागरणाच्या बाबतीत आपण मोठा आराखडा करीत आहोत. त्यानुसार राज्यामध्ये सर्व उपक्रम आपल्याला करावयाचे आहेत. परभणी येथे 15 ऑगस्टला मोठी रॅली निघणार आहे. अनेक कार्यक्रम झालेले आहेत. चर्चासत्रे झालेली आहेत, रॅलीज झालेल्या आहेत आणि होणार आहेत. या कार्यक्रमांचे न्यूजकटिंग आता माझ्याकडे नाही. परंतु मी ती माहिती पटलावर ठेवू शकते. जजेस, वकील यांच्यासाठी, सेन्सेटायझेशनसाठी चर्चासत्रांचा कार्यक्रम घेण्यात आलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी सांगितले की, जजेस, वकील यांना देखील या प्रश्नाच्या अनुषंगाने ट्रेनिंगची आवश्यकता आहे. कारण कोर्टामध्ये केस दाखल करीत असताना ते प्रापर्ली सेन्सेटाईज असतील तर केस चांगल्या प्रकारे मांडू शकतील आणि गुन्हेगाराला कोर्टामध्ये शिक्षा होऊ शकेल. तेव्हा अशा सर्व प्रकारच्या प्रबोधनावर शासनाने लक्ष दिलेले आहे. राज्यामध्ये 44 चर्चासत्रे "हॅलो सखी" आणि "जय महाराष्ट्र" या कार्यक्रमाद्वारे झाली. आपण हेल्पलाईन देखील सुरु केलेली आहे. त्यास अतिशय चांगला प्रतिसाद मिळत आहे. ही हेल्पलाईन सुरु केल्यानंतर 11 जुलैला 20 तक्रारी आल्या होत्या. हेल्पलाईन तीनअंकी करण्याचा प्रयत्न शासन करीत आहे. 1 ऑगस्ट पासून "wwwaamchimulgi.com" वेबसाईट सुरु केलेली आहे. या वेबसाईटवरुन देखील तक्रारी करता येतील. गर्भपाताची औषधे खुलेआम विकण्यात येतात. त्यावर शासनाने बंधन आणण्याचे

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान...

ठरविलेले आहे. प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केलेली आहे. त्यांचा रिपोर्ट आलेला आहे. त्या समितीचे मत घेऊन आपण ठरविलेले आहे की,

...नंतर श्री. भोगले...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ AKN/ पूर्वी श्री.शिगम.... 11:30

प्रा.फौजिया खान.........

ही औषधे over the counter मिळू नयेत, त्यासाठी prescriptionची गरज असावी. ते prescription Registered Practitioner असलेल्या Radiologist वा Gynacologistकडून उपलब्ध व्हावे अशा पध्दतीची रचना केलेली आहे.......

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, पटलावर चुकीची माहिती राहू नये. रेडिऑलॉजिस्ट प्रिस्क्राईब करु शकत नाही असा नियम आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, माझी विनंती आहे की, मला डिस्टर्ब करु नये. शासनाकडून जे काही प्रयत्न केले जात आहेत ते सभागृहाला सांगण्याचा मी प्रयत्न करीत आहे. मला शासनाची बाजू मांडण्याचा अधिकार आहे. त्यामुळे माननीय सदस्यांनी माझे उत्तराचे भाषण ऐकून घ्यावे.

श्री.विनोद तावडे : सरकारला या घटना थांबविण्याचा अधिकार असताना स्त्रीभ्रूण हत्येच्या घटना का थांबविल्या जात नाहीत? कोणत्या ठिकाणी बैठका झाल्या? सहा-सहा महिने बैठका झालेल्या नाहीत.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, ऑब्जेक्शन कशाबद्दल घेतले जाते तेच मला कळत नाही.

श्री.विनोद तावडे : मंत्री महोदया, आपल्याला विषयच कळत नाही.

प्रा.फौजिया खान : जी काही इम्प्रूव्हमेंट झाली आहे त्याबद्दल मी बोलणार आहे. त्यामुळे मला डिस्टर्ब करणे योग्य नाही. शासनाला माहिती आहे की, युएसजी सेंटर आहेत त्या ठिकाणी स्टींग ऑपरेशन करण्यात आले. या संदर्भातील कायदा केंद्राचा असला तरी झालेले प्रयत्न पुरेसे नाहीत. त्यामुळे फक्त स्टींग ऑपरेशन करण्यामुळे हे प्रकार संपले असा मला दावा करावयाचा नाही हे मी सुरुवातीलाच सांगितले आहे. माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांचे मी आभार मानते. त्यांनी सांगितले की, सर्व लोकप्रतिनिधींची सुध्दा ही जबाबदारी आहे, त्यांनी आपापल्या क्षेत्रात, आपापल्या विभागामध्ये या संदर्भात दक्ष राहून कायद्यातील तरतुदींची कठोर अंमलबजावणी होण्याबाबत काय करता येईल याचा विचार केला पाहिजे. या social evil साठी जे जे काही करता येईल ते करण्याची शासनाची तयारी आहे. जे काही झाले ते पुरेसे आहे असे नसून अधिक सतर्क होऊन खूप प्रभावी काम करावयाचे आहे, त्याची सुरुवात आपण केलेली आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान........

सभापती महोदय, स्त्रियांचे समाजामधील Status जोपर्यंत Raise होत नाही तोपर्यंत हा प्रश्न मिटणार नाही. समाजातील स्त्रियांचे Status Raise करण्यासाठी शासनाकडून काय प्रयत्न केले जात आहेत हे सांगण्याची गरज आहे. ही फक्त सार्वजनिक आरोग्य विभागाची जबाबदारी नाही. अनेक विभागांच्या माध्यमातून अनेक प्रकारचे उपक्रम आपण राबवित आहोत. सर्वप्रथम 1994 मध्ये महिला धोरण आणण्यात आले आणि त्याची अंमलबजावणी सुरु झाली. अंमलबजावणी किती प्रभावी झाली हे सुध्दा पाहण्याची गरज आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी महिलांच्या दृष्टीने आर्थिक क्षेत्रावर भर देण्याचा उल्लेख केला होता. त्या दृष्टीने शासनाने बचत गटांची मोहीम राबविण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी राज्यात अनेक उपक्रम राबविले गेले आहेत. महिलांना बचत गटामार्फत 4 टक्के व्याज दराने कर्ज पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या शिवाय राजकीय क्षेत्रात महिलांना 50 टक्के आरक्षण देऊन त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सहभागी करुन घेण्याचे पाऊल उचलण्यात आले. शिक्षण क्षेत्रामध्ये मुलींसाठी 12वी पर्यंत मोफत शिक्षणाची व्यवस्था केलेली आहे. उच्च शिक्षण आणि Professional Courses साठी 30 टक्के आरक्षण दिले आहे. अकरावी ते बारावीपर्यंत 30 टक्के आरक्षण देण्याचा विचार करीत आहोत. आज राज्यातील पोलीस दलामध्ये महिला पोलीस शिपाई मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत. शासनाच्या प्रयत्नांमुळे अनेक क्षेत्रात महिला पुढे येत आहेत. महिलांना रोजगारामध्ये, शिक्षणामध्ये, राजकीय क्षेत्रामध्ये, सामाजिक क्षेत्रामध्ये, आर्थिक क्षेत्रामध्ये पुढे आणण्याच्या दृष्टीने शासनाकडून प्रयत्न केले जात आहेत.

सभापती महोदय, अनेक माननीय सदस्यांनी कायद्यामध्ये बदल करण्याच्या दृष्टीने सूचना केलेली आहे. त्याबरोबरच ऑनलाईन फॉर्मबाबत सुध्दा सूचना केलेली आहे. केंद्र सरकारच्या वेब साईटवर ऑनलाईन फॉर्म देता येतो. ऑनलाईन फॉर्म सादर करण्याची सक्ती करणे गरजेचे आहे. या संदर्भात अभ्यास करुन काय modification करता येईल याचा विचार केला जाईल आणि राज्याच्या वेब साईटवर ही सुविधा देण्याचा विचार केला जाईल.

सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी संपूर्ण कुटुंब हे महिलेचे असते. त्यामुळे संपूर्ण कुटुंबाचे कौन्सिलिंग करणे गरजेचे आहे असे सांगितले होते. पहिली मुलगी

..3...



SGB/ MMP/ AKN/ पूर्वी श्री.शिगम.... 11:30

प्रा.फौजिया खान........

झाल्यानंतर दुसऱ्या मुलीसाठी त्या कुटुंबाची मानसिकता तयार व्हावी या दृष्टीने कौन्सिलिंग करण्याची त्यांनी सूचना केली आहे. या संदर्भात जरुर विचार करता येईल.

सभापती महोदय, मी सभागृहाला माननीय हायकोर्टाचे एक जज्जमेंट वाचून दाखविते. या ठिकाणी असा उल्लेख झाला की, प्रकरणे न्यायालयात दाखल होतात परंतु शिक्षा होत नाही किंवा वर्षानुवर्षे प्रकरणे न्यायालयात प्रलंबित राहतात, त्यामुळे ते डिटरन्ट होत नाही. माननीय हायकोर्टाने दिनांक 6 जून, 2011 रोजी श्रीमती सुहासिनी उमेश करंजकर यांच्या प्रकरणात जे जज्जमेंट दिले आहे त्यात म्हटले आहे की, "We are also distressed by the fact that number of cases of trials of offences registered under the Act pending in courts of the Judicial Magistrate First Class for a long period, sometime upto 6 years and in few cases as long as 6-8 years. It is therefore, directed that all cases under the Act shall be taken up on top priority basis by the Metropolitan Magistrate in Mumbai and Judicial Magistrate First Class in other districts shall try and decides such cases with utmost priority and preferably within one year. Criminal cases instituted in the year 2010 and prior thereto shall be tried and decided by 31st December, 2011." म्हणजे न्यायपालिकेने सुध्दा याची गंभीर दखल घेतली आहे. त्यात पुढे असे म्हटले आहे की, "A copy of this judgement shall be circulated to the Principal District Judges in all the districts of the State of Maharashtra and State of Goa and to the Chief Metropolitan Magistrate, Mumbai."

सभापती महोदय, समाजातील अनेक घटक याची दखल घेत आहेत. यावर गांभीर्याने पावले उचलली जात आहेत. Special Lawyer प्रत्येक जिल्हयात नियुक्त करण्याची घोषणा माननीय मंत्री महोदयांनी केली आहे. अशा प्रकारचे खटले दाखल करण्यामध्ये आपण कमी पडत असू तर Special Lawyer नियुक्त करणे गरजेचे आहे. जी महिला गर्भवती असते तिचे ट्रॅकिंग करण्यासाठी गावामध्ये अंगणवाडी कार्यकर्ती आणि आशा यांची मदत घेतली जाणार आहे. गावातील अंगणवाडी कार्यकर्ती आणि आशा यांच्याकडे संपूर्ण गावाची माहिती उपलब्ध असते.

..4..



प्रा.फौजिया खान........

त्यांच्याकडून माहिती मागवून घेऊन एखादी महिला गर्भवती असल्यास तिची आरोग्य विषयक माहिती मिळविण्यासाठी एएमसी ट्रॅकिंग पध्दत सुरु करीत आहोत. त्याची प्रक्रिया सुरु आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एएमसी ट्रॅकिंग करुन यावर नियंत्रण ठेवू शकतो. अंगणवाडी कार्यकर्ती आणि आशा यांच्या माध्यमातून शासन अशा घटनांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, माझ्याकडे लेखी स्वरुपात काही सूचना परस्पर आणून दिलेल्या आहेत. त्यामध्ये स्त्री सुरक्षा योजना सुरु करावी असे सुचविले आहे. एखादी मुलगी जन्माला आली आणि ते अर्भक कोणी डस्टबीनमध्ये फेकून दिले.................

नंतर श्री.खर्चे...

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ AKN/ MMP/ पूर्वी श्री. भोगले..... 11:40

प्रा. फौजिया खान ......

अशा अनेक केसेस पाहण्यात येतात. जर कोणी त्या मुलीला उचलून शासनाकडे आणून दिले तर त्यांना 11 हजार रुपये बक्षिस द्यावे, अशीही सूचना आली आहे. त्यात ती व्यक्ती जर शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी असेल तर त्यांना एक वेतनवाढ देण्यात यावी अशाही रँडम सूचना आहेत, या सूचनांचा जरुर विचार करता येईल. सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांनी एक चांगली सूचना केली आहे की, राज्यातील एकूण सोनोग्राफी सेंटर्सचा अभ्यास करुन त्यासंदर्भात एक मास्टर प्लॅन तयार करुन जिल्ह्यात व तालुक्यात किती सोनोग्राफी सेंटर्सची गरज आहे तेवढ्यानाच मान्यता द्यावी. अथवा अशा प्रकारचा बृहत आराखडा तयार करावा ही संकल्पना सुध्दा अतिशय चांगली आहे, हा अभ्यास देखील आपल्याला करता येईल. त्याचबरोबर कोणत्या ठिकाणी किती सोनोग्राफी सेंटर्सची गरज आहे असा विचार केला तरी समजू शकेल की किती सोनोग्राफी सेंटर्सना मान्यता द्यावी किंवा उत्पादकांनी आपल्या सोनोग्राफी मशिन्स विकण्यापूर्वीच शासनाची परवानगी घेऊनच विकाव्यात असाही विचार आपल्याला करता येईल.

महोदय, यानंतर स्कूल एज्युकेशन रिलिजेस स्लॅबच्या बाबतीत सुध्दा येथे सूचना करण्यात आली आहे, याचाही विचार करता येण्यासारखा आहे. महिला धोरणाच्या अनुषंगाने राज्यात ज्या ज्या योजना राबविलेल्या आहेत त्यांच्या इम्पॅक्ट ॲनालिसीसची वेळ सुध्दा आली आहे. कोणत्या स्कीमचा काय इम्पॅक्ट आहे हे त्यातून समजू शकेल. महिलांसाठी आपण शालेय शिक्षण, ट्रायबल वेल्फेअर, महिला बालकल्याण, अल्पसंख्याक, आरोग्य इ. माध्यमातून अनेक उपाययोजना करीत आहोत. यासाठी एखादी एक्स्टर्नल एजन्सी नियुक्त करुन या इम्पॅक्टची तपासणी करता येईल काय, याबाबत शासन भविष्यात विचार करील आणि अशा प्रकारे इम्पॅक्टचे ॲनालिसीस करुन कोणती स्कीम महिलांसाठी किती प्रभावी ठरली हे ठरण्यासाठी आपल्याला युनेस्को, टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस किंवा एखादी एक्स्टर्नल एजन्सी यांच्या माध्यमातून हे काम करता येईल. व त्यांनी केलेल्या शिफारशी माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देता येतील.

महोदय, सभागृहात चर्चा करीत असताना सोनोग्राफी सेंटर्समध्ये सायलेंट ऑब्झर्व्हरचा देखील उल्लेख झालेला आहे, शासनाने देखील तसे प्रयत्न केले आहेत. पण सायलेंट ऑब्झर्व्हर फक्त इमेजेस रेकॉर्ड करते, व त्यामुळे काही साध्य होईल असे मला तरी वाटत नाही. कारण त्यात अनेक पुरुषांनी देखील सोनोग्राफी केलेल्या असल्याने त्या इमेजेस सुध्दा असतात. पण

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान........

त्यातूनच आपल्याला ॲनालिसीस करणे आवश्यक आहे व त्याचाही अभ्यास करणे गरजेचे आहे असे मला वाटते. यासाठी काही तरी प्रॅक्टिकल उपाययोजना करणे महत्वाचे वाटते म्हणून या बाबींचा अभ्यास करुन त्यात कोणत्या इम्प्रुव्हमेंट्स करता येतील, त्या इमेजेसच्या माध्यमातून कशा प्रकारे फायदा घेता येईल याचाही विचार करावा लागणार आहे. पण हा फायदा आपल्याला इनबिल्ट मशिन्स असतील तरच होऊ शकतो. एक्स्टर्नल स्वरुपात सायलेंट ऑब्झर्व्हर असेल तर त्यात लुप होल्स राहण्याची शक्यता आहे पण तरी देखील एक उपाय म्हणून ही सूचना समोर आली आहे, त्याचाही अभ्यास करुन त्यानुसार उपक्रम राबविण्याची शासनाची तयारी आहे. ते बाजूला टाकून चालणार नाही, त्यातून काही ना काही मार्ग काढण्याचे प्रयत्न जरुर करण्यात येतील. अशा प्रकारे ज्या सूचना आहेत त्यांचाही विचार करण्यास शासन तयार आहे व त्यानुसार अभ्यास करुन उपक्रम राबविण्याची शासनाची तयारी आहे. शेवटी मी इतकेच सांगू इच्छिते की, आपल्याला या कामामध्ये अनेक एनजीओज ची मदत होऊ शकते पण जोपर्यंत चळवळीचे स्वरुप त्याला येणार नाही तोपर्यंत यामध्ये क्रांती घडणार नाही हे देखील मी ठामपणे सांगू इच्छिते. कारण सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी अशी घोषणा केली की, ते या कामासाठी एक तालुका दत्तक घेणार आहेत. या माध्यमातून ते एक अत्यंत चांगला कार्यक्रम राबविणार आहेत. तसेच माननीय खासदार श्रीमती सुप्रिया सुळे यांनी देखील हे काम हाती घेतलेले आहे. सभागृहात जैन धर्मगुरुंच्या बाबतीत सुध्दा उल्लेख झालेला आहे, त्यांच्याकडूनही असे प्रयत्न समाजात होत आहेत. मी परवा एका जैन धर्माच्या कार्यक्रमासाठी गेले होते. अशा अनेक सामाजिक संस्था या क्षेत्रात काम करीत आहेत.

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : सभागृहाच्या विशेष बैठकीची वेळ 11.45 वाजेपर्यंत ठरलेली होती पण मंत्री महोदयांचे उत्तर अद्याप बाकी असल्याने मी सभागृहाची वेळ 12.00 वाजेपर्यंत वाढवितो.

प्रा. फौजिया खान : महोदय, मी परभणी जिल्ह्याची पालकमंत्री म्हणून जो कार्यक्रम घेते त्या संदर्भात सांगू इच्छिते की, त्या कार्यक्रमाला आता चळवळीचे स्वरुप येत आहे हे देखील मी सांगणार आहे. लहान लहान गावात आम्ही "लेक वाचवा" मोहीम राबविण्याचे कार्यक्रम घेतो तेथे "रुग्ण कल्याण समिती" च्या माध्यमातून सर्वांनी पुढाकार घेऊन मुलीच्या जन्माचे स्वागत

....3



PFK/ AKN/ MMP/ पूर्वी श्री. भोगले..... 11:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान.......

करण्यासाठी त्यांच्या स्तरावर एक योजना राबवित आहेत. ती योजना म्हणजे मुलगी झाली तेथे हे रुग्ण कल्याण समितीचे लोक भेट देतात व प्रथम सासूचा सन्मान करण्याचा प्रयत्न करतात. मी एकदा एका गावात गेले होते आणि तेथील कार्यक्रम संपल्यानंतर दुसऱ्या गावात गेले तर मलाही आश्चर्य वाटले की त्या गावात साड्यांचे पाच गठ्ठे व्यापारी लोकांनी आणून दिले व आमच्याकडून या साड्या घ्या आणि सासू किंवा मातेला त्या वाटप करा असे त्यांनी सांगितले. ज्या घरात मुलगी झाली त्या निमित्ताने आमच्याकडून ही भेट म्हणून समजण्यात यावी. यावरुनच समाजाचा देखील या कार्यक्रमामध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग होत आहे हे देखील मला अनुभवावयास मिळाले आहे. अशा प्रकारे आपण जो उपक्रम राबवित आहोत तेच कार्यक्रम समाज सुध्दा राबवित आहे व अनेक एनजीओज देखील राबवित आहेत. त्याचबरोबर स्त्री भ्रूण हत्येसंबंधीच्या तक्रारी घेऊन सुध्दा अनेक लोक समोर येऊ लागले ही सुध्दा आनंदाची गोष्ट आहे. शासन अशा सर्व एनजीओज किंवा या क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांची मदत करण्यास तयार आहे. सर्वांच्याच मदतीने हा कार्यक्रम आपण राबविण्याचा प्रयत्न करणार आहोत. सर्वांच्या बरोबर काम करण्याचीही शासनाची तयारी आहे. या निमित्ताने मला आलेला एक एसएमएस मी वाचून दाखविते. या एसएमएसच्या माध्यमातून सोशल इव्हीलसारख्या बाबी हाताळण्यासाठी प्रत्येकाने काय विचार केला पाहिजे हे लक्षात येईल.

"There are millions of people in this world so why you born?
The reason is, god is expecting something from you
which is not possible by millions."

Begin from yourself. त्यामुळे हे काम आपण स्वत:पासून सुरु करावे. यासंदर्भात माननीय शरदरावजी पवार साहेबांनी 40 वर्षापूर्वी एकाच मुलीनंतर शस्त्रक्रिया करुन एक आदर्श घालून दिलेला आहे, माननीय अध्यक्ष श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी सुध्दा आपल्या जीवनात तोच मार्ग अवलंबिलेला आहे. असे अनेक लोक, अनेक अधिकारी आहेत ज्यांनी अशा पध्दतीचे आदर्श घालून दिले आहेत, त्यांना सॅल्यूट करुन मी येथेच थांबते.

------

....4



श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो कारण सभागृहात स्त्री भ्रूण हत्यासंबंधीच्या प्रस्तावाला उत्तर देत असताना त्यांनी अतिशय उत्कृष्ट

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भाषण केले आहे. भाषण चांगले झाले, पण नवीन कोणत्या उपाययोजना शासन करणार आहे हे मात्र त्यांनी सांगितले नाही. यामध्ये शासन नव्याने काय करीत आहे, सन 2001 पासून हे सर्व कार्यक्रम राज्यात सुरुच आहेत, अधिकाऱ्यांच्या कार्यशाळा व बैठका सुध्दा त्यासंदर्भात होतच आहेत, तरी देखील ही वेळ का आली, हा प्रश्न का निर्माण झाला याचे उत्तर मात्र आम्हाला मंत्री महोदयांच्या उत्तरातून मिळाले नाही. यासंदर्भात शासन कोणते ठोस प्रयत्न, कोणते ठोस निर्णय अथवा एखादी नवीन घोषणा करणार अशी अपेक्षा असताना तसे मात्र काहीच सांगण्यात आले नाही. समाजात अनेक सामाजिक संस्था व लोकांच्या पातळीवर सुध्दा असे प्रयत्न होत आहेत पण शासन काय करीत आहे .......

यानंतर श्री. जुन्नरे ....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे...

स्त्रीभ्रूण हत्या थांबविण्याच्या संदर्भात अनेक लोक प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते परंतु यासंदर्भात शासन काहीही प्रयत्न करीत नसल्याचे दिसून येते हा खरा महत्वाचा मुद्दा आहे. स्त्रीभ्रूण हत्त्येच्या संदर्भात शासन आज काही तरी ठोस घोषणा करेल अशी आमची भावना होती. सायलंट ऑब्झर्व्हरमध्ये काही त्रुटी असतील तर ॲक्टीव्ह ट्रॅकर बसविण्याची घोषणा तरी सरकाने करावयास पाहिजे होती. स्त्रीभ्रूण हत्त्येच्या संदर्भात 302 कलम लावण्याची मागणी अनेक सन्माननीय सदस्यांनी केलेली आहे त्याबाबतीत आपण काय करणार आहात ? स्त्रीभ्रूण हत्त्येच्या संदर्भात जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांच्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात ? अशा प्रकारे जे अधिकारी काम करीत आहेत त्यांना आपण तसेच मोकळे सोडणार आहात काय ? मी स्वत: अजित बालिका सुरक्षा योजना राबवतो आहे तशा प्रकारची योजना शासन राबवणार आहे काय ? मूळ विषयाकडे आपण गांभीर्याने लक्ष दिले नाही तर स्त्रीभ्रूण हत्त्येच्या घटना अशाच होत राहतील एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

प्रो. फौजिया खान : सभापती महोदय, एसीएस हेल्थने केंद्र सरकारला या विषयाच्या संदर्भात दिनांक 25/7/2011 रोजी पत्र दिलेले आहे. पीसीपीएनडीटी कायद्यात आपल्याला ख-या अर्थाने बदल करावे लागणार आहेत. स्टँड अलोन सेंटर्स रद्द करण्याच्या संदर्भातील उल्लेख माननीय मंत्री महोदयांनी विधानसभेत केलेला आहे. रेडीओलॉजीस्टने दोन पेक्षा अधिक सेंटर्सला भेट देता कामा नये तसेच बीएएमएस, बीएचएमएस, बीयुएमएस या डॉक्टरांचा या विषयातील अभ्यास नसल्यामुळे त्यांना सोनोग्राफीचे रजिस्ट्रेशन दिले जाणार नाही. ज्या डॉक्टर्सच्या करीक्युलम मध्ये या विषयाच्या संदर्भात 4 आठवडयापेक्षा जास्त टीचींग अवर्स आहेत त्यांनाच सोनोग्राफी सेंटर देण्यात यावे असे आपण सुचवलेले आहे. तसेच पोर्टेबल सोनोग्राफी मशिन्स बॅन करण्याचे ठरविण्यात आलेले आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी या विषयाच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्यामुळे मी या संदर्भात सांगू इच्छिते की, पोर्टेबल मशीन हॉस्पिटलमध्ये वापरता येईल. शासनाची परवानगी घेऊनच आपल्याला इमर्जन्सीमध्ये यासंदर्भात काम करता येईल. ॲप्रोप्रिएट ॲथॉरीटीने काम बरोबर केले नाही तर डिस्ट्रीक्ट लेव्हल वरील



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ...

टास्क फोर्स यासंदर्भात मंथली रिव्हयू घेऊन कारवाई करणार आहे.

ट्रॅकींग मशीनच्या संदर्भात सुध्दा मी या ठिकाणी उल्लेख केलेला आहे. एका जिल्हयातून दुस-या जिल्हयात जाऊन जे लोक सोनोग्राफी करतात अशांना त्या ठिकाणच्या समुचित प्राधिका-याला प्रथम कळविणे गरजेचे राहणार आहे. एमटीपी ॲक्टप्रमाणे कॉन्ट्रॅसेप्टीव्ह फेल्युअरमुळे गर्भपात करण्याची वेळ आली तर 12 आठवडयापेक्षा कमी गर्भाचे ॲबॉर्शन करणे अलाऊड राहील. तसेच एमटीपी सेंटर्सने 5 वर्षामध्ये रिन्यूअल करणे गरजेचे राहणार आहे. 12 आठवडयाच्या ॲबॉर्शनसाठी दोन डॉक्टर्सची यासंदर्भात परमिशन घ्यावी लागणार असून यातील एक डॉक्टर सरकारी असणे आवश्यक आहे. अशा पध्दतीच्या सुधारणा आपण यामध्ये सुचवलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी या विषयाच्या संदर्भात काही तरी ठोस आश्वासन देण्याची सूचना केली आहे. या विषयाच्या संदर्भात अजून आम्ही कोणते ठोस आश्वासन देऊ शकणार आहोत ? सायलंट ऑब्जर्व्हरच्या संदर्भात अभ्यास करावा लागेल. हाय टेक्नॉलॉजी फूल प्रूफ असण्याची आवश्यकता असते. त्यामुळे केवळ घोषणा करण्याची शासनाची पध्दत नाही एवढे मी या निमित्ताने सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिते. या विषयाच्या सदंर्भात जरुर अभ्यास करण्यात येईल अशा प्रकारची घोषणा मी केलेलीच आहे. या विषयाच्या संदर्भात अभ्यास केल्यानंतर त्यामध्ये काही लूप होल्स दिसले तर शासन ते स्वीकारावयास तयार आहे.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, कायद्यामध्ये काय बदल करणार किंवा कायद्याच्या द्वारे स्त्रीभ्रूण हत्त्या कशा थांबविणार याबाबत येथे चर्चा झालेली आहे. परंतु हा विषय सोशल इव्हील आहे. कुटुंब नियोजनाचा कार्यक्रम हे शासन गेल्या अनेक वर्षापासून राबवत आहे. आई, वडील आणि एका अपत्याची संकल्पना शासनाने जनतेच्या मनावर बिंबवली आहे. सन 2001 ते 2011 पर्यंत स्त्रीभ्रूण हत्त्येचे प्रमाण वाढल्याचे आढळून आलेले आहे. दोन अपत्य असणा-या व्यक्तीला निवडणूक लढविता येईल यासंदर्भात कायदा झालेला असल्यामुळे त्याचा काही परिणाम झाला आहे काय ? याचा अभ्यास करणे फार गरजेचे आहे. हा विषय केवळ कायद्याचा नाही तर यामध्ये सोशल ॲंगलने सुध्दा पाहण्याची गरज आहे. चायना मध्ये वन चाईल्ड पॉलिसीचा ॲडव्हर्स



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे....

इम्पॅक्ट होते त्याचा त्यांनी अभ्यास केल्यामुळे त्या ठिकाणी दांपत्याना दोन मुले जन्माला घालण्याचा अधिकार दिला गेला. त्यामुळे कुटुंब नियोजनामध्ये जे ॲडव्हर्स इम्पॅक्ट झाले याचा सोशल ॲंगलने विचार करणार आहे काय ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी चांगली सूचना केली आहे तसेच अनेक सन्माननीय सदस्यांनी या विषयाच्या संदर्भात चांगल्या सूचना केलेल्या आहेत. सर्व सूचनांना अल्प वेळेत उत्तर देणे आता तरी शक्य नाही. स्त्रीभ्रूण हत्त्येच्या संदर्भात शासन अतिशय गंभीर आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी ज्या ज्या सूचना उपस्थित केलेल्या आहेत त्या सर्व सूचनांचा अभ्यास करुन शासन त्यावर निश्चित उपाययोजना करेल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छिते.

सभापती महोदय, सावित्रीबाई फुले योजना द्रारिद्रय रेषेखालील महिलांसाठी राबवतो आहे. यामध्ये एका मुलीनंतर कुटुबनियोजन शस्त्रक्रिया केली तर 10 हजार रुपये दिले जातात. यामध्ये 2 हजार रुपयांचे सर्टिफिकेट्स व 8 हजार रुपये रोख रक्कम दिली जाते. या ठिकाणी "लाडली" योजनेचा उल्लेख केलेला आहे त्या योजनेची सांगड घालून आपल्याला नवीन योजना करता येईल काय ही बाब सुध्दा शासनाच्या विचाराधीन आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, परळी येथे डॉ. अलका गिते, डॉ. शाम काळे यांना स्त्रीभ्रूण हत्या करतांना रेड हॅंड पकडण्यात आलेले आहे. हे सर्व प्रकार डॉ. गितेंच्या हॉस्पिटलमधून चालत होते. त्यामुळे यासंदर्भात त्यांच्यावर कोणती ॲक्शन घेण्यात आलेली आहे ? परळी शहरातील इन्स्पेक्टर श्री. रामराव गाडेकरांचे परळी शहरातील डॉक्टरांच्या संगनमताने हे सर्व प्रकार सुरु होते. हे सर्व होत असतांना संबंधितांविरुध्द कोणतीही कडक कारवाई करण्यात आलेली नाही. पोलीस इन्स्पेक्टर खाजगी वाहनातून लोकांना नेत असतात. या विषयाच्या संदर्भात आम्ही जेव्हा परळी येथील पोलीस स्टेशनवर गेलो होतो तेव्हा त्यांनी असे सांगितले की, पीसीपीएनडीटी कायद्यान्वये छापा मारणे, केस करणे हे काम उप जिल्हाधिकारी, आरोग्य विभागाचे काम आहे. यासंदर्भात कारवाई करण्याचे पोलीस विभागाला पीसीपीएनडीटी अंतर्गत अधिकार

..4..

श्रीमती विद्या चव्हाण ...

नाहीत असे त्यांनी आम्हाला सांगितले होते. एवढया मोठया प्रमाणात स्त्रीभ्रूण हत्त्या झालेल्या असतांना शासन काय करणार आहे ? खरे म्हणजे स्त्रीभ्रूण हत्त्येच्या संदर्भात शासनाने श्वेत पत्रिका जाहीर करण्याची आवश्यकता आहे तसेच स्त्रीभ्रूण हत्त्या केलेल्या डॉक्टरांवी व संबंधित पालकांवर कोणती कारवाई करण्यात आलेली आहे याचीही माहिती सभागृहाला देण्याची आवश्यकता आहे. शासकीय योजनांचा आढावा घेऊन त्या योजनांचा फायदा झालेला आहे की, नाही याचीही माहिती देण्याची आवश्यता आहे.

श्री. मनिष जैन : सभापती महोदय, स्त्रीभ्रूण हत्त्येचा निषेध करण्यासाठी माननीय मंत्रीमहोदयांनी आज काळी साडी परिधान केल्यामुळे मी त्यांचे स्वागत करतो. ज्या उमेदवाराला एक मुलगी असेल अशाच उमेदवाराला शासकीय नोकरीत घेतले जाईल, शासनाच्या योजनांचा फायदा दिला जाईल अशा प्रकारचा निर्णय शासन घेणार आहे काय ?

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी बीड जिल्ह्यातील परळी-वैजनाथच्या घटनेचा उल्लेख केला आहे, त्या बाबत ठोस कारवाई केली असून सक्षम प्राधिकाऱ्यांनी केस दाखल केली आहे. जे लोक बेलवर सुटले आहेत, त्यांच्याविरुध्द केस चालू आहे. सभापती महोदय, पोलिसांनी करावयाच्या कारवाईसंदर्भात पीसीपीएनडीटी कायद्यामध्ये तरतूद नाही, त्याकरिता 302 कलमाखाली गुन्हा दाखल करता येईल याबाबत आपण केलेल्या सूचनेबाबत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेऊन त्या संदर्भात काय करता येईल हे पाहिले जाईल. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी एफ फॉर्ममध्ये बदल करण्याबाबत प्रश्न विचारला होता. ती बाब देखील आपण तपासून पाहू, त्याबाबत ठोस आश्वासन देता येणार नाही. शासन या बाबतीत गंभीरपणे दखल घेऊन काम करील एवढे ठोस आश्वासन आपणास देते.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे. सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होऊन दुपारी 12.15 वाजता सभागृहाची नियमित बैठक पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.00 ते 12.15 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/KT पूर्वी श्री.सरफरे . . . . 12:15

**सभापतीस्थानी - माननीय सभापती**

**नियम 289 अन्वये प्रस्तावाबाबत**

(अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून घोषणा देतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय सदस्य सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, विनोद तावडे, रामदास कदम, संजय केळकर, डॉ.दीपक सावंत, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री.केशवराव मानकर, धनंजय मुंडे, सय्यद पाशा पटेल, डॉ.रणजित पाटील, चंद्रकांत पाटील, रामनाथ मोते, वि.प.स.यांनी नियम 289 अन्वये खालील प्रमाणे प्रस्ताव दिलेला आहे.

"पवना धरणातील पाण्यावर मावळ परिसरातील 65 गावांच्या पाणी पुरवठा योजना व 15 हजार हेक्टर जमिनींचे सिंचन चालू असताना पवना धरणातील पाणी बंद जल वाहिनीव्दारे पिंपरी-चिंचवड शहरात नेण्याचा शासनाने निर्णय घेऊन त्या करिता पवना धरणातील 6.5 टी.एम.सी.पाणी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडे वळविण्याचे ठरविणे, असे करताना गावांचा पाणी पुरवठा व जमिनींचे सिंचन बाधित होऊ नये व बंद जलवाहिनीव्दारे पाणी वाहून नेऊ नये अशी मागणी गावकऱ्यांनी गेल्या 3 वर्षापासून शासनाकडे करुन देखील शासनाने कोणतीही कार्यवाही न करणे, या साठी दिनांक 09 ऑगस्ट 2011 रोजी बंद पुकारण्यात येणे, या बंदला विविध राजकीय पक्षांनी पाठिंबा देणे, बंद मध्ये मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर शांततामय रितीने रास्ता रोको आंदोलन करण्यात येणे, आंदोलन सुरु असताना पोलिसांनी बळाचा वापर करुन आंदोलन दडपण्याचा प्रयत्न करताना शेतकऱ्यांवर कमरेच्या वर गोळीबार केल्याने 3 शेतकऱ्यांचा मृत्यू होणे,गत पंधरवड्या- मध्ये सुध्दा जालना जिल्ह्यातील गावकऱ्यांवर तसेच नागपूर जिल्ह्यातील मोवाड येथील शेतकऱ्यांवर केलेल्या गोळीबाराच्या घटना ताज्या असणे, अशा प्रकारे निरपराध शेतकऱ्यांवर झालेल्या गोळीबारामुळे जनता व शेतकऱ्यांमध्ये शासनाबद्दल पसरलेला तीव्र असंतोष."

या बाबतीत सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी एक-दोन मिनिटात आपले म्हणणे मांडावे.

. . . .एन-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, काल 09 ऑगस्ट हा क्रांती दिवस होता. मावळ तालुक्यात पवना धरण असून तेथील 6 क्युबीक मीटर पाणी पिंपरी-चिंचवड परिसराला जलवाहिनीच्या माध्यमातून देण्यासंबंधात तेथील शेतकऱ्यांचे काही म्हणणे होते. याबाबतीत गेल्या तीन वर्षापासून तेथील शेतकरी शांततामय मार्गाने आंदोलन करीत होते आणि सरकारी दरबारी निवेदन दिली जात होती. एक महिन्यापूर्वी त्यांची माननीय मुख्यमंत्री महोदयांबरोबर चर्चा झाली. असे असतानाही आम्ही पोलिसांच्या बळावर सदरहू जलवाहिनी तयार करु असे म्हणून त्याचे काम सुरु करण्यात आले. दिनांक 18 जुलै रोजी याबाबतील काम थांबविण्यासाठी प्रथम आंदोलन झाले. त्यावेळी सदरहू आंदोलन तेथील आमदारांच्या नेतृत्वाखाली अतिशय शांततामय मार्गाने झाले. परंतु ते काम थांबविण्याचे काही लक्षण दिसत नव्हते. म्हणून काल मावळ तालुक्यातील शेतकऱ्यांनी रस्ता रोको आंदोलन केले. दोन-तीन-साडेतीन तास रस्ता रोको आंदोलन केले, तेथे भाषणेही झाली. मग सदरहू आंदोलन संपण्याच्या मार्गावर होते. परंतु त्यावेळी काही आंदोलकांना पोलिसांनी जबरदस्तीने पकडण्याचा प्रयत्न केल्यामुळे तेथे गोंधळ झाला आणि मग त्याठिकाणी बेछूटपणे,अंदाधूंदपणे गोळीबार करण्यात आला. खरे म्हणजे शासन संवेदनाशुन्य झाले आहे हे दिसून येते. या राज्यातील महिलांकडे एक आदराचे स्थान म्हणून पाहिले जाते. पण त्यांच्या छातीवर गोळया मारल्या आहेत, बेछूटपणे गोळीबार केला आहे.

(घोषणा)

सभापती महोदय, एका बाजूला एस.पी.यांनी सांगितले की, गाड्यांची मोडतोड करण्यात आली. परंतु दुसऱ्या बाजूला काल "आयबीएन" लोकमत मधील क्लीपमध्ये जे दाखविण्यात आले, त्यानुसार पोलीसच गाडयांची मोडतोड करण्यामध्ये पुढे होते. पोलिसांनी गाड्या तोडल्या, त्याच्या काचा फोडल्या. पोलिसांनी हे सर्व केलेले आहे. अशा परिस्थितीत जो बेछूट गोळीबार करण्यात आला, त्यामध्ये तीन लोक ठार झाले. तसेच या गोळया मारत असताना कमरेच्या वर मारण्यात आल्या, जे 9 लोक जखमी झाले आहेत, त्यांना सुध्दा कमरेच्या वरच्या भागात गोळ्या मारल्या आहेत.तसेच बंदुकीतून नाही तर रिव्हॉल्वरमधून लोकांच्या जवळ जाऊन त्यांच्यावर गोळया मारलेल्या आहेत. हे राज्य शेतकऱ्याचे आहे. अशा प्रकारे सरकार दादागिरीने बंदुकीच्या जोरावर राज्य करण्याचा प्रयत्न करीत असेल तर ते सहन केले जाणार नाही. म्हणून आमची मागणी आहे की,राज्यातील शेतकऱ्यांचा इतका महत्वाचा प्रश्न असताना या सभागृहामध्ये कोणतेही कामकाज न होता यावर चर्चा झाली पाहिजे. खरे म्हणजे कालचा गोळीबार समर्थन करण्यासारखा नाही. म्हणून

एका विशिष्ट परिस्थितीत या सभागृहातील प्रश्नोत्तराचा तास आणि इतर कामकाज थांबवून ताबडतोब चर्चेला सुरुवात करावी अशा प्रकारची मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, काल ससूनच्या शवागारामध्ये श्रीमती शांताबाई अंकुश ठाकर, श्री.मोरेश्वर साठे आणि श्री.श्यामराव तुपे यांचे मृतदेह पाहिल्यानंतर दिसून आले की, पोलिसांनी केलेल्या गोळीबारामध्ये त्यांच्या कमरेच्या वरच्या बाजूला गोळया लागल्या होत्या आणि श्रीमती शांताबाई ठाकर यांच्या छातीमध्ये गोळी लागलेली आहे. अशा गंभीर प्रश्नावर एक दिवस आंदोलन झाले अशातला भाग नाही. आम्ही 289 चा प्रस्ताव यासाठी दिलेला आहे की, राजकीय पक्षाचा अभिनिवेष आणि टगेगिरी याच्या पलीकडे जाऊन, यासंदर्भात आपण समाजाच्या विकासा साठी,शेतकऱ्यांसाठी काम करतो असा सर्व पक्ष दावा करीत असतात. त्याठिकाणी चार तास रस्ता-रोको आंदोलन सुरु होते. यापूर्वी मुंबई-पुणे एक्सप्रेस वे वर अनेक वेळा रस्ता-रोको झालेले आहे. आमचा अनुभव असा आहे की, अर्धा तास, पाऊण तास किंवा एक तास रस्ता-रोको झाल्यावर पोलीस संबंधितांना अटक करुन पुढील सर्व प्रोसीजर पूर्ण करतात. काल चार तास रस्ता रोको सुरु होता. त्यानंतर जेव्हा त्यांना अडविले गेले, तेव्हा आपण असेही चित्र पाहिले की, पोलीसच वाहनांची तोडफोड करीत आहेत आणि संबंधितांच्या नातेवाईकांनी देखील हेच सांगितले. 50 गावे बाधित होणारा हा प्रकल्प असून, याला लोकांनी ग्रामसभेमध्ये विरोध करुन सुध्दा आम्ही तो आणणारच अशा प्रकारे सरकारची जी वाटचाल सुरु आहे, त्याबाबत आता कोणता निर्णय घेतलेला आहे? कारण या सर्व प्रकारामध्ये निरपराध लोकांना पकडले जात आहे. त्याचबरोबर सभागृहामध्ये सुध्दा या पध्दतीने समर्थन केले जात असेल तर ती गोष्ट अतिशय चुकीची आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

तुम्ही समर्थन केलेले आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांचे म्हणणे पूर्ण झाल्यानंतर मी सन्माननीय सदस्यांना संधी देतो. सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, जर सन्माननीय सदस्य बसून बोलले तर ते अधिकृत





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मानत नाहीत. परंतु काल ज्यावेळी मृतदेह पाहिले, त्यानंतर या गोळीबाराबद्दल आम्ही बोलणार आहोत, आम्ही बोलणार आहोत, आम्ही बोलणार आहोत म्हणजे अजून गोळीबार करणार असे बोलणार आहात काय ? मग ते बसून किंवा उभे राहून किंवा अजून काही करावयाचे असेल सभापती महोदय, मग ते जे बोलत आहेत . . . ..

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात)

**सभापती** : कृपया सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

(घोषणा)

**सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

(घोषणा)

**सभापती** : अशा परिस्थितीत कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक 12 वाजून 23 मिनिटांनी 10 मिनिटांसाठी तहकूब झाली.)

----

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या ठिकाणी ...

**सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी कृपया खाली बसावे. हा विषय नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाचा कसा होतो हे सांगून एक दोन मिनिटांमध्येच आपण आपले भाषण संपवावयाचे असते. आपण मघाशी आपले म्हणणे मांडले आहे. फक्त आपल्या बोलण्यामध्ये आपण सभागृहाचा जो उल्लेख केला...

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, हा विषय नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाचा यासाठी होतो की, या अधिवेशनामध्ये यापूर्वी ..

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी कृपया खाली बसावे. मी नंतर आपल्याला बोलण्याची संधी देतो.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मी आपला आदर करतो परंतु मघाशी सन्माननीय सदस्यांनी जो उल्लेख केला...

**सभापती** : माझ्या आदराचा प्रश्न नाही पण कोठे तरी सभागृहाचा आदर ठेवला पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

डॉ. नीलम गोऱ्हे : हा विषय नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाचा होतो याचे कारण असे की, ही अत्यंत निकडीची बाब आहे. गेल्या पंधरा दिवसात हा तिसऱ्यांदा गोळीबार झालेला आहे. जे शेतकरी मृत झालेले आहेत त्यांच्या नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेतलेले नाहीत. त्यांच्या आंदोलनातील मागण्यांसोबतच अनेक निरपराध लोकांची धरपकड चाललेली आहे. सभापती महोदय, आपल्यासमोर अनेक महत्वाचे कामकाज असले तरी माणसाचा जगण्याचा अधिकार जेव्हा काढून घेतला जातो त्यापेक्षा कोणतीही गोष्ट जास्त महत्वाची नसते, असे मला वाटते. खरे म्हणजे

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

डॉ. नीलम गोऱ्हे .....

नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव मांडण्यासाठी माझे जे मुद्दे होते त्या मुद्यांना कलाटणी देण्यासाठीच असा गोंधळ केला जातो की काय असे दुर्दैवाने म्हणावेसे वाटते.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी मघाशी या ठिकाणी भाष्य करताना एक वाक्य असे उच्चारले की, सदनामध्ये या गोष्टीचे समर्थन होत आहे. त्यांनी अशा पध्दतीचे जे वाक्य उच्चारले ते कामकाजातून काढून टाकावे.

**सभापती** : ते वाक्य कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा घ्यावी यासाठी ज्या पध्दतीने सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे त्या प्रस्तावाच्या समर्थनार्थ बोलत होत्या ते बोलत असताना त्यांनी या गोष्टीचे सभागृहात समर्थन होत आहे असा उल्लेख केला. आपण ते वाक्य कामकाजातून काढून टाकले त्या बद्दल मी आपले अतिशय आभार मानतो. परंतु त्याच्या व्यतिरिक्त सुध्दा नंतर त्यांनी असे म्हटले की, या सदस्यांना पुढे काय म्हणावयाचे आहे, हे असे म्हणणार आहेत का, तसे म्हणणार आहेत का, असे करणार आहेत का ? आम्ही काय करणार याबाबत त्या कधीपासून भविष्य बघावयास लागल्या आहेत ? त्या कधीपासून आमच्या मनातले ओळखावयास लागल्या आहेत ? अशा प्रकारे हेत्वारोप करणे ही बाब नेहमीचीच झालेली आहे. त्यामुळे त्यांना समज द्यावी आणि माफी मागावयास लावावी.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, एका गंभीर घटनेच्या संदर्भात नियम 289 अन्वये या सार्वभौम सभागृहामध्ये चर्चा व्हावी आणि त्यातून काही तरी फलश्रुती व्हावी या उद्देशाने सन्माननीय सदस्यांनी हा विषय सभागृहामध्ये मांडलेला आहे. आदरणीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनीही हा विषय मांडला तेव्हा सत्ताधारी बाजूकडील कोणत्याही सन्माननीय सदस्याने काहीही वक्तव्य केले नाही. सगळ्यांनी शांतपणे ऐकून घेतले. परंतु सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे ज्यावेळी बोलत होत्या त्यावेळी त्यांचे माननीय सभापती महोदयांकडे लक्ष कमी होते आणि इकडे जास्त लक्ष होते. अंगुलीनिर्देश करुन वारंवार अशा पध्दतीने बोलणे हे त्यांच्यासारख्या अतिशय सुशिक्षित, विद्वान सदस्यांना शोभा देत नाही असे मला वाटते. त्यामुळे त्यांनी जी काही वक्तव्ये केलेली आहेत ती फार गंभीर आहेत. ती वक्तव्ये कामकाजातून काढली जावीत हा एक

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. भाई जगताप ....

भाग आहे. विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य मी हात हलवत बोलत आहे असे सांगत आहेत. मी आता सुध्दा हात हलवित आहे. त्याची आपण चिंता करण्याचे कारण नाही. आमचे हात असेच हलत राहतील. सभापती महोदय, या घटनेचे समर्थन कोणीही केलेले नाही आणि समर्थन करण्यासारखे नाही. आम्ही सगळे तितक्याच चिंतेत आहोत. या घटनेच्या संदर्भात या ठिकाणी चर्चा व्हावी. या चर्चेमध्ये आम्हालाही आमचे विचार मांडावयाचे आहेत. या घटनेचे समर्थन कोणत्याही माध्यमातून, कोणत्याही स्तरातून होऊ नये आणि होणार नाही. पण आपणच त्यांचे काही तरी ठेकेदार आहोत अशा प्रकारे या गंभीर घटनेचे राजकारण करणाऱ्या सदस्यांना आपण समज द्यावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे बसून बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, अशा प्रकारे सगळ्यांनीच जर बसून बोलावयाचे ठरविले तर उभे राहून बोलणाऱ्याला काहीच अर्थ राहात नाही. बसून बोलण्याचे सुध्दा दुष्परिणाम होतात त्यामध्ये विरोधी पक्षाच्या काही सन्माननीय सदस्यांनी सत्ताधारी बाजूच्या सन्माननीय सदस्यांबद्दल अतिशय अपमानजनक उद्‌गार काढलेले आहेत. अशा प्रकारे जर त्यांना चर्चा करावयाची असेल तर ती या पध्दतीने होणार नाही. आम्ही सगळे या प्रकरणाबद्दल गंभीर आहोत. आम्हालाही याची चर्चा होण्याची आवश्यकता वाटत आहे. आपल्याला मुद्यापुरते बोलावयाचे असेल तर ही चर्चा तातडीने व्हावी अशी आमची मागणी आहे.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना दिलेली आहे त्या बाबत आता मी माझा निर्णय देत आहे. एक अत्यंत गंभीर बाब या दृष्टीने या घटनेकडे पहावे लागेल. काल पवना धरणातील पाणी बंद जलवाहिनीव्दारे पिंपरी-चिंचवडला देण्याच्या अनुषंगाने जो प्रक्षोभ झाला

यानंतर श्री. खंदारे ...

**सभापती**....

आणि शेतकऱ्यांचे जे आंदोलन झाले, त्या आंदोलनाच्या ठिकाणी गोळीबार झाला आहे, ही घटना अत्यंत दुर्दैवी आहे. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी या घटनेच्या संदर्भात तत्काळ चर्चा करण्याची भूमिका मांडलेली आहे. सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार, सन्माननीय संसदीय कार्य मंत्री, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, रामदास कदम हे माझ्या दालनामध्ये आले होते. त्या वेळी सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार आणि सन्माननीय संसदीय कार्य मंत्री या दोघांनीही या विषयाबाबत शासनाचे मत सदनासमोर येण्यासाठी सभागृहात तातडीने चर्चा होण्याची आवश्यकता आहे असे सांगितलेले आहे. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी व शासनाने सुध्दा या संबंधी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. मी या विषयावर नियम 97 अन्वये तातडीने चर्चा सुरु करण्याचा निर्णय घेतलेला आहे. आजचा प्रश्नोत्तराचा तास मी तहकूब करीत आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, या महत्वाच्या विषयाबाबत आपण तातडीने चर्चा करण्यासाठी मान्यता दिली, आपण आम्हाला न्याय दिला आहे त्याबद्दल सभागृह आपले आभार मानते.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना असे विचारु इच्छितो की, ही चर्चा कधी सुरु करावयाची आहे ते आपण सांगावे. मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.41 ते 12.51 पर्यंत स्थगित झाली. )

----

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 12:50

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर हे आज नियम 97 अन्वयेचा प्रस्ताव मांडणार आहेत. आजच्या कामकाज पत्रिकेवरील एकूण कामकाजाच्या संदर्भात माझ्या दालनामध्ये चर्चा झाली. नियम 97 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा आपल्याला अडीच तासामध्ये मंत्र्यांच्या उत्तरासह संपवायची आहे. त्या नंतर 2 शासकीय विधेयके संपवायची आहेत. शेतक-यांसंबंधीचा प्रस्ताव गेले दोन-तीन दिवस चर्चेला येऊ शकलेला नाही. या प्रस्तावावरील चर्चा देखील आपल्याला संपवायची आहे. यावर अडीच तासाची चर्चा होऊन त्यास मंत्री महोदयांनी उत्तर दिल्यानंतर सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावावर चर्चा सुरु करावयाची आहे. या प्रस्तावावरील चर्चेला उद्या सकाळी उत्तर देण्यात येईल. आजचा प्रश्नोत्तराचा तास मी स्थगित करीत आहे. तसेच आजच्या कामकाज पत्रिकेवरील लक्षवेधी सूचना आणि अर्धा-तास चर्चा चर्चेला घेण्यात येणार नाहीत.

श्री. संजय केळकर : आम्ही देखील शिक्षणासंबंधीचा प्रस्ताव दिलेला आहे. तो क्लब केला तर बरे होईल.

**सभापती** : मी जरुर पहातो. परंतु या बाबतीत लगेच काही सांगता येणार नाही. मी आता सांगितल्या प्रमाणे कामकाज होईल. एकूण कामकाज पहाता सायंकाळी 6.00 वाजल्यानंतर देखील सभागृहाची वेळ वाढवावी लागेल. हे सर्व कामकाज करण्याच्या दृष्टीने आपण सर्वांनी पीठासीन अधिका-यांना सहकार्य करावे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मावळ तालुका, जि.पुणे येथे आंदोलनकर्त्या शेतक-यांवर पोलिसांनी केलेला गोळीबार

**मु.शी.**: मावळ तालुका, जिल्हा पुणे येथे आंदोलनकर्त्या शेतक-यांवर पोलिसांनी केलेला गोळीबार या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, विनोद तावडे, रामदास कदम, संजय केळकर, डॉ. दीपक सावंत श्रीमती शोभा फडणवीस, डॉ. नीलम गो-हे, सर्वश्री केशवराव मानकर, धनंजय मुंडे, सय्यद पाशा पटेल, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री चंद्रकांत पाटील व रामनाथ मोते, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

**सभापती** : मावळ तालुका, जिल्हा पुणे येथे आंदोलनकर्त्या शेतक-यांवर पोलिसांनी केलेला गोळीबार या विषयावरील चर्चेसंबंधी मतदानाकरिता औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. चर्चा व मंत्र्यांचे उत्तर या करिता अडीच तासाची वेळ दिलेली आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर हे आपली सूचना वाचतील व भाषण करतील.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 97 अन्वये पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.

पवना धरणातील पाण्यावर मावळ परिसरातील 65 गावांच्या पाणीपुरवठा योजना व 15 हजार हेक्टर जमिनीचे सिंचन चालू असताना पवना धरणातील पाणी बंद जलवाहिनीद्वारे पिंपरी-चिंचवड शहरात नेण्याचा शासनाने निर्णय घेऊन त्याकरिता पवना धरणातील 6.5 टी.एम.सी.पाणी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडे वळविण्याचे ठरविणे, असे करताना गावांचा पाणी पुरवठा व जमिनीचे सिंचन बाधित होऊ नये व बंद जलवाहिनीद्वारे पाणी वाहून नेऊ नये अशी मागणी गावक-यांनी गेल्या 3 वर्षापासून शासनाकडे करुन देखील शासनाने कोणतीही कार्यवाही न करणे, यासाठी दिनांक 9 ऑगस्ट 2011 रोजी बंद पुकारण्यात येणे, या बंदला विविध राजकीय पक्षांनी पाठिंबा देणे, बंदमध्ये मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर शांततामय रीतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात येणे, आंदोलन सुरु असताना पोलिसांनी बळाचा वापर करुन आंदोलन दडपण्याचा प्रयत्न करताना शेतक-यांवर कमरेच्या वर गोळीबार केल्याने 3 शेतक-यांचा मृत्यू होणे, गत पंधरवड्यामध्ये सुध्दा जालना जिल्ह्यातील गावक-यांवर तसेच नागपूर जिल्ह्यातील मोवाड येथील

..3..

श्री. पांडुरंग फुंडकर....

शेतक-यांवर केलेल्या गोळीबाराच्या घटना ताज्या असणे, अशा प्रकारे निरपराध शेतक-यांवर झालेल्या गोळीबारामुळे जनता व शेतक-यांमध्ये शासनाबद्दल पसरलेला तीव्र असंतोष."

सभापती महोदय, कालचा दिवस हा क्रांती दिवस होता. या देशामध्ये इंग्रजांचे जुलमी राज्य सुरु होते. त्या इंग्रजाना या देशातून चले जावचा इशारा देण्यासाठी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी 9 ऑगस्ट 1942 ही तारीख निवडली. तेव्हा पासून या देशामध्ये 9 ऑगस्ट हा क्रांती दिवस म्हणून ओळखला जाऊ लागला. काल देखील या देशामध्ये ठिकठिकाणी हा क्रांती दिवस साजरा केला गेला. हुतात्म्यांच्या स्मारकाजवळ हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली, आदरांजली अर्पण करण्यात आली. गोरा इंग्रज या देशातून गेला पाहिजे, स्वराज्य निर्माण झाले पाहिजे म्हणून या देशातील जनतेने हसत हसत इंग्रजांच्या गोळया छातीवर झेलल्या. या देशाला स्वातंत्र्य मिळाले. परंतु स्वातंत्र्याच्या 60 वर्षानंतर 9 ऑगस्ट 2011 ही तारीख दु:खदायक अशा घटनेने उजाडेल याचा कोणी स्वप्नातही विचार केला नसेल. कोणीही कल्पना केली नसेल की, इंग्रजांच्या गोळया छातीवर झेलणा-या या देशामध्ये आपल्याच सरकारकडून छातीवर गोळया झेलाव्या लागतील. स्वप्नातही असा विचार कुणी केला नसेल. परंतु दुर्दैवाने काल ते घडले. काल पोलिसांनी केलेल्या गोळीबारामध्ये तीन जणांचा मृत्यू झाला. दुर्दैवाची बाब अशी की, यामध्ये एक भगिनी होती. 13 तारखेला रक्षाबंधन आहे. या रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला एका भावापासून एक बहीण हिरावून नेली गेली आहे. सभापती महोदय, हे पाप कोणाच्या माथ्यावर टाकायचे ? महात्मा गांधींनी घालून दिलेल्या मार्गाने आंदोलन केले जात होते. मी काल तेथे गेलो. सर्व पक्षाच्या लोकांना भेटलो.

हे कोणत्या एका पक्षाचे आंदोलन नव्हते. भारतीय जनता पक्ष, शिवसेना, रिपाई, किसान संघ या सर्व पक्षांनी एक कृती समिती नेमली. या समितीच्या माध्यमातून आपल्या न्याय्य हक्कासाठी गेल्या तीन वर्षापासून हा लढा सुरु केला होता.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.......

यांची मागणी काय होती? या मावळ परिसरात 1971 साली पवना धरण बांधण्यात आले. पवना नदीवर हे धरण बांधले गेले. या धरणासाठी 19 गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या गेल्या. गेल्या 30 वर्षात त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सुटलेला नाही, हाही एक असंतोष होता. प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना शासकीय नोकरी मिळालेली नाही. जे भूमीहीन झाले, ज्यांची शेती उद्ध्वस्त झाली, त्यांचे प्रश्न 30-30 वर्षे सुटणार नसतील तर त्यांनी काय करायचे? आंदोलन करणार नाही तर काय करणार?

सभापती महोदय, गेली तीन वर्षे त्या परिसरातील शेतकरी ज्या प्रश्नासाठी झगडत आहेत तो प्रश्न बाजूलाच राहिला आहे. या धरणामध्ये एकूण 10.5 टीएमसी पाणी उपलब्ध आहे. या धरणातून जवळपास 15 हजार हेक्टर शेतीला आणि 65 गावांना पाणीपुरवठा केला जातो. 1400 क्यूसेक्स पाणी पिंपरी-चिंचवड शहरासाठी नदीच्या मार्गाने सोडण्यात येते. पिंपरी-चिंचवड शहराला पाणी देण्याबद्दल कोणाचा विरोध नव्हता. परंपरेने जी पध्दत सुरु आहे त्याच पध्दतीने नदीद्वारे पिंपरी-चिंचवड शहरासाठी पाणी सोडण्यात यावे अशी मागणी होती. 1400 क्यूसेक्स पाणी नदीतून सोडले जाते ते पाणी पिंपरी-चिंचवड येथील जल शुध्दीकरण केंद्रात शुध्द केले जाते. केंद्र सरकारकडून नुकतीच एक योजना जाहीर करण्यात आली. त्या योजनेतून नदीतून सोडले जाणारे पाणी जल वाहिनीद्वारे पिंपरी-चिंचवड शहरापर्यंत न्यायचा निर्णय घेण्यात आला. धरणातील एकूण 10.5 टीएमसी पाण्यापैकी 6.5 टीएमसी पाणी पिंपरी-चिंचवड शहरासाठी देण्यात आल्यानंतर 65 गावांचे काय होणार? नदीद्वारे जे पाणी सोडले जात होते ते बंद होणार आहे. या धरणाच्या पाणी साठ्यावर जलविद्युत प्रकल्प चालविला जातो. जल वाहिनीद्वारे पाणी सोडण्यात आल्यास 1400 क्युसेक्स ऐवजी 300 क्युसेक्स पाणी नदीमध्ये सोडले जाईल. त्यामुळे जलविद्युत प्रकल्पावर त्याचा परिणाम होणार आहे. नदीद्वारे पाणी सोडणे कमी झाल्यामुळे पूर्वी पाण्याचे जे पर्कोलेशन होते ते आता फार अल्प प्रमाणात होणार आहे. त्यामुळे शेतीसाठी पाणी लिफ्ट करुन द्यावे लागणार आहे. पर्यायाने 15 हजार हेक्टर शेती पाण्यापासून वंचित होणार आहे.

सभापती महोदय, आम्ही त्या गावकऱ्यांशी चर्चा केली. त्यांनी सांगितले की, नदीद्वारे पिंपरी-चिंचवड शहराला पाणी देण्यास आमचा विरोध नाही. आतापर्यंत ज्या पध्दतीने पाणी दिले गेले त्याच पध्दतीने पाणी देण्यात यावे असा त्यांचा आग्रह आहे. आवश्यकता असल्यास पिंपरी येथे





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.......

के.टी.वेअर बांधण्यात यावेत आणि तेथून पाणी लिफ्ट करुन जलशुध्दीकरण केंद्रात नेण्यात यावे अशी त्यांची मागणी आहे. परंतु हा दुराग्रह कोणाचा आहे? तेथील नगरसेवकांशी आम्ही चर्चा केली. ते म्हणाले की, आमचे काही म्हणणे नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या आंदोलनामध्ये सहभागी नसला तरी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे काही स्थानिक कार्यकर्ते आम्हाला भेटले आणि त्यांनी सांगितले की, आमच्यावर दबाव आहे, त्यामुळे आम्ही आंदोलनामध्ये सहभागी होऊ शकलो नाही.

सभापती महोदय, हे आंदोलन शेतकऱ्यांनी केले होते. तीन वर्षे तेथील शेतकरी सरकार दरबारी खेटे घालून विनंती करीत होते की, ही योजना थांबवावी, या योजनेला स्थगिती द्यावी. अन्यथा आमचे संसार उद्‌ध्वस्त होतील. आज तळेगाव, देहू रोड, बरुड ही गावे मोठया प्रमाणात नागरीकरण झाल्यामुळे पूर्वीप्रमाणे गावे राहिलेली नाहीत. तळेगाव येथून निघाल्यानंतर पुणे किंवा पिंपरी-चिंचवड कधी सुरु होते हेच लक्षात येत नाही. पिंपरी-चिंचवड शहराला दरडोई 140 लीटर पाणी दिले जाते आणि मावळ तालुक्यातील 65 गावांना दरडोई 40 लीटर पाणी दिले जाते. किती तफावत आहे पहा. या पुढील काळात हे पाणी जल वाहिनीद्वारे सोडण्यात आल्यानंतर या 65 गावांचे काय होणार आहे? या आंदोलनाला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न होऊ नये. हे आंदोलन शिवसेना पक्षाने किंवा भारतीय जनता पक्षाने आयोजित केलेले नव्हते. जल वाहिनीद्वारे पाणी सोडण्यात येऊ नये असा तेथील 65 गावातील ग्रामसभेने एकमताने ठराव केला होता. आमच्या जमिनी संपादित होऊनही आमचे पुनर्वसन झालेले नाही, त्यामुळे नदीद्वारे पाणी सोडण्यात यावे अशी त्यांची मागणी आहे. तीन वर्षाच्या काळात तेथील शेतकऱ्यांना बोलावून सामोपचाराने या प्रश्नामध्ये मार्ग काढता आला असता, परंतु त्या दृष्टीने प्रयत्न केले गेले नाहीत.

सभापती महोदय, या देशात लोकशाही आहे. लोकांसाठी लोकांनी चालविलेले राज्य अशी लोकशाहीची संकल्पना आहे. असे असताना एवढी दादागिरी केली जाते? या राज्यामध्ये लोकांचे म्हणणे ऐकून घेतले जात नाही. जनमताचा सन्मान केला जात नाही. बंदुकीच्या जोरावर, पोलिसांच्या जोरावर पाईपलाईनचे काम पूर्ण करण्याचा प्रयत्न करु अशी धमकी दिली जात असेल तर या देशात लोकशाही अस्तित्वात आहे की नाही असा प्रश्न निर्माण होतो. गेली तीन वर्षे शेतकऱ्यांनी अनेक निवेदने देऊनही विचार झाला नाही. मागील महिन्यात माननीय मुख्यमंत्र्यांना निवेदन देऊन पाईपलाईनद्वारे पाणी सोडण्याची योजना थांबवावी अशी विनंती केली गेली. त्यांना

..3..



SGB/पूर्वी श्री.शिगम... 13:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.......

धमकी देण्यात आली. तुम्ही हे काम थांबवू शकणार नाही. आम्ही पोलिसांच्या जोरावर हे जल वाहिनीचे काम पूर्ण करणार आहोत असे सांगण्यात आले. 15 जुलै, 2011 रोजी हे काम सुरु करण्यात आले. त्यावेळी तेथील शेतकऱ्यांनी त्याच दिवशी हे काम थांबविण्याची विनंती केली होती.

सभापती महोदय, 70 वर्षाचे वयोवृध्द शेतकरी किसान संघाचे कार्यकर्ते आहेत, त्यांनी आत्मदहनाचा इशारा दिला. माझ्याकडे त्यांच्या पत्राची प्रत उपलब्ध आहे. त्यांनी "एक कविता आत्मदहनकर्त्याची" या नावाने कविता लिहिली आहे. कालच्या घटनेमुळे या वयोवृध्द शेतकऱ्याचा रक्तदाब वाढल्यामुळे त्यांना तळेगाव येथील जनरल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. मी त्यांची प्रत्यक्ष रुग्णालयात जाऊन भेट घेतली. हा वयोवृध्द शेतकरी रडत होता. मला मरताना समाधान वाटले पाहिजे यासाठी या परिसरातील शेतकऱ्यांना तुम्ही न्याय मिळवून द्या अशी त्यांनी विनवणी केली. परंतु या सरकारला माणुसकीचा पाझर फुटत नाही. बंदुकीच्या भरवशावर राज्य चालविले जात आहे. जनमताचा विचार केला जात नाही. नदीतून पाणी सोडले असते तर काय घडणार होते? जनमतासमोर दादागिरी चालत नाही हे मी शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. जनमताच्या रेट्यासमोर या देशातील इंग्रज टिकले नाहीत. त्यामुळे याबाबत शासनाने विचार केला पाहिजे. या प्रश्नामध्ये मार्ग निघू शकला असता. परंतु मार्ग काढण्याची सरकारची इच्छा नव्हती. 15 जुलै, 2011 रोजी आंदोलन करुनही न्याय मिळाला नाही. पुन्हा पाईपलाईनचे काम सुरु झाले. त्यामुळे काल 9 ऑगस्ट या क्रांतीदिनी शेतकऱ्यांनी रास्तारोको केला. त्या परिसरातील सर्व गावे महामार्गापासून दूर आहेत. 400 ते 500 शेतकऱ्यांनी महामार्ग रोखून धरला. सुमारे दोन तास त्या ठिकाणी शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींची भाषणे सुरु असताना, शांततेच्या मार्गाने आंदोलन सुरु असताना पोलिसांनी गडबड करण्याची गरज नव्हती. यापूर्वी सुध्दा तेथे आंदोलने झाली होती. शेतकऱ्यांचा कोणताही अट्टाहास नव्हता. कदाचित पोलिसांनी जबरदस्ती केली नसती तर त्याच ठिकाणी आंदोलन संपले असते. परंतु आंदोलन संपण्यापूर्वीच ते दडपण्याचा प्रयत्न पोलिसांकडून सुरु झाला. शेतकऱ्यांचा आवाज का बंद करीत आहात?

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

PFK/ पूर्वी श्री. भोगले...... 13:10

श्री. पांडुरंग फुंडकर .......

शांततेच्या मार्गाने चाललेले आंदोलन पोलिसांच्या बाळावर दाबण्याचा प्रयत्न झालेला आहे, त्यामुळे जनतेत एक प्रकारची चीड निर्माण झाली व त्यामुळे गोंधळ झाला. हे आंदोलन चिरडण्यासाठी 800 पोलिसांचा ताफा तैनात केला होता. पुण्याचे एस.पी. सांगतात की 500 ते 550 पोलीस होते. एवढ्या मोठ्या प्रमाणात पोलिसांची कुमक आणि आंदोलनकर्त्यांच्या हातात मात्र शस्त्र नाही, लाठ्याही नव्हत्या किंवा एक्सप्रेस-हायवे असल्यामुळे दगडांचाही प्रश्न नव्हता. मग मात्र शासनाकडून कारण शोधण्यात आले की, आंदोलनकर्त्या लोकांनी दगडफेक सुरु केली. पण वस्तुस्थिती काय आहे याच्या व्हिडियो क्लिप्स आयबीएन लोकमत या इलेक्ट्रॉनिक चॅनलच्या माध्यमातून आम्ही पाहिल्या. त्या क्लिप्समध्ये स्पष्ट दिसत आहे की, पोलिसांनीच गाड्या फोडल्या, मेटॅडोरच्या काचा फोडल्या. निमुटपणे रस्त्यावर उभ्या असलेल्या गाड्यांची व मेटॅडोरची तोडफोड पोलिसांनी का केली, ड्रायव्हरला तर पोलिसांनी इतक्या निर्घृणपणे मारले हे सुध्दा या क्लिप्समध्ये स्पष्ट दिसत आहे. हे आंदोलन सुरु झाल्यापासून गोळीबार होईपर्यंतच्या व्हिडियो क्लिप्स आमच्याकडे आहेत. पोलिसांनी कशा प्रकारे नागरिकांच्या गाड्या फोडल्या, कारमधून जबरदस्तीने आंदोलकांना आणण्याचा प्रयत्न होत होता असे स्टेटमेंट एस.पी. करीत होते. वास्तविक रस्त्यावर उभ्या असलेल्या गाड्या प्रवाशांच्या होत्या पण पोलीस इतके बेछूट झालेले होते, इतके बेफाम झ ालेले होते की त्यांनी कोणताही विचार न करता अतिशय रागाने, पिसाळल्याप्रमाणे या गाड्यांची तोडफोड केली. अशा प्रकारे प्रवाशांच्या गाड्या तोडफोड करण्याचे अधिकार पोलिसांना कोणी दिले याचे उत्तर सभागृहाला पाहिजे. त्याचप्रमाणे पोलिसांनी वास्तविक प्रथम अश्रूधुराच्या नळकांड्या सोडणे आवश्यक असते, त्यानंतर लाठीचार्ज करावा लागतो पण अशा नियमांचे कोणतेही पालन न करता डायरेक्टली गोळीबारच सुरु केला. एस.पी. कडून मात्र सांगण्यात आले की, अश्रूधुराच्या नळकांड्या सोडल्या, लाठीचार्ज सुध्दा केला. त्यातही कळस म्हणजे हा गोळीबार बंदुकीतून केला नाही तर छोट्या रिव्हॉल्वरमधून केला, ज्याचे टार्गेट अतिशय जवळून असते, कमी अंतरावरुन असते. अशा प्रकारे मनाला वेदना देणारी ही घटना आहे. पोलिसांना गोळीबार कधी व कसा करायचा असतो याचे प्रशिक्षण देण्याची गरज वाटली नाही काय याचेही स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. महिलांनी आंदोलनात भाग घेतला असेल आणि डायरेक्ट गोळीबार झाला असे तर महिलांना गोळ्या मारायच्या की नाही याचेही प्रशिक्षण पोलिसांना दिलेले दिसत नाही. कारण या

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .......

आंदोलनात ज्या महिला उतरल्या होत्या त्या सर्वच महिला उद्रेक करीत नव्हत्या, दगडफेक करीत नव्हत्या तर त्या फक्त नारेबाजी करीत होत्या. पण पोलिसांनी श्रीमती कांताबाई ठाकर, वय-38 वर्षे या आंदोलनात सहभागी झालेल्या महिलेच्या छातीवर गोळी झाडली. अशा प्रकारे समोरासमोर जाऊन गोळी झाडण्याचे लायसेन्स पोलिसांना दिलेले आहे काय असा माझा प्रश्न आहे. या महिलेच्या छातीवर गोळी लागल्याने ती क्षणात मृत्युमुखी पडली. काल आम्ही घटनास्थळाला भेट दिली तेव्हा आमच्यासोबत या सभागृहाच्या सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे या सुध्दा होत्या. आम्ही ससून हॉस्पिटलमध्ये हे हृदयद्रावक दृश्य स्वत:च्या डोळयांनी बघितले. मृत महिलेला शवगृहात पाहून बाहेर आल्यानंतर तिचा भाऊ आम्हाला विचारत होता की, परवा रक्षाबंधन आहे, माझी एकटीच बहीण होती, आम्ही दोन भाऊ आहोत. या एकट्या बहिणीला रक्षा बंधनाच्या पूर्वसंध्येलाच मारले त्यामुळे आता आमच्या हातात राखी कोण बांधणार, या प्रश्नाला आम्ही कोणतेही उत्तर देऊ शकत नव्हता. त्या भावाने आम्हाला पुन्हा प्रश्न विचारला की, आपल्या बहिणीला कोणी मारले असते तर आपण काय केले असते ? आता सरकार कदाचित एखाद्या लाखाची मदत करील पण आम्हाला जन्मभर रक्षा बंधनासाठी बहिणीची वाट पहावी लागणार असे अत्यंत विदारक दृश्य दिसून आले. इतक्या निर्दयीपणे पोलिसांनी कृत्य केलेले आहे. आम्हाला सभागृह बंद पाडून या विषयावर ही चर्चा उपस्थित करण्याची हौस नव्हती पण सरकार इतके निर्दयी झाले, संवेदनाहीन झालेले आहे त्यामुळे आमच्यासमोर कोणताही पर्याय उरला नव्हता.

महोदय, दुसरी व्यक्ती म्हणजे श्री. साठे यांच्या खांद्याच्या खालीच पोलिसांनी गोळी मारली आहे. त्यानंतर श्री. तुपे यांच्या सरळ डोक्यातच गोळी झाडली आहे, अशा प्रकारे गोळीबार करण्याचे तंत्र पोलिसांना शिकविलेले आहे काय ? पुण्याचे एस.पी. मात्र अत्यंत निर्लज्जपणे सांगत आहेत की, पोलिसांनी पायावर गोळ्या मारल्या आहेत. तरी देखील तीन लोकांचा मृत्यू झालेला आहे. वस्तुस्थिती मात्र वेगळीच आहे. म्हणून या सर्व प्रश्नांची उत्तरे शासनाकडून मिळायला हवीत. अशा प्रकारे या आंदोलनात एका भावाची बहीण हिरावून घेतली आहे हे पाप शासनाला भरावेच लागेल. हे राज्य बंदुकीच्या जोरावर चालविण्याचे शासनाने ठरविले काय याचेही उत्तर देणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....3



PFK/ पूर्वी श्री. भोगले...... 13:10

श्री. पांडुरंग फुंडकर .......

महोदय, पावसाळी अधिवेशन 25 जुलै रोजी सुरु झाले पण इतक्या कमी कालावधीत राज्यात तीन ठिकाणी पोलिसांनी गोळीबार केला. प्रथम जालना येथे वारकऱ्यांच्या दिंडीवर गोळीबार केला त्यात दोन वारकऱ्यांना आपला जीव नाहक गमवावा लागला. त्यानंतर परवाच नागपूर जिल्ह्यातील मोवाडमध्ये एका तरुणीवर बलात्कार झाल्यामुळे त्याची फिर्याद नोंदवून न घेता जमावावर बेछूट गोळीबार करण्यात आला आणि आता तिसरा प्रकार शेतकऱ्यांच्या आंदोलनाचा. येथे तर अन्नदाता शेतकऱ्यांचे शांततेच्या मार्गाने चालणारे आंदोलन गोळीबार करुन चिरडण्याचा प्रयत्न झालेला आहे. ज्या अन्नदाता शेतकऱ्याचे प्रश्न स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या 60 वर्षात देखील सुटले नाहीत, शेतकऱ्याच्या शेतीला उद्योगाचा दर्जा मिळत नाही, मालाला भाव मिळत नाही, निसर्गाची अवकृपा झाल्यानंतर किंवा पिकावरील रोगराई यासाठी विम्याचे संरक्षण नाही असे अनेक प्रश्न आजही सुटलेले नाहीत. या देशातील शेतकरी हा एकच घटक असा आहे की, ज्याला 60 वर्षात सुध्दा न्याय मिळालेला नाही. त्याच्या शेतीला जे थोड्या फार प्रमाणात पाणी दिले गेले ते सुध्दा अशा प्रकारे हिरावून घेण्याचा प्रयत्न होतो असे विदारक चित्र या राज्यातील शेतकऱ्याचे आहे. अशा परिस्थितीत आपल्याला न्याय मिळावा म्हणून अहिंसक मार्गाने आंदोलन करुन मागणी पूर्ण करण्याचा प्रयत्न केला तर तसे आंदोलन देखील बंदुकीच्या जोरावर चिरडण्याचा प्रयत्न राज्यकर्त्यांकडून होतो. म्हणून या घटनेचा जेवढा निषेध करावा तितका थोडाच आहे.

या आंदोलनात एकूण 9 लोक जखमी झाले पण कागदोपत्री अशी नोंद करण्यात आली की, पोलिसांनी प्रथम रबरी गोळ्या झाडल्या, लाठीचार्ज केला, अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या हे खरे नाही. कारण हे सर्व ऑफ्टर थॉट तयार झालेले पोलिसांचे रेकॉर्ड आहे. यामागे पोलिसांचा बचाव करावा म्हणूनच हे रेकॉर्ड तयार करण्यात येत आहे. राज्यात आता हे ठरविले पाहिजे की, कमीत कमी गोळीबार कसा करता येईल आणि त्याचे प्रशिक्षण पोलिसांना दिले पाहिजे. जमावाला काबूत आणण्याचे प्रशिक्षण पोलिसांना दिले पाहिजे, आंदोलन हाताळण्याचे प्रशिक्षण पोलिसांना दिले पाहिजे, महिलांशी कसे वागावे याचेही प्रशिक्षण देण्याची गरज आहे. मोगलांनाही लाजवेल अशा प्रकारे अत्याचार होणार असतील तर मी एकच सांगणार आहे की, यापुढे असे प्रकार राज्यात सहन केले जाणार नाहीत. मंत्री महोदयांना मी इतकेच सांगतो की, राज्यातील जनता आता

.....4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .......

खवळली आहे त्यामुळे तुमच्या बंदुकीच्या गोळ्या संपून जातील पण माणसे थांबणार नाहीत. म्हणून शासनाला माझा इशारा आहे की, अशा प्रकारे आंदोलन हँडल करु नका, कोणत्याही आंदोलनाला राजकीय स्वरुप अथवा रंग देऊ नका. मी सुरुवातीलाच सांगितले होते की, या आंदोलनात काँग्रेस पक्ष, भारतीय जनता पक्ष, शिवसेना पक्ष, रिपब्लिकन पक्ष आणि पाठीमागून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते सुध्दा होते. हे आंदोलन शेतकऱ्यांचे होते, अन्नदाता शेतकऱ्यांचा आवाज शासनाने अशा प्रकारे दाबण्याचा प्रयत्न केला तर तो देखील यापुढे सहन केला जाणार नाही हा इशारा सुध्दा या निमित्ताने मी शासनाला देत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

सभापती महोदय, शासन या घटनेची चौकशी करणार आहात की नाही ? या घटनेच्या ठिकाणी माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार पहाटे 5 वाजता गेले होते. पहाटे 5 वाजता जाण्याची त्यांना गरज काय ? माननीय उप मुख्यमंत्री त्या ठिकाणी दिवसा ऊजेडी का गेले नाही ? या ठिकाणी फार उद्रेक आहे ते आम्ही शब्दात सांगू शकत नाही. काल त्या ठिकाणी वाईट घोषणा दिल्या जात होत्या त्या आम्ही येथे सांगू शकत नाही. असे असतांना उप मुख्यमंत्री पहाटे 5 वाजता जातात ते योग्य आहे काय ? पहाटे 5 वाजता 90 टक्के लोक झोपेत असतांना राज्याचे उपमुख्यमंत्री जखमी लोकांना भेटण्यासाठी,मृत देहांला पाहण्यासाठी जातात ते योग्य आहे काय ? आपण त्या ठिकाणी निधडया छातीने जाऊन जनतेचे म्हणणे ऐकून घेऊ शकता काय ? झेड सिक्युरीटी घेऊन अशा ठिकाणी कोणीही जाऊ शकतो. परंतु त्या ठिकाणच्या जनतेचे म्हणणे ऐकण्याची हिंमत उपमुख्यमंत्र्यांमध्ये आहे काय ? हा प्रश्न अधिक बिकट झालेला आहे. मावळ तालुक्यातील 65 गावातील शेतक-यांच्या जीवाशी हे सरकार अजूनही खेळणार आहे काय ? 65 गावातील शेतक-यांना पिण्याच्या पाण्यापासून शासन वंचित ठेवणार आहे काय, त्यांची शेती कोरडी ठेवणार आहे काय हा प्रश्न आहे? ज्या मावळ तालुक्यातील शेतक-यांसाठी धरण बांधले व त्यासाठी 19 गावाच्या शेतक-यांनी जमिनी दिल्या त्यांचे अजून पर्यंत पुनर्वसन झाले नाही असे असतांना त्यांच्या जीवाशी हे सरकार खेळणार आहे काय ? या प्रश्नाचे उत्तर अजून मिळत नाही. या ठिकाणी गेल्या 3 वर्षापासून शांततेने चालणारे आंदोलन गोळीबाराच्या माध्यमातून दाबण्याचा प्रयत्न होत असेल तर यापुढे ते चालू देणार नाही असा मी इशारा देतो.

गोळीबार कोणत्या परिस्थितीत झाला, गोळया रिव्हॉल्वर मधून का सुटल्या, बंदुकीचा वापर केवळ दोनच गोळ्यांसाठी का करण्यात आला, नेम धरुन गोळया का मारल्या गेल्या, महिलेच्या छातीवर गोळी कोणी मारली? गोळीबाराचे आदेश कोणी दिले ? पोलिसांमध्ये या घटनेच्या संदर्भात आपापसात को-ऑर्डीनेशन नव्हते. वेगवेगळे अधिकारी वेगवेगळे निर्णय घेत होते त्यामुळे या सर्व गोष्टीची चौकशी झाली पाहिजे. या घटनेची न्यायालयीन चौकशी केली जावी अशी मी मागणी करतो. दूध का दूध आणि पाणी का पाणी झाले पाहिजे व त्यामधून सत्य बाहेर आले पाहिजे. जो कोणी जबाबदार असतील त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे अशी मागणी या निमित्ताने करतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

सभापती महोदय, जलवाहिनीचे काम थांबून त्या कामाला त्वरित स्टे देऊन, 65 गावातील लोकांसाठी एकत्र मार्ग काढून हा प्रश्न सरकारने त्वरित सोडवला पाहिजे अशा प्रकारची मागणी या निमित्ताने करतो. दादागिरी करुन पोलिसांच्या जोरावर जलवाहिनी नेण्याचा प्रयत्न केल्यामुळे आता एक मावळ तालुका पेटला परंतु पुढे पुणे जिल्हा पेटेल आणि उद्या पूर्ण महाराष्ट्र पेटेल त्यामुळे आपण आगीशी खेळू नका असा इशारा या निमीत्ताने देतो व माझे वक्तव्य संपवतो.

**सभापती** : आपण रोज दीड ते दोन या वेळेत मध्यंतरासाठी सुट्टी घेत असतो परंतु ती सुट्टी आज घेतली जाणार नाही.

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री. भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी मावळ तालुक्यातील शेतक-यांवर झालेल्या गोळीबाराच्या गंभीर व संवेदनशील विषयावर चर्चा उपस्थित केली असून त्या चर्चेवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मूळ विषयाला हात घालण्यापूर्वी सर्वप्रथम कालच्या घटनेत ज्या 3 शेतक-यांचा दुर्दैवी मृत्यू झाला त्यांच्या कुटुंबीयांच्या व आंदोलन कर्त्यांचे सांत्वन भाषणाच्या रुपाने मी व्यक्त करीत आहे. हा प्रश्न गेल्या 3 वर्षापासून लोकशाहीच्या मार्गाने हाताळला जात असतांना अचानक या प्रश्नाला वेगळे वळण का लागले यादृष्टीने सुध्दा विचार होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, दुर्दैवाने अशी एखादी घटना घडल्यानंतर सभागृहात चर्चा उपस्थित होत असते. या राज्यामध्ये दुर्दैवाने पुनर्वसनाचे अनेक प्रश्न उपस्थित झालेले आहेत. कोयना धरणग्रस्तांचे पुनवर्सन आज पावेतो पूर्णपणे झालेले नाही. आपल्या राज्यात अनेक प्रकल्प उभे राहिलेले आहेत. या प्रकल्पाच्या संदर्भात कोणाच्याही मनात शंका नव्हती. बळीराजाने, शेतक-याने आपल्या जमिनीचा तुकडा राज्याच्या विकासासाठी, राज्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी नेहमीच दिलेला आहे. परंतु त्यांचे पुनर्वसनाचे प्रश्न सुटलेले नाहीत. प्रकल्प सुरु झाल्यानंतर प्रथम पुनवर्सनाच्या प्रश्नाकडे पाहिले जाते परंतु नंतर या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले जाते ही वस्तुस्थिती आहे. मावळ तालुक्यातील पवना प्रकल्पाला जवळ जवळ 15 ते 20 वर्षे झालेली आहेत. 15-20 वर्षापासून या ठिकाणच्या प्रकल्प ग्रस्तांचे प्रश्न सुटत नसल्यामुळे या ठिकाणी सर्व पक्षीय कृती संघर्ष समिती तयार झाली. ही कृती समिती कोणत्या एका पक्षाची नसून 65 गावातील शेतकरी एकत्र येऊन त्यांनी ही कृती समिती निर्माण केलेली आहे. पूर्वी पवना धरणाचे पाणी नदीत सोडले जात होते परंतु त्याला कोणी विरोध केला नव्हता. परंतु जलवाहिनी द्वारे हे पाणी घेऊन जाण्याचा विचार जेव्हा झाला तेव्हाच ख-या अर्थाने विरोधाला सुरुवात झाली. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने जलवाहिनीने पाणी घेऊन जाण्याचा निर्णय घेतला तेव्हा पासून या संघर्षाला तोंड फुटले असे मी म्हटले तर ते वावगे होणार नाही. धरणाची क्षमता किती आहे व त्यातील किती पाणी उचलले जावे या गोष्टी महत्वाच्या आहेतच. परंतु त्याबरोबर आपल्याकडे झपाटयाने नागरीकरण वाढत आहे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप....

आता पुणे शहर लोणावळयापर्यंत आलेले आहे. नागरीकरणाला पाणी उपलब्ध करुन देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. हा प्रश्न एवढा का चिघळावा असा प्रश्न आमच्या समोर सुध्दा पडलेला आहे.

यानंतर श्री. सरफरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

मुळात त्या नदीमधून पिंपरी-चिंचवड शहराला पाणी पुरविले जाते, ते पाणी पाईपलाईनव्दारे पुरवावे की पूर्वीसारखे नदीमधून पुरवावे एवढाच प्रश्न असतांना त्याचा एवढा मोठा उद्रेक कां व्हावा याच्या मागील कारण शोधणे गरजेचे आहे. या ठिक्‌ाणी ठराव कुणी मांडला किंवा कुणी विषय मांडला ही गोष्ट अलाहिदा आहे. आपली या बाबतीत वेगवेगळी मत-मतांतरे असू शकतील. परंतु या प्रश्नाचा उद्रेक कां व्हावा याच्या मुळाशी तुम्हा-आम्हाला जाणे गरजेचे आहे. त्या गोळीबाराचे कोणत्याही प्रकारे समर्थन होवू शकत नाही. ही मोगलाई नाही किंवा ब्रिटीश शाही नाही. हे सर्व घडत असतांना नक्की काय घडले याचे विश्लेषण करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. केवळ राजकीय पुढारी म्हणून नाही तर आपण या सर्व जनतेचे देणेकरी आहोत म्हणून आपण सर्वजण त्याला जबाबदार आहेत. या अधिवेशन काळात आपण उल्लेख केलेल्या तीन घटना घडल्या आहेत. त्याची जितकी निंदा करावी तितकी कमी आहे. या ठिकाणी मघाशी आयबीएन या चॅनेलचा उल्लेख करण्यात आला. त्या चॅनेलच्या वार्ताहराने काय सांगितले ते तुम्ही आणि आम्ही ऐकले आणि पाहिले आहे. त्या ठिकाणी एक कँटर उभा होता, त्याच्या चालकाला पोलिसांकडून मारले जात होते हे आपण पाहिले आहे. सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी म्हटल्याप्रमाणे एक्सप्रेस हायवेपासून सर्व गावे लांब आहेत. त्यामुळे त्या गावातील माणसे ताडकन आंदोलनाच्या ठिक्‌ाणी चालून आली आणि आंदोलन सुरु झाले असे झालेले नाही. त्या संघर्ष समितीने आंदोलनाची दिशा व दिवस ठरविला असावा असा माझा भाबडा समज आहे.

त्या ठिकाणी सकाळी साडे नऊ वाजता सर्व आंदोलनकर्ते जमा व्हावयास लागले. साडे नऊपासून आंदोलनाची प्रक्रिया सुरु झाली. सभापती महोदय, आंदोलन म्हटल्यानंतर त्या ठिकाणी थोडीफार आक्रमक स्वरुपाची भाषणे होतात. परंतु आक्रमक आणि प्रक्षोभक यामध्ये कुठेतरी समन्वय साधणे गरजेचे आहे. यापूर्वी देखील या राज्यामध्ये आंदोलने झाली आहेत आणि भविष्यात देखील होतील, हा तुमचा आणि आमचा लोकशाहीतील अधिकार आहे. परंतु ते आंदोलन चौकटीमध्ये राहून कसे करावे याचे संकेत लोकशाहीमध्ये तुम्हा-आम्हाला पाळावे लागतील. या बाबत मी कोणत्याही गोष्टीचे समर्थन न करता माझे स्वत:चे वैयक्तिक मत मांडतो. आंदोलनाच्या ठिकाणी आक्रमक भाषणे झाली त्याप्रमाणे प्रक्षोभक भाषणे सुध्दा झाली याचाही आपल्याला उल्लेख करावा लागेल. आपण म्हणालात की, त्या आंदोलनाचे आम्ही टेप रेकॉर्डींग केले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

तशाप्रकारच्या टेप आमच्याकडे सुध्दा आहेत, पोलिसांकडे सुध्दा असल्या पाहिजेत. या सर्व प्रकारामध्ये पोलीस नेहमी आरोपीच्या पिंजऱ्यामध्ये उभा असतो. या घटनेमध्ये ज्या पध्दतीने इतक्या जवळून पोलिसांकडून गोळीबार करण्यात आला आहे, त्यामुळे महाराष्ट्राच्या पोलिसांना नक्की आरोपीच्या पिंजऱ्यामध्ये उभे राहावे लागेल. म्हणून या प्रकरणाच्या मुळाशी जाणे गरजेचे आहे. आपण नेहमी म्हणतो की, "म्हातारी मेल्याचे दुःख नाही,पण काळ सोकावता कामा नये". अशाप्रकारे काळ सोकावत गेला तर लोकशाहीच्या चौकटीमध्ये तुम्ही जसे वावरता तसे आम्ही देखील वावरतो. जगामधील सर्वात मोठया लोकशाहीप्रधान देशामध्ये लोकशाहीच्या चौकटीमध्ये वावरत असतांना, नागरीकांमध्ये वावरत असतांना कुणी प्रक्षोभक भाषणे करुन चिथावणी देत असेल तर त्याची चौकशी करणे आवश्यक आहे.म्हणून मला वाटते की, हा पाण्यापुरता मर्यादित प्रश्न असता तर गोष्ट वेगळी होती.

त्या ठिकाणी पाईपलाईनने पाणी न्यायचे की पूर्ववत नदीमधून पाणी न्यावयाचे हा प्रश्न आहे. पूर्ववत नदीमधून पाणी न्यायला शेतकऱ्यांनी कधीही विरोध केला नाही. त्या ठिकाणी शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न आहे. जवळ जवळ 15 हजार हेक्टरच्या सिंचनाचा प्रश्न आहे. या धरणाची निर्मिती सिंचनासाठी झाली याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही आमचे सुध्दा दुमत नाही.परंतु हा सिंचनाचा प्रश्न कसा सोडविला जाईल या संबंधी संबंधितांबरोबर बैठका घेऊन त्याची उकल होणे गरजेचे होईल असे मला वाटते. ही सर्व उकल होत असतांना एक्सप्रेस हायवे कशापध्दतीने बंद केला गेला हा प्रश्न देखील तितकाच अनुत्तरीत आहे. आपणा सर्वांच्या वक्तव्यामधून कदाचित माझ्या या ज्ञानामध्ये थोडी भर पडेल. सकाळी साडे नऊ वाजता आंदोलन सुरु झाल्यानंतर एक्सप्रेस हायवेच्या दोन्ही बाजूला पुढील तीन ते चार तास गाडया थांबल्या होत्या. या एक्सप्रेस हायवेवरुन फक्त श्रीमंताच्या गाडया जातात असे नाही. हा आपणा सर्वांचा द्रुतगतीने जाणारा मार्ग असल्यामुळे या आंदोलनामुळे पाच किलोमीटरपर्यंत गाडया थांबल्या होत्या, ट्रॅफिक जाम झाले होते या कडे सुध्दा आपण लक्ष देणे गरजेचे आहे. माझ्याकडील माहितीप्रमाणे मघाशी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी ज्या कँटरचा उल्लेख केला, त्यापूर्वी त्या ठिकाणी पोलिसांच्या दोन गाडया जाळण्यात आल्या. हे मी सांगत नाही तर त्या ठिकाणाहून आयबीएन चॅनेलव्दारे थेट प्रक्षेपण होत होते, त्यांच्या वार्ताहरांचे म्हणणे मी या ठिकाणी आपणास सांगत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

सभापती महोदय, काल विधिमंडळाची दोन्ही सभागृहे तहकूब झाल्यानंतर सर्व सन्माननीय सदस्य त्या ठिकाणी रवाना झाले. सन्माननीय उप मुख्यमंत्री सुध्दा आज सकाळी गेले, काल संध्याकाळी गेले. त्या ठिकाणी जाणे हा महत्वाचा विषय नव्हता तर त्या ठिकाणी जावून तेथील दु:खितांचे अश्रू पुसणे महत्वाचे होते. सभापती महोदय, आयबीएन-7 च्या वार्ताहराने एक महत्वाची गोष्ट सांगितली ती जशीच्या तशी मी या ठिकाणी सांगण्याचा प्रयत्न करतो. "सुरुवातीला आंदोलनकर्त्यांनी भाषणे सुरु केली त्यावेळी सर्व आलबेल शांत वातावरण होते, घोषणा सोडल्यातर कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडेल असे कुणाच्याही स्वप्नात नव्हते.परंतु ज्यावेळी प्रक्षोभक भाषणे सुरु झाली त्यावेळी ज्या ठरलेल्या घोषणा होत्या त्या व्यतिरिक्त घोषणा सुरु झाल्या. त्या वेळी तेथील वातावरण गढूळ व्हावयास लागले. हे होत असतांना पोलिसांनी त्यामध्ये चागल्या अर्थाने थोडासा हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला. सुरुवातीला आंदोलनकर्त्यांचे आंदोलन शांततेने संपावे आणि हा एक्सप्रेस हायवे लवकर मोकळा होऊन सर्व वाहतूक मार्गी लागावी या भूमिकेतून पोलीस आपले काम करीत असतांना अचानक त्या ठिकाणी दगडफेक सुरु झाली.आपण म्हणता की, एक्सप्रेस हायवेवर दगड कोठून आले? हा प्रश्न तितकासा महत्वाचा वाटत नाही. या ठिकाणी ज्या चॅनेलचा उल्लेख करण्यात आला, तेथील आंदोलनाच्या केलेल्या टेप रेकॉर्डींगचा उल्लेख केला गेला त्या बाबतीत अगदीच स्पष्टपणे सांगावयाचे झाले तर त्या ठिकाणी जवळ जवळ अर्धा तास दगडफेक सुरु होती. ती होत असतांना सुरुवातीला त्यांना इशारे देण्यात आले, त्यांना भोंग्यावरुन सांगण्यात आले. परंतु दगडफेक थांबविली जात नाही तेव्हा सर्वात प्रथम त्या ठिकाणी अश्रूधूराची नळकांडी फोडण्यात आली. त्यानंतर आंदोलक सैरा वैरा पळू लागले. त्यामध्ये काही घटना घडल्या आणि त्यामधूनच पोलिसांच्या गाडीला आग लावण्यात आली, त्यामुळे भीतीचे वातावरण तयार झाले. या ठिकाणी पोलिसांच्या जाळण्यात आलेल्या गाडीचा प्रश्न होताच, परंतु एक्सप्रेस हायवेच्या दोन्ही बाजूला 5 कि.मी. पर्यंत वाहने उभी होती . त्या ठिकाणी चुकून जर काही घटना घडली असती तर काय झाले असते याचेही सर्वांनी भान ठेवणे गरजेचे आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 13:40

श्री.भाई जगताप . . ..

सभापती महोदय, या सर्व प्रसंगामध्ये प्रथम अश्रुधूराची नळकांडी फोडली गेली, त्यानंतर त्याठिकाणी प्लॅस्टीकच्या गोळ्यांचे फायरींग झाले आणि या सगळया गोंधळामध्ये काही पोलीस सुध्दा अडकले आणि अनेक वेळा सांगून सुध्दा काही होत नाही, त्यानंतर फायरींग करण्यात आले अशा प्रकारची माझी माहिती आहे आणि तशा प्रकारची माहिती वाहिन्यांनी सुध्दा दिली. आता असा प्रश्न निर्माण होतो आणि जो जास्त महत्वाचा आहे की, पोलिसांनी एवढ्या जवळून छाताडावर गोळया मारण्याइतपत रिव्हॉल्व्हर मधून फायरींग का केले. मला असे वाटते की, आतापर्यंत आपल्या राज्यामध्ये ज्या-ज्यावेळी फायरींग झालेले आहे, मग ते रमाबाई आंबेडकर कॉलनीमध्ये झालेले असेल.पण अशा प्रकारे जेव्हा दुर्दैवी घटना होतात तेव्हा रिव्हॉल्व्हर मधून फायरींग करु नये अशा प्रकारचे संकेत आहेत काय हे मला माहिती नाही. ते जर कळले तर माझ्याही ज्ञानामध्ये भर पडेल.पण फायरींग करताना रिव्हॉल्व्हरमधून करु नये,बंदुकीमधूनच करावे असे काही कायद्यामध्ये असल्याचे मला तरी माहिती नाही. म्हणून त्यावेळी जी घटना घडली, त्याला कंट्रोल करण्यासाठी त्यांनी जर प्रेकॉर्शन म्हणून अशा प्रकारची ॲक्शन केली असेल तर त्याचे समर्थन करता येणार नाही आणि त्याकडे दुर्लक्ष देखील करता येणार नाही. याचे कारण असे की, जर एवढ्या जवळून जर कोणाच्या छाताडावर गोळया घातल्या जात असतील तर त्याचे समर्थन या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये अजिबात होणार नाही आणि ते कोणीही करणार नाही हे मला मुद्दाम येथे सांगावेसे वाटते. हा जो दुर्दैवी प्रसंग घडलेला आहे, त्यातून आम्ही काही शिकणार आहोत की नाही, यातून काही बोध घेणार आहोत की नाही हा सगळयात महत्वाचा प्रश्न माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला पडलेला आहे.

सभापती महोदय, यापूर्वी मी विधानसभेमध्ये होतो आणि येथील अनेक सन्माननीय सदस्य देखील विधानसभेमध्ये होते.मला आश्चर्य असे वाटते की, आम्ही लहान असताना कोयना धरणाच्या बाबतीत ऐकत होतो.पण अजूनही कोयना धरणाच्या संबंधातील पुनर्वसनाचे प्रश्न बऱ्याच प्रमाणात जसेच्या तसे आहेत,मी हे एकच उदाहरण सांगितले.पण अशी अनेक उदाहरणे असतील मग गोसीखूर्द प्रकल्प असेल किंवा विदर्भातील काही प्रकल्प असतील किंवा पश्चिम महाराष्ट्रातील प्रकल्प असतील, कोकणामध्ये एक नातूनगर प्रकल्प सोडला तर तेथे दुर्दैवाने प्रकल्प झालेले नाहीत.पण जे झाले त्याबाबत सांगावयाचे तर कोयना आणि नातूनगर प्रकल्पाच्या संबंधात पुनर्वसनाचे प्रश्न निर्माण झाले आहेत.सिंधुदूर्ग मध्ये तिल्लारी प्रकल्प झाला आहे,तेथेही पुनर्वसनाचा



असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.भाई जगताप . . ..

पुनर्वसनाचा प्रश्न भेडसावत आहे. ठाणे येथे आणि नाशिक येथेही बरेच प्रकल्प आहेत आणि आपण संपूर्ण मुंबईला तेथून पाणी पुरवितो. परंतु तेथील पुनर्वसनाचे प्रश्न देखील सुटलेले नाहीत. त्यामुळे अशा प्रकारे लोकांचा उद्रेक होतो, त्याच्या मुळाशी जाणे गरजेचे आहे. यातील राजकारण बाजूला ठेवावयास पाहिजे. कोणी राजकारण केले, कोणी काय केले, कोणी चिथावणी दिली हे जेवढे महत्वाचे आहे, तेवढेच जर या लोकांना त्यांच्या जमिनीचेच पैसे मिळाले नसतील, आम्ही सरकार म्हणून त्यांना जे आश्वासित केले, मग ते नोकरी देण्याच्या बाबतीत असेल किंवा आणखी काही बाबींसाठी असेल आणि ते जर आम्ही त्यांना आजपर्यंत देऊ शकत नसलो तर कुठेतरी आपल्याला परत एकदा याबाबतीत विचार करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय,माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरभाऊ यांच्या मताशी आम्ही पूर्णत: सहमत आहोत. या संपूर्ण प्रकरणाची न्यायालयीन चौकशी व्हावी मग यामध्ये सगळेच मग राष्ट्रवादी काँग्रेस किंवा काँग्रेस पक्ष असे काही नाही. त्या विभागातील नागरिकांनी तयार केलेली संघर्ष समिती आहे. कृपया याला कोणतातरी झेंडा लावण्याचा प्रयत्न करु नये. म्हणून मला मुद्दाम सांगावेसे वाटते की, आम्ही आपल्या मताशी पूर्णपणे सहमत आहोत. या गोळीबाराची न्यायालयीन चौकशी व्हावयास पाहिजे आणि त्यामध्ये जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. कारण ज्यापध्दतीने एका महिलेच्या छातीवर गोळया चालविल्या आहेत, एका शेतकऱ्यांच्या छातीवर गोळ्या चालविल्या आहेत हे महाराष्ट्र राज्य पुरोगामी असल्याचे लक्षण अजिबात नाही आणि याचा कोणालाही अभिमान असणार नाही. म्हणून माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, याची न्यायालयीन चौकशी व्हावी आणि यामध्ये जो कोणी दोषी असेल त्याच्यावर सक्त कारवाई झाली पाहिजेच. त्याचबरोबर त्यावेळी विशेषत: तास-दोन तासामध्ये ज्या-ज्या अधिकाऱ्यांनी बेजबाबदारपणे व्यक्तव्ये केलेली आहेत मग त्यामध्ये कोणीही असतील,त्यांना आपण बोलावून विचारावे की, खरेतर आपण एखादी गोष्ट होऊ नये यासाठीच प्रयत्न करावयास पाहिजेत आणि तशीच आपली भूमिका आहे.कायदा आणि सुव्यवस्था पाळणे म्हणजे काय? गोळीबार करणे ही बाब कायदा आणि सुव्यवस्थेमध्ये येऊ शकत नाही. कायदा आणि सुव्यवस्थेच्या बाबतीत अतिशय उद्रेक झाल्यानंतरची प्रक्रिया आहे.परंतु कायदा आणि सुव्यवस्था सांभाळण्याच्या बाबतीत आपली जी भूमिका आहे, ती कोणत्या पध्दतीने पार पाडण्यात आली याचे सुध्दा माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराच्या भाषणामध्ये विश्लेषण होणे आम्हाला अपेक्षित आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय,याठिकाणी एकंदर 65 गावे बाधित झालेली आहेत,त्यांच्या जमिनी गेलेल्या आहेत. तसेच पवना धरणाबरोबर लोणावळा येथील वरसगाव येथील जे धरण आहे, त्या भागातील कार्यकर्त्यांनी देखील आंदोलनाची नोटीस दिली होती. म्हणून मी् त्याचा मुद्दाम येथे उल्लेख करु इच्छितो. कारण असे की, अशा सगळया प्रसंगातून राज्यावर आरिष्ट येऊ नये म्हणून याअनुषंगाने शासनाला विनंती करतो आणि सूचना करु इच्छितो की, अशा प्रकारचे जे-जे प्रश्न आहेत, त्यामध्ये स्वत: माननीय मुख्यमंत्री महोदयांनी लक्ष घालून यासंबंधात त्वरित बैठका घ्याव्यात आणि प्रश्नांची उकल कशी होईल जेणेकरुन तेथील शेतकऱ्यांना,आंदोलनकर्त्यांना किंवा तेथील ज्या संघर्ष समित्या आहेत त्यांना शासनाची ठोस भूमिका समजू शकेल.

सभापती महोदय, हे सर्व प्रश्न 24 तासामध्ये सुटतील असे होऊ शकत नाही आणि माझा तसा आग्रही नाही हे मला आणि सगळयानांच माहिती आहे. परंतु येणाऱ्या कालावधीमध्ये हे प्रश्न कशा प्रकारे हाताळले जातील, याची उकल कशी होईल यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वत: लक्ष घालून ते प्रश्न सोडवावेत. तसेच या दुर्दैवी घटनेमध्ये तीन शेतकऱ्यांचा मृत्यू झाला आहे, त्यांच्या कुटुंबीयांना आम्ही शासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे असे देऊ, तसे देऊ असे म्हणणार नाही. परंतु ही एक विशेष घटना आहे आणि त्याचे भान ठेऊन, गांभीर्य ओळखून त्यांच्या कुटुंबीयांना पूर्णत: संरक्षित केले पाहिजे असे करणे म्हणजे त्यांच्यासाठी पोलिसांची सेवा उपलब्ध करुन देणे नव्हे, या घटनेमध्ये एका कुटुंबातील महिला मरण पावली आहे. सन्माननीय सदस्य म्हणाले ते खरे आहे की, एक बहीण गेलेली आहे. एका कुटुंबातील कर्ता पुरुष गेलेला आहे. दुसऱ्या कुटुंबातील देखील एक कमावता पुरुष गेलेला आहे, म्हणून सरकारने तीनही मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांना एक विशेष बाब म्हणून कर्तव्याच्या भावनेतून हातभार लावावा. यासाठी आपला ठरलेला जो नियम आहे, तो बाजूला ठेऊन त्यांना मदत करावी अशा प्रकारची मी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो. जय हिंद जय महाराष्ट्र.

-----

व्ही-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, याठिकाणी विरोधी पक्षाच्या वतीने नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला होता आणि सन्माननीय सभापती महोदयांनी या प्रस्तावाला मान्यता देऊन नियम 97 अन्वये चर्चा करण्यास अनुमती दिली. त्याबाबत माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, खरेतर या राज्यात कायदा आणि सुव्यवस्था शिल्लक आहे की नाही असा पहिला प्रश्न निर्माण होतो. जनतेच्या जीविताचे रक्षण करण्याचे काम तसेच मालमत्तेचे रक्षण करण्याचे काम हे शासनाचे आहे. जर आपण अलीकडच्या काळात पाहिले तर जनतेच्या जीविताचे रक्षण होत आहे काय ?

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

जनतेच्या मालमत्तेचे रक्षण केले जाते का आणि याला जबाबदार असणारे शासनकर्ते हे सरकार चालविण्यासाठी लायक आहेत का, या अनुषंगाने अनेक प्रश्न या ठिकाणी निर्माण होत आहेत. पवना धरण 1971 साली झाले. या धरणाला आता 40 वर्षे होऊन गेलेली आहेत. 40 वर्षानंतर सुध्दा तेथील शेतकरी सांगतो की, आमचे पाणी आम्हाला द्या. ज्या धरणासाठी आम्ही आमच्या जमिनी दिल्या आणि धरण बांधल्यानंतर त्या धरणातील पाणी आम्हाला मिळावे आणि पिंपरी-चिंचवडला सुध्दा मिळावे अशी त्या समितीची प्रामाणिक इच्छा आहे. खरे तर यामध्ये कोठेही राजकारण नाही. आम्हाला पिंपरी-चिंचवडला पाणी द्यावयाचे नाही असे त्या लोकांचे म्हणणे नाही. यामध्ये राजकारणाचा प्रश्न कोठे उद्भवत नाही. मला पहिला प्रश्न असा पडतो की, दादा आणि आबांमध्ये काही वाद आहे का ?

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अशा पध्दतीने उल्लेख करणे बरोबर नाही.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी चांगलेच बोलत आहे. मी असे का बोलत आहे ते सन्माननीय सदस्यांनी ऐकून घ्यावे. अधिवेशन चालू असताना माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांचे एक स्टेटमेंट आम्ही ऐकले की, पोलीस लावून त्या ठिकाणी मी पाईपलाईनचे काम करुन घेईन. अशा वेळी मी नेमके काय म्हटले पाहिजे अशी आपली इच्छा आहे ? यामध्ये मी काय राजकारण आणले ? त्या ठिकाणी तीन वर्षापासून सर्व पक्षांच्या वतीने एखादी समिती नेमली जाते आणि त्यांच्याकडून माननीय मुख्यमंत्र्यांपासून सगळ्यांना निवेदने दिली जात आहेत. गेल्या 40 वर्षापासून हे सर्व चाललेले आहे त्यामुळे ही काही कालची बात नाही. मग माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांचे काम काय आहे ? त्या समितीला बोलवणे, तेथील ग्रामस्थांना बोलवणे आणि त्यांच्याबरोबर चर्चा करुन त्यांचे प्रश्न सोडविणे ही शासनाची जबाबदारी आहे. तीन-तीन वर्षे आपण या आंदोलनाकडे लक्ष देत नाही त्याचा आम्ही काय अर्थ लावावयाचा ? त्या ठिकाणी जी तीन माणसे मेली त्याला हे शासन जबाबदार आहे. त्यामध्ये शांताबाई ठाकर असतील, मोरेश्वर साठे असतील किंवा शामराव तुपे असतील हे गोळ्या लागून मृत्युमुखी पडले, याला शासन जबाबदार आहे. माझी पहिली मागणी अशी आहे की, या तिघांचे

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. रामदास कदम ...

खून पाडण्याचे काम या सरकारने केले आहे. त्यामुळे या राज्याचे माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री आणि माननीय गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील या तिघांवर ताबडतोब कलम 302 खाली खटला दाखल केला पाहिजे. शासन आपले आहे त्यामुळे आपण त्याला जबाबदार आहात.

सभापती महोदय, नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना मान्य करणे याचा अर्थ यामध्ये शासनाचे अपयश आहे. प्रश्नोत्तराचा तास, लक्षवेधी सूचना तसेच सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला ठेऊन ज्यावेळी विरोधी पक्षाची नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना मान्य होते त्यावेळी हे अपयश शासनाचे आहे. मी राजकीय भाषण करीत नाही. यामध्ये शासनाचे अपयश आहे. ही बाब पहिल्यांदाच घडलेली नाही. हे अधिवेशन चालू असताना तीन-तीन वेळा पोलिसांच्या माध्यमातून गोळ्या झाडल्या जातात. वारकऱ्यांच्या बाबतीत घटना घडली. ड्रायव्हरने दारु पिऊन भरधाव गाडी भक्तांवर घातली आणि त्यामध्ये काही वारकरी मयत झाले. त्या ठिकाणी सुध्दा पोलिसांनी गोळ्या झाडल्या. त्या ठिकाणी कोण चिथावणी देण्यासाठी आला होता, कोण घोषणा देण्यासाठी आला होता ? त्या ठिकाणी पोलिसांच्या कोणत्या गाड्या जाळल्या होत्या ? याला कोण जबाबदार आहे ?

सभापती महोदय, जैतापूरमध्ये जो गोळीबार झाला त्यावेळी सुध्दा अशाच प्रकारची विधाने केली गेली की, याच्या पाठीमागे चिथावणी देणारे कोण आहेत ? आता जे बोलले जाते तेच त्यावेळी सुध्दा बोलले गेले. जैतापूरमध्ये देखील 200 पोलीस लावून जुलूमशाहीच्या माध्यमातून, ठोकशाहीच्या माध्यमातून, पोलिसांच्या हातामध्ये काठ्या देऊन, बंदुका देऊन कंपाऊंडचे काम चालू आहे. मग लोकशाही कोठे आहे ? घटनेच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आम्हाला हक्क दिले. आमची स्वत:ची जागा देण्याच्या बाबतीत आम्ही नाही म्हटले तर आमच्याकडे सत्ता आहे, आमच्या हातामध्ये पोलीस आहेत, बंदुका आहेत, त्या बंदुकीच्या माध्यमातून जमीन घेऊन कंपाऊंडचे काम चालू आहे. ही ठोकशाही आहे. ही हुकूमशाही आहे. हम करे सो कायदा अशी परिस्थिती आहे. सत्तेपुढे शहाणपण नसते असे आम्ही ऐकले होते पण आता आम्ही ते प्रत्यक्षात अनुभवत आहोत. नागपूरच्या घटनेमध्ये मध्ये जो बलात्कार झाला आणि त्या ठिकाणी जे लोक जमले त्यांच्यावर गोळीबार झाला. त्या गोळीबारात एक माणूस मयत झाला. त्या ठिकाणी प्रक्षोभक भाषण देण्यासाठी कोण आले होते ? त्यामुळे याच्या पाठीमागे या शासनाचे पूर्णपणे अपयश आहे.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. रामदास कदम ....

सभापती महोदय, या ठिकाणी त्या लोकांचे एवढेच म्हणणे आहे की, हे पाणी तुम्ही पाईपमधून घेऊन न जाता ते नदीमधून सोडा. नदीतून ते पाणी पिंपरी-चिंचवडलाही द्या आणि 65 गावातील शेतीचा जो प्रश्न आहे तोही सुटू द्या. ही साधी गोष्ट आहे. तसे न करता केंद्र शासनाकडून जे पैसे आलेले आहेत ते खर्ची पडले पाहिजेत म्हणून पाईपलाईनचे काम झाले पाहिजे, हे कशासाठी आणि कोणासाठी करीत आहात ? आपण कायमचे शासनात बसलेला नाहीत. आपण या ठिकाणी विश्वस्त म्हणून बसलेला आहात. त्या भागातील आमदार असतील किंवा पिंपरी-चिचवड महानगरपालिकेच्या निवडणुका असतील, त्या निवडणुका जिंकण्यासाठी पिंपरी-चिंचवडसाठी केवळ आम्हीच आहोत हे भासविण्याचा प्रयत्न केला जातो की काय याची देखील चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे. यामध्ये राजकारण नाही असे कितीही म्हटले तरी हे सर्व कशासाठी केले जात आहे ? हा हट्ट कशासाठी केला जात आहे ? 65 गावातील लोक एकत्र येऊन समिती तयार करतात. त्यांना संघर्ष का करावा लागतो ? सर्व पक्षाच्या लोकांना एकत्र येऊन आंदोलन कशासाठी करावे लागते, ही वेळ त्यांच्यावर कोणी आणली ? सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांना सांगू इच्छितो की, ही वेळ आपल्या शासनाने, आपल्या राज्यकर्त्यांनी आणलेली आहे. त्यामुळे या खुनाला राज्यकर्ते जबाबदार आहेत असे मला वाटते.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी मागणी केल्या प्रमाणे न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे. त्याबद्दल कोठेही दुमत नाही. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी सांगितले की, नियमाच्या बाहेर जाऊन सुध्दा या तीन लोकांच्या कुटुंबीयांना मदत करता येते का ते पहावे. पण आज एक गोष्ट स्पष्ट झाली पाहिजे आणि आम्हाला शब्द दिला पाहिजे की, या महाराष्ट्रामध्ये भविष्यामध्ये आम्ही बंदुकीच्या जोरावर राजकारण करणार नाही, सत्ता गाजविणार नाही. हे एकदा स्पष्ट होणे अत्यंत आवश्यक आहे. सभागृहाचे अधिवेशन चालू असताना तीन-तीन वेळा गोळीबार होतो आणि शेतकरी मरतात याचा अर्थ काय आहे ? गेल्या 60 वर्षामध्ये आम्ही शेतकऱ्यांना काय दिले ? शेतकऱ्यांना पूर्णपणे नेस्तनाबूत आणि उद्ध्वस्त करण्याचे काम या शासनकर्त्यांकडून चालले आहे. एका बाजूला अस्मानी आणि दुसऱ्या बाजूला सुलतानी संकटामध्ये सापडलेल्या शेतकऱ्यांना आपण गोळ्या घालून मारत आहात. सन्माननीय सदस्य

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. रामदास कदम ....

श्री. भाई जगताप यांनी सांगितले की, रिव्हाल्वरमधून गोळी घालू नये असा कोणताही कायदा नाही, नियम नाही. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना एवढेच सांगावयाचे होते की, ज्यावेळी रिव्हाल्वरमधून तुम्ही गोळी घालता त्यावेळी जवळून गोळी घालता. ज्यावेळी बंदुकीतून गोळ्या घालतो तेव्हा लांबचे अंतर असते. मग असा कोणता प्रसंग आला होता ? या संदर्भातच माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उल्लेख केला. इतक्या जवळून आपण एखाद्या बाईच्या छातीत गोळ्या घालता. काय मर्दानी काम केले आहे ? एखाद्या गरीब बाईच्या छातीवर गोळ्या घालून या सरकारने कोणते मोठे काम केले आहे ? आपण यातून काय दाखवून दिले, महाराष्ट्राला काय संदेश दिला ? आम्ही बाईच्या छातीवर देखील गोळ्या घालू शकतो असे आम्ही लोकशाही न मानणारे राज्यकर्ते आहोत असा संदेश आपण यातून दिलेला आहे. जो संदेश आपण जैतापूरला दिला तोच संदेश या ठिकाणी दिलेला आहे. ही वेळ का यावी ? त्या ठिकाणी शेतकऱ्यांवर तीन-तीन तास, पाच-पाच तास आंदोलन करण्याची वेळ कोणी आणली ? गेल्या तीन वर्षात त्यांनी निवेदने दिलेली होती.

आपण त्या जिल्ह्याचे पालकमंत्री आहात. पुण्याला असताना आपण निरोप पाठवून तेथील आमदाराला बोलविले असते, त्या समितीला बोलविले असते तर पाच मिनिटांमध्ये हा प्रश्न सुटला असता. पण आंदोलन करीत आहेत तर करु दे, माझ्याकडे पोलीस आहेत, माझ्या हातामध्ये सत्ता आहे, आमचे कोण वाकडे करणार आहे, आम्ही बघून घेऊ, गोळ्या घालू, याच पध्दतीने जर आपण या महाराष्ट्रामध्ये राज्य करणार असाल तर भविष्यामध्ये तुम्हाला देखील निवडणुकीला सामोरे जावयाचे आहे. आज तुम्ही गोळ्या घालून शेतकऱ्यांना संपवित आहात उद्या शेतकऱ्यांच्या हातामध्ये देखील मते आहे, ही गोष्ट आपण लक्षात ठेवावी. आपण ज्या पध्दतीने शेतकऱ्यांच्या जीवनाशी खेळत आहात, सर्वसामान्य लोकांना गोळ्या घालत आहात, ते योग्य नाही. दूरदर्शन वहिनीवर आम्ही सुध्दा दृश्य पाहिले. नुसता एक टेम्पो नाही तर एक सफेद गाडी होती ती सुध्दा पोलीस फोडत होते. पोलिसांच्या हातात ज्या काठ्या होत्या त्या काठ्यांनी केवळ गाड्या फोडण्याचे काम पोलिसांकडून सुरु होते. हे कशासाठी ? मी रात्री टी.व्ही. पाहात होतो. ज्या खाकी ड्रेसवाल्या पोलिसांनी कायद्याचे संरक्षण करावयाचे आहे

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

ते पोलीस कायदा हातामध्ये घेऊन, दंडुका घेऊन मालमत्तेची तोडफोड करण्याचे काम करीत होते. मग या राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची बिहारपेक्षाही वाईट अवस्था आहे असे म्हटले तर आम्ही राजकारण करतो असे म्हटले जाते. परंतु वस्तुस्थिती कोणालाही नाकारता येणार नाही, त्या ठिकाणी पोलीस हातात दंडुका घेऊन गाड्या फोडत होते. त्या गाडीतून आंदोलक आले होते म्हणून त्याची त्यांनी तोडफोड केली आहे. ते आंदोलक त्या गाडीतून आले यामध्ये त्यांनी काय चूक केली होती ? म्हणून ज्या पोलिसांनी अशा प्रकारचे कृत्य केले आहे त्याची चौकशी करण्यात यावी. त्यापूर्वी तेथील पोलीस अधीक्षक असेल, ज्यांनी शेतकऱ्यांवर गोळ्या घातल्या आहेत त्या पोलिसांना शासनाने निलंबित करावे. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही, पण काळ सोकावता कामा नये. या घटनेला जे जे जबाबदार आहेत त्या सर्व पोलिसांना त्वरित निलंबित केले पाहिजे. त्याच प्रमाणे राज्याचे माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री व माननीय गृह मंत्री या तिघांविरुध्द कलम 302 अन्वये खुनाचा खटला तत्काळ दाखल करावा अशी मी मागणी करतो आणि माझे भाषण संपवितो.

------

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी या घटनेबाबत सभागृहात तातडीने चर्चा सुरु करण्याची मागणी केल्यावर सभागृहात चर्चा सुरु झालेली आहे. ही चर्चा सुरु असताना सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी या घटनेची न्यायालयीन चौकशीची मागणी केली, त्यांनी आत्मियतेने आपले भाषण केले. परंतु माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री व माननीय गृहमंत्री यांच्यावर कलम 302 चा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. अशा प्रकारचे वक्तव्य सभागृहाच्या रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावे.

श्री.रामदास कदम : मी काय चुकीचे बोललो आहे, जे काही काल घडले ते योग्य आहे काय, या घटनेला जबाबदार कोण आहे ?

**उप सभापती** : दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना आपल्या भावना मांडावयाच्या होत्या, त्या त्यांनी भाषणातून मांडल्या आहेत. त्यांच्या भाषणाची नोंद घेण्यासाठी मी येथे बसलेलो आहे.

2...

**उप सभापती** .....

सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, ही चर्चा मंत्री महोदयांच्या उत्तरासह अडीच तासात आपल्याला पूर्ण करावयाची आहे. चर्चा सुरु होऊन 1 तास 7 मिनिटे झालेली आहेत. सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे अशी तक्रार करु नये की, अगोदरच्या सन्माननीय सदस्यांना अधिक वेळ दिला जातो, त्या मुळे आम्हाला कमी वेळ मिळतो. ज्या सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे त्यांनी 5-5 मिनिटात आपले भाषण पूर्ण करावे. उत्तरासाठी अर्धा तास वेळ दिला जाईल.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, या चर्चेला मी आणि माननीय गृह मंत्री सुध्दा उत्तर देणार आहेत. त्यामुळे या चर्चेसाठी थोडा वेळ वाढवून द्यावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मावळ येथे झालेल्या गोळीबारासंबंधी सभागृहात चर्चा सुरु आहे, या चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, पवना धरणाच्या पाण्यावरुन राजकारण नको असे बोलले जात आहे. परंतु तेथे शहरीकरण वाढत आहे. प्रत्येक शहराला कोणत्या ना कोणत्या तरी नदीतून पाण्याचा पुरवठा केला जातो. मग मुंबई असेल, नागपूर असेल किंवा औरंगाबाद असेल. या वाढत्या शहरीकरणामुळे पाणी द्यावे लागते. या पाण्याच्या विभाजनासाठी सभागृहात विधेयकावर चर्चा झालेली आहे. त्यानुसार प्रथम पिण्यासाठी, नंतर शेतीला, नंतर उद्योगाला पाणी देण्याचे धोरण जाहीर करण्यात आले. शासनाने शेतीला पाणी देऊ असे सांगितले आहे. त्यानंतरही हे पाणी शहराकडे चालले आहे. पुण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटलेला असताना शेतकऱ्यांच्या भावना कशा भडकावयाच्या, 1971 सालापासूनचा हा प्रश्न आहे. या प्रश्नासंबंधी तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी 8 तारखेला एक बैठक बोलविली होती. त्या बैठकीला कोणकोण गेले होते, कोणकोणत्या पक्षाचे लोक गेले होते ? आता अधिवेशन सुरु आहे. अधिवेशनाच्या काळात बैठक झाली पाहिजे असे वाटत होते. जर 8 तारखेची बैठक चांगली झाली असती तर आज ही वेळ आली नसती आणि 3 लोकांचा जीव वाचविता आला असता. आता घेतलेल्या माझ्या माहिती प्रमाणे एक पोलीस अधिकारी सुध्दा अत्यवस्थ आहे. पाण्याच्या प्रश्नाशी संबंधित जलसंपदा विभाग आहे, मंत्री महोदय आहेत, पाणी विषयावरील तज्ज्ञ आहेत. या सर्वांच्या माध्यमातून या प्रश्नातून मार्ग काढता आला असता. सभागृहात गोळीबाराविषयी चर्चा होत आहे. महाराष्ट्रातील पाण्याचा सुटावा यासाठी इतर राज्यातील लोक येथे येत आहेत. तलासरी येथे गोव्याच्या मंत्र्यांबरोबर माननीय जलसंपदा मंत्र्यांनी बैठक घेतली आहे. दुसऱ्या राज्याच्या लोकांची येथे बैठक होते. आपापल्या नदीचे पाणी कोणाला व कशा पध्दतीने दिले जावे यावर विचार झाला पाहिजे. प्रथम पिण्यासाठी पाणी व नंतर शेतीला पाणी मिळाले पाहिजे, याबद्दल दुमत नाही. पण भोळ्या भाबड्या लोकांचा राजकारणासाठी वापर केला जात आहे यावर विचार करण्याची गरज आहे.

मी गोळीबाराचे समर्थन करण्यासाठी या ठिकाणी उभा राहिलेलो नाही. गोळीबार झाला ते चांगले झाले असे मी म्हणणार नाही. परंतु गोळीबार करण्याची वेळ का येते यावर सुध्दा विचार करण्याची गरज आहे. मघाशी सर्व सन्माननीय सदस्यांनी असे म्हटले की, या प्रश्नाबाबत कोणी

4...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर

राजकारण करु नये. राजकारण नको असे म्हणत असताना तेथील मॉबच्या क्लिपिंग दाखविल्या जात होत्या त्या मी रात्री पाहिल्या आहेत. त्यामध्ये राष्ट्रवादीचे झेंडे दिसले नाहीत, काँग्रेसचे झेंडे दिसले नाहीत, भारतीय जनता पक्षाचे आणि शिवसेना पक्षाचे झेंडे दिसले. शेतकऱ्यांच्या प्रश्नात राजकारण नको असे आपण म्हणत असू तर या झेंड्यांचे राजकारण कसे काय आले, हे झेंडे दिसण्याचे कारण काय होते ? (अडथळा) मग आपण हे घडविले आहे ते मान्य करावे. शेतकऱ्यांच्या भावना भडकविण्याचे काम केले हे तुम्ही मान्य करावे. (अडथळा) अशा पध्दतीचे राजकारण केले जात आहे. त्यावर शांततेने विचार करण्यात यावा. पण असंख्य लोकांचे मुडदे पाडल्यानंतर झेंडे बदलू नका, काही लोकांना जगावा. त्या अगोदर झेंडे बदला. मावळचा प्रश्न उपस्थित करुन 4 लोक मरण पावले, अणुऊर्जेसाठी रत्नागिरी येथे काही लोक गेले, तेथेही लोकांच्या भावना भडकविण्यात आल्या, चर्चेसाठी तुम्ही गेला नाही, त्यावेळी तेथे एका व्यक्तीचा मृत्यू झाला होता. त्यासाठी पोलीस जबाबदार आहेत असे बोलले गेले. एन्रॉनच्या वेळी तीच परिस्थिती होती. भावना भडकविण्याचा प्रयत्न करण्यात आला. वारकऱ्यांच्या घटनेबाबत सुध्दा तेच करण्यात आले.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ ऑर्डर आहे. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर हे काय बोलत आहेत ?

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मी मागे घडलेल्या घटनांचा उल्लेख करीत आहे. त्याबाबत चौकशी करण्यात यावी अशी माझी मागणी आहे.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात. )

**उप सभापती** : कृपया सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम हे बोलत असताना सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी हात वर करुन बोलण्याची परवानगी मागितली होती. परंतु मी त्यांना बोलण्याची परवानगी दिली नाही. एखाद्या सन्माननीय सदस्यांचे म्हणणे पूर्ण होत नाही, तो पर्यंत कोणीही मध्येच उठून बोलू नये. सन्माननीय सदस्यांना अशी भीती वाटत आहे की, रेकॉर्डवर चुकीचे येत आहे. रेकॉर्डवर चुकीचे येत आहे की बरोबर येत आहे हे मी नक्की ठरवीन. त्याची आपण काळजी करु नये. सन्माननीय सदस्य श्री.पावसकर यांच्या भाषणाबाबत सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना आक्षेप घ्यावयाचा असेल तर मी आपल्याला नंतर जरुर संधी देईन.

5...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, गोळीबारासंबंधी आपण चर्चा करीत आहोत. पोलिसांनी गोळीबार करताना गोळी कंबरेखाली मारली की वर मारली याची न्यायालयीन चौकशी जरुर व्हावी, ज्यांनी हे आदेश दिले असतील त्यांच्यावर कठोर शिक्षा व्हावी. विरोधी पक्षाच्या काळात जी झाली नाही त्यापेक्षाही कठोर शिक्षा केली जावी. पण हे जे घडविले जाते त्यावर मी बोलावयाचे नाही काय, मी काय चुकीचे बोललो आहे ? रत्नागिरी येथे शांततेने बैठका झाल्या असत्या तर एका व्यक्तीचा जीव वाचला असता. जिल्हाधिका-यांनी 8 तारखेला बोलविलेल्या बैठकीत सर्व पक्षांनी मिळून प्रयत्न केला असता तर काल जे 3 जण मरण पावले आहेत ते वाचले असते. एन्रॉनच्या वेळी सुध्दा लोकांना तसेच भडकविण्यात आले होते. माझ्याकडे एक बातमी आहे. मी कोणावरही आरोप करीत नाही. ती बातमी मी सभागृहासमोर आणू इच्छितो. काही दिवसांपूर्वी गिरणी कामगारांसाठी मोर्चा काढण्यात आला होता. मी माननीय मुख्यमंत्र्यांना, माननीय उप मुख्यमंत्र्यांना आणि सर्व मंत्री महोदयांना धन्यवाद देईन. या मोर्च्याच्या 4 दिवस अगोदर सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप असतील, सन्माननीय राज्यमंत्री श्री.सचिन अहिर असतील त्यांनी कामगारांशी चांगल्या प्रकारे चर्चा केली म्हणून तेथील वातावरण शांत झाले.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर...

दुस-या दिवशी हा प्रश्न सुटत नाही असे पाहून मुंबई बंद करण्याचा इरादा होता. त्या आधी 11 मिटींग झाल्या. त्याची कॅसेट मी सभागृहामध्ये दाखवायला तयार आहे. तेव्हा आंदोलन घडवून आणण्यासाठी काय केले जाते हे विरोधी पक्षाने आम्हाला सांगण्याची आवश्यकता नाही. ज्यांनी पुण्यामध्ये बस फोडा, ट्रक जाळा म्हणून सांगितले त्यांनी आम्हाला या बाबतीत काही सांगण्याची आवश्यकता नाही. पोलिसांना टेप मिळाली म्हणून ते सर्व जनतेसमोर आले.

गिरणी कामगारांचे आंदोलन 28 वर्षापासूनचे आहे. कामगारांच्या 7 युनियन एकत्र येऊन हे आंदोलन करीत आहेत. गिरणी कामगारांचा प्रश्न शांततेने आणि सामंजस्याच्या मार्गाने सुटावा अशा गिरणी कामगारांच्या 7 युनियनची मागणी होती. मुंबई आणि मुंबईतील जनतेला वेठीला धरुन हा प्रश्न त्यांना सोडवायचा नव्हाता तर शासना बरोबर चर्चा करुन हा प्रश्न सोडवायचा होता. सभापती महोदय, त्यावेळी सोमवारी मुंबई बंद झाली असती तर त्यासाठीची आखणी वेगळया मार्गाने झाली होती. तो मार्ग यशस्वी झाला असता तर मुंबईमध्ये एवढे मृत्यूमुखी पडले, त्यामुळे गृह मंत्र्यांनी राजीनामा द्यावा, मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी झाली असती. राजीनामा द्या आणि काय करा ? 40 वर्षे सरकारच्या प्रतीक्षेत असलेल्यांना सरकार द्या ! पुढची 40 वर्षे ही जनता आपणास तशी संधी देईल असे मला वाटत नाही. आपल्याकडे आंदोलने केली जातात. पण आंदोलनाची रुपरेषा काय आहे हे कळणे फार गरजेचे आहे. अतिउत्साही लोकांना, कार्यकर्त्यांना काही गोष्टी करायला सांगितल्या जातात.

वारक-यांचा अपघात झाला. त्यासंबंधी या सभागृहामध्ये चर्चा झाली. या वारक-यांना कोण कोण भेटायला गेले होते, कोण कोण काय काय सांगत होते ? मघाशी सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या अधिवेशनाच्या काळामध्ये तीन वेळा गोळीबार झाला. जर मुंबई बंद झाली असती तर हा गोळीबार चौथ्यांदा झाला असता. वारक-यांचा प्रश्न सामोपचाराने सुटला नसता तर आणखी पाचव्या वेळी हा गोळीबार झाला असता. काही गोष्टी घडविण्याच्या दृष्टीने भाषणे करायची, अतिउत्साही अशा आपल्या कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन त्यांना अशा प्रकारचे काम करायला सांगायचे आणि आपण मात्र वर हेलिकॉप्टर मधून फोटो काढून, त्याची पुस्तके छापायची, अशाने प्रश्न सुटणार नाहीत. मी एक साधे उदाहरण देतो. 10 वर्षापूर्वी वाड्यामध्ये देखील असाच प्रश्न





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर...

निर्माण झाला होता. वाड्यामध्ये कोका कोला कंपनी पोहोचली होती. त्या कंपनीने पाण्याची लाईन टाकली होती. ती पाण्याची लाईन बंद करण्यात आली. त्यासाठी गावक-यांना बरोबर घेण्यात आले होते. आंदोलन करताना मी पलीकडच्या बाजूला होतो. मी स्वत: तिकडचा युनियन लिडर होतो. एकीकडे उत्पादकता वाढावी म्हणून काम करीत असताना दुसरीकडे पाणी थांबविण्यात आले. त्यानंतर त्याबाबतीत आपापसात चर्चा करुन मुबलक पाणी चालू झाले. जिथे थेंब थेंब पाणी मिळत होते ते भरपूर पाणी मिळायला लागले. हे कोठून आणि कसे मिळायला लागले ? पहिले पोल्यूशन आणि नंतर सोल्यूशन हा काय प्रकार आहे ? सभापती महोदय, दंगल घडविण्याचे ट्रेनिंग दिले जाते असे मी सांगणार नाही. परंतु दंगल घडविण्याच्या ट्रेनिंगची पहिली कॅसेट पोलिसांनी पकडल्यानंतर या कार्यक्रमामध्ये आम्हाला घेऊ नका असे कार्यकर्त्यांनी सांगितल्याचे पोलिसांच्या लक्षात आले. जर घेणार असाल तर अशा प्रकारचे काम आम्हाला करायचे नाही असे कार्यकर्त्यांनी सांगितले.

प्रत्येक वेळी पोलिसांनी कारवाई केली तर पोलिसांवर कारवाई करा अशी मागणी केली जाते आणि पोलिसांनी काहीच केले नाही तर पोलिसांनी बघ्याची भूमिका घेतली असे सांगितले जाते. म्हणजे झाले तरी चांगले आणि नाही झाले तरी चांगले या पध्दतीने जाणार असाल तर त्याचा विचार व्हावा. सभापती महोदय, मी गोळीबाराचे समर्थन करीत नाही. परंतु गोळीबार का करण्यात आला यामागची पार्श्र्वभूमी समजून घेण्याची गरज आहे. कॉन्स्टेबल टेम्पोच्या काचा फोडताना, टेम्पोवर काठ्या मारताना मी वाहिन्यांवरुन पाहिलेले आहे. या चॅनेल वाल्यांनी एडिटिंग फार चांगल्या प्रकारे केलेले आहे. त्या आधीची कॅसेट माझ्याकडे देखील आहे. ती कॅसेट पाहिली तर दिसून येईल की, त्या टेम्पोतून लाल आणि पिवळी बनियन घालून जे लोक उतरले त्यांना पांगविल्यानंतर कॉन्स्टेबल त्या टेम्पोवर काठ्या मारत होते. हे अगोदरचे क्लिपिंग जाणून घेण्याची आवश्यकता आहे. पोलीस गाड्यांवर काठ्या मारतानाचे शुटींग कधी पहावयास मिळणार नाही. परंतु हे शुटींग पोलिसांना बदनाम करण्याच्या उद्देशाने हुशारीने केलेले आहे.

सभापती महोदय, त्या एक्सप्रेस वे वर एवढे मोठे दगड कोठून आले ? बाजूला जाळया लावलेल्या आहेत. या प्रकाराची चौकशी केली पाहिजे. 8 तारखेला पाण्यासाठी वाद सुरु झाला. हा वाद मिटविण्याचा जिल्हाधिका-यांनी प्रयत्न केला. त्यावेळी कोणी उपस्थित राहिले नाही. त्यानंतर

..3..





श्री. किरण पावसकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

9 तारखेला जनता मिटींग घेत असताना त्यांच्या भरीस भर घालून प्रश्न सोडविण्याचे बाजूला ठेवून त्या मिटींगचे आंदोलनात रुपांतर करण्यात आले. नंतर सभागृहामध्ये भाषण करताना

श्री. किरण पावसकर...

सांगितले जाते की, तीन मुददे पडले, चार मुददे पडले, चार वेळा फायरिंग झाली, हे प्रकार विरोधकांनी थांबवावेत. गोळीबाराची सविस्तर चौकशी व्हावी आणि शेतक-यांना न्याय मिळावा अशी मागणी करीत असताना अशा प्रकारे जर कोणी दंगली घडवित असेल, मंत्र्यांनी राजीनामे द्यावेत आणि आम्हाला त्या खुर्चीत बसवावे या अपेक्षेने कोणी काही करीत असेल तर त्याची देखील सविस्तर चौकशी झाली पाहिजे आणि संबंधितावर कठोर कारवाई झाली पाहिजे. भविष्यात असे प्रकार कधी होणार नाहीत, कधी कोणी मृत्यूमुखी पडणार नाही याची काळजी शासनाने घ्यावी. पण त्याच बरोबर हे जे लांब राहून अतिउत्साही लोकांना पुढे पाठवित आहेत, जे कोणी कर्तेकरविते आहेत त्यांची सविस्तर चौकशी करुन त्यांच्याविरुध्द 302 खाली गुन्हा दाखल करावा, मग ते कोणत्याही पक्षाचे नेते असोत, असे सांगून मी माझे दोन शब्द संपवितो.

--

...4...



श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, हा जो दुर्दैवी प्रकार घडला त्याची सविस्तर माहिती सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितलेली आहे. वस्तुस्थिती काय होती हे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लोकांनी वाहिन्यांवरुन पाहिलेले आहे. त्या गावातील सर्वसामान्य शेतक-यांची मागणी काय होती ? त्यांनी पवना धरणासाठी जमीन दिली, कालव्यासाठी जमीन दिली,छोट्या मोठ्या बंधा-यासाठी जमीन दिली, एक्स्प्रेस वे साठी जमीन दिली, औद्योगिक वसाहतीसाठी, वीज प्रकल्पासाठी जमीन दिली. आम्ही सातत्याने जमिनी देत आहोत. तेव्हा जी काही उरलेली जमीन आहे त्या काळया आईची सेवा करण्यासाठी जे काही पाणी लागेल ते पाणी मिळावे अशी त्यांची मागणी होती आणि त्यासाठी त्यांचा लढा होता.पिढ्यानपिढया कसत असलेल्या जमिनीचे तोंडचे पाणी पळविले जात होते त्या काळ्या आईचे जीवन वाचविण्यासाठी मावळ तालुक्यातील कांताबाई ठकारने बलिदान केलेले आहे. काळया आईला वाचविण्याची धडपड कांताबाई आणि त्यांचे सहकारी करीत होते. त्यामधील कांताबाईची धडपड शांत करण्यात हे सरकार यशस्वी झालेले आहे. आंदोलनकर्त्या शेतक-यांचा मुद्दा एवढाच आहे की आमचा घसा कोरडा करुन शहरवासीयांची तहान भागवू नका. पाण्यावरुन युद्धे होतील अशी भाषणे या ठिकाणी करण्यात आलेली आहेत. पिंपरी-चिंचवड ही सर्वात श्रीमंत महानगरपालिका आहे. तेथील नेते दमदार आहे. मग त्या महानगरपालिकेने स्वत:चे धरण बांधून पाणी घेतले पाहिजे. परंतु तसे न करता शेतक-यांचे पाणी काढले जात आहे. ती महानगरपालिका श्रीमंत असेल तर स्वत: धरण बांधून पाणी घेऊ शकते असा काहीनी विचार मांडला. परंतु तसा विचार केला तर फेब्रुवारीमध्ये होणा-या निवडणुकीमध्ये मते कशी मिळतील ?

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

आज सगळी घाई झालेली आहे. या आंदोलनाचा अनेकांनी उल्लेख केला. हे खरे आहे की, या आंदोलनाबरोबरच शेतकऱ्यांनी अचानक रास्तारोको केला नाही. या आंदोलनाचे गांभीर्य माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांच्या लक्षात आलेले नाही. आम्ही राजकीय पक्षाचे प्रतिनिधी काय करतो? काही आंदोलने प्रतिकात्मक असतात. काही आंदोलने ही त्या विषयाची अगतिकता असते. एखाद्या दिवशी प्रतिकात्मक जेल भरो आंदोलन केले जाते. काल जे आंदोलन केले गेले त्या मागील पार्श्वभूमी आपण समजून घेतली पाहिजे. मागील काही दिवसात सरकारकडून ज्या ज्या गोष्टी केल्या गेल्या त्याबाबत तेथील गावकऱ्यांनी विरोध दर्शविला होता. भूसंपादनाची जाहिरात प्रसिध्द झाली असताना लोकांनी त्या जाहिरातीकडे लक्ष दिले नाही. जमिनीचा मोबदला घेऊन जा असे सांगूनही संबंधित शेतकरी पैसे घ्यायला गेले नाहीत. ज्या पध्दतीने सरकार आग्रह करीत होते तेवढ्याच प्रमाणात स्थानिक ग्रामस्थांनी विरोध दर्शविला होता. त्या परिसरातील 2/3 ग्रामपंचायती वगळता इतर सर्व ग्रामपंचायतींनी सरकारच्या भूमिकेबाबत विरोध नोंदविला होता. या आंदोलनाचे गांभीर्य पोलिसांच्या ध्यानात आले नाही. आपणापैकी अनेक माननीय सदस्यांनी पक्षाच्या भूमिकेमुळे रास्ता रोको केलेला आहे. रास्ता रोको केला जातो त्यावेळी पक्षाच्या प्रतिनिधींकडून भाषणे केली जातात. भाषणे संपल्यानंतर प्रतिनिधी व कार्यकर्त्यांना अटक केली जाते. काही वेळेला लाठीचार्ज देखील होतो. माजी पंतप्रधान जर आंदोलनामध्ये सामील झाले तर मात्र लाठीचार्ज केला जात नाही. अशा वरिष्ठ नेत्यांना सामील करुन घेतल्यास आंदोलने शांततेने पार पडतात. कारण आंदोलनकर्त्यांना मुख्यमंत्र्यांकडे चहापानाला बोलावले जाते. कारण माजी पंतप्रधान आंदोलनामध्ये सहभागी झालेले असतात. परंतु ज्यावेळी सामान्य शेतकरी आंदोलन करतो त्यावेळी मात्र त्यांना पोलिसांच्या लाठ्यांचा मार सहन करावा लागतो. माननीय सदस्यांनी सांगितले की, आम्ही शांततेत आंदोलन केले. अर्थातच त्यांच्यासमवेत माजी पंतप्रधान व्ही.पी.सिंग होते म्हणून आंदोलन शांततेत पार पडले. परंतु कालच्या आंदोलनाचे गांभीर्य पोलिसांच्या लक्षात आले नाही.

सभापती महोदय, राजकीय पक्षांची आंदोलने ही डेकोरेटीव्ह असतात. मावळ येथील प्रश्न खदखदत असताना आपल्या अस्तित्वासाठी रस्त्यावर शेतकरी उतरणार आहेत हे पाहून सर्वपक्षीय कृती समिती तयार झाली. अशी आंदोलने ज्यावेळी होतात त्यावेळी एखादा महामार्ग चार-आठ

..2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

तास बंद राहिला तर अधिकारीवर्गाने भावनिक होण्याचे कारण नाही. ज्यावेळी आंदोलनकर्त्यांसमोर नेत्यांची वा प्रतिनिधींची भाषणे होतात त्यावेळी पोलीस अधिकारी देखील समजावण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यातून बोलाचाली होते. अमुक मंत्र्यांच्या सांगण्यावरुन भाषण करीत आहात काय असेही पोलिसांकडून बोलले जाते.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी वारकऱ्यांचा कोणता प्रश्न मांडला हेच कळले नाही. अंबड येथे वारकऱ्यांचा अपघात घडला होता, तेथील वारकऱ्यांच्या हाती कोणत्या राजकीय पक्षाचा झेंडा नव्हता. त्यांच्या हाती विठूरायाचा झेंडा होता. नागपूरला तुम्ही गोवारींना मारले, काल शेतकऱ्यांना मारले. माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांच्या भाषणावरुन असे वाटते की, बहुधा सरकारने प्लॅन केला होता, त्यामुळे चर्चा घडली नसती तर सरकारने या शेतकऱ्यांना मारले असते. हे कामगार नेते स्वत: असे म्हणतात त्याचे मला आश्चर्य वाटले. पूर्वीच्या एखाद्या टेपचा उल्लेख केला जातो त्यावेळी मावळ परिसरातील प्रश्नाबाबत मंत्री आणि पोलीस अधीक्षक यांच्याशी जो संवाद झाला त्याची टेप बाहेर काढा. आंदोलनाच्या प्रश्नाबाबत सरकार आणि पोलिसांच्या वतीने काय मॅसेज गेला याची टेप समोर येऊ द्या. हे सभागृहाला कळले पाहिजे. आंदोलन होणार आहे, कदाचित प्रतिष्ठेचा विषय असला तरी स्थानिक जनतेचा सर्व प्रकारे विरोध असताना जल वाहिनीचे काम करणारच अशी मानसिकता असेल तर सगळ्या गोष्टी बाहेर आल्या पाहिजेत. या प्रकरणाची संपूर्ण चौकशी झाली पाहिजे.

सभापती महोदय, रमाबाई आंबेडकर येथे पोलीस गोळीबार झाल्यानंतर विधानसभेत झालेल्या चर्चेमध्ये ज्या ज्या माननीय सदस्यांनी भाषणे केली होती त्या भाषणाच्या प्रती मी मागविल्या होत्या. परंतु मला त्या भाषणांच्या प्रती उपलब्ध झाल्या नाहीत. ते रेकॉर्ड उपलब्ध नाही असे सांगण्यात आले. मला माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील आणि माजी मंत्री श्री.मधुकरराव पिचड यांच्या भाषणाची प्रत हवी होती. परंतु मला फक्त माननीय मंत्री श्री.छगन भुजबळ यांनी त्यावेळी सभागृहात केलेल्या भाषणाची प्रत मिळाली. त्यावेळी विरोधी पक्षाच्या बाजूला असताना ते इतके जबाबदार होते आणि आज सत्ताधारी पक्षात असताना इतके बेजबाबदार कसे झाले? हा प्रश्न माझ्यासमोर उपस्थित झाला आहे. त्यांनी भाषणात असे म्हटले होते की, "रस्त्यावर आला नाहीत का? दगडफेक केव्हा झाली नाही का? संताप व्यक्त केला नाही का?

..3..

10-08-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Z.3

SGB/पूर्वी श्री.शिगम 14:20

श्री.विनोद तावडे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशा प्रकारे दुसऱ्या कोणी संताप व्यक्त केला तर त्यांच्यावर गोळ्यांचा वर्षाव करायचा का? राज्यात गरिबांना राहण्याचा अधिकार नाही. यांना मारा, यांना हाणा. जो कोणी पोलीस अधिकारी करेल त्या पोलीस अधिकाऱ्याला त्याची फित वाढवून दिली जाते वगैरे वगैरे." या ठिकाणी आणखी काय काय म्हटले आहे? "स्वातंत्र्याचे 50 वे वर्ष साजरे करीत आहोत. अशा वेळी गरीब लोकांवर गोळ्या झाडल्या जात असताना राज्याच्या राज्यकर्त्यांना एक मिनिट देखील या खुर्चीवर बसण्याचा अधिकार राहिलेला नाही." पेट्रोल टँकर जाळला, अधिकाऱ्याला जाळण्याचा प्रयत्न झाला ते बरोबर होते की चूक हे चौकशीमधून बाहेर आले पाहिजे. असेच जर मारणार असाल तर एक मिनिट खुर्चीवर बसण्याचा अधिकार नाही. मग आता तुम्ही कोणत्या तोंडाने खुर्चीवर बसलेले आहात? वणी येथे गोळीबार झाल्यानंतर माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी भाषणात असे म्हटले होते की, "एक तर न्याय मिळण्याबाबत शेतकरी नेहमीच पाठीमागे राहतो. तो न्याय मिळण्यासाठी पुढे येत असेल, आंदोलन करीत असेल तर त्याचे आंदोलन वेळीच पोलीस बळाच्या आधारे मोडून काढणे मी योग्य मानत नाही. संबंधित विभागाने पुढाकार घेतला पाहिजे आणि चर्चेने प्रश्न सुटला पाहिजे. अशा प्रकारची भूमिका शेतकरी आंदोलनाबाबत मी नेहमीच घेतो." आता माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी या प्रकरणामध्ये तीच भूमिका घेतली होती की, कोणत्या दादांनी ऐकले नाही हे सभागृहाला कळले पाहिजे. अशी चर्चा आहे की, पुण्यामध्ये गृहमंत्री वेगळाच आहे. सभागृहाला खरे काय ते कळले पाहिजे. अशा घटना सातत्याने घडत आहेत. माननीय गृहमंत्री यांना या चर्चेवरील उत्तराचे भाषण करण्यासाठी मुद्दे आवश्यक असल्यामुळे माननीय गृह राज्यमंत्र्यांनी मी जे मुद्दे सांगणार आहे ते लिहून घ्यावेत. 1994 साली 38 प्रकरणी पोलिसांना फायरिंग करावे लागले आणि त्यात 15 लोक मारले गेले. 1995 मध्ये पोलीस फायरिंगमध्ये मृत्यू पावलेल्या लोकांची संख्या 15 होती. 1996 मध्ये 53 वेळा पोलिसांना फायरिंग करावे लागले. ही माहिती युती सरकारच्या काळातील असल्यामुळे लिहून घ्यावे. कारण माननीय गृहमंत्र्यांना उत्तरासाठी तयारी करावी लागेल. 1997 साली 100 वेळा पोलिसांना फायरिंग करावे लागले व 84 लोक मारले गेले. 1998 साली 96 वेळा पोलिसांना फायरिंग करावे लागले व 48 लोक मारले गेले. 1999 साली 113 वेळा पोलिसांना फायरिंग करावे लागले व 117 लोक मारले गेले. सभागृहात माननीय गृहमंत्र्यांनी 2006 साली 67 वेळा पोलिसांना फायरिंग करावे लागले आणि

..4..



श्री.विनोद तावडे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यात 25 लोक मरण पावले अशी माहिती दिल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, आपलेच सरकार सत्तेवर आहे आणि जी माहिती देत आहोत त्यामध्ये जवळजवळ 20 नक्षलवादी मारले गेले आहेत. 1995 ते 1999 च्या काळात गँगवॉर आणि एन्काऊंटरमध्ये जे मारले गेले त्याची आकडेवारी देऊन कशाला लोकांची फसवणूक केली जाते? आम्हाला दुर्दैवाने म्हणावे लागते...........

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ........

की. माननीय गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील ज्या पध्दतीने वारकरी, गावकरी व शेतकऱ्यांना गोळ्या मारतात ते गृह मंत्री जनरल डायरचीच आठवण करुन देत आहेत, हे सिध्द झाले आहे. एका बाजूला राज्यात एवढ्या प्रमाणात गोळीबाराच्या घटना घडत आहेत त्यांचा विचार केला तर कालची घटना ही सामान्यत: 9 ऑगस्ट या क्रांतिदिनी .......(अडथळा)......

**उप सभापती** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, भाषणकर्त्या सन्माननीय सदस्यांना त्यांच्या भावना प्रथम सभागृहात मांडू द्याव्यात, त्यावर आपल्याला काय म्हणावयाचे असेल तर आपण नंतर बोलावे. तसेच मी असेही लक्षात आणून देऊ इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी "जनरल डायर" चे उदाहरण दिले ते माननीय गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील यांना लागू नाही, कारण जनरल डायर म्हणजे जनरल डायरच, तो दुसरा कोणी असू शकत नाही.

श्री. विनोद तावडे : महोदय, मला या प्रसंगाच्या निमित्ताने जे बोलावेसे वाटले तेच मी बोललो. कारण कालचा दिवस हा क्रांती दिन होता. अशा 9 ऑगस्ट या क्रांतिदिनी अशी घटना राज्यात घडली तर एखाद्या देशप्रेमी कार्यकर्त्याला या घटनेची आठवण होणारच आहे. या निमित्ताने मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, या घटनेच्या संदर्भात माननीय गृह मंत्र्यांचे वक्तव्य असे होते की, संतप्त जमावाला काबूत आणण्याचे प्रयत्न अयशस्वी ठरल्यामुळे पोलिसांना नाईलाजास्तव गोळीबार करावा लागतो, याचा अर्थ गोळीबाराचे समर्थन असा होणार की नाही किंवा माननीय गृह मंत्र्यांचे या गोष्टीला समर्थन म्हणणार नाही तर काय म्हणणार आहात याचे उत्तर मिळाले पाहिजे. तसेच माननीय गृह मंत्र्यांचे असेही म्हणणे आहे की, पुणे ग्रामीण पोलिसांकडे माहिती होती की, हे आंदोलन मोठे होणार आहे त्यामुळे तळेगांवसह पाच पोलीस स्टेशन्सच्या हद्दीत मोठा बंदोबस्त होता. संतप्त जमावाने हाय-वे रोखून धरल्यामुळे परिणामी पोलिसांना गोळीबार करावा लागला. या घटनेत तीन लोकांचा बळी गेलेला आहे. माझे इतकेच म्हणणे आहे की, ज्या गोष्टीची आपण नीट माहिती घेतली नाही, प्रत्यक्ष त्या ठिकाणी गेला नाहीत तरी देखील अशा प्रकारे पोलिसांना पाठीशी घातले जाते म्हणूनच राज्यातील पोलीस मस्तावले आहे. विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन चालू असताना असे प्रकार राज्यात होतात हे योग्य नाही.

.....2

श्री. विनोद तावडे .......

परवा देखील अधिवेशन सुरु झाल्यानंतर खालच्या सभागृहात डान्स बार चालू असल्याची सी.डी.दाखविली गेली. काल रात्री सुध्दा हा बार पुन्हा सुरु झाला व त्याची सी.डी. माझ्याकडे आहे, ती सी.डी. मी आपल्याकडे पाठवित आहे.

महोदय, मी अत्यंत प्रामाणिकपणे सांगतो की, सभागृहात माननीय श्री. आर.आर.पाटील यांनी ठणकावून सांगितल्यानंतर सुध्दा पोलीस ऐकत नाहीत याचा पुरावा म्हणून मी ही सी.डी. आणलेली आहे. यात कसल्याही प्रकारे चेष्टेचा भाग समजण्याची गरज नाही. पण राज्यातील एकाही पोलिसावर मंत्र्यांचा धाक राहिलेला नाही. एक जण गृह खाते चालवितो त्यामध्ये 10 लोक दबाव आणतात हा प्रश्न आयपीएस अधिकारी विचारतात व ही परिस्थिती निर्माण होण्याचे हेच कारण आहे. महोदय, ज्यावेळी या आंदोलन कर्त्यांवर गोळीबार होतो याचा अर्थ असा होतो काय की लोकांना शांततेच्या मार्गाने सुध्दा आंदोलन करायचे नाही. शासनाने यासंदर्भात एक विधेयक आणले होते व त्या माध्यमातून आंदोलनाद्वारे मालमत्तेचे नुकसान झाले तर नुकसान भरपाई घेतली जाईल, असा कायदा सुध्दा केला.....अडथळा.....कोर्टाने यासंदर्भातील विधेयक आणा किंवा कायदा करा असे सांगितलेले नव्हते तर एका प्रकरणात असा निकाल दिलेला होता. अशा प्रकारे लोकशाही पध्दतीने शासनाच्या भूमिकेचा विरोध केला तर जनतेचा, शेतकरी किंवा वारकऱ्यांचा आवाज दाबायचा निर्णय शासनाने घेतला असेल तर तो निंदनीय आहे. राज्यात पोलीस जर अशा पध्दतीने कृती करतील आणि आंदोलन ठेचण्याचा प्रयत्न करीत असतील तर.......अडथळा......40 वर्ष राज्य केले हे सगळे आता विसरुन जा, शासनाकडून जनतेचा आवाज दाबण्याचा जेवढा प्रयत्न होईल तेवढाच तो चेंडुसारखा उसळी घेऊन आपल्याच अंगावर येईल. म्हणून शासनाने या आंदोलन कर्त्यांवर जो गोळीबार केला त्याबद्दल राज्यातील जनतेसमोर दिलगिरी व्यक्त केली पाहिजे. काल जी घटना घडली ती जरी अपरिहार्य वाटत असली तरी त्यात तीन लोकांचा मृत्यू झालेला आहे आणि त्याबद्दल शासनाने जाहीर माफी मागितली पाहिजे. केवळ मृतांच्या नातेवाईकांना व जखमींना नुकसान भरपाई देऊन चालणार नाही, त्यामुळे त्यांचे नुकसान भरुन निघणार नाही आणि यासंबंधी शासन योग्य तो विचार करील असाही माझा विश्वास आहे. सकाळी साडेपाच वाजता काळोखात जाऊन मदत न देता सात-आठ वाजता मदत द्यायला जाणे आवश्यक

......3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ........

होते.  कदाचित सभागृहाचे कामकाज सुरु आहे म्हणूनही मंत्री महोदय अशी मदत करण्यासाठी किंवा विचारपूस करण्यासाठी गेले असावेत पण तरी देखील शासनाने दिलगिरी व्यक्त केली पाहिजे आणि राज्यकर्त्यांचे हे अपयश आहे.  तसेच अशा प्रकारच्या घटना घडणे म्हणजे ते राज्यकर्त्यांचे अपयश आहे हे मान्य करुन माननीय गृह मंत्र्यांनी राजीनामा दिला पाहिजे अशी मागणी करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

------

यानंतर श्री. जुन्नरे ....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एस.क्यू. जमा (महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, पुणे जिले के मावल तालुका में किसानों पर हुए गोलीबार के बारे में माननीय विरोधी पक्ष नेता ने जो चर्चा उपस्थित की है, उसके ऊपर मैं अपने विचार प्रकट करना चाहता हूँ. मेरा आपसे अनुरोध है कि इस विषय के महत्व को देखते हुए आप मुझे 10 मिनट का समय दीजिए.

सभापति महोदय, इस घटना में 3 किसान मारे गए हैं, मैं उनके प्रति संवेदना व्यक्त करता हूँ और उन्हें श्रद्धांजलि देता हूँ. इन लोगों के परिजनों को सरकार जो मुआवजा देगी या शासकीय नौकरी देगी, उसके बारे में मंत्री महोदय अपने उत्तर में बताएंगे. मैंने माननीय विरोधी पक्ष नेता, माननीय सदस्य श्री. किरण पावसकर और अन्य माननीय सदस्यों की बातें सुनी. मैं 2-3 बुनियादी बातों के ऊपर प्रकाश डालना चाहता हूँ. कुछ दिन पूर्व जालना में वारकरी लोगों के ऊपर गोलीबार हुआ, मोहाड में गाँव वालों के ऊपर गोलीबार हुआ और उसमें एक व्यक्ति की मृत्यु हुई. मोहाड की घटना के बारे में जब चर्चा हो रही थी, उस समय कहा गया कि जालना की घटना की जाँच के अन्तर्गत मोहाड की घटना की भी जाँच की जाएगी. कल जो घटना हुई है, उसकी तह में जाना बहुत जरुरी है. अगर हम राजनैतिक बात करेंगे तो इससे कोई समाधान नहीं निकलेगा, केवल उससे हमारे राजनैतिक स्वार्थ पूरे हो सकते हैं. कल की घटना की मॅजिस्ट्रेट से जांच कराने का आदेश जिलाधिकारी ने दिया है. मेरा शासन से अनुरोध है कि मॅजिस्ट्रेट की जांच जल्दी से जल्दी खत्म करके इसकी न्यायिक जाँच होनी चाहिए. वहां पर जो संघर्ष समिति बनाई गई थी, उसमें सभी पक्षों के लोग थे या नहीं, जब तक इन सारी घटना के बारे में न्यायिक जाँच नहीं होगी कि किस कारण से किसानों में रोष था, इस आंदोलन के लिए किसने मोर्चा निकालने और रस्ता रोकने की परमीशन ली थी, ये सारी बातें जाँच के दायरे में आनी चाहिए. इसमें राजनैतिक पार्टियों के आचरण के बारे में भी जाँच होनी चाहिए. इन सारी बातों की जाँच न्यायिक जाँच के द्वारा ही हो सकती है, इसलिए हम न्यायिक जाँच की मांग कर रहे हैं.

सभापति महोदय, आजकल देश में एक वाजिब ट्रेन्ड हो गया है कि भूमि अधिग्रहण का प्रश्न चाहे वह किसी भी राज्य में हो, हमारे देश के राज्यों में अलग अलग राजनैतिक पार्टियों की सरकार है, वहां के किसानों में गुस्सा है और वे प्रतिरोध कर रहे हैं. प्रकल्पग्रस्तों को ठीक से मुआवजा नहीं मिलता है और उनके पुनर्वसन के प्रश्न हल नहीं होते हैं. यह ट्रेन्ड पूरे देश में है और राजनैतिक पार्टियों के लोग समय समय पर अपने स्वार्थ के लिए उसका उपयोग करना

. . . BB-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एस.क्यू जमा . . .

चाहते हैं. कभी राजनैतिक पार्टी के नाम पर, कभी संघर्ष समिति के नाम पर और कभी सर्वदलीय समिति के नाम पर हम ऐसे लोगों को लीड करते हैं. मैं इस बात की भी जाँच करवाना चाहता हूँ कि जितनी भी गोलीबार की घटनाएं होती हैं, उसमें कभी किसी नेता को गोली क्यों नहीं लगती है. मेरा कहना है कि नेता लोग सामने नहीं आते, उसकी पीछे क्या तर्क है. लोगों की जो भावनाएं होती हैं, लोगों में जो गुस्सा होता है, उसको एक्सप्लॉइट करने के लिए उनको मोर्चे के रुप में सड़क पर भेज देते हैं. कल की घटना के दौरान वहां पर 3-4 घंटे तक भाषण हुए. वहां पर जो लोग भाषण दे रहे थे, चाहे वे किसी भी पक्ष के नेता हों, वे पुलिस को कह रहे थे हमारा भाषण खत्म होने के बाद हम आंदोलन खत्म कर देंगे. लेकिन जब भाषण खत्म हुआ, उसके बाद क्या हुआ. आपने सीडी दी है, हमारे पास भी सीडी है, पुलिस के पास भी सीडी है, मीडिया की भी सीडी लीजिए, मीडिया बहुत सीमित रुप से घटनाओं को दिखाती है. इन सारी सीडी को आप मॅजिस्ट्रेट के पास जाँच के लिए दीजिए. बहुत कम इलेक्ट्रॉनिक या प्रिन्ट मीडिया ऐसे हैं, जो सही तथ्य दिखाते हैं. इलेक्ट्रॉनिक और प्रिंट मीडिया भी बंटी हुई, वे भी अपनी तरह से एडिटिंग करके दिखाते हैं और वे अपनी पॉलिसी के मुताबिक प्रोजक्ट करते हैं.

सभापति महोदय, महाराष्ट्र में जो भूमि अधिग्रहण का कानून है, केन्द्र सरकार का जो कानून है, वह अपर्याप्त है. लोगों का समय से पुनर्वसन नहीं होता है, किसानों को समय से मुआवजा नहीं मिलता है. महाराष्ट्र में आज भी पिछले 15-20 साल से प्रकल्पग्रस्तों के प्रश्न प्रलंबित हैं. हमारे शासन ने पिछले अधिवेशन में जल वितरण की नीति में सुधार किया है. पहले उद्योग को प्राथमिकता थी, अब उन्होंने कृषि को प्राथमिकता दी है. सरकार ने जल वितरण की नीति बदली है.

सभापति महोदय, वारकरी लोगों द्वारा किया गया आंदोलन एक स्पोन्टेनियस एक्शन था, वह प्लान्ड एक्शन नहीं था, दुर्घटना हो गई, कुछ लोग मारे गए, इस वजह से आंदोलन हुआ, यह बात मैं समझ सकता हूँ. लेकिन जो कुछ मोहाड में हुआ या कल जो कुछ हुआ या अन्य जगहों पर इस प्रकार के जो आंदोलन हो रहे हैं, हमें उसकी तह में जाना चाहिए कि किसानों में गुस्सा क्यों है, किसान नाराज क्यों हैं, इसके बारे में भी सरकार को स्पष्ट और समयबद्ध नीति बनानी चाहिए, ताकि उनका पुनर्वसन संतोषजनक तरीके से हो.

. . . BB-3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्री. एस.क्यू. जमा

सभापति महोदय, भूमि अधिग्रहण के बारे में केन्द्र सरकार का संशोधित बिल आया है, उसके बारे में हम जल्दी से जल्दी चर्चा करके सुझाव देंगे. कोई भी नया कानून आगे से लागू होगा, लेकिन किसानों के जो लंबित मामले हैं, पिछले 8-10 साल से विदर्भ के कई प्रोजक्ट प्रलंबित हैं, इन प्रोजक्ट के बारे में महाराष्ट्र शासन को समयबद्ध निर्णय लेना चाहिए. मैं यह कहना चाहता हूँ कि भूमि अधिग्रहण के बारे में जो प्रलंबित मामले हैं, सरकार को उनके बारे में अविलम्ब निर्णय लेना चाहिए. गोसीखुर्द और मिहान प्रकल्प के लिए 25 साल से वहां के किसान आंदोलन कर रहे हैं. अभी वहां के किसानों ने मोर्चा नहीं निकाला है, लेकिन भविष्य में वे अपनी मांगों को लेकर मोर्चा निकाल सकते हैं. माननीय सदस्य श्री. किरण पावसकर ने इस बारे में यहां पर जिक्र किया है. हम लोग भी ट्रेड यूनियन में काम करते हैं, हम लोगों ने कई मोर्चे निकाले हैं. प्रजातंत्र में सभी को बोलने और मोर्चा निकालने की आजादी है. महाराष्ट्र शासन को एक कोड बनाना चाहिए कि जो व्यक्ति मोर्चे का नेतृत्व कर रहा है, उसके ऊपर उसकी जबाबदारी होनी चाहिए. जिसको मोर्चा निकालने की पुलिस परमीशन देती है, उसको अंडरटेकिंग देनी चाहिए कि हमारा मोर्चा शान्त रहेगा, हमारे मोर्चे में हिंसा होगी या हम प्रोवोकेट करेंगे. इन सारी चीजों के बारे में नियम बनने चाहिए. इन सारी बातों के बारे में कोड ऑफ कन्डक्ट बनाना चाहिए और अगर आवश्यकता हो तो पुलिस के कानून में सुधार होना चाहिए ताकि लोगों की भावनाओं को भड़काकर उसके ऊपर राजनीति न हो सके. इन सारी बातों पर रोक लगनी चाहिए. इतना कहते हुए मैं अपना भाषण पूर्ण करता हूँ.

. . . . . . . .

भाषण पूर्ण.
नंतर श्रीमती नीलम गो-हे
. . . BB-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, गोळीबाराची घटना घडल्याचे कळाल्यानंतर मी तळेगाव येथील जनरल हॉस्पिटलला तसेच ससून हॉस्पिटलच्या पोस्टमार्टेम विभागाला व तेथील मृतांच्या नातेवाईकांना भेट दिली. त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. पवना नगर परिसरातील गावांशी माझा गेल्या 15-20 वर्षापासून संपर्क आहे. 1971 मध्ये पवना धरणासाठी शेतक-यांनी जमीन दिल्यानंतर मुळशी तसेच मावळ परिसरातील धरणग्रस्तांनी कृती समिती तयार केलेली आहे. पवना नगरच्या 863 धरणग्रस्तांना अद्यापपावेतो जमिनीचा मोबदला मिळालेला नाही. ठराविक अजेंडयाशीवाय दुसरे विषय घ्यावयाचे नाही असे माननीय उप मुख्यमंत्र्यांचे म्हणणे असते. आता या चर्चेच्या निमित्ताने माननीय उप मुख्यमंत्री उपस्थित असल्यामुळे मी त्यांना सांगू इच्छिते की, जनतेचे जे प्रश्न असतात ते उप मुख्यमंत्री या नात्यांनी सोडवले पाहिजेत परंतु त्यांचे जनतेच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष झाल्याचेच दिसून येते.

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी विचार मांडलेले आहेत. कालच्या गोळीबाराच्या घटनेच्या संदर्भात मी तपशीलवार माहिती मांडणार आहे. पवना धरणग्रस्तांनी गेल्या तीन वर्षात अनेक वेळा आंदोलने केलेली आहेत. धरला झेंडा की, केली दगडफेक असे कधीच होत नसते. या घटनेच्या संदर्भात सकाळी 10.30 वाजता लोक निदर्शने करावयास जमले होते त्यानंतर सुमारे अडीच ते तीन तास रस्ता रोको त्या ठिकाणी चालला होता. रस्ता रोको किती वेळ चालला याची माहिती तेथील जनतेला तसेच शासनाला देखील आहे. कोणत्याही रस्त्यावरील किंवा एक्स्प्रेस वे वरील रास्ता रोको एक तासापेक्षा जास्त थांबवला जात नाही. एक तासामध्ये निदर्शकांना अटक केली जात असते. दोन अडीच हजाराच्या मॉबला एक तासात अटक करणे शासनाला काहीच अवघड नाही. ब-याच वेळा आम्हाला अटक करुन दुसरीकडे सोडण्यात आलेले आहे. रस्त्याच्या लागून असलेल्या जमिनींचे भाव वाढलेले आहेत. पवना नगर भागातील जमिनीचे भाव तर मोठया प्रमाणात वाढलेले आहेत. येथील शेतक-यांना जमिनी विकण्यास प्रवृत्त केले जात असून त्या जमिनी मोठ मोठे अभिनेते किंवा श्रींमती लोकांना फार्म हाऊसेस बांधण्यासाठी रिकाम्या करुन दिल्या जात आहेत. एक्स्प्रेस वेच्या शेजारी जे शेतकरी राहत आहेत त्या सर्वांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. या घटनेची मी न्यायालयीन

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे.....

चौकशीची मागणी करते.

काल आम्ही मृतांच्या नातेवाईकांची भेट घेतली होती तसेच या घटनेच्या संदर्भात तेथील तहसीलदारांशी सुध्दा संपर्क केला. जिल्हाधिकारी विकास देशमुख यांनी मला फोनवरुन असे सांगितले आहे की, "तात्पुरत्या स्वरुपात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला जलवाहिनी थांबविण्याचे आदेश दिलेले आहेत". माझी माननीय मुख्यमंत्र्यांकडून अपेक्षा आहे की, जलवाहिनीचे काम आपण खरोखर थांबविले गेले आहे काय ? कालच्या गोळीबारात मृत्यू झालेल्यांची प्रेते त्यांचे नातेवाईक उचलण्यास तयार नाहीत. त्यामुळे मृतांच्या नातेवाईकांचा राग तात्पुरता का होईना शमविण्यासाठी शासन काही घोषणा करणार आहे काय ? या धरणामुळे जवळ जवळ 50 गावे बाधित झालेली आहेत.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. श्रीमती नीलम गोऱ्हे...

सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप म्हणाल्याप्रमाणे पूर्वी देखील या धरणामधून पिण्यासाठी पाणी दिले जात होते तर मग लोकांची नाराजी कशासाठी आहे? लोकांचे म्हणणे असे की, बंद वाहिनीव्दारे पाणी नेले तर पूर्वी त्या मार्गावर शेतीसाठी जे पाणी झिरपत होते ते त्यांना मिळणार नाही, या कारणासाठी तेथील शेतकऱ्यांचा विरोध आहे. दुसरे असे की, तेथील 50 गावांमधील ग्रामसभांनी ठराव करुन या प्रकल्पाला विरोध केला. असे असतांना त्या ग्रामसभांचे आपण म्हणणे ऐकून घेणार नाही काय? या बाबतीत राजकारण करावयाचे नाही म्हटले तरी तेथील खासदार शिवसेनेचे आणि आमदार भारतीय जनता पक्षाचे असल्यामुळे पिंपरी-चिंचवडच्या लोकांना देखील पाणी मिळाले पाहिजे असे आमचे म्हणणे आहे. इतकेच नव्हेतर पुणे, मुंबई, कोल्हापूर किंवा अन्य शहरातील महानगरपालिकांनी त्यांच्या जनतेला द्यावयाच्या पिण्याच्या पाण्यासाठी कोठून स्त्रोत निर्माण करावेत यासंबंधीचे एक धोरण तयार केले पाहिजे. दुर्दैवाने असे घडते की, नांदेड शहरासाठी एखाद्या धरणामधून पाणी उचलत असतांना त्याचबरोबर सहारासारख्या सिटीसाठी देखील आपण धरणामधून पाणी उचलतो. त्याचप्रमाणे लवासाबद्दल चर्चा होत असतांना तेथील परिस्थिती आपण पहात आहोत, आज देखील तेथील 50 टक्के प्रश्न सुटले नाहीत. यामुळे या सरकारवरील जनतेचा विश्वास उडत चालला आहे. सातत्याने आठ वेळा आंदोलने करुन सुध्दा त्यांचे प्रश्न सुटत नाहीत.

सभापती महोदय, तेथील कामाच्या निविदेची मुदत 30 एप्रिलला संपलेली असतांना आणि जागा ताब्यात नसतांना या कंत्राटदाराला 129 कोटी रुपये देण्यात आले. प्रत्यक्षात या कंत्राटदाराला बिनव्याजी 92 कोटी रुपये वापरण्यासाठी मिळाले. जमीन संपादित केलेली नसतांना फक्त 9 कि.मी. जलवाहिनी टाकली याबद्दल या कंत्राटदाराला 92 कोटी रुपये मिळाले. त्याचप्रमाणे गेल्या दोन वर्षापासून हे काम बंद होते, या कामाबद्दल कोर्टात दाखल केलेली याचिका फेटाळल्यानंतर पुन्हा भू संपादनाच्या कामाला सुरुवात झाली त्यावेळी लोकांचा उद्रेक झाला आहे.सभापती महोदय, या गोळीबारामध्ये जे लोक मरण पावले आहेत, जे लोक जखमी झाले आहेत त्यांचे कुटुंबीय शासनाची मदत स्वीकारतील की नाहीत याची मला माहिती नाही. शासनाने जालना येथे मरण पावलेल्या वारकऱ्यांना मदत देण्याबाबत विचार केला, त्याप्रमाणे या घटनेमध्ये शांताबाई ठाकर, मोरेश्वर सोपान साठे आणि शामराव तुपे या मृत व्यक्तींच्या कुटुंबीयाना पाच लाख रुपयांची मदत देण्यात यावी. त्यांची लहान मुले आहेत, काही कुटुंबामध्ये एकमेव कमविणारी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ...

व्यक्ती असल्यामुळे त्यांना आपण आर्थिक मदत करावी. त्याचप्रमाणे जखमी झालेल्या लोकांना सुध्दा आपण आर्थिक मदत करावी अशी मला मागणी करावयाची आहे.

सभापती महोदय, हा पवना नगर भाग गोळीबाराच्या घटनेमुळे एकदम प्रकाशात आलेला आहे. आज त्या ठिक्‌णी ग्लायडिंग क्लबसुध्दा आहे. त्या ठिकाणी ग्लायडिंग करण्यासाठी वेगवेगळे लोक येऊन गेले आहेत. त्यामुळे उत्तर प्रदेशातील शेतकऱ्यांचा जेवढा महत्वाचा प्रश्न आहे तेवढाच पवना नगरमधील शेतकऱ्यांचा प्रश्न महत्वाचा आहे. या दृष्टीने जी 50 गावे बाधित झालेली आहेत त्यांच्याकडे लक्ष देत असतांना पिंपरी-चिंचवड शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी शासनाने नवीन योजना घेण्यासाठी पावले उचलली पाहिजेत. त्याचप्रमाणे या ठिकाणी सी.डी. बाबत देखील चर्चा करण्यात आली आहे. माध्यमांच्या बाबतीत चर्चा करीत असतांना त्यांनी घेतलेल्या फूटेजपैकी खरे किती आणि खोटे किती याबाबत देखील न्यायालयीन चौकशी होऊ शकते. आपल्या विरुध्द एखादी गोष्ट घडल्यानंतर सर्वच खोटे किंवा खरे याची चर्चा करण्यापेक्षा ज्याच्याबद्दल आपल्या मनात शंका आहे त्याची चौकशी होणे क्रमप्राप्त आहे.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेने स्वत:ची धरणे बांधलेली आहेत त्या प्रमाणे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने सुध्दा स्वत:साठी एखादे धरण बांधणे अशक्य नाही. पवना नगरचे धरण सोडून पुढील भागामधून पाण्याचा सोर्स घेतला तर त्याला कुणाचाही विरोध असण्याचे कारण नाही. सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी काल घटनेच्या ठिक्‌णी जावून भेट दिली व आता सभागृहामध्ये उत्तर देण्यासाठी ते आले आहेत. सभापती महोदय, गेल्या वर्षभरामध्ये राजकारणातील एक तयार झालेली शैली या सभागृहात पहाते की, आम्ही आरोप केल्यानंतर समोरुन त्याचे प्रत्यत्तर दिले जात असतांना आमच्यावर आरोप केले जातात. प्रश्न असा आहे की, आम्ही शंभर चुका केल्या असतील तर तुम्ही एक हजार चुका करणार काय? आम्ही सुध्दा शेंडे, बुडखे जोडून उद्या या संदर्भात भूमिका घेतली तर ती चुकीची नाही. "मुंबई बंद"च्या संदर्भातील किंवा अन्य निर्णयाच्या संदर्भात आम्ही शासनाला गुड फेथमध्ये सहकार्य देत आहोत याचा अर्थ आम्ही कमकुवत आहोत असे जर कुणाला वाटत असेल तर खंबाटा सारख्या कंपनीमध्ये तेथील युनियन लिडरनी काय काय केले आहे याच्या चौकशीची मागणी आम्ही करु शकतो. एवढे बोलून माझे भाषण संपविते. धन्यवाद.

---

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या प्रस्तावावरील या सभागृहातील चर्चा काही काळापुरती थोडीशी संवेदनाहीन झाली होती. माझ्या या बाबतीत स्पष्ट भावना आहेत की, ज्यावेळी या राज्यातील शेतकऱ्याचा गोळीबारामध्ये मृत्यू होतो त्यावेळी तुम्ही आम्ही सर्व जनप्रतिनिधी आहोत. मी कोणत्या पक्षाचा आहे किंवा माझी काय बांधिलकी आहे या पेक्षाही या राज्यातील काही घटनांच्या बाबतीत तुम्ही-आम्ही संवेदनाशील असले पाहिजे आणि तसे आपण आहोत असे माझे मत आहे. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांचे भाषण ऐकल्यानंतर सत्ताधारी पक्षाच्या भावना स्पष्ट झाल्या. परंतु ही जबाबदारी कुणाची असा प्रश्न काही काळ माझ्या मनामध्ये होता एक गोष्ट स्पष्ट आहे की, अशा घटना घडतात त्यावेळी ती नैतिक जबाबदारी राज्यकर्त्यांची असते. कुणी घटना घडविली, कशी घडविली त्या घटनेचे नियंत्रण व तिचे आकलन योग्य पध्दतीने कां झाले नाही हा राज्यकर्त्यांचा दोष असतो. ज्या जिल्ह्याला दादांसारखे राजकीयदृष्टया जागरुक असलेले पालक मंत्रीपद लाभले आहे, त्या जिल्ह्यामध्ये गेली तीन वर्षे आंदोलनाचा विषय सुरु असल्याचे मला समजले. जिल्ह्याच्या एका भागात सारखी ठिणगी पेटत असतांना त्याकडे एखाद्या यंत्रणेला जाणीवपूर्वक लक्ष ठेवायला सांगितले गेले असेल तर याबाबतीत मंत्रीमहोदय त्यांच्या भाषणामध्ये सांगतील. पोलिसांच्या गुप्तचर यंत्रणेला त्याठिकाणी काय सुरु आहे याची सतत माहिती मिळते. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्य माझ्याकडे ही सी.डी. आहे माझ याकडे ती सी.डी. आहे असे सांगत होते. अशाप्रकारे आपण सी.डी. जमा करु शकता तर मग पोलीस कां जमा करु शकत नाहीत? मी त्या भागात गेलो नसल्यामुळे त्या ठिकाणी घडलेल्या घटनेसंदर्भात मला भावना व्यक्त करणे जमणार नाही. परंतु मी काल म्हटले की,तीन शेतकरी मेल्यानंतर, शेतकऱ्यांच्या एवढया निर्घृणपणे हत्या झाल्यानंतर या सभागृहामध्ये कामकाज करण्याची आमची मानसिकता नाही. मी माझ्या कुवतीप्रमाणे शेतकऱ्यांसाठी अगदी समर्पक भावनेने काम करतो. परंतु त्या ठिकाणी काय घडले आहे, याची मला माहिती नसल्यामुळे मी प्रतिक्रिया देवू शकत नव्हतो.

सभापती महोदय, काल मला पत्रकार श्री. भावे भेटले व त्यांनी सांगितलेल्या सर्वच गोष्टींचा उल्लेख करुन सभागृहाचा वेळ घेणार नाही. एकेकाळी अधिवेशन सुरु असतांना गोळीबार झाला होता, त्याबद्दल सदनामध्ये प्रतिक्रिया उमटली असता संपूर्ण विरोधी पक्षाला सभागृहामधून निलंबित करण्यात आले. त्यावेळी आचार्य अत्रे यांच्याकडे इम्पाला होती, त्याप्रमाणे सन्माननीय



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

राज्यपालांची इम्पाला होती. पहिली आचार्य अत्रेंची इम्पाला आल्यानंतर राज्यपालांची आली. त्यावेळी खाली असलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांना ते समजले नाही. परंतु निलंबित केले असतांनाही आचार्य अत्रे सभागृहात आले आणि त्यांच्या पध्दतीने ते उभे राहिले. त्यावेळी केलेला निषेध वगैरे सर्व रेकॉर्डवर आहे, तो वाचून दाखववावा असे नाही. विरोधी पक्षाने आपल्या तीव्र भावना व्यक्त करणे याचा अर्थ सत्ताधारी पक्षाने त्या भावना जाणीवेने घेणे असा त्याचा अर्थ होतो. परंतु तुम्ही बोलता म्हणून आम्ही बोलू, तुम्ही सुनावता म्हणून आम्ही सुनावू या भावनेतून झालेली चर्चा मी मागे बसून ऐकत होतो त्यावेळी मला खूप वेदना होत होत्या. आपण राजकारणामध्ये तू-तू, मी-मी करु या, तो तर आपला धर्म आहे. आम्ही विरोधी पक्ष म्हणून या सदनामध्ये आलो असून तुमची सत्ता हिसकावून घेण्यासाठी, हस्तगत करण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार. विरोधी पक्षाला नामोहरण करण्यासाठी व आपली सत्ता टिकविण्यासाठी तुम्ही तुमच्या सत्तेचा वापर करणार.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

हा राजकीय पध्दतीत घालून दिलेला दंडक आहे. परंतु जेव्हा एखाद्या संवेदनशील प्रकरणामध्ये अशा प्रकारे तू-तू, मी-मी होते तेव्हा वेदना होतात.

सभापती महोदय, समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्यांनी पूर्वीची भाषणे काढून दाखविली. तशी ती माझ्याकडेही आहेत. मी येथे वाचून दाखविणार नाही. कारण त्यावेळी माननीय वित्त मंत्री श्री.अजितदादा पवार हे देखील सभागृहामध्ये होते. त्यावेळी माननीय अध्यक्ष श्री.दिलीप वळसे-पाटील, माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील या सर्वांच्या भाषणामध्ये काय म्हटले होते? त्यावेळी अधिवेशन सुरु नव्हते.परंतु त्यावेळी चांदूर रेल्वे भागामध्ये कापसाच्या भावाच्या संदर्भात झ ाालेल्या आंदोलनाच्या वेळी झालेल्या गोळीबारामध्ये दोन शेतकरी मरण पावले होते.आज याठिकाणी विरोधी पक्ष जी वाक्ये वापरत आहेत किंबहुना त्यापेक्षाही आक्रमक वाक्ये माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी वापरलेली आहेत की, "डोक्यावर कशा गोळ्या लागल्या ? छातीवर गोळया कशा लागल्या ?"वगैरे. मी ते सगळे वाचून दाखवत नाही. अशा प्रकारे त्यावेळी विरोधी पक्षामध्ये असलेले आजचे माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी जी वाक्ये वापरली, त्यापेक्षा कितीतरी सौम्य वाक्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी वापरली आणि सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनीही वापरली आहेत आणि सन्माननीय सदस्य श्री.रामदासभाई कदम यांनी काही चूक केलेली नाही.

सभापती महोदय, त्यावेळी तर सध्याचे सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सर्वांचे राजीनामे मागितले होते. माननीय मंत्री श्री.मधुकर पिचडसाहेब यांनी सर्वांचे राजीनामे मागितले. काही सन्माननीय सदस्यांनी तर माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री आणि माननीय गृह मंत्री या तिघांचे राजीनामे मागितले.ते सगळे याठिकाणी आहे.त्या मुळे आज जेव्हा याबाजूने देखील अशाच प्रकारच्या भावना व्यक्त होतात तेव्हा त्या भावनांचा आदर करुन देखील,आम्ही राजीनामा मागितला म्हणून तुम्ही राजीनामा दिला असे काही होत नाही तसेच तुम्ही खुर्च्या रिकाम्या कराव्यात आणि आम्हाला त्या खुर्चीवर बसवा असे काही होत नाही. कारण आपल्याला या खुर्च्यांवर बसविणारी जनता आहे. तुम्हाला आणि मला कुठे बसवावयाचे हे जनता ठरविते.पण याठिकाणी ज्यापध्दतीने तू-तू,मी-मी होते, त्यावेळी त्या मृत शेतकऱ्यांच्या आत्म्याला प्रतिसाद देण्याकरता आणि जनतेच्या तीव्र भावनांचे सांत्वन होण्यासाठी लोक या सदनातील चर्चेकडे आपुलकीने पहात आहेत, आतुरतेने पहात आहेत. म्हणून मी वेदनेने असे म्हणतो की, या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

विषयावर चर्चा करीत असताना मध्ये जे हसणे सुरु होते, मस्करी चालू होती ते बरोबर नाही. आपण राज्यकर्ते आहात, त्यामुळे आपण लोकांच्या संवेदना समजून घ्यावयास पाहिजेत. आम्ही तुमच्यावर आरोप करणार आणि जो आरोप झेलतो, सहन करतो आणि आपल्या कृतीतून रिचवतो तो राज्यकर्ता असतो. केवळ टीका करावयास हरकत नाही, मी सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांना सांगू इच्छितो की, तुम्ही ज्यापध्दतीने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामध्ये गेलात त्याचा मी आदर करतो. कारण तुम्ही राजकीय प्रतिष्ठा सांभाळली. तुम्ही "मातोश्री" येथे जाऊन शिवसेना पक्षाचा राजीनामा दिला आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामध्ये गेलात. सर्व पध्दत पार पाडली, ही डिग्नीटी ठेवावयास शिकावे.मी वारंवार पहात आहे आणि तुम्हाला प्रेमाने सांगतो. त्या प्रमाणे करणे न करणे हा तुमचा प्रश्न आहे. आम्ही आमच्या पध्दतीने जाणारच. पण सुडाच्या भावनेतून एखादे वक्तव्य करीत असाल तर तुमचे भविष्यातील करिअर त्याही पक्षामध्ये रहाणार नाही. याच्यामागे कोण होते?त्याच्यामागे कोण होते? हे माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनाही माहिती आहे.

सभापती महोदय, हे आंदोलन 3 वर्षापासून सुरु आहे आणि तेथे गावकऱ्यांची मिळून सर्वपक्षीय समिती आहे. केवळ काल दोन झेंडे दिसले नाहीत आणि ते सत्तेमध्ये असल्यामुळे झेंडे दिसले नाहीत. पण ते तिकडे होते.मी मघाशी सन्माननीय सदस्य श्री.रामदासभाई कदम यांना सांगितले.हा केवळ शिवसेना आणि भाजप या पक्षांचा लढा नाही. यामध्ये कॉंग्रेस पण होती. यामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसला उघडपणे कसे सामील होता येईल? पण त्यांच्याही भावना या आंदोलकांबरोबर होत्या की, आमच्या मावळमधील पाणी आम्हाला मारुन तिकडे नेऊ नका. पिंपरी-चिंचवडला अवश्य पाणी द्यावे. परंतु त्याच्यामागे असे काहीतरी असेल आणि मग मागचे काहीतरी शोधून काढा वगैरे गोष्टी करु नका. याठिकाणी एका चुकीच्या गोष्टीचा उल्लेख झाला म्हणून मी सांगतो.कारण मला या विषयामध्ये उणीदुणी काढावयाची नाहीत.पण तुम्ही रत्नागिरीला असे दाखविले की, जेथे-जेथे आम्ही जातो, तेथे-तेथे लोकांवर गोळीबार करावयास लावतो. ठीक आहे.वारकऱ्यांच्या बाबतीत काही संबंध नाही ते उत्स्फूर्त होते. मी तेथे गेलो होतो. परंतु तेही आमच्या गळ्यामध्ये मारलेत, हरकत नाही.

सभापती महोदय,जैतापूरच्या बाबतीत सांगावयाचे तर तेथे शिवसेनेचे लोक आणि कार्याध्यक्ष प्रथम गेले नव्हते. माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वत:हून निर्णय घेतला की, मी येथील गावकऱ्यांशी संवाद





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

साधेन आणि मी त्यावेळी त्यांना मनापासून धन्यवाद दिले होते. माननीय मंत्री श्री.भास्करराव जाधव यांनाही माहिती असेल.हा चांगला निर्णय होता, सन्माननीय निर्णय होता.खरे म्हणजे तेथे माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी सुध्दा जावयास हवे होते,पण तुम्ही जाऊ शकला नसाल. जैतापूर प्रकरणामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी सर्व गावकऱ्यांना बोलाविले.त्यावेळेला नकळत अशी तंबी दिली होती की,कोणीही बाहेरुन गाड्या भरुन माणसे आणू नयेत.त्यावेळी सभेमध्ये जैतापूरचे गावकरी बसले होते. पण तुमचे माननीय उद्योगमंत्री तेथे गेले, व्यासपीठावर बसले. एक प्रोटोकॉल असतो. माननीय उप मुख्यमंत्री अजितदादा पाटील यांचे आणि माझे काही पटले नाही तरी व्यासपीठावर माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री बसल्यानंतर इतर मंत्री महोदयांनी आपल्या माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री यांचा प्रोटोकॉल सांभाळला पाहिजे आणि ही राजकारणातील पध्दत आहे.परंतु माननीय मुख्यमंत्री व्यासपीठावर असताना दमबाजी करावयाची. "तुला बघून घेतो", "तुला संपवून टाकतो" असे त्यांच्या देखत बोलावयाचे आणि मग भडका झ ाला,जैतापूरच्या लोकांच्या भावना भडकल्या.कारण याठिकाणी राज्याचे माननीय मुख्यमंत्री असताना जर आम्हाला दमबाजी होत असेल तर तो गोळीबार हा त्या भावनेचा उद्रेक होता. त्या गोळीबारामध्ये काही लोक मरण पावले.त्यानंतर कार्यकारी अध्यक्ष आदरणीय श्री.उद्धवजी ठाकरे, आणि शिवसेनेचे लोक तेथे गेले होते, ते मृत व्यक्तींच्या घरच्या लोकांचे सांत्वन करण्यासाठी आणि आंदोलनाचे समर्थन करण्यासाठी गेले होते. मघाशी आपण उल्लेख केला म्हणून तेवढयापुरतेच सांगितले आहे, मला इतर बाबींमध्ये जावयाचे नाही.

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना सांगू इच्छितो की, मला माफ करा. पण तुम्ही चांगल्या प्रकारे भावना मांडल्या पण तुमच्या या भावना आहेत काय हा प्रश्न निर्माण होतो. आंदोलन सुरु असताना असे प्रकार होणे हे सत्तारुढ पक्ष म्हणून तुम्हाला आणि विरोधी पक्ष म्हणून आम्हालाही भूषणावह नाही. विधानमंडळाचे अधिवेशन सुरु असताना अशा प्रकारे गोळीबार होणे हे 100 टक्के सत्तारुढ पक्षाचे अपयश आहे आणि त्याची नैतिक जबाबदारी स्वीकारलीच पाहिजे.तसेच नागपूरला मोवाडला जो प्रकार झाला,तेथे आम्ही नव्हतो.एका पोलिसांची रुम घेऊन आठ-नऊ वर्षाच्या बालिकेवर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला आणि त्यामुळे चिडलेल्या जनतेने जे काही केले,त्यातून गोळीबार झाला. वारीच्या बाबतीत देखील तोच प्रकार होता.त्याबाबत मी परत उल्लेख करावयास नको.त्यानंतर काल झालेला गोळीबार.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, 1 तारखेच्या संदर्भात सांगावयाचे तर मी येथे माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले. त्यावेळी माननीय सभापती म्हणाले की, आपल्याकडे तशी पध्दत नाही. पण मी त्यांना विनंती केली की, मला बोलू द्यावे. माननीय मुख्यमंत्र्यांनी दिनांक 1 ऑगस्ट 2011 रोजी आयोजित केलेला "मुंबई बंद"टाळण्यासाठी जे श्रम घेतले, माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी त्यामध्ये जो भाग घेतला, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन केले. 1 तारखेच्या आदल्या दिवशी कामगारांनी आंदोलन केले. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप कामगार नेते आहेत.पण मी हे लहानपणापासून सर्व पाहिले आहे.ज्या वेळी कोणत्याही कामगारांचे आंदोलन रस्त्यावर येते, पक्षाचे सोडून द्या, त्यावेळेला ते हिंसकच बनते हा अनुभव आहे.त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी सदरहू बंद टाळण्यामध्ये जे यश मिळविले त्याबद्दल मी आपले अभिनंदन करण्यासाठी उभा आहे. कारण आम्हालाही ती हिंसा नको होती. आज वर्षानुवर्षे पिचलेले कामगार तुमच्या-आमच्याकडे आशेने पहात आहेत आणि आम्ही त्याचे नेतृत्व करीत आहोत, तुम्ही देखील संयमाने घेत आहात, अशा वेळी हा संयम आणि आमच्या शिवसेना पक्षाच्या कार्यकारी अध्यक्षांचे नेतृत्व आणि इतर सर्व पक्षांचा आदर त्या आंदोलनातून व्यक्त झाला पाहिजे, उणीदुणी काढून त्या आंदोलनाचा अनादर होतो ही माझी भावना आहे आणि ती या चर्चेच्या निमित्ताने सांगता आली. त्यामुळे मला अत्यंत नम्रपणाने परंतु खेदाने नमूद करावेसे वाटते. मी माझ्या सर्व सहकाऱ्यांना विनंती करतो की, ही घटना अतिशय दुर्दैवी असून तीन शेतकरी मृत्युमुखी पडलेले आहेत. त्यावेळी तेथे माझा मुलगा हजर होता. कारण गाडयांची जी रांग लागली होती, त्यामध्ये पाचवी गाडी त्याची होती. त्याला तातडीने पुण्याला जावयाचे होते. म्हणून त्याने ड्रायव्हरला गाडीमध्ये बसावयास सांगून चालत पुढे गेला आणि पलिकडच्या बाजूने वळून ज्या गाड्या जात होत्या, त्यातील एका गाडीमध्ये बसून तो पुणे येथे गेला. तत्पूर्वी मला त्याचा मिस कॉल आला होता. नंतर मी त्याला फोन केल्यानंतर त्याने प्रथम ही बातमी मला दिली की, असे-असे येथे घडलेले आहे. सुरुवातीला 150-200 लोक होते. मला ड्रायव्हरने सांगितले की, तेथे एक तासाने जवळ जवळ भरपूर लोक आले आणि त्यांना ताब्यात घेणे पोलिसांना शक्य होते. सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे जे बोलल्या, ते घडले नाही. मग हे आंदोलन तीव्र झाले. माझ्या मुलाच्या गाडीच्या पुढे असलेल्या गाडीतील ड्रायव्हर चिक्की घेण्यासाठी उतरला आणि तो 20 रुपये, 30 रुपये असे सांगत होता आणि त्याच्या पायाला गोळी लागली आणि आरपार गेली. गोळीबार कसा झाला असेल याची मी काही चिकित्सा करीत



श्री.दिवाकर रावते . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाही. कारण सर्वांनी विनंती केली आहे की, या घटनेची न्यायालयीन चौकशी व्हावी.त्यामध्ये सर्व काही समोर येईल.याठिकाणी सांगितले जात आहे की, मी ही सी.डी. आणतो,ती सी.डी. आणतो. पण आपण कोण आणणार? काल तुम्ही-आम्ही सर्व टी.व्ही.वर पहात होतो.त्यावेळी पुलावरुन देखील पोलिसांना गोळीबार करताना पाहिले आहे. परंतु पुलावर लोक होते की खाली होते हे मला येथून सांगता येणार नाही, पण गोळीबार झाला.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरभाऊ तेथे गेले होते आणि सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे देखील गेल्या होत्या. तसेच विधानसभेचे माननीय विरोधी पक्षनेते देखील गेले होते. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार देखील पालकमंत्री म्हणून तेथे जाऊन आले. तुम्ही कधी गेलात याला महत्व नाही, पण तुम्ही गेलात. तेथील लोकांच्या छाती मध्ये, कपाळामध्ये गोळी लागलेली आहे, मानेतून आरपार गोळी गेलेली आहे.त्यावेळी तेथील एस.पी. टी.व्ही.वर सांगतात की,ते लोक वाकले म्हणून गोळी लागली. म्हणून या गोळीबाराची चौकशी झाली पाहिजे आणि या विषयामध्ये सुरुवातीला अनेक माननीय मंत्री महोदयांनी आमची सत्ता असताना शिवशाहीच्याबाबत सांगितले.पण शिवशाहीच्या काळामध्ये झालेल्या पोलीस गोळीबाराबाबत अगदी लालबहाद्दूर शास्त्री पासून उदाहरणे देऊन नैतिकता स्वीकारुन राजीनामा द्यावा असे सांगितले. पण माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार, माझा एकच प्रश्न आहे की, माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी राजीनामा द्यावा की नाही याबाबत होणाऱ्या चौकशीमध्ये त्यांचा विभाग दोषी ठरला तर ते ठरवतील. पण अधिवेशन सुरु असताना. आता कामकाजाचे तीन-चार दिवस राहिलेले असताना असे काय अडले होते की,अधिवेशनामध्ये 400 पोलीस लावून जैतापूरला जसे सुरु आहे तसे येथे काम करावयास लावावयाचे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

हे आदेश कोणी दिले की ज्यातून लोकांच्या भावना भडकल्या आणि त्यातून हे सर्व निर्माण झाले ? अधिवेशन चालू असताना पोलिसांचे सामर्थ्य लावून मी काम करणारच असा हट्ट कोणी धरला ? सर्वात जर दोष कोणाचा असेल तर अधिवेशन चालू असताना ती पाईपलाईन टाकण्याकरिता पोलिसांचे बळ वापरावयास लावले आणि पाईपलाईन चालू करावयास लावली त्यांचा दोष आहे. त्यामध्ये सन्माननीय मंत्री श्री. सुनील तटकरे साहेब आहेत. माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार तिकडचे पालकमंत्री आहेत. हे कोणी केले हे मला सांगता येत नाही पण ज्यांनी अधिवेशन चालू असताना पोलीस लावून लोकांच्या भावना भडकेल अशा प्रकारचे काम चालू करावयास लावले त्यांची जबाबदारी आहे. अधिवेशनाच्या काळामध्ये हा गोळीबार समर्थनीय नाही. तीन शेतकरी मृत्युमुखी पडलेले आहेत. यामध्ये कोणाचे राजीनामे मागावयाचे या संदर्भात माझे असे म्हणणे आहे की, या संदर्भात ज्यांनी पाईपलाईन जबरदस्तीने चालू करावयास लावली त्यांची ही जबाबदारी आहे. त्या संबंधितांनी आपली नैतिक जबाबदारी स्वीकारुन राजीनामे द्यावेत. या तीन शेतकऱ्यांचा मृत्यू त्यांच्या डोक्यावर जातो. त्यांचे हे पाप आहे असे माझे मत झालेले आहे. माझे मत काही अंतिम नाही पण त्यांनी राजीनामा दिला पाहिजे असे मला ठामपणे वाटते.

सभापती महोदय, पिंपरी-चिंचवडला पाणी मिळाले पाहिजे. या प्रक्षोभाच्या बाबतीत आपण पालकमंत्री म्हणून जो काही असेल तो उपाय तातडीने करावा आणि त्यांच्यासाठी योग्य पाण्याचा स्त्रोत पकडावा. मावळ तालुक्यातील तीन शेतकऱ्यांनी रक्त सांडल्यानंतर या आंदोलनातून त्यांना न्याय मिळाला पाहिजे, त्या 30-35 गावांना न्याय मिळाला पाहिजे. आपली शेती उद्ध्वस्त होणार नाही असा शब्द या रक्तरंजित आंदोलनातून त्यांना मिळाला पाहिजे पण त्याचवेळेला पिंपरी-चिंचवडला सुध्दा पाणी देण्याकरिता तो कोठला योग्य स्त्रोत असेल तो निवडावा. पाहिजे तर त्या ठिकाणी कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधा, पुढे दोन चार बंधारे बांधा. 1 टीएमसी पाण्याचा प्रश्न आहे आणि 1 टीएमसी पाणी साठेल अशा पध्दतीने ती नदी जरुर वाहत असते. जो मार्ग असेल तो निवडावा. माननीय उप मुख्यमंत्री यांची ही जबाबदारी आहे. आज उत्तरामध्ये आम्ही ते अपेक्षित करतो. पिंपरी-चिंचवडला पाणी मिळालेच पाहिजे. ते कोणत्या स्त्रोतातून द्यावयाचे हे शासनाने बघावे पण या गावकऱ्यांच्या हक्कावर गदा आणू नका. आता त्यांनी रक्त सांडलेले आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. दिवाकर रावते ....

मी या माध्यमातून एक विनंती करणार आहे की, बॉम्बस्फोटात जे मयत झाले त्यांना आपण श्रध्दांजली वाहिली. सभापती महोदय, मी आपल्याला विनंती करतो की, या तीन शेतकऱ्यांच्या बाबतीत आपण एकमुखी ठराव मांडावा. आम्ही त्यावर चर्चा करणार नाही किंवा बोलणार नाही पण या चर्चेनंतर या तीन शेतकऱ्यांना आपण आदरांजली अर्पण करावी अशी मी आपल्याला विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : यानंतर माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणास सुरुवात करावी.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांना बोलण्याची संधी द्यावी. आमच्या पक्षाकडून फक्त दोनच सन्माननीय सदस्य बोललेले आहेत.

**उप सभापती** : आपण ज्या दोन सदस्यांची नावे दिली होती त्यांना मी बोलण्याची संधी दिलेली आहे.

श्री. पांडुरंग फुडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांना बोलण्याची संधी द्यावी. नियम समितीमध्ये ठरल्याप्रमाणे कामकाज होणार नसेल तर ते योग्य नाही.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. अजित पवार ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, 9 ऑगस्टला क्रांती दिनाच्या दिवशी जी काही घटना घडली त्या घटनेच्या संदर्भामध्ये सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम, दिवाकर रावते, विनोद तावडे, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री भाई जगताप, किरण पावसकर, एस.क्यू.जमा अशा दोन्ही बाजूच्या 8 सन्माननीय सदस्यांनी या चर्चेमध्ये भाग घेतला होता. काल पवना परिसरामध्ये जो गोळीबार झाला आणि पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर बऊर येथे काल गोळीबाराची जी घटना घडली त्यामध्ये काही मागण्या घेऊन मावळातील नागरिक रस्त्यावर उतरले होते आणि त्या ठिकाणी आंदोलन सुरु केले गेले होते. त्यावेळी एका विशिष्ट परिस्थितीमध्ये पोलिसांना गोळीबार करावा लागला. हा जो गोळीबार झाला आहे त्यामध्ये तीन जण मृत्युमुखी पडले. या घटनेबाबत मी सभागृहामध्ये दुःख व्यक्त करतो आणि त्यांना श्रध्दांजली देखील व्यक्त करतो. घडलेली घटना ज्या कारणामुळे घडली त्या बाबतीत आजच्या चर्चेच्या निमित्ताने राज्यातील जनतेला वस्तुस्थिती देखील समजली पाहिजे.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नियम समितीमध्ये ठरल्याप्रमाणे जर कामकाज चालणार नसेल तर ते योग्य नाही. या ठिकाणी सुध्दा आमचा आवाज दाबला जाणार आहे का ?

**उप सभापती** : मी मघाशी सुध्दा सांगितले होते की, ठीक 3.00 वाजता उत्तराचे भाषण सुरु होईल. त्या वेळी मी माननीय मंत्री महोदयांना उत्तराचे भाषण सुरु करण्याची विनंती केली होती पण उरलेल्या वेळेत सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपले भाषण केले. प्रत्येक सदस्यानेच जर बोलण्याची विनंती केली तर कसे काय होईल ? मी ज्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिली त्यांची नावे वाचून दाखवतो. कॉंग्रेस पक्षाकडून सन्माननीय सदस्य सर्वश्री भाई जगताप आणि एस.क्यू.जमा यांची नावे आली होती. त्यांना मी बोलण्याची संधी दिलेली आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर, अनिल भोसले आणि श्रीमती विद्या चव्हाण यांची नावे आली होती. त्या पैकी सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनाच बोलण्याची संधी दिली. भारतीय जनता पक्षाकडून माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, सर्वश्री विनोद तावडे, पाशा पटेल आणि चंद्रकांत पाटील यांची नावे आलेली होती.

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**उप सभापती** .....

त्यातील दोन सन्माननीय सदस्यांना मी संधी देऊ शकलो. शिवसेना पक्षाकडून सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री रामदास कदम आणि दिवाकर रावते यांची नावे आली होती. यातील दोन सन्माननीय सदस्यांना मी आधी संधी दिली आणि शेवटच्या चार पाच मिनिटांमध्ये सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना बोलण्याची संधी दिली. त्या नंतर मी माननीय मंत्री महोदयांना उत्तराचे भाषण सुरु करण्याची विनंती केली. उत्तराचे भाषण आपण पंधरा मिनिटे उशिराने सुरु केले. इतक्या न्यायपूर्ण भूमिकेतून मी वावरल्यानंतर आपण जर असे म्हणत असाल तर ते योग्य नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांना चार पाच मिनिटे बोलू द्यावे.

**उप सभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी पाच मिनिटात आपले भाषण पूर्ण करावे.

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. सय्यद पाशा पटेल ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, शेतकरी ज्या पध्दतीने आंदोलन करतात ते कशासाठी करतात ? माझ्या अंत:करणाला वेदना होऊ लागलेल्या आहेत. शेतकऱ्यांच्या कालच्या आंदोलनामध्ये झेंडे होते. शेतकरी झेंडे संरक्षणासाठी वापरतात. माझा आवाज त्या ठिकाणी दाबला जातो, कोणी तरी माझ्या बरोबर येऊन माझ्या प्रश्नाला न्याय मिळवून दिला पाहिजे, ही त्यांची अपेक्षा असते. मी पाच-दहा गोळीबारांचा साक्षीदार आहे. मी 5-50 लाठीहल्ल्याचा साक्षीदार आहे. एक-एक लाख रुपये जरी दिले आणि गोळी खायला या म्हटले तरी कोणी येणार नाही. कालच्या आंदोलनाला ज्या पध्दतीचे कलंक लावण्याचे काम चालू आहे ते बरोबर नाही. त्या आंदोलनामध्ये 250 महिला होत्या. ज्या ठिकाणी गोळीबार आणि लाठीहल्ला होणार आहे त्या ठिकाणी कोणीही आपल्या घरच्या लक्ष्मीला घेऊन जात नाही. त्यांच्या पोटाला तेवढी वेदना आहे. 35 किलोमीटरमध्ये माझ्या शेताला पाणी मिळणार नाही, माझे शेत वाळून जाणार आहे, या परिस्थितीत राहण्यापेक्षा मेलेले बरे म्हणून ते लोक रस्त्यावर आले होते. कोणाच्या फूस लावण्याने किंवा कोणाच्या प्रलोभनाने लोक येत नसतात. लोक फक्त आपल्या प्रश्नाला न्याय मिळवून देण्यासाठी येत असतात.

सभापती महोदय, लोकांनी काल 9 तारखेलाच आंदोलन का केले ? गावातील भोळ्या भाबड्या लोकांना आशा असते की, अधिवेशन चालू आहे, सरकार एकत्र जमले आहे, किमान आज तरी मला कोणी लाठी घालणार नाही, किमान आज तरी मला कोणी गोळी घालणार नाही, म्हणून लोक रस्त्यावर येतात. तुम्ही एवढी लाज सोडली, त्या गावातील लोकांना किती वेदना होत असतील. सरकार बसलेले असताना सुध्दा पाणी मागण्यासाठी गेल्यानंतर जर तुम्ही तीन लोकांना गोळ्या घालणार असाल तर तुमचे राज्य करणे काय उपयोगाचे आहे ? आपण त्या भागातील लोकांच्या सर्व गोष्टी जर बघितल्या तर मावळ भागामध्ये हे सगळे का होऊ लागले आहे ? यामध्ये जी महत्वाची कारणे आहेत त्यातील दोन तीन गोष्टी मी सांगणार आहे. पिंपरी-चिंचवड या भागातील विकासासाठी सातत्याने मावळ प्रांतात अनेक वेळा भूसंपादन झालेले आहे. प्रत्येक वेळी प्रकल्पग्रस्तांना देण्यात येणारी आश्वासने पाळली न गेल्याने तेथील नागरिक असंतुष्ट आहेत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल...

हजारोंच्या संख्येने तेथे सातत्याने आंदोलने होत आहेत. त्या भागात आतापर्यंत टाटांची 5 धरणे, सरकारची 8 धरणे, रेल्वे, हायवे, जुना हायवे, मिलिटरीसाठी 10 एकर जमीन, एमआयडीसी अशा प्रकारे 50-60 एकर जमीन संपादित करण्यात आलेली आहे. मी स्वत: टाटांची धरणे पाहिलेली आहेत. अंदमाळ व पवनमाळला धरण आहे. त्या धरणात पाणी साचलेले आहे, परंतु तेथील लोकांना पिण्यासाठी पाणी मिळत नव्हते. युतीच्या काळात त्या गावातील लोकांना पिण्याचे पाणी मिळण्यासाठी अधिकार मिळाला आहे. अशा प्रकारच्या जुलमी गोष्टी घडलेल्या होत्या, त्यामुळे या लोकांच्या मनात असंतोष होता. म्हणून त्या लोकांना असे वाटत होते की, या धरणातील पाणी नेले तर आपल्या हातून सगळेच जाईल.

मी अनेक आंदोलनांचा साक्षीदार आहे. सरकारला आंदोलन होऊ द्यायचे नसेल तर जे प्रमुख कार्यकर्ते असतात त्यांना रात्री घरातून उचलून नेता येते. आंदोलन होऊ नये म्हणून मला आतापर्यंत 50 वेळा तरी पोलिसांनी रात्री घरातून नेलेले आहे. जर तेथे आंदोलन होऊ नये, आंदोलकांवर लाठीचार्ज होऊ नये, गोळीबार होऊ नये असे सरकारला वाटत होते तर आंदोलनाला अशा पध्दतीने हाताळता आले असते. शासनाने ही घटना मुद्दाम केलेली आहे. तेथील पाणी नेण्यासाठी आपला रस्ता मोकळा व्हावा म्हणून गोळीबार केलेला आहे, हा गोळीबार लोकांमुळे झाला नसून शासनाने केलेला आहे. शासनाला हे आंदोलन होऊ नये असे वाटत होते तर त्यातील प्रमुख 25 कार्यकर्त्यांना जेलमध्ये टाकले असते तर कोणीही रस्त्यावर आले नसते. पाणी बंद पाईप लाईनमधून जावे की नदीच्या पात्रातून जावे यासाठी हा हट्ट धरण्यात आला आहे. तेथील पाण्याचे बाष्पीभवन होऊ नये, जमिनीत झिरपू नये एवढी शासनाला काळजी वाटत असेल तर नदीवर अस्तर करण्यात यावे. त्यामुळे पाणी कमी होणार नाही. पाणी झिरपणार नाही. बाष्पीभवन होऊ नये म्हणून वरुन आवरण टाकावे. बंद पाईपचा हट्ट कशासाठी धरला जातो ? त्यामध्ये सुध्दा स्वार्थ दिसत आहे. या सर्व गोष्टी पाहिल्यामुळे लोक रस्त्यावर आले होते.

सभापती महोदय, पोलिसांनी पुरुषांना तर मारले आहे, पण महिलांना सुध्दा मारण्यात आले आहे. मी तीन वेळा बातमीमध्ये असे पाहिले की, एका पोलीस अधिकारी हातात दोन रिव्हॉल्व्हर घेऊन पळत होते. एका पोलीस अधिकाऱ्याकडे दोन रिव्हॉल्व्हर असू शकतात काय, त्यांनी दुसरे

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल....

रिव्हॉल्व्हर कोठून आणले ? त्या पोलिसांनी हरणाला टिपावे, पाखरांना टिपावे असे माणसांना टिपले. ही मस्ती कोठून आली ? ही मस्ती त्या पोलीस अधिका-यांची नाही, ही मस्ती त्याच्या पाठीमागच्या पाठबळाची आहे. शेतकरी रस्त्यावर येत असताना त्याच्या मनातील वेदना काय वेदना असतात त्या मला माहिती आहेत, मी हे भोगलेले आहे. म्हणून शासनाने वारंवार शेतक-यांचा असा घात करु नये. एकेकाळी राजे महाराजे रस्त्यावर सुंदर स्त्री दिसली की, तिला पळवून नेत असत. आताचे राज्यकर्ते पाणी व जमीन उचलून नेत आहेत. लोक हे फार काळ सहन करणार नाहीत.

मी अनेक ठिकाणची धरणे पाहिली आहेत आणि दहा ठिकाणचा पाण्याचा प्रश्न बघितला आहे. हे सर्व बघत असताना माझ्या मनाला वेदना होतात. हे शेतकरी केवळ 2-3 एकर जमीन धारण करणारे आहे. या जमिनीला सुध्दा पाणी मिळाले नाही तर त्यांनी कसे जगायचे ? सभापती महोदय, शासनाने त्या शेतकऱ्यांच्या मनाचा तरी विचार करावा.त्यांच्या परिस्थितीचा विचार करावा. त्यांच्या परिस्थितीचा विचार न करता आपल्या हातात असलेल्या सत्तेचा वापर करुन लोकांचा आवाज दाबणार असाल तर काळ तुम्हाला माफ करणार नाही.

या घटनेत त्या ठिकाणी एक ड्रायव्हर मरण पावला आहे, तो माजी सभापतीचा ड्रायव्हर आहे काय ? त्याची मुलगी लग्नाला आलेली आहे, आता त्या कुटुंबीयांना कोण आधार देणार आहे, शासन तिचे लग्न करण्याची जबाबदारी उचलणार आहे काय, तिच्या वडिलांचा जीव गेला आहे. शासनाला बंद पाईप लाईनने पाणी न्यावयाचे आहे, घेऊन जावे, पण त्या मुलीचे आता काय, या गोळीबारात एक शेतकरी महिला मरण पावली आहे तिच्या कुटुंबीयांचे काय होणार याचा विचार करावा. या घटनेत तीन जीव गेले आहेत त्यातील एकही मोठा शेतकरी नव्हता कोणीही पैसेवाला नव्हता, हे सर्वजण हातावर पोट असलेले लोक होते. जर शासनाला मनात त्यांच्याबद्दल थोडेसे तरी काही वाटत असेल तर त्यांना भरीव मदत करावी. आता 1 लाखाला, 2 लाखाला किंमत राहिलेली नाही. मरण पावलेले तिघेही आपल्या रोजीरोटीसाठी मेले आहेत. ते लोक पाणी घेऊन काय करणार होते ? पुण्याला फळे जातात, पुण्याला भाजीपाला जातो, शेतकऱ्यांनी जर पेरा केला नाही तर जग काय धतुरा खाईल काय ? ते लोक त्यासाठी मेले आहेत. त्या लोकांना काहीही

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करावयाचे नव्हते. त्यांना शहरातील लोकांना धान्य खाऊ घालावयाचे होते. त्यासाठी त्यांना पाणी पाहिजे. आज शेतीचा धंदा फायद्यात आहे का, नाही, आज काहीही पिकवा, कितीही पिकवा, शेतकऱ्यांच्या धोतरातून ढोपर दिसतेच दिसते. अशा प्रकारचा तोट्याचा धंदा असतानाही तो धंदा ते ईमानदारीने करु इच्छित असतील तरीही शासनाकडून त्यांच्यावर गोळया घातल्या जात आहेत.

सभापती महोदय, मी या संदर्भात केवळ 3 मागण्या करणार आहे. मी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर अतिशय भावनावश होत असतो. मी शासनाला विनंती करतो की, पोलिसांच्या गोळया लागल्यामुळे मरण पावले आहेत त्यांच्या कुटुंबीयांना 5-5 लाख रुपये द्यावेत. त्यांच्या घरातील एका व्यक्तीला सरकारी नोकरीत सामावून घेता येते का ते पहावे, कारण सध्या खोगीर भरती खूप झ ालेली आहे, काम न करता बसणारे बरेच आहे. पण त्या लोकांचे सर्वस्व गेलेले आहे. त्यांना सरकारी नोकरी द्यावी. पण ज्याच्या हाताचे हाड मोडले आहे, जखमी झालेले आहेत त्यांना प्रत्येकी 1-1 लाख रुपये देण्यात यावे. कारण चांगले खाल्याशिवाय हाड बसत नाही आणि चांगले खाण्यासाठी काहीच नसते. म्हणून शासनाने जखमींना 1-1 लाख रुपये द्यावे आणि मृतांच्या नातेवाईकांना 5-5 लाख रुपये द्यावे. शासनाने त्या पाईप लाईनचा नाद सोडला तर बरे होईल, एवढेच सांगतो आणि थांबतो.

-----

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे, सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम, भाई जगताप, सय्यद पाशा पटेल, एस.क्यू.जमा व किरण पावसकर यांनी 9 ऑगस्ट, 2011 रोजी क्रांतिदिनाच्या दिवशी जी दु:खद घटना घडली आणि त्या ठिकाणी गोळीबार होऊन 3 निष्पाप, दुर्दैवी अशा शेतक-यांचा मृत्यू झाला त्यासंबंधी आज या ठिकाणी चर्चा उपस्थित केली आहे.

सभापती महोदय, पुणे-मुंबई हाय-वेवर कामशेतजवळ बहुर नावाचे एक गाव आहे. तेथे काल गोळीबाराची घटना घडली आहे. मावळमधील लोक रस्त्यावर उतरले होते. पवना धरणातील पाणी नेण्यासाठी बंद पाईप लाईन टाकू नका अशी त्यांची मागणी होती. या घटनेत जे 3 ग्रामस्थ मृत्युमुखी पडले आहेत त्याबद्दल मी सुरुवातीलाच सभागृहात दु:ख व्यक्त करतो व त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो. घडलेली घटना अतिशय दुर्दैवी आहे. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी तसेच या सभागृहामार्फत राज्यातील जनतेने देखील त्याच्या पाठीमागे काय घडले होते ते समजून घेण्याची गरज आहे. काही सन्माननीय सदस्यांनी आवाज वाढवून, भावनात्मक बोलून त्या संदर्भात पूर्ण माहिती न घेता कोठे तरी आताच्या राज्यकर्त्यांनी तेथे चुकीचा निर्णय घेतला आहे अशा प्रकारचे वक्तव्य केले किंवा तसे दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

1999 साली भाजप-शिवसेनेच्या सरकारचा पराभव करुन लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेवर आले. आज आम्ही एकत्रपणे काम करु लागल्यावर जनतेच्या विकासाचे प्रश्न सुटले पाहिजेत, मग ते शेतक-यांचे असतील, कामगारांचे असतील, शहरी भागातील असतील, ग्रामीण भागातील असतील, आदिवासी, बिगर आदिवासी भागातील असतील, सगळया भागातील असतील, या भागांसाठी आम्ही काम करीत आहोत. सभापती महोदय, आपण ठाणे जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करीत आहात. तेथे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. त्यामुळे शाई धरण झाले पाहिजे, काळू धरण झाले पाहिजे अशा प्रकारची शासनाची भूमिका आहे. ज्या ठिकाणी शहरे वाढत आहेत तेथे प्रथम पिण्याचे पाणी द्यावे लागते. प्रथम पिण्यासाठी, दुसरे शेतीसाठी व तिसरे उद्योगासाठी पाणी देण्याचे या राज्याचे धोरण आहे. यापूर्वी दुसरे प्राथम्य उद्योगासाठी व तिसरे शेतीसाठी असे धोरण होते ते शासनाने बदलले आहे.

5....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

शेवटी आम्ही सुध्दा शेतकरी आहोत. आपण सगळेजण आपल्या घरची शेती पिकवितो. सभापती महोदय, मी पुणे भागाचे 5 वेळा प्रतिनिधीत्व करीत आलो आहे. त्या भागात अनेक धरणे आहेत. काही सन्माननीय सदस्यांच्या भागात धरणे सुध्दा नाहीत. तेथे टाटांची धरणे आहेत, राज्य सरकारने कृष्णा खोरे महामंडळाची स्थापना केल्यावर त्यांची धरणे झाली. महामंडळ अस्तित्वात येण्यापूर्वीही तेथे धरणे बांधण्यात आली आहेत. ती धरणे कशासाठी बांधण्यात आली ? आज पुणे शहर वाढत आहे, पिंपरी-चिंचवडचा भाग वाढत आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार...

आज या सभागृहामध्ये माझ्या समोरच्या बाकावर सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकात पाटील हे बसलेले आहेत. कोल्हापूरला बंद पाईप लाईन मधून पाणी आणण्याची मागणी सर्वपक्षीय लोक करीत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल हे ज्या मराठवाड्याचे प्रतिनिधीत्व करीत आहेत त्या मराठवाड्यातील उस्मानाबादला देखील बंद पाईप लाईनद्वारे पाणी आणावे असा आग्रह धरला जात आहे. लातूरला देखील बंद पाईप लाईन मधून पाणी आणण्याचा आग्रह धरला जात आहे. जिल्ह्याच्या ठिकाणी आणि मोठमोठ्या शहरांच्या ठिकाणी बंद पाईप लाईन मधून पाणी आणल्या शिवाय पाण्याचा प्रश्न ख-या अर्थाने सुटू शकणार नाही. या ठिकाणी सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करणारे सन्माननीय सदस्य आहेत. सोलापूरला उजनी धरणातून बंद पाईप लाईनने पाणी आणले तर शंभर टक्के शहराला पाणी देता येते म्हणून शेवटी नाईलाजास्तव उजनीचे पाणी भीमा नदीमध्ये सोडावे लागते. सोलापूरला 1 टीएमसी पाणी देण्यासाठी नदीमध्ये 3 टीएमसी पाणी सोडावे लागते. आज पाण्याची काय परिस्थिती आहे ? आज पुण्याचे प्रतिनिधीत्व करणारे सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार, सन्माननीय सदस्य श्री. अनिल भोसले आणि माझे अन्य सहकारी येथे आहेत. वरसगाव, पानशेत, खडकवासला, टेमघर या चार धरणातून पुण्याला पाणी दिले जाते. आज पुणे शहरातून 8 आमदार निवडून जातात. पुण्याची लोकसंख्या 40 लाख आहे. आज आम्ही राज्यकर्ते आहोत. उद्या जनतेला वाटेल ते राज्यकर्ते येतील. राज्यकर्ते कोणीही असोत. माणसाला जगण्यासाठी पाणी द्यायला पाहिजे. शेतीचे पाणी कमी करुन पहिल्यांदा माणसे जगवायला पाहिजे.

त्यावेळी माननीय श्री. शरद पवार साहेबांनी निव्वळ पुणे शहराला पाणी उपलब्ध व्हावे यासाठी टेमघर धरण बांधले. 4 टीएमसीचे हे धरण आहे. हे धरण बांधतांना अनेक अडचणी आल्या. परंतु नंतर आम्ही ते धरण पूर्ण केले. 1 टीएमसी पाणी म्हणजे 10 हजार एकराला 12 महिने पुरेल एवढे पाणी असते. 4 टीएमसी पाणी म्हणजे 40-40 हजार शेतक-यांचे पाणी आज पुणे शहराला पिण्यासाठी दिले जात आहे. तरीही खालचा हवेली तालुका, दौंड तालुका, इंदापूर तालुका यांना पाण्याची कमतरता भासते. म्हणून आपण सर्वांनी एकत्र येऊन विधेयक मंजूर करुन घेतले. राज्याच्या इतिहासामध्ये जे कधी घडले नाही ते लोकशाही आघाडीच्या सरकारने दोन्ही

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार...

सभागृहामध्ये घडवून आणण्याची कमाल केली. या जशा गोष्टी आहेत त्याप्रमपाणे पिंपरी-चिंचवडचे औद्योगिकीकरण फार मोठ्या प्रमाणावर झालेले आहे. आज पिंपरी-चिंचवड मधून तीन आमदार निवडून जातात. पूर्वी एकच आमदार निवडून जात होते. आज तेथील लोकसंख्या 20 लाखाच्या घरात गेलेली आहे. पवना धरण झाले त्यावेळी 1976च्या पूर्वीचा कायदा होता. त्यामुळे त्या धरणाच्या बाबतीत काही तरतुदी लागू होत नाहीत. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की पवना धरण 1971साली बांधण्यात आले. सभापती महोदय, धरणे बांधण्यासाठी, शहरे वसविण्यासाठी जमिनी घ्याव्या लागतात. अलीकडच्या काळात केंद्र सरकारने जमिनीच्या संदर्भात शेतक-यांना मदत करण्याच्या दृष्टीने कायदा केलेला आहे. त्या कायद्याचे सर्वांनी स्वागत केलेले आहे.

आज पवना धरणातून खरिपासह, पावसाळयातील पाण्यासह साधारणत: 11.27 टीएमसी पाण्याचा वापर 12 महिने केला जातो. 15 ऑक्टोबर पर्यन्तचा उपयुक्त पाणीसाठी हा 9.68 टीएमसी इतका असतो. पिंपरी-चिंचवड वाढत असताना पिंपरी-चिंचवडला पवना धरणाचे पाणी देण्यात आलेले आहे. इतके दिवस पवना धरणातील पाणी पवना नदीमध्ये सोडून रावेरच्या बंधा-यातून ते पाणी उचलले जाते. या सर्व तांत्रिक बाबी पाहिल्यानंतर एक गोष्ट लक्षात आली की अशा पध्दतीने पाणी सोडल्यानंतर 1 टीएमसी पाणी वाया जाते. 1 टीएमसीचे धरण करायचे म्हटले तर कमीत कमी 300 आणि जास्तीत जास्त 400 कोटी रुपये लागतात. काही सन्माननीय सदस्यांना अधिकची माहिती नसल्यामुळे त्यांनी सांगितले की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका श्रीमंत असल्यामुळे त्या महानगरपालिकेने स्वत:चे धरण करावे. सभापती महोदय, धरण करणे इतकी सोपी गोष्ट आहे काय ? कृष्णा लवादाचा निर्णय झाला. लवादाने महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश या राज्यामध्ये कुठे कुठे धरणे करावयाची, किती करावयाची, किती पाणी अडवायचे यासंबंधी निर्णय दिलेला आहे. कृष्णा-खो-याच्या भागामध्ये नवीन धरण करावयाचे म्हटले तर जोपर्यन्त लवादाची मान्यता मिळणार नाही तोपर्यन्त धरण करता येणार नाही. आता तर आपल्या राज्यात अलीकडच्या काळात शेतकरी आपली जमीन, घरेदारे, गावे द्यायला तयार होत नाहीत. त्यामुळे येथून पुढच्या काळात धरणे होणे अशक्य आहे. मी जलसंपदा खात्याचा मंत्री असताना अधिका-यांनी माझ्या लक्षात आणून दिले की, पवना धरणाचे मजबुतीकरण केले तर अमुक इतका

..3..



श्री. अजित पवार...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पाणीसाठा वाढविता येईल. त्या काळामध्ये 18-20 कोटी रुपये खर्च करुन धरणाचे मजबुतीकरणाचे काम हाती घेतले. काही जण यामध्ये राजकारण करतात.

सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गो-हे या देखील त्याठिकाणी गेल्या होत्या. त्या तेथे ब-याच बोलल्या. त्याबद्दल मला जास्त काही बोलायचे नाही. श्री. गजानन बाबर हे तेथील खासदार आहेत. दिनांक 23.7.2002चे त्यांचे पत्र आहे. पत्राचा विषय "पवना धरणातून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला लोकांना पिण्यासाठी बंद पाईप लाईनने पाणी आणणे बाबत" असा आहे. पत्रामध्ये असे नमूद केलेले आहे की, "या सर्व गोष्टींचा विचार केला तर बंद नळातून पाणी आणावेच लागेल. त्यासाठी येणा-या बजेटमध्ये तरतूद करावी आणि त्यासाठी सर्व पक्षाच्या नगरसेवकांनी एकमुखी पाठिंबा द्यावा." हे श्री. गजानन बाबर यांचे पत्र आहे. आता तुमचे नेते विरोध करा म्हणून सांगत आहेत. विरोधासाठी ते विरोध करीत आहेत. परंतु जेव्हा 2002 सालामध्ये मी बंद पाईप लाईनसाठी परवानगी देखील घेतलेली नव्हती त्यावेळचे हे लेखी पत्र आहे. कुठेही आतले आणि बाहेरचे असे दुटप्पी राजकारण मी करीत नाही....(अडथळा)... सभापती महोदय, यामध्ये काही जण राजकारण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. राज्यातील जनतेला कुठे तरी या गोष्टी कळल्या पाहिजेत. या सगळया गोष्टी करीत असताना त्यावेळी श्री. विलासराव देशमुख हे राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यांनी सांगितले की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला बंदिस्त पाईपलाईद्वारे पाणी पुरविण्यासाठी पवनमाळातील जमीन संपादन करायची नाही. काही जणांचा असा समज झालेला आहे की, आम्ही तेथील मोठ्या जमिनी ताब्यात घेत आहोत. हे साफ चुकीचे आहे. हा निर्णय आम्ही का घेतलेला आहे ? बंद जलवाहिनीद्वारे पाणी दिल्यास शेतीला पाणी कमी पडेल अशी काही सन्माननीय सदस्यांची आणि काही शेतक-यांची तक्रार आहे. वास्तविक मंजूर पाणी कोट्या पेक्षा जादा पाणी उचलले जाणार नाही. पवना नदीवर मौजे शिवणे आणि गौंजे येथे 2 केटीवेअर अधिकचे करीत आहोत. त्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका 6 कोटी देत आहे.

आज आपण बंद पाईप लाईनद्वारे पाणी का आणत आहोत ? आज पुण्याला देखील खडकवासला धरणाचे पाणी बंद पाईप लाईनमधून जात नाही. उलट राज्य सरकारने त्या काळामध्ये जाणीवपूर्वक अशा प्रकारचा निर्णय घेतला की, खूप पाणी वाया जात असल्यामुळे त्या त्या शहरांनी बंद पाईप लाईनने पाणी घेतले नाही तर पाण्याचा दर 3 रुपये असेल आणि बंद

..4..



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 15:30

श्री. अजित पवार...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पाईप लाईनने पाणी घेतले तर पाण्याचा दर 1 रुपया राहील. आज नगरला मुळा धरणातून बंद पाईप लाईन मधून पाणी येते. मुंबई शहराला बंद  पाईप लाईन मधून पाणी येते. बारवी धरणातूनही बंद पाईप लाईनमधून पाणी येते हे सन्माननीय सदस्यांना देखील माहीत आहे. मोरवे धरणातून बंद पाईप लाईनमधून पाणी येते. नागपूरला बंद पाईप लाईन मधून पाणी येते. औरंगाबादला बंद पाईप लाईन मधून जायकवाडी धरणाचे पाणी येते. काही जण लोकांमध्ये असा गैरसमज निर्माण करीत आहेत की, बंद पाईप मधून पाणी आणले तर पवना नदीचे पाणी आटेल. हे साफ चुकीचे आहे. याबाबतीत काही जणांनी मुंबई हायकोर्टामध्ये पीआयएल दाखल केली. मुंबई हायकोर्टाने त्यांची पीआयएल फेटाळली. आता जे लोक हे आंदोलन करीत आहेत त्यांनी सर्व प्रकार केलेले आहेत. सुरुवातीच्या काळामध्ये मी देखील त्यांच्या अनेक बैठका घेतल्या. काल 9 तारीख होती. पुणे जिल्हयाचे जिल्हाधिकारी श्री. विकास देशमुख यांनी सर्वपक्षाच्या प्रमुखांना 8 तारखेला मिटींगला बोलावले होते. चर्चा करुन मार्ग काढण्याचा त्यांचा प्रयत्न होता. परंतु त्या मिटींगला कोणी गेले नाही. कारण याच्या पाठिमागे एक वेगळे राजकारण आहे. मी तेथे स्वत: गेलो होतो.

...नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/पूर्वी श्री.शिगम... 15:40

श्री.अजित पवार........

सभापती महोदय, मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना वेगळ्या पध्दतीने मानतो. मघाशी माननीय सदस्य श्री.विनोद तावडे वेगवेगळ्या पध्दतीने आरोप करीत होते. त्यांची ती नेहमीची सवय आहे. खरे तर समजून घेऊन बोलले पाहिजे. परंतु तसे करीत नसल्यामुळे विरोधी पक्षनेते पद तुमच्याकडे येण्यास तयार नाही. तुमचा प्रयत्न चालला आहे, मात्र वरिष्ठांचा तुमच्यावर विश्वास बसलेला नाही म्हणून माननीय श्री.पांडुरंग फुंडकर त्या पदावर बसलेले आहेत. आम्हाला त्याचा आनंद वाटतो. माननीय विरोधी पक्षनेते हे समंजस असल्यामुळे चांगल्या पध्दतीने काम करीत आहेत.

सभापती महोदय, माझ्या असे लक्षात आणून देण्यात आले की, मी घटनास्थळी भेट देण्यास गेलो नाही याबद्दल आक्षेप घेण्यात आला. मध्यंतरी मुंबई शहरात बॉम्बस्फोट झाले, त्या घटनेनंतर मी, माननीय मुख्यमंत्री, माननीय गृहमंत्री, माननीय गृह राज्यमंत्र्यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन व रुग्णालयात जाऊन जखमीची विचारपूस केली. त्यावेळी राज्यकर्त्यांचे काय काम आहे, कशाला दिवे लावायला गेलात, आयसीयू मध्ये चिखलाचे पाय घेऊन जातात, यांच्या भेटीने काय होणार आहे असा आक्षेप घेण्यात आला होता. मी अतिशय जबाबदारीने सांगू इच्छितो, माझ्या जिल्हयातील विरोधी पक्षाच्या प्रमुख व्यक्तीने मला फोन करुन सांगितले होते की, 9 ऑगस्ट रोजी मावळ येथे भारतीय जनता पक्ष आणि इतर राजकीय पक्ष मिळून आंदोलन करणार आहेत. त्यांनी मला हेही सांगितले की, आठ दिवस अगोदर मी तुम्हाला माहिती देत आहे. मी माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांना माझा मोबाईल क्रमांक देतो, केव्हाही तपासून घ्या. त्यांनी आपल्या भाषणात उल्लेख केला होता की, एस.पी.ना कोणाकोणाचे फोन गेले. माझी पूर्ण तयारी आहे. एस.पी.चा नंबर घेऊन या आणि माननीय सभापतींकडे तपासून घ्या. मी राजकारण जरुर करीत असतो. परंतु अशा प्रकरणामध्ये राजकारण करीत नाही. राजकारण करण्याच्या ठिकाणीच मी राजकारण करीत असतो. अशा प्रकारे कोणत्याही माननीय सदस्यांनी महत्वाचा प्रश्न मांडला तर तातडीने मी बैठक घेण्याचा प्रयत्न करतो. तेथील माजी आमदार श्री.दिगंबर भेगडे यांनी मला सांगितल्यानंतर अनेकदा मी त्यांच्याबरोबर बैठक घेतली होती.

सभापती महोदय, पवना धरण हे खूप जूने धरण असल्यामुळे त्याला राज्याचे काही कायदे लागू होत नाहीत. 1976 च्या कायद्यापूर्वी हे धरण बांधले असल्यामुळे तेथील शेतकऱ्यांना काही

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार........

मदत होत नाही. कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळाच्या ताब्यात तेथील जवळपास 1000 एकरच्या आसपास जमीन आहे हे अधिकाऱ्यांनी माझ्या लक्षात आणून दिले. एवढी जमीन शासनाकडे आहे. मी त्यावेळचे महसूल, पुनर्वसन व मदत कार्य मंत्री डॉ.पतंगराव कदम यांना विनंती केली. ही संपूर्ण जमीन कृष्णा खोरे महामंडळाच्या वतीने आम्ही महसूल विभागाच्या ताब्यात देतो, ज्यांची जमीन या धरणासाठी संपादित केली गेली आहे त्या प्रकल्पग्रस्तांना शासनामार्फत एक-एक एकर जमीन द्यावी. प्रकल्पग्रस्ताना वाटण्यासाठी जमीन नाही. जमीन उपलब्ध झाल्यामुळे एक-एक एकर जमीन देण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी सर्वतोपरी मदत केली. शासनाने शेतकऱ्यांना जमीन देण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय घेतला त्यावेळी त्या भागामध्ये 25 लाख रुपये एकरी दर होता. अजूनही त्या जमिनींचे वाटप झालेले नाही. कारण आता ज्यांना राजकारण करावयाचे आहे ते म्हणतात की, एक एकर जमीन घेऊ नका, दोन एकर जमिनीची मागणी करा. प्रत्येक शेतकऱ्यांना दोन एकर जमीन देण्यासाठी पुरेशी जमीन उपलब्ध नाही. जमीन उपलब्ध असती तर शासनाने जरुर दिली असती. कारण शेवटी ते शेतकरी आपल्याच राज्यातील आहेत. जमीन द्यायला शासनाची तयारी आहे. आज त्या भागात जमिनीचा दर एकरी 1ते 1.5 कोटी रुपये आहे.

सभापती महोदय, माझी माननीय विरोधी पक्षनेत्यांना विनंती आहे की, 1995, 1999, 2004 आणि 2009 च्या निवडणुकीत त्या भागातून भारतीय जनता पक्षाचे प्रतिनिधी निवडून आलेले आहेत. त्या भागातून पंचायत समित्या, जिल्हा परिषद, तालुका पंचायती, महानगरपालिका, आमदार, खासदार निवडणुकीत जे प्रतिनिधी निवडून आलेले आहेत त्यांनाही विनंती राहील की, एक-एक एकर जमीन प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना दिली तर 1 ते 1.5 कोटी रुपये मिळतील आणि त्यांचे समाधान होईल. मला हे कळत नाही, रिलायन्स कंपनीने गॅस पाईपलाईन त्या भागातून नेली त्यासाठी यांनी विरोध केला नाही. तेथे सगळे मॅनेज केले जाते. परंतु मावळमध्ये पाण्यासाठी पाईपलाईन टाकण्यासाठी विरोध केला जातो. अजित पवारांनी विरोध केला त्यांना बोलावले जाते आणि काय आहे चला, संपवून टाका. कोणाकोणाला मॅनेज करण्यात आले हे तेथे पुढारीपणा करणाऱ्या पुढाऱ्यांना सगळे माहित आहे. निव्वळ विरोधासाठी विरोध करायचा म्हणून हे चालले आहे का?

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार........

सभापती महोदय, काही लोकांनी गुजराथमध्ये जायचे, तेथील मुख्यमंत्र्यांचे कौतुक करायचे. गुजराथमध्ये काय चालले आहे हे सांगायचे काम सुरु आहे. गुजराथचे मुख्यमंत्री श्री.नरेंद्र मोदी कशामुळे विकास करु शकतात? तेथे विरोधी बाकावर कॉँग्रेस पक्ष बसलेला आहे. विकास कामे करण्यासाठी कॉँग्रेस पक्ष मदत करतो म्हणून ते विकास करीत आहेत. या राज्यात आमच्या विरोधात जे बसले आहेत त्यांच्याकडून आम्हाला सहकार्य मिळाले तर आम्ही देखील जलद गतीने विकास करु शकतो. गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील चांगले आहेत, सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळ चांगले आहेत म्हटले जाते. दोन दिवसांपूर्वी रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीमध्ये लोकप्रतिनिधींसाठी दोन दिवसांचे चर्चासत्र आयोजित केले होते. तेथे सल्ला असा देण्यात आला की, अजित पवार यांना टार्गेट करा. दिल्लीला गेले तरी अजित पवार यांच्या नावाचा जप सुरु आहे. नेमके काय चालले आहे हेच कळत नाही. मी माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांना विनंती करतो की, त्यांनी तरी यामध्ये लक्ष घालावे. मला काही कळत नाही, यांचे काय चालले आहे? चुकत असेल तर जरुर आरोप करा. भ्रष्टाचार केला, वेडेवाकडे केले, राज्याचे नुकसान केले तर जरुर लोकशाही पध्दतीने जाब विचारण्याचा तुम्हाला अधिकार आहे. परंतु चांगल्या पध्दतीने कारभार करीत असताना, माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण हे देखील चांगले काम करीत असताना माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी गिरणी कामगारांच्या घराबद्दलचा प्रश्न उपस्थित केला. माननीय सदस्य श्री.रामदास कदम हे देखील बैठकीला उपस्थित होते. त्यांच्याच समोर सर्व भूमिका मांडली होती. माननीय विरोधी पक्षनेत्यांना आम्ही स्पष्टपणे सांगितले होते की, अमुक एवढी जमीन आहे, अमुक एवढी घरे तयार आहेत ही घरे कशी वाटप करायची हे तुम्हीच सुचवावे. काहींनी त्याच्यातून महापालिकेच्या निवडणुकीच्या दृष्टीने राजकारण करण्याचा प्रयत्न केला.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांचे दूरदर्शनच्या चॅनेल्सवर दाखविण्यात आलेले भाषण मी ऐकले. ते अमुक मंत्र्यांच्या घरामध्ये चला म्हणून गिरणी कामगारांना आव्हान करीत होते. आम्हाला देखील गिरणी कामगारांबद्दल जिव्हाळा आहे. पश्चिम महाराष्ट्रातील बरेच गिरणी कामगार आहेत.

सभापती महोदय, गॅस पाईपलाईन टाकण्याच्या वेळी मदत होते आणि आम्ही बंद.......

..4..



श्री.अजित पवार........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पाईपलाईनने पाणी देण्याचा प्रयत्न करीत असताना विरोध केला जातो. एक एकर जमीन प्रत्येक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना देण्याचा शासनातर्फे निर्णय घेतला आहे. ज्या ज्या प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीमधून पाईपलाईन जाते, जे भूमीहीन होणार आहेत त्यांना सांगितले आहे की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत त्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला सेवेमध्ये घेण्यात येईल. शिक्षण कमी झाले असेल तर महानगरपालिकेतर्फे दुकानाच्या गाळ्याचे वाटप केले जाईल, जेणेकरुन त्यांचे कुटुंब उघड्यावर पडू नये. शेवटी ते आमच्याच जिल्हयातील शेतकरी आहेत, एवढे आम्हालाही कळते. अशा प्रकारची पाईपलाईन नेत असताना एक्स्प्रेस हायवेच्या अगदी जवळील जमीन संपादित करीत आहोत. कमीत कमी जमीन लागावी ही त्या मागची राज्य सरकारची भूमिका आहे. हे सगळे करीत असताना बंद पाईपलाईनमधून स्वच्छ पाणी मिळेल आणि धरणातील पाणी ग्रॅव्हीटीने मोठया प्रमाणात येते त्यामुळे विजेची बचत होईल. 1 टीएमसी पाणी बचत होईल. 1 टीएमसी पाण्याची बचत झाली तर शेतकऱ्यांना अधिक पाणी देता येईल. शेतकऱ्यांच्या हिश्श्याचे पाणी काढून घेतलेले नाही. नदीमध्ये पाणी सोडले जाणार आहे. पवना धरणापासून रावेत बंधाऱ्यापर्यंत जी गावे आहेत त्या ठिकाणाहून ड्रेनेजचे पाणी नदीमध्ये सोडण्यात येते. कपडे धुणे, भांडी धुणे, म्हशी धुणे या माध्यमातून पाण्याचे प्रदूषण केले जाते. दुर्दैवाने शेतकऱ्यांनी त्या भागातील जमिनी पुणे मुंबईच्या लोकांना विकल्या आहेत. बहुतेकांचे तेथे फार्महाऊस उभे राहिले आहेत. माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे या त्या भागातील असल्यामुळे त्यांना याची माहिती आहे. पवना धरणापासून रावेत बंधाऱ्यापर्यंत किती परिसर बागायती राहिला आहे? लोकांना कळत नाही. जमिनीचे पैसे मिळायला लागल्यामुळे प्लॉट पाडून विकायला लागले आहेत.

सभापती महोदय, काहीजण म्हणतात नदीचे पाणी बंद होईल. शासनाने हायकोर्टात लेखी लिहून दिले आहे की, अशा पध्दतीने पाणी कमी होणार नाही. हायकोर्टाने सांगितले आहे की, प्राधिकरणाकडे जा. प्राधिकरण अस्तित्वात आलेले आहे. ज्यांचा विरोध होता त्यांची त्यांच्यापुढे सुनावणी झाली. त्यानंतर पाईपलाईनचे काम सुरु झाले. अचानकपणे काम सुरु झालेले नाही. माननीय सदस्य श्री.विनोद तावडे हे आपल्या भाषणात वेगवेगळया प्रकारची उपमा देत होते.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ......

ठीक आहे, आपल्या हातात माईक आल्यानंतर काय बोलावयाचे हा आपला अधिकार आहे. पण हे सर्व करीत असताना शेतकऱ्यांना कोठेही त्रास होऊ नये याचा विचार करण्याची देखील गरज आहे. या ठिकाणी दुसरे धरण घेता येत नाही म्हणून आहे ते पाणी काटकसरीने कसे वापरता येईल याचा विचार करणे आवश्यक आहे. केवळ विरोधासाठी बोलावयाचे म्हणून बोलणे योग्य नाही. दोन दिवसांपूर्वी आपण मला पुण्याच्या कामांच्या संदर्भात भेटला. पुण्याला भामा आसकेटचे पाणी देण्याच्या संदर्भातील काम आपण लवकरच करण्याची विनंती केली. हे भामा आसकेटचे पाणी वडगांव-शेरी व चंदननगर भागापर्यंत आपण नेतो, अशा काही गोष्टी केल्याशिवाय गत्यंतर नाही असेच या निमित्ताने मला म्हणावयाचे आहे. महोदय, तसेच मी असेही सांगू इच्छितो की, चासकमान धरणाचे पाणी येते तेथे आपली सुध्दा जमीन आहे. त्या चासकमान धरणातील काही पाणी आपण भारत फोर्जच्या एसईझेडला देण्यासंबंधीचाही विचार केला होता. कारण राज्यात काही प्रमाणात उद्योग सुध्दा उभे राहिले पाहिजे, त्यासाठी आपल्याला पाणी देणे आवश्यक असते. असे पाणी दिले नाही आणि उद्योग जर दुसऱ्या राज्यात गेले तर पुन्हा विरोधी पक्षाकडून टीका केली जाते की, पहा, गुजरात राज्यात कसा विकास सुरु आहे, आपल्या राज्यात येऊ घातलेले उद्योग सुध्दा गुजरातमध्ये चालले आणि आपले राज्य कुठे चालले, असे प्रश्न निर्माण होतात. म्हणजे सगळे आपल्या सोईनेच झाले पाहिजे असे विरोधकांना वाटते, त्यांच्या फायद्याचे वाटले तसे होईल, पण असे करुन चालत नाही. आमचे इतकेच म्हणणे आहे की, कोणत्याही बाबतीत व्यवहारीपणाचा देखील विचार केला गेला पाहिजे. येथे बोलताना असेही सांगण्यात आले की, माननीय उप मुख्यमंत्री सकाळी पाच वाजता उठून पुण्याला गेले. मी दररोज पाच वाजता उठणारा कार्यकर्ता आहे, हे सात वाजता उठणाऱ्यांना समजणार नाही. काही लोक सूर्यमुखी असतात, ते सकाळी दहा वाजल्याशिवाय उठत नाही. त्यामुळेच कुठे कुठे डान्स बार चालू आहेत हे आम्हाला रात्रभर बघून त्याची सी.डी. तयार करावी लागते. रात्री कोठे काय चालले आहे हे त्यातून समजते. म्हणून पाच वाजता मी माझे घर सोडले यात काय नवल आहे. मी उप मुख्यमंत्री असल्याने मला "झेड प्लस" प्रकारची सुरक्षा आहे, त्यामुळे प्रत्येक तासाला माझी गाडी कोणत्या ठिकाणाहून पास झ ाली ही माहिती वायरलेसवर समजते.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ........

मघाशी बोलताना येथे असाही उल्लेख करण्यात आला की, उप मुख्यमंत्री सकाळी साडे सहा वाजता उठून पुण्याला गेले. पण मी एवढेच सांगू इच्छितो की, मी पुण्याला फक्त इतक्यापुरताच जात नाही आणि माझे बरेवाईट काही झाले तरी ते पुण्यातच होणार आहे, त्याची काळजी कोणी करु नये अथवा मला शिकवू सुध्दा नये. मी सकाळी गेलो किंवा कधी गेलो याचाही विचार करु नये. मी सकाळी पुण्याला गेल्यानंतर ससून हॉस्पिटलमध्ये एक जखमी आंदोलक श्री. बाळासाहेब कृष्णा पिंगळे यांना भेटलो, त्यांची विचारपूस केली. असाच खालच्या सभागृहात देखील उल्लेख झाला. मी त्यांच्याशी बोललो, त्यांच्या भावना या घटनेच्या संदर्भात अतिशय तीव्र दिसून आल्या. बऱ्याच वेळा एखाद्या गोष्टीच्या संदर्भातील भावना तीव्र असतात. मात्र काही लोक दोन्ही बाजूंनी बोलतात. उदा. नॅनो हा टाटाचा प्रकल्प पश्चिम बंगालमध्ये टाकणे शक्य झाले नाही म्हणून गुजरातमध्ये गेला. पण रेड कारपेट टाकले म्हणून हा प्रकल्प गुजरातमध्ये गेला अशीही टीका त्यावेळेस करण्यात आली. अशा परिस्थितीत विरोधी पक्षाने उलट असे सांगायला पाहिजे की, शासनाने यासंदर्भात व्यवहारी मार्ग काढावा. मी यासंदर्भात आजच जिल्हाधिकाऱ्यांना आदेश दिले की, सध्या हे काम बंद ठेवावे. कारण या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, त्या भागातील ज्यांचा ज्यांचा विरोध असेल किंवा समर्थन असेल त्यांना व माननीय विरोधी पक्षनेत्यांनाही बोलावून आठ दिवसात बैठक घेऊन सविस्तर चर्चा करुन मार्ग काढण्यात येईल.

सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल आपण तर अशा आविर्भावात सांगत होता की, सरकारने या सर्व शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले. ठीक आहे, मला माहीत नव्हते, आपल्याला इतकी सुंदर ॲक्टिंग करता येते की एखाद्या नाट्य सम्राटालाही जमणार नाही. तरी देखील पुढच्या टर्ममध्ये काय होईल ते पाहू. आपण यापूर्वी आमच्या पक्षात होता त्यामुळे आम्हाला आपले सर्व बारकावे माहीत आहेत तसेच आपल्याला शेतकऱ्यांबद्दल किती आस्था आहे हे सुध्दा माहीत आहे. नेहमी शेतकऱ्यांचा प्रश्न आला की आपण भावनिक होऊन बोलता, त्याबद्दलही मला आदर आहे, आम्हाला त्याची चाड आहे त्यामुळे मी आपला कधीच अनादर करणार नाही. पण माझे इतकेच म्हणणे आहे की, सभागृहात हे सर्व मांडत असताना अन्य सभासद, ज्यांना पवना धरण, रावेत बंधारा, पिंपरी-चिंचवड कसे विकसित होते याची माहिती नाही त्यांनी देखील आपल्या भावना किती

......3



PFK/ पूर्वी श्री. भोगले.... 15:50

श्री. अजित पवार .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तीव्र आहेत हे दाखववायाचे हेच एक कोडे आहे. पण काही सन्माननीय सदस्य अगोदर कोणाला तरी पुढे करतात तर काही प्रथम विरोध करतात तो शेवटपर्यंत टिकवून ठेवत नाही. तसे लोक मात्र पिंपरी-चिंचवड मध्ये गेल्यानंतर सांगतात की, पाणी बंद पाईपलाईन मधूनच मिळाले पाहिजे असे आमचे मत आहे पण मावळमध्ये गेल्यानंतर मात्र असे होता कामा नये अशी दुटप्पी भूमिका बजावतात. मलाही माहीत आहे की, राज्यकर्ता म्हणून काम करीत असताना कधी कधी वाईटपणा घ्यावा लागतो, सगळ्यांना 100 टक्के समाधानी करु शकत नाही.

महोदय, शेवटी इतकेच सांगू इच्छितो की, सभागृहात कोणी तरी मुद्दा उपस्थित केला की, स्थानिक विकास कराच्या संदर्भात एलपीटी हा टॅक्स रद्द करावा. त्यावर सभागृहात थोडी चर्चा देखील झाली. त्यासंदर्भात मला माननीय मंत्री महोदय श्री. छगन भुजबळ साहेब यांनी निरोप दिला की, या विषयावर सभागृहात निवेदन करावयाचे आहे. वास्तविक या विषयाच्या अनुषंगाने काल सभागृहात निवेदन न करता बैठक घ्यावयाची होती पण काल दोन्ही सभागृहाचे विरोधी पक्षनेते पुण्याला गेल्यामुळे ही बैठक होऊ शकली नाही. ती बैठक आज चार वाजता ठरलेली आहे. मी सभागृहात आल्यानंतर येथे उत्तर दिले व सभागृहातून लिफ्टने खाली गेल्यानंतर मला पुणे जिल्ह्यातील मावळचे आमदार सन्माननीय सदस्य श्री. संजय भेगडे हे विधान भवनाच्या पायरीवर उपोषणासाठी बसलेले दिसून आले. नेहमी असे होते की, विरोधी पक्षाचे एखादे सन्माननीय सदस्य त्यांच्या मागणीसाठी उपोषणाला बसल्यानंतर त्यांच्याच पक्षाचे कोणी तरी ज्येष्ठ नेते सभागृहात ही माहिती देतात व त्यांचे उपोषण सोडविण्याची संबंधित मंत्र्यांना विनंती करतात. वास्तविक ते उपोषणाला बसले आहेत असे कोणीही मला सांगितले नव्हते. पण मला जेव्हा दिसले तेव्हा लगेच मी त्यांच्याकडे गेलो. मी सन्माननीय सदस्य श्री. संजय भेगडे यांच्याकडे गेल्यानंतर ते म्हणाले की, मावळ तालुक्यात 9 ऑगस्ट रोजी असा असा प्रकार झाला. शेतकऱ्यांनी आंदोलन सुरु केले. मी त्यांना समजावले. तसेच आताच्या आता माननीय पाटबंधारे मंत्री श्री. रामराजे नाईक निंबाळकर, माननीय श्री. सुनिल तटकरे, यांची बैठक लावतो असेही त्यांना म्हणालो. या बैठकीसाठी आपण देखील उपस्थित रहावे. तसेच जिल्हाधिकारी, पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त, कृष्णा खोऱ्याचे संबंधित अधिकारी यांना बोलावून आपण चर्चा करु व यातून मार्ग काढू. माझी माननीय विरोधी पक्षनेत्यांना विनंती आहे की, आता देखील आपण खालच्या सभागृहातील

.....4



श्री. अजित पवार .......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय सदस्य श्री. संजय भेगडे यांना विचारणा केली की उप मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले, ते आपल्याला वस्तुस्थिती सांगू शकतील. असे सांगून मी त्यांना, उपोषणासाठी लावलेला बोर्ड मागे घ्यावा अशी विनंती केली.

महोदय, या निमित्ताने मला सांगावयाचे आहे की, बंद पाईपलाईनचे काम बरेचसे उरकत आले आहे. पण खालच्या सभागृहातून कदाचित चुकीचे ब्रिफिंग झाले की काय माहीत नाही. येथे बोलताना सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, या कामाचे सन 2008 मध्ये 331 कोटीचे चुकीचे टेंडर काढले गेले व त्यात 129 कोटीचा ॲडव्हान्स देण्यात आला. असाच उल्लेख जसाच्या तसा खालच्या सभागृहात सन्माननीय सदस्य श्री. सुभाष देसाई यांनी मांडला, तोच येथे रिपीट झाला. आपल्याला माहीत आहे की, जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान मोहीम या केंद्र सरकारच्या योजनेच्या माध्यमातून आपल्या राज्यात अनेक कामे चालू आहेत. ही एक अत्यंत चांगली योजना असून त्या माध्यमातून सर्वात जास्त निधी केंद्र शासनाकडून आपल्या राज्यात आणला त्यामुळे माननीय मुख्यमंत्री या सर्व गोष्टीत यशस्वी झाले. दिल्लीत असलेल्या आपल्या राज्यातील राष्ट्रवादी व काँग्रेस पक्षाच्या नेत्यांची सुध्दा चांगलीच मदत झालेली आहे. या योजनेत केंद्र शासनाकडून 50 टक्के, 20 टक्के राज्य शासन आणि 30 टक्के रक्कम पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या माध्यमातून खर्च केली जाते. अशा प्रकारे 70 टक्के बाहेरची रक्कम आणि 30 टक्के त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थेला खर्च करुन ही योजना राबविता येते. एक गोष्ट खरी आहे की, या कामाचे टेंडर 397 कोटी म्हणजे 20 टक्के जादाने काढण्यात आले. पण मोबिलायझेशन ॲडव्हान्स देण्याची जी तरतूद आहे ती रक्कम 49 कोटी एवढी दिलेली आहे. म्हणून सन्माननीय सदस्यांनी 129 कोटी रुपये ॲडव्हान्स दिला असा उल्लेख केला तो वस्तुस्थितीला धरुन नाही. अशा प्रकारे ही कामे काढलेली आहेत. या कामाची कोणाला सीआयडी मार्फत चौकशी करावयाची असेल तर आमची कोणतीच हरकत नाही. हे टेंडर सन 2008 चे आहे, मधल्या काळात विधानसभेच्या निवडणुका झाला आणि पुन्हा काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावरच विश्वास ठेवावा, बाकीचे विश्वास ठेवण्याच्या योग्यतेचे नाही असे

जनतेला वाटल्यामुळे तिसऱ्यांदा आम्हाला निवडून दिले........अडथळा.......आपण पडला की बोगस आणि बाकीचे निवडून आले तेंव्हा चांगले.......

यानंतर श्री. जुन्नरे .....

अप्रकाशित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अजित पवार ....

तुमच्याच आखाडयातील पहिलवान भास्कर जाधव यांनी तुम्हाला चारी मुंडया चित केलेले आहे हे आपण कसे काय विसरता ? (अडथळा) आपण म्हणता त्याप्रमाणे मशीन ठेवून मतदान घेऊ. कुस्ती खेळतांना कसाही लंगोट लावण्याची आमची तयारी आहे.

सभापती महोदय, आम्ही कोणत्याही गोष्टी चुकीच्या केलेल्या नाहीत. शेतक-यांना कशाही प्रकारे नाराज करण्याची आमची भूमिका नाही. आम्हाला पुण्यामध्ये राहावयाचे आहे. पुण्याच्या नागरिकांचे प्रश्न सोडविण्याचेच काम आम्हाला सातत्याने करावयाचे आहे. पुण्यामध्ये भारतीय जनता पक्षाचे कमळ गेल्या चार वेळेपासून कसे खुलते व तेथे आपलेही घडयाळ कसे चालेल यासाठी माझा प्रयत्न राहणार असून पुढील वेळेस या ठिकाणावरून माझ्या पक्षाचा आमदार निवडून येण्यासाठी मी प्रयत्न करणारच आहे.

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात दोन्ही सभागृहाच्या विरोधी पक्ष नेत्यांबरोबर तसेच इतरांबरोबर माननीय मुख्यमंत्र्यांसमवेत चर्चा करण्याची आमची तयारी आहे. चर्चा करीत असतांना या ठिकाणच्या वेगवेगळया गावातील जनतेचे मत आहे की, आम्हाला कमी पाणी मिळणार आहे परंतु यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, त्यांना त्यांच्या हक्काचे पाणी मिळणारच आहे, त्यांच्या शेतीला पाणी मिळणारच आहे. या ठिकाणी आपण ऑलरेडी ॲडीशनल दोन बंधारे दिलेले आहेत. चांगले आणि स्वच्छ पाणी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील जनतेला पिण्यासाठी मिळणार असेल तर आपण त्याला कशासाठी विरोध करता ?

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की, या पुढे पाण्यावरुन युध्दे होतील किंवा पाण्यावर राजकारण होईल. त्यामुळे यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, आता जे पाणी आहे त्या पाण्याचा आपण काटकसरीने उपयोग करावयाचा नाही काय ? ही गोष्ट सन्माननीय सदस्यांनी लक्षात घेतली पाहिजे एवढे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, अजित पवारांचा गुप्त दौरा अशी बातमी टीव्हीवर सुध्दा आली आहे. मी कशाचा गुप्त दौरा केला आहे ? यांना न सांगता गेलो की, तो गुप्त दौरा होतो. मला टीव्ही चॅनलवाल्यांना,कॅमेरे वाल्यांना सांगून त्यांना बरोबर घेऊन जाणे आवडत नाही. परंतु काही काहींना

..2..

श्री. अजित पवार ....

सवय असते की, चलारे आम्ही चाललो आहे, तुम्हालाही एक गाडी घ्या, त्यामध्ये तुमचे कॅमेरे ठेवा. मग हे पेशंट्सना बघताहेत, विचारपूस करताहेत, कुरवाळताहेत व मग त्यांचे फोटो काढावयाचे असे यांना जे जमते ते मला अजिबात जमत नाही. मी फक्त तेथे गेलो, रुग्णांना भेटलो. आज मी रुग्णालयाला भेट दिली त्यावेळेस माझ्याबरोबर एसपी,जिल्हाधिकारी बरोबर होते त्यांना ज्या काही सूचना द्यावयाच्या होत्या त्या मी दिल्या. या विषयाच्या संदर्भात मुख्यमंत्री महोदयांशी जी काही चर्चा करावयाची होती ती केली होती. तेथे गेल्यानंतर मी सर्वांची विचारपूस केली होती.

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी सांगितले की, एक्स्प्रेस वे 8-10 तास बंद राहिला असता तर काय बिघडले असते ? जर यदाकदाचित एक्स्प्रेस वे मध्ये पेंशट किंवा गर्भवती महिला असती तर काय झाले असते ? माझे म्हणणे आहे की, आंदोलन करतांना महत्वाचा एक्स्प्रेस वे त्यांनी कशासाठी बंद करावयाचा ? आपल्याला वेगवेगळ्या पध्दतीने आंदोलने करता येतात. सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांचे चिरंजीव सुध्दा एक्स्प्रेस वे मध्ये अडकले होते. झटपट जाण्यासाठीच एक्स्प्रेस वे आहे. एक्स्प्रेस वेच्या कामास युती शासनाने सुरुवात केली त्याबद्दल आम्हाला कौतुक आहे. या एक्स्प्रेस वेचे काम आमच्या सरकारने पूर्ण केले. लोकशाहीमध्ये प्रत्येकाला आंदोलन करण्याचा पूर्ण अधिकार आहे. 9 ऑगस्ट क्रांती दिनाच्या दिवशी घटनेच्या ठिकाणी मोठया प्रमाणात बंदोबस्त ठेवण्यात आला होता. परंतु नेहमी सारखेच आंदोलन संपेल असे पोलिसांना वाटत होते. परंतु तसे झाले नाही ही वस्तुस्थिती आहे. कालच्या गोळीबाराच्या घटनेच्या संदर्भात सन्माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील विस्तृतपणे सभागृहाला माहिती देतील. परंतु मी एक गोष्ट आपल्याला सांगू इच्छितो की, कालच्या घटनेत एक महिला व दोन पुरुष असा तिघांचा दुर्दैवी मृत्यू झालेला असून त्यांच्या वारसांना पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत नोकरी देण्यात येईल. नोकरी दिली म्हणजे घरातील गेलेला माणूस परत येणार नाही याची मला कल्पना आहे. परंतु फुल ना फूलाची पाकळी म्हणून मदत करणे गरजेचे आहे या भावनेतून सरकारने हा निर्णय घेतलेला आहे. अशा प्रकारच्या घटना घडल्यानंतर जी काही आर्थिक मदत दिली जाते किंवा जखमी झाल्यानंतर जी काही मदत दिली जाते ती दिली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ....

सभापती महोदय, मला कल्पना आहे की, समन्वय साधून, बैठका घेऊन, चर्चा करुन प्रश्न मिटवायचे असतात. पिंपरी चिंचवडची जनता आपलीच आहे, मावळातील, पवना परिसरातील जनता सुध्दा आपलीच आहे. जनतेचे नुकसान व्हावे अशी कोणत्याही सरकारची इच्छा नसते. जमिनीतून जी पाईपलाईन जाणार आहे त्या जमिनीला सुध्दा आजच्या बाजार भावाप्रमाणेच भाव दिला जाणार आहे. महानगर पालिकेच्या 6.4 किमी लांबीची पाईपलाईन आहे, द्रुतगती मार्गाच्या समांतर 19.45 किमी अंतराची पाईपलाईन आहे, जिल्हा परिषदेच्या रस्त्याच्या कडेवर फक्त 9 किमीची पाईपलाईन आहे. 9 किमी च्या परिसरामध्ये ज्यांची जमीन आहे तेवढया पुरताच प्रश्न आता राहिलेला आहे. 15 गावांपैकी 14 गावांना 23.23 किमी लांबीचा ताबा घेण्यात आलेला आहे. सभागृहाच्या समोर एक गोष्ट मान्य करतो की, ऊसे गावाच्या हद्दीतील जमिनीच्या ताब्याची कार्यवाही सुरु आहे परंतु बहुतांशी शेतक-यांनी भूसंपादनाचा मोबदला स्वीकारलेला नाही. यासंदर्भात आम्ही अर्जन्सी क्लॉज टाकलेला आहे. परंतु असे असतांनाही त्यांनी मोबदला स्वीकारलेला नाही. 15 गावे मिळून 26.95 हेक्टर म्हणजे साधारणत: 27 हेक्टर जमिनीचा एकंदर आवश्यकता आहे. जमिनीमध्ये सुध्दा आम्ही काटकसर करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आता आपल्याला केवळ 15.5 हेंक्टर क्षेत्र संपादित करावे लागणार आहे. बंद पाईपालाईनमुळे वीज वापरामध्ये 16.35 द.ल.युनीटची बचत होणार आहे, जलाशयातून पाणी उचलल्यामुळे 6.60 कोटी रुपयांची बचत होणार आहे, बंद पाईपलाईन मुळे शुद्धीकरण प्रक्रियेमध्ये बचत होणार आहे तसेच बंद पाईपलाईन मुळे 1 टीएमसी पाण्याची बचत होणार आहे.

या चर्चेच्या निमित्ताने राज्याच्या जनतेने ही गोष्ट लक्षात घ्यावयास पाहिजे की, उच्च न्यायालयाने तांत्रिक अभ्यास करुन अहवाल देण्याचे निर्देश दिले होते. यामध्ये जनसुनावणी देखील झाली होती. दि. 19.10.2010 रोजी उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली व उच्च न्यायालयाने याचिका फेटाळल्यानंतर आपण या कामाला गतीने सुरुवात केली. सन 2008,2009 मध्ये या कामाला गती देण्यत आली नव्हती. न्यायालयाने याचिका फेटाळल्यामुळे आम्ही हाती घेतलेले काम योग्य आहे असा त्यातून अर्थ काढला व कामाला जोराने सुरुवात केली. जलसंपदा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ....

प्राधिकरणाकडे दि. 22.7.2011 रोजी सुनावणी झाली होती. याचिका कर्त्यांनी मूळ अर्जात दोन मुद्दे मांडले होते. त्यामध्ये त्यांनी या परिसरातील गावांना पाणी कमी पडेल तसेच नदी पात्रातील प्रवाह कमी झाल्यामुळे पाण्याची गुणवत्ता कमी होईल असे त्यांचे दोन मुद्दे होते. सदर सुनावणीच्या वेळी याचिका कर्त्यांची स्थगितीची मागणी प्राधिकरणाने फेटाळली. प्राधिकरणाने याचिका कर्त्यांना वरील दोन मुद्यांच्या संदर्भात 8 दिवसात माहिती सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत व जलसंपदा विभागाला याबाबत 1 महिन्यामध्ये तुमचे म्हणणे काय ते मागितलेले आहे.

सभापती महोदय, बैठका घेतल्या गेल्या नाहीत असे बोलले जाते परंतु तोडगा निघण्यासाठी अनेक बैठका घेण्यात आल्या असून माझ्याकडे बैठकांच्या तारखा, वेळ सुध्दा आहे. या सर्व गोष्टी मी पटलावर ठेवण्यास सुध्दा तयार आहे. दिनांक 8.8.2011 रोजी आंदोलन कर्त्यांना जिल्हाधिका-यांनी बोलावले असतांना सुध्दा ते त्यावेळी गेले नाही त्याच वेळेस आमच्या मनात पाल चुकचुकली की, 9 ऑगस्ट हा क्राती दिन. या क्रांती दिनाच्या दिवशी महात्मा गांधीनी ब्रिटिशांना भारत छोडो आंदोलन पुकारले होते. त्या दिवसाचे निमित्त साधून वेगळे राजकारण करण्याचा मतितार्थ होता की, काय ? या सर्व बाबी उद्याच्या चौकशीत स्पष्ट होतील.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी सांगितल्याप्रमाणे याच्या खोलात जावून चौकशी करण्याचे आम्ही ठरविले आहे. याच्या पाठीमागे नक्की कोण आहे, याचा कर्ता करविता कोण आहे हे राज्यातील जनतेला कळले पाहिजे. अधिवेशन सुरु असतांना नागरिकांवर गोळीबार व्हावा असे कोणत्याही राज्यकर्त्यांनो वाटत नाही. उलट अधिवेशन काळात पोलीस खाते व शासनाच्या सर्व विभागांनी नागरिकांश्ी जास्त काळजीने, खबरदारीने वागावे असे आम्ही सांगतो व तसा प्रयत्न करीत असतो. तरीसुध्दा जे घडू नये अशी अतिशय दुर्दैवी घटना घडली. मी सुरुवातीला त्या संदर्भात सांगण्याचा प्रयत्न केला. या बाबतीत मी कोणत्याही गोष्टीचे समर्थन करु शकत नाही. आम्हाला आमचा मार्ग सांगितला पाहिजे. राज्य सरकारचा मार्ग हा समन्वयाचा आहे, सामंजस्याचा आहे. रस्त्यावर उभे राहून हातामध्ये दगड धोंडे घेऊन प्रश्न सुटत नाहीत ही गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे असे माझे ठाम मत आहे. विकासाच्या दिशेने जात असतांना आम्ही समोर राजकारण आणीत नाही. मी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना सांगतो की, विकासाच्या मुद्यावर आपण राजकारण आणून निष्पाप नागरिकांचे नाहक बळी घेण्याचा प्रयत्न करु नये. या घटनेपुरते बोलावयाचे झाले तर मी सभागृहाला हमी देतो की, पवना काठच्या गावांना शेतीसाठी, पिण्यासाठी पाणी कमी पडू दिले जाणार नाही. परंतु काही लोकांना काहीतरी खोटे नाटे सांगून त्यांची दिशाभूल करुन त्यांना रस्त्यावर आणण्याचा प्रयत्न होत आहे तो प्रयत्न कुणीही करु नये. त्या ऐवजी चर्चेसाठी, बैठकीसाठी त्यांना येण्यास आपण प्रवृत्त केले तर त्यामधून सर्वांना यश मिळू शकते असे मला वाटते. त्यामधून आपण समन्वयाने मार्ग काढू शकतो, कुणावरही अन्याय करावयाचा नाही ही गोष्ट या चर्चेच्या निमित्ताने सभागृहाच्या लक्षात आणून द्यावयाची होती. या संदर्भात चर्चा करुन त्यामधून मार्ग निश्चितपणे काढू शकतो या करिता निश्चितपणे सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी, राजकीय नेत्यांनी त्यामध्ये मदत करावी असे मी आवाहन करतो.

काही राजकीय नेते या बाबतीत राजीनामा मागतात. अजित पवार यांचा राजीनामा मागतात, सुनील तटकरे यांचा राजीनामा मागतात. या संदर्भात सन्माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे यांचा काडीचा संबंध नाही. मी त्यावेळी विधानसभेच्या सन्माननीय अध्यक्षांच्या चेंबरमध्ये होतो, परंतु त्यांनी अशाप्रकारे प्रचार करण्याचा प्रयत्न केला, बातमीचा विपर्यास करण्याचा प्रयत्न केला. त्याच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ...

पाठीमागे कुणीतरी बोलविता धनी असून त्या माध्यमातून लोकांच्या मनामध्ये अशाप्रकारे गैरसमज निर्माण करण्याचे काम सुरु आहे. त्यांना मला सांगावयाचे आहे की, कृपा करुन या गोष्टी आपण थांबवाव्यात. या राज्याला खऱ्या अर्थाने प्रगतीपथावर नेण्यासाठी आपण पॉझीटीव्ह ॲप्रोच ठेवावा,समन्वयाची भूमिका घेतली तर त्यामधून निश्चितपणे एक चांगला मार्ग निघू शकतो ही गोष्ट मला आपल्या लक्षात आणून द्यावयाची आहे.

सभापती महोदय, गोळीबाराच्या संदर्भात मी उत्तर देवू शकलो असतो परंतु सन्माननीय गृहमंत्री श्री. आर.आर. पाटील हे त्या संदर्भातील उत्तर देणार आहेत. तरीसुध्दा त्या ठिकाणी घडलेली घटना अतिशय दुर्दैवी आहे.अशाप्रकारची घटना या महाराष्ट्र राज्यात यापुढे कदापि घडता कामा नये. 9 ऑगस्ट क्रांती दिनाच्या दिवशी अजिबात घडता कामा नये.इतकेच नव्हेतर वर्षभराच्या 365 दिवसामध्ये कधीही घडता कामा नये अशाप्रकारचा प्रयत्न राज्यकर्ता या नात्याने आमचा राहील असा शब्द या चर्चेच्या निमित्ताने मी सभागृहाला व जनतेला देवू इच्छितो व माझे दोन शब्द संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सत्ताधारी बाकावरुन बाके वाजविली जातात.)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे भाषण संपल्यानंतर समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्यांनी बाके वाजवून स्वागत केले हे बरोबर नाही.

(गोंधळ)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, बाके वाजवून स्वागत करण्याकरिता कालच त्यांना आदेश देण्यात आले होते.

(गोंधळ)

**उप सभापती** : माझ्याकडे सन्माननीय गृहमंत्र्यांकडून चिट्ठी पाठविण्यात आलेली आहे. ते गोळीबाराच्या घटनेसंदर्भात विधानसभेमध्ये उत्तर देत आहेत, तेथील उत्तराचे भाषण संपवून या सभागृहामध्ये येणार आहेत. सन्माननीय गृहमंत्री सभागृहात येईपर्यंत दरम्यानच्या काळात एक-दोन शासकीय विधेयके चर्चेकरिता घ्यावीत काय असे मी सभागृहाला विचारु इच्छितो.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, गोळीबारामध्ये तीन शेतकरी मृत्युमुखी पडलेले आहेत, विषय गंभीर असल्यामुळे तोपर्यंत आपण सभागृहाचे कामकाज स्थगित करावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, तोपर्यंत आपण 15 मिनिटांकरिता सभागृहाचे कामकाज स्थगित करावे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, विधानसभेमध्ये चर्चा सुरु आहे, आणि सन्माननीय गृहमंत्री उत्तर देणार आहेत. तोपर्यंत आपण कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवावीत अशी माझी विनंती आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय गृहमंत्र्यांना या सभागृहामध्ये येऊन उत्तराचे भाषण करु द्यावे. तोपर्यंत सभागृहाचे कामकाज थांबवावे अशी माझी विनंती आहे.

**उप सभापती** : सभागृहाची बैठक 4.45 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 4.17 ते 4.45 वाजेपर्यंत स्थगित झाली)

----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KT पूर्वी श्री.सरफरे . . . . 4.45

(स्थगितीनंतर)

**सभापतीस्थानी - माननीय उप सभापती**

श्री.आर.आर.पाटील (गृहमंत्री) : सभापती महोदय, सदनाचे विरोधी पक्षनेते माननीय श्री.पांडुरंग फुंडकर साहेब यांनी कालच्या घटनेबाबत जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आहे, त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.यासंदर्भात बोलण्यास सुरुवात करण्यापूर्वीच कालच्या पोलीस गोळीबारामध्ये कै. शामराव तुपे, कै.कांताबाई ठाकर आणि कै.मोरेश्वर साटम यांचा मृत्यू झाला, त्याबद्दल खेद व्यक्त करुन मी त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो. कालच्या घटनेमध्ये 9 शेतकरी हे पोलिसांच्या गोळयांनी, काही दगडांनी जखमी झालेले आहेत आणि जवळजवळ 44 पोलीस कर्मचारी ज्याच्यामध्ये 2 महिलांचा समावेश आहे हे सुध्दा दगडफेकीमध्ये जखमी झाले आहेत. तसेच कालच्या घटनेमध्ये 8 पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांना फ्रॅक्चर झालेले आहे आणि तेथे असलेल्या वाहनांचे आणि इतर यांचे मिळून जवळजवळ 1 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. राज्याच्या दृष्टीने ही निश्चितच दुर्दैवी घटना आहे आणि ती कालच घडलेली असल्यामुळे आपण सर्वांनी त्याबद्दल तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करणे हे स्वाभाविक आहे असे मी मानतो.

सभापती महोदय, पवना डॅमविषयी, पिंपर-चिंचवडच्या मागणी विषयी आणि तेथील गावांची जी मागणी आहे, ती बऱ्याच काळापासून प्रलंबित आहे. ती अलीकडच्या काळामध्ये केलेली मागणी नाही. त्यांची मुख्य मागणी होती की, सदरहू धरण 1972 साली पूर्ण झालेले असून तेथील लोकांचे पुनर्वसन करावे. पण त्यावेळी पुनर्वसन कायदा अस्तित्वात नव्हता. सदरहू कायदा 1976 मध्ये झ ाला. त्यामुळे 1976 सालानंतर ज्या-ज्या ठिकाणी धरणे बांधण्यात आली, तेथील लोकांचे पुनर्वसन केले जाते. पण सदरहू धरण 1972 सालातील असल्याने तेथील लोकांचे पुनर्वसन केले नव्हते आणि तेव्हापासून या लोकांच्या लढ्याला सुरुवात झाली होती. येथील बंद पाईप लाईनच्या संबंधातील आतापर्यंतची परिस्थिती पाहिली तर दिनांक 07-08-2008 रोजी श्री.दिगंबर भेगडे यांनी पहिला मोर्चा काढला. त्यानंतर दिनांक 05-09-2008 रोजी शिवसेनेच्या श्री.मच्छिंद्र खराडे यांनी मोर्चा काढला. आतापर्यत वेगवेगळी अगदी कालच्या आंदोलनासह बंद पाईप लाईनच्या अनुषंगाने 10 मोठी आंदोलने झालेली आहेत. हे लोक केवळ आंदोलने करुन थांबले नाहीत. त्यांनी आंदोलने केली, विधानसभेमध्ये याबाबतीत प्रश्न येतील यादृष्टीने देखील प्रयत्न केले. पण येथेही काही होत नाही असे म्हटल्या नंतर हे सर्व शेतकरी हाय कोर्टामध्ये सुध्दा गेले आणि तेथेही त्यांच्या बाजूने निर्णय लागला नाही. त्यानंतर ते जल आयोगाकडे गेले. कारण त्यांची अशी मागणी होती की, या



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . . .

धरणाचे पाणी बंद पाईप लाईनमधून न नेता नदीतून न्यावे.

सभापती महोदय, एका बाजूला त्या लोकांचे असे म्हणणे होते की, यामुळे आमच्या शेतीचे पाणी कमी होईल. त्यामुळे संबंधितांनी बंद पाईप लाईनमधून पाणी न नेता नदीमध्ये टाकून द्यावे. पिंपरी-चिंचवड येथील नागरिकांची मागणी होती की, ज्या काळामध्ये वरच्या बाजूला मोठया इंडस्ट्रीज नव्हत्या, फारशी लोकसंख्या नव्हती, तेव्हा आम्ही नदीत पाणी टाकून नेतो. पण आता वरच्या भागात मोठ्या प्रमाणात पोल्ट्रीज झालेल्या आहेत, कारखाने निघाले आहेत आणि हे सगळे सांडपाणी नदीमध्ये पाठविले जाते.त्यामुळे पिंपरी-चिंचवडच्या नागरीकांना अतिशय अशुध्द पाणी मिळत आहे अशी पिंपरी-चिंचवड या भागातील लोकांची तक्रार होती. त्यातच बाष्पीभवनामुळे पाण्याचे मोठया प्रमाणात वेस्टेज होत आहे अशी दुसरी तक्रार होती. नदीमध्ये सोडलेले पाणी पुन्हा पिंपरी-चिंचवड महापालिकेला उचलावे लागत असून त्यामध्ये साडेसहा कोटी रुपयांची वीज दरवर्षी जाते अशी तिसरी तक्रार आहे. अशा परिस्थितीत थेट पाईप लाईनव्दारे पाणी सोडले तर आमचा खर्च कमी होईल म्हणून खालच्या शहरातील लोकांची अशी मागणी आहे की, आम्हाला आता थेट पाईन लाईनव्दारे पाणी द्यावे. परंतु केंद्र शासनाने व राज्य शासनाने थेट पाईप लाईनची योजना मंजूर केलेली आहे.परंतु कामाला सुरुवात झाल्यानंर अंदोलनाचा जोर वाढला. अलीकडच्या काळामध्ये काही जणांच्या भूमिका जरी बदललेल्या असल्या तरी मी आपल्याकडे पत्रे पाठवतो. भारतीय जनता पक्षाने ज्यांना पाठिंबा दिला होता आणि तेथील विद्यमान खासदार हे श्री.गजानन बाबर साहेब आहेत. या सर्व गोष्टींचा विचार केला तर बंद नळातून पाणी आणावेच लागेल.

(सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे काही बोलतात.)

सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांना सांगू इच्छितो की, ताई मला यामध्ये राजकारण करावयाचे नाही. हा प्रश्न वेगळया अर्थाने महत्वाचा आहे. त्यासाठी येणाऱ्या बजेटमध्ये निधीची व्यवस्था करावी आणि त्यासाठी सर्व नगरसेवकांनी एकमुखी पाठिंबा द्यावा आणि सदरहू विषय असा आहे की, "पवना धरणातून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील लोकांना पिण्यासाठी बंद नळातून पाणी आणण्याबाबत".मी यासंबंधातील पत्र आपल्याकडे देतो. तसे पहावयास गेलो तर ही मागणी चुकीची आहे अशातला भाग नव्हता. उद्या ठाणे जिल्ह्यातील लोकांनी जर अशी मागणी केली की, आम्हाला मिठी नदीतील पाणी द्यावे आणि ते पाणी नदीव्दारे सोडावे.आज देशातील ट्रेन्ड पाहिला तर सगळीकडील पाणी प्रदूषित होऊ नये म्हणून बंद नळातून पाणी देण्याची भूमिका





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

स्वीकारलेली आहे. तसेच वरच्या भागातील शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून त्यांचे पुनर्वसन झाले नव्हते आणि त्यांना कोणताही कायदा लागू होत नव्हता. तरी सुध्दा प्रत्येकी एक एकर जमीन देण्याची भूमिका घेतेलेली आहे.तसेच त्यांचे पाणी कमी होणार नाही अशी हाय कोटार्मध्ये सरकारने दिलेली हमी तसेच पाणी टिकून रहावे म्हणून महानगरपालिकेने आणखी दोन के.टी.वेअर्स् बांधून देण्याची भूमिका घेतलेली आहे. या सगळया भूमिका घेतलेल्या असताना सुध्दा काल आंदोलन झाले. त्यांची आता पर्यंतची सर्व आंदोलने अतिशय शांततेच्या वातावरणात झालेली आहेत आणि ही बाब विधानसभेतील सन्माननीय सदस्यांनी देखील मान्य केलेली आहे. काही वेळा आंदोलन लांबले आणि त्यामुळे एस.टी निघून गेली तर अशा वेळी त्या आंदोलनकर्त्याला पोलिसांनी आपल्या एस.टी.तून नेऊन त्याच्या घरापर्यंत सोडलेले आहे. एवढे तेथे खेळीमेळीचे वातावरण होते. त्याठिकाणी दहा मोठया पध्दतीची आंदोलने झाली. पण कधीच काही घडले नव्हते. पण काल मात्र अधिवेशन सुरु होते आणि याठिकाणी आल्यानंतर काही सन्माननीय सदस्यांनी ठिय्या आंदोलन सुरु केले होते. त्यामुळे आपल्या प्रश्नाकडे आणखी लक्ष वेधले जावे म्हणून आंदोलनकर्त्यांनी थोडीशी आक्रमक भूमिका घेतली आणि ते हायवे वर येऊन बसले.

सभापती महोदय, आपला नॅशनल हायवे पुणे-मुंबई रस्ता जवळजवळ दोन तास बंद होता. त्यांनी सुरुवातीला अशी भूमिका घेतली की, आमच्यातील एक जण भाषण करेल. तसेच प्रतिकात्मक स्वरुपात आम्ही आंदोलन करु आणि त्याची विधानसभेमध्ये चर्चा होईल अणि मग आम्ही बाजूला होऊ. त्याप्रमाणे त्यांनी प्रतिकात्मक स्वरुपामध्ये सभा सुरु केली. त्यावेळी जवळजवळ 7 ते 8 वक्ते बोलले आणि तरीही आंदोलक तेथून उठत नव्हते.दोन-अडीच तास झाल्यानंतर तेथे दोन्ही बाजूला पाच-सहा कि.मी.अंतरावर वाहने थांबली होती.तेथील वाहतूक ठप्प झाली होती. हायवे बंद झाला होता. त्यात काही बसेस होत्या, काही टँकर्स् होते, काही खाजगी गाड्या होत्या. तसेच परवाची घटना घडल्यानंतर मी विधानसभेमध्ये देखील सांगितले की, जर आंदोलने होणार असतील तर ती सरकारच्या वतीने शांतनेने आणि संयमाने घ्यावी. अशा वेळी तातडीने फायरिंगच्या उपाययोजना करु नका. गोळ्यांना हात घालू नका अशा शासनाच्या वतीने निश्चित पणे सूचना दिल्या होत्या. तेथे एकंदर आंदोलकांची संख्या 200 ते 300 असताना, तेथील पोलिसांची संख्या पाहिली तर एक पोलीस अधीक्षक स्वत: जागेवर होते. एक अप्पर पोलीस अधीक्षक, ॲडिशनल एस.पी.,4 डी.वाय.एस.पी., 74 महिला पोलीस आणि 886 पोली जवान होते. अशा प्रकारे तेथे एवढ्या मोठया



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

संख्येने स्टाफ होता. सुरुवातीला फक्त 300 माणसे होती. त्याठिकाणी कोणालाही येऊ द्यावयाचे नाही असे म्हटले तरी सुध्दा ते पोलिसांना शक्य होते. पण आंदोलकांनी पोलिसांना सांगितले की, आम्ही प्रतिकात्मकरित्या येथे येऊन बसतो आणि तुम्हाला सहकार्य करतो. अशा प्रकारे त्यांनी अनेक ठिकाणी सहाकार्य केले.

सभापती महोदय, काल 5 पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये त्यांनी 8 ठिकाणी आंदोलने केली. त्यापैकी 7 ठिकाणी अत्यंत शांततेने आंदोलने झाली. कुठेही काही झाले नाही. पण याठिकाणी मात्र ते आक्रमक झाले.आपल्या जागेवरुन उठण्यास तयार नव्हते. त्याठिकाणी सर्व पक्षांच्या नेत्यांचीही भाषणे संपली. मग पुन्हा कोणीही उठून भाषण करण्यास सुरुवात केली. एकतर त्यांना थोडेसे अ-सहकार्य करावयाचे आहे अशी स्थिती लक्षात आल्यानंतर पोलिसांनी त्यातील काही लोकांना धरुन बाजूला करण्याचा प्रयत्न केला. मग दगडफेक सुरु झाली.

यानंतर श्री.बरवड . . . .

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ....

मग पुढे लाठीचार्ज, रबरी गोळ्या झाडणे, रिव्हाल्वरमधून गोळ्या झाडणे वगैरे गोष्टी झालेल्या आहेत. कालच्या घटनेमध्ये पोलिसांचे आणि शेतकऱ्यांचे सुध्दा मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. 8 पोलीस फ्रॅक्चर झालेले आहेत. 3 शेतकऱ्यांचा मृत्यू झालेला आहे. या घटनेने कोणाचे समाधान झाले आहे आणि कोणी समाधान मानावे अशातील भाग नाही. एका तक्रारीची आणखी नोंद झालेली आहे. त्या तक्रारीच्या बाबतीत आम्ही माहिती घेत आहोत. याच्या पाठीमागे कोण आहे हे नंतर तपासातून बाहेर येईल. पण जेव्हा पोलिसांनी लोकांना उचलून बाहेर नेण्याचा प्रयत्न केला तेव्हा तिथून एका खाजगी इंडिगो किंवा इंडिका गाडीतून मारलेली एक गोळी एका नागरिकाला लागलेली आहे. त्याने ही तक्रार केलेली आहे. हा गोळी मारणारा कोण आहे, भीतीचे वातावरण निर्माण करणारा कोण आहे, हे आम्ही निश्चितपणे बघू. गोळीचे काही पार्टीकल्स मिळालेले आहेत. ते फॉरेन्सिक लॅबमध्ये तपासून ती पोलिसांची गोळी होती की, आणखी वेगळ्या पध्दतीची बुलेट आहे हे आपल्याला निश्चितपणे समजेल. जाणीवपूर्वक या आंदोलनाला हिंसक वळण लावण्याचा कोणाचा प्रयत्न होता का ? कदाचित शेतकऱ्यांचा असा प्रयत्न असू शकणार नाही. कारण आतापर्यंतचे त्यांचे दहा आंदोलनातील रेकॉर्ड बघितले तर ते कधीही हायवेवर आले नाहीत. मग त्या ठिकाणी कोण आले हे सगळे तपासाचे प्रश्न आहेत. याच्या पाठीशी जे कोणी असतील त्यांना निश्चितपणे उघड करण्याचे काम करु.

सभापती महोदय, मी माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा केलेली आहे. या शेतकऱ्यांच्या ज्या काही मागण्या आहेत त्यातील एक मागणी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या बाबतीतील आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी आज सकाळी निर्णय दिलेला आहे की, आणखी वरिष्ठ स्तरावर बैठक होईपर्यंत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने जे काम सुरु केले आहे ते स्थगित ठेवावे. त्या बाबतीतील सूचना त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आयुक्तांना सूचना दिलेल्या आहेत. कामाच्या बाबतीत सरकारने ही भूमिका घेतलेली आहे. जे मृत्युमुखी पडलेले आहेत ते गरीब शेतकरी कुटुंबातील माणसे आहेत. मी स्वत: माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती केलेली आहे आणि माननीय

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. आर. आर. पाटील ...

मुख्यमंत्री त्या संदर्भातील भूमिका घोषित करणार आहेत आणि त्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिली जाईल. आता प्रश्न असा आह की, ही सगळी घटना घडली परंतु अशी घटना पुन्हा घडू नयेत, अशा घटना टाळाव्यात यासाठी आपल्याला आणखी काय उपाययोजना कराव्या लागतील आणि कालची जी घटना घडली त्यामध्ये नेमका कोणाचा दोष आहे, त्यांना कोणी प्रोत्साहित केले किंवा पोलिसांनी अतिरिक्त बळाचा वापर केला का याचा तपास करण्यासाठी मी विधानसभेमध्ये सुध्दा घोषित केले की, हायकोर्टाच्या निवृत्त न्यायाधीशामार्फत चौकशी करण्यात येईल आणि तीन महिन्याच्या आत अहवाल आणून जर पोलिसांनी गरजेपेक्षा अधिक बळाचा वापर केला असेल तर त्यांच्यावर आम्ही जरुर कारवाई करु. पोलिसांकडील त्या सगळ्या व्हिडिओ कॅसेट्स बघितल्यावर काही गोष्टी मनाला खटकणाऱ्या सुध्दा आहेत. त्यात जखमी झालेले पोलीस दिसत आहेत, नागरिकही दिसत आहेत. आपले पोलीस लोकांच्या संरक्षणासाठी आहेत. पण एका ठिकाणी पोलीसच आंदोलकाच्या दोन गाड्यांवर काठ्या मारत आहेत असे दिसले. हे सुध्दा चुकीचे आहे. मी त्या चुकीचे समर्थन करणार नाही. जे कोणी काठ्या मारणारे पोलीस आहेत त्यांना लोकेट करा, त्यांना ओळखा आणि त्यांना तातडीने सस्पेंड करण्याच्या सूचना मी पोलीस अधीक्षकांना दिलेल्या आहेत.

सभापती महोदय, मी लोकांचा उद्रेक समजू शकतो पण पोलिसांनी शांत डोक्यानेच आपल्या कारवाया केल्या पाहिजेत. आंदोलक गाड्या फोडत आहेत म्हणून पोलिसांनी त्यांच्या गाड्या फोडावयाच्या अशी भूमिका घेताच येणार नाही. यातील जी काही वस्तुनिष्ठ परिस्थिती आहे ती लोकांसमोर आणली जाईल. खोलात जाऊन या घटनेची चौकशी सुध्दा केली जाईल. पुन्हा असे प्रकार होऊ नयेत म्हणून पोलिसांच्या बाजूने प्रयत्न केले जातील. तशा सूचना पोलिसांना दिल्या जातील. पण त्या पध्दतीचे सहकार्य समोरच्या बाजूकडून आणि माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांच्याकडून तसेच समाजाच्या वेगवेगळ्या संघटनांकडून सुध्दा मिळण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी अनेक आंदोलने केली. मी सुध्दा सत्ताधारी पक्षात असताना आणि विरोधी पक्षात असताना अनेक आंदोलने केलेली आहेत. पण आपण मार्चाच्या बाबतीत नोटीस देतो, ठिकाण कळवतो. काही वेळा पोलीस परवानगी देत नाही

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ....

त्यावेळी आपण त्यांना जाऊन भेटतो. आता कोणीही ऊठून कोठेही आंदोलन करावयास लागले तर ते होऊ देणे योग्य आहे का ? अनेक संघटना आहेत, अनेक पक्ष आहेत आणि मोर्चे काढणाऱ्यांना त्यांचा प्रश्न योग्यच वाटतो. तो योग्यच असतो असे नाही. मोर्चा काढणाऱ्यांनी जर हायवेवर बसण्याचे ठरविले तर ही गोष्ट राज्य म्हणून तरी आपल्याला परवडणारी आहे का ? उद्या जर कोणी उठले आणि म्हणाले की मी एअरपोर्टवर आंदोलन करणार आहे तर आपण वाहतूक बंद करु शकतो का ?

सभापती महोदय, आंदोलनाला सुध्दा एक पध्दत असते. आंदोलने शांततेच्या पध्दतीने असली पाहिजेत. आपल्या आंदोलनामुळे नागरिकांना त्रास होणार नाही याची दक्षता आंदोलनकर्त्यांनी सुध्दा घेतली पाहिजे. त्यांचे भांडण सरकारबरोबर असू शकते. कारखान्याच्या कामगारांचे भांडण त्यांच्या मालकांबरोबर असू शकते. सर्वसामान्य माणसाला वेठीला धरताना त्यांचा काय दोष असतो ? काल त्या ठिकाणी एका बाजूला 6 किलोमीटर आणि दुसऱ्या बाजूला 6 किलोमीटर अंतरापर्यंत ट्राफीक थांबलेले होते आणि सहा तास हायवे बंद होता. त्यामध्ये ॲम्ब्युलंस होत्या, काही टँकर होते. पोलिसांच्या गाड्यांवर लोकांचा राग मी समजू शकतो. पण त्या ठिकाणी बसेस जाळलेल्या आहेत. त्या ठिकाणी टँकर होते. जर भडका उडाला असता आणि निरपराध माणसे मेली असती तर काय परिस्थिती झाली असती हाही प्रश्न आहे. म्हणून जसे पोलिसांनी संयमाने घेण्याची आवश्यकता आहे तसे आंदोलकांनी सुध्दा आपल्या मागण्या जरुर लावून धरल्या पाहिजेत, लोकशाहीमध्ये आंदोलन करण्याचा अधिकारच आहे पण महाराष्ट्रातील जनजीवन विस्कळित होईल अशा पध्दतीच्या आततायीपणाच्या भूमिका त्यांनी सुध्दा घेता उपयोगाच्या नाहीत. काल त्यांनी थोड्या मर्यादा ओलांडलेल्या दिसल्या. यापूर्वी त्यांनी अतिशय शांततेने आंदोलने केली होती पण काल आंदोलन हिंसक बनले आणि पोलिसांनाही गोळीबार करावा लागला. या दोन्ही घटना घडल्या नसत्या तर गृह मंत्री म्हणून मला आनंदच झाला असता. भविष्यात असे प्रसंग टाळावेत म्हणून आणखी काय करता आले असते याचाही विचार आम्ही करीत आहोत.

अनेक वेळा एखादी संघटना मोर्चा काढते, बऱ्याचदा माहिती सुध्दा मिळते आणि अधिवेशन

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील ....

चालू आहे त्यामुळे यावेळचे आंदोलन नेहमीपेक्षा वेगळे असेल हे पोलिसांना कळल्यामुळेच स्वत: एस.पी. पासून एवढ्या मोठ्या संख्येने पोलीस फोर्स ठेवण्यात आला. त्या रस्त्यावर ठेवलेला पोलीस फोर्स जर आपण बघितला तर महाराष्ट्रातील एका जिल्ह्यामध्ये एकूण जे पोलीस आहेत तितक्या मोठ्या संख्येने आम्ही त्या ठिकाणी पोलीस ठेवले होते. म्हणजे एखाद्या जिल्ह्यातील संपूर्ण पोलीस दल हायवे बंद होऊ नये म्हणून ठेवले होते. असे असताना सुध्दा कालचा प्रसंग घडलेला आहे. असे प्रसंग टाळण्याचा आमचा प्रयत्न राहील. पण आंदोलनकर्त्यांनी सुध्दा शासनाला थोडे सहकार्य करण्याची भूमिका स्वीकारावी. पुन्हा असे प्रकार होऊ नयेत म्हणून काय उपायोजना केल्या जातील यासह या पोलिसांनी बळाचा अतिरिक्त वापर केला आहे का, या आंदोलकांना कोणी हिंसक मार्गदर्शन केले आहे का, केले असेल तर कोणी केले, या सगळ्याची चौकशी हायकोर्टाच्या निवृत्त न्यायमूर्तीमार्फत करण्यात येईल आणि भविष्यामध्ये असे प्रसंग येणार नाहीत यादृष्टीने ज्या खबरदाऱ्या घेणे आवश्यक आहेत, प्रिव्हेंटिव ॲक्शन्स वाढविणे किंवा अशा आंदोलनाचे जर काही स्वरुप कळले तर अगोदरच त्यांना ताब्यात घेऊन तिथपर्यंत पोहचू न देणे अशा उपाययोजना जरुर आम्ही पोलिसांमार्फत करु. कालचा प्रसंग हा राज्याच्या दृष्टीने निश्चितपणे दुर्दैवी आहे. शासनाला सुध्दा याचा खेद वाटतो.

---

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेते ) : सभापती महोदय, मी माननीय गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील यांना यासाठी धन्यवाद देईन की, त्यांनी आज आपले भाषण फार आटोपते घेतले. आपण कोठेही मुद्याच्या बाहेर गेला नाहीत. खरे म्हणजे या अधिवेशनाचे हे दुर्दैव आहे की, या अधिवेशनामध्ये तीन वेळा गोळीबारावर चर्चा करावी लागली. माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी वस्तुस्थिती सांगितली. हा प्रस्ताव फार सीमित होता. गोळीबार कोणत्या परिस्थितीत करावा लागला आणि लोकांचा विरोध असताना पोलीस बळाचा वापर करुन ती जलवाहिनी होता कामा नये हेच दोन मुद्दे या प्रस्तावाच्या भोवती फिरत होते. माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार हे जर त्याच मुद्याला धरुन बोलले असते तर अधिक बरे झाले असते. त्यांनी महाराष्ट्रात कोणकोणत्या शहराला जलवाहिनीतून पाणीपुरवठा केला जातो यांची त्यांनी माहिती दिली. हा जो पवना धरणाचा आणि मावळ तालुक्याचा प्रश्न आहे त्यामध्ये त्यांनी आता जरुर स्थगिती दिलेली आहे पण आमची अपेक्षा एवढीच होती की, त्या लोकांना विश्वासात घेऊन मार्ग काढावा. पिंपरी-चिंचवडला पाणी देण्यासाठी कोणाचाही विरोध नाही. पिंपरी-चिंचवडलाही पाणी मिळाले पाहिजे. फक्त तेथील शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन यातून मार्ग काढावा अशी आम्ही मागणी केली होती. हे जर घडले तर खरे म्हणजे त्या ठिकाणी आंदोलनाचा प्रश्नच शिल्लक राहणार नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

सन्माननीय गृह मंत्र्यांनी आणि सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी जमिनीच्या संदर्भात असे सांगितले की, प्रकल्पग्रस्तांना शासन जमीन देण्यास तयार आहे. परंतु 1976 सालापूर्वीचे ते धरण असल्यामुळे हा कायदा त्यांना लागू होत नाही. मुद्दा एवढाच होतो की, जल वाहिनीतून पाणी नेत असताना तेथील लोकांना विश्वासात घेऊन तुमच्या 15 हेक्टरला धक्का लागणार नाही, 65 गावच्या पाणी पुरवठा योजनेसाठी पाणी कमी पडणार नाही असे त्यांना आश्वस्त करणे आवश्यक होते. मग जल वाहिनीचे काम सुरु करावयास पाहिजे होते. त्या लोकांना धमकी देण्यात आली होती की, पोलीस बळाचा वापर करुन जल वाहिनीचे काम करण्यात येईल. हे बोलण्याची आवश्यकता नव्हती. आम्ही या घटनेची न्यायालयीन चौकशीची मागणी केली होती. माननीय गृह मंत्र्यांनी निवृत्त न्यायाधीशांमार्फत या घटनेची चौकशी करण्याचे मान्य केलेले आहे. त्या चौकशीतून जे सत्य आहे ते बाहेर आले पाहिजे. त्यांनी असेही सांगितले की, त्या ठिकाणी आतापर्यंत 15 वेळा शेतक-यांनी आंदोलने केलेली आहेत. आजपर्यंत तेथे शेतकऱ्यांनी असे आंदोलन केले नव्हते किंवा पोलिसांना बळाचा वापर करावा लागला नाही, अशा प्रकारचे सर्टिफिकेट दिले आहे. परंतु यावेळी ते घडले. माननीय गृहमंत्र्यांनी शंका व्यक्त केली आहे ती माझ्या मनातही आली होती. काल या घटनेनंतर मी रात्री सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्याजवळ त्या ठिकाणी बॅड एलिमेण्ट तर घुसलेले नाही ना अशा प्रकारची शंका व्यक्त केली होती. आता पर्यंत त्या शेतकऱ्यांनी कोणतेही उग्र आंदोलन केलेले नाही.

या घटनेत एक वाईट गोष्ट घडलेली आहे. पोलिसांनी नागरिकांच्या गाड्या फोडल्या आहेत. त्याबाबत जे क्लिपिंग दिसते ते गंभीर आहे. यातून संपूर्ण महाराष्ट्रात वाईट संदेश जाणार आहे. महाराष्ट्रातील पोलिसांची अशी मानसिकता झाली तर जनता व पोलीस यांच्यात संघर्ष सुरु होईल. जनता व पोलिसात संघर्ष सुरु झाला तर तो कोणालाही परवडणार नाही. म्हणून पोलिसांकडून या पुढे असे कृत्य घडू नये अशी आमची अपेक्षा आहे. पोलिसांकडूनच लोकांच्या मालमत्तेची नासधूस झाली तर मग संघर्ष होईल. ज्यांनी असे कृत्य केले आहे त्या पोलिसांना निलंबित करण्यात येईल असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, या सभागृहात चांगली चर्चा झाली आहे. या घटनेत 3 जण मरण पावले आहेत. त्यांच्या प्रेताची आग अजून विझलेली नसेल. अशा वेळी माननीय उप मुख्यमंत्र्यांचे भाषण संपल्यानंतर सभागृहात बाके वाजविण्यात आली आहेत, ही थोडीशी क्लेशदायक घटना घडलेली आहे. आम्ही त्यांचे शांतपणे भाषण ऐकलेले आहे. ज्या गांभीर्याने सभागृहात चर्चा झालेली आहे. या चर्चेतून चांगला संदेश बाहेर जाणार नाही, एवढेच मला सांगावयाचे आहे.

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मला एकच प्रश्न विचारावयाचा आहे. आमचा नेहमीच असा अनुभव आहे की, पुणे एक्सप्रेस-वे असो की पुणे शहर असो, एखाद्या ठिकाणी अर्धा, पाऊणतास रस्ता रोको आंदोलन केले तर आंदोलनकर्त्यांना अटक केली जाते. या प्रकरणात पोलीस अधीक्षकांनी अटक करण्यास विलंब का लावला, त्यांना अटक का केली नाही किंवा आंदोलनाच्या आदल्या रात्रीच प्रतिबंधात्मक कारवाई का करण्यात आली नाही ? जेणे करुन हे प्रकरण चिघळले नसते. हा मुद्दा न्यायालयीन चौकशीत समोर आला पाहिजे. आमदार श्री.गजानन बाबर यांच्या पत्राचा उल्लेख करण्यात आला आहे. पण 2008 नंतर या पाईप लाईनचा निर्णय झाल्यावर त्याचे स्वरुप लोकांसमोर आल्यानंतर लोकांचा त्याला विरोध सुरु झाला आहे. एका गाडीतून गोळीबार झाला असल्याचे दिसून आले आहे असे माननीय गृह मंत्र्यांनी उत्तरात सांगितले आहे. अशा घटनांमुळे चिथावणी मिळाली असेल तर त्याचे धागेदोरे चौकशीत स्पष्ट व्हावेत. प्रत्येक वेळी आंदोलन झाल्यावर, शेतकऱ्यांचे रक्त सांडल्यावर माननीय गृह मंत्र्यांकडून न्यायालयीन चौकशी करण्याचा निर्णय घेतला जातो, पण अशा प्रश्नांबाबत तंटामुक्ती करण्यासाठी माननीय गृहमंत्र्यांनी लक्ष घातले पाहिजे असे मला वाटते.

**सभापती** : ही अल्पकालीन चर्चा आता संपलेली आहे.

----

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या घटनेमध्ये 3 शेतकऱ्यांचा मृत्यू झालेला आहे. या मृतांना श्रध्दांजली वाहण्यासाठी सभागृहाची बैठक 5 मिनिटांकरिता स्थगित करण्यात यावी.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, सदनामध्ये दुखवटा व्यक्त करण्यासाठी कामकाज सल्लागार समितीच्या

3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**.....

बैठकीत विचारविनिमय केला जातो. तेथे विचारविनिमय करण्यात आल्यानंतरच सभागृहात दुखवट्याचा प्रस्ताव मांडला जातो. या घटनेसंबंधी अशा प्रकारचा कोणताही विचारविनिमय झ ाालेला नसल्यामुळे दुखवट्याचा प्रस्ताव मी मांडणे योग्य होणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**पृ.शी./मु.शी.**: माजी राज्यपाल डॉ.पी.सी.अलेक्झांडर यांच्या निधनाबद्दल दुखवटा जाहीर करणे

**सभापती** : मला माननीय मुख्यमंत्री महोदय यांच्याकडून आज दिनांक 10 ऑगस्ट, 2011 रोजी असे कळविण्यात आले आहे की, महाराष्ट्राचे माजी राज्यपाल डॉ.पी.सी.अलेक्झांडर यांचे आज दिनांक 10 ऑगस्ट, 2011 रोजी चेन्नई येथील मिशन हॉस्पिटल येथे सकाळी 8.30 वाजता दुःखद निधन झाले. त्यांचा अंत्यसंस्कार मावेलिकारा या त्यांच्या केरळ राज्यातील मूळ गावी दिनांक दिनांक 12 ऑगस्ट, 2011 रोजी दुपारी 12.30 वाजता होणार आहे.

डॉ.अलेक्झांडर यांच्या निधनाबद्दल राज्य सरकारने आजपासून दिनांक 12 ऑगस्ट, 2011 रोजी पर्यंत तीन दिवसांचा दुखवटा जाहीर केला असून सदर कालावधीमध्ये राज्यात सर्व शासकीय इमारतींवर जिथे राष्ट्रध्वज नियमितपणे फडकविला जातो, अशा इमारतींवर राष्ट्रध्वज अर्ध्यावर फडकविला जाईल. राज्य शासनाने घेतलेल्या या निर्णयाची माहिती माननीय मुख्यमंत्री महोदयांनी विनंती केल्याप्रमाणे मी सभागृहास अवगत करीत आहे.

------

5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. X OF 2011

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966)

श्री.भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि. प. वि. क्रमांक 10, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, आपल्या राज्याच्या प्रगतीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे विधेयक आहे. आपल्या राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील लोकसंख्या आता जवळजवळ 50-50 टक्के इतकी झालेली आहे. अधिकृतपणे शहराची लोकसंख्या 47-48 टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. शहरामध्ये व शहराच्या आजूबाजूच्या परिसरामध्ये मोठया प्रमाणावर नागरीकरण होत असताना कशाही पध्दतीने शहरे वाढत चालली आहेत. त्यासाठी कोणतेही नियोजन केले जात नाही. पुढील 25 वर्षाची दृष्टी नाही. शहराच्या कडेला असलेल्या जागेवर बांधकामे केली जातात. त्यामुळे सर्व नागरी सुविधांवर प्रचंड ताण येतो. ज्यावेळी एखादा डी.पी.तयार केला जातो त्यावेळी त्यात विविध प्रकारची आरक्षणे ठेवली जातात. मग खेळाचे मैदान, सामाजिक ॲक्टिव्हिटी, रेसिडेन्शिअल, ग्रीन झोन असेल, यासाठी ही आरक्षणे ठेवली जातात. परंतु त्या जागेवर 15-15 वर्षे विकासाची कामे होत नाहीत. पुढील 20 वर्षानंतर डी.पी.तयार केला जातो त्यावेळी ते आरक्षण दुसऱ्या ठिकाणी दाखविले जाते किंवा त्याच ठिकाणी ठेवण्यात येते. काही वेळा आरक्षित केलेली जागा डेव्हलप करण्यासाठी नगरपालिकांची आर्थिक परिस्थिती मजबूत नसते. परिणामी आरक्षण तसेच ठेवले जाते. त्यामुळे तेथील नगरपरिषदेचे असे म्हणणे असते की, डी.पी.मध्ये आरक्षित ठेवलेली जागा आमच्या ताब्यात नाही. आम्ही ती जागा अधिग्रहित केलेली नाही. तसेच ज्याची ती जागा असते तो ती विकूही शकत नाही. त्यामुळे त्या जागेवर काहीही ॲक्टिव्हिटी होत नाही. कारण त्यावर आरक्षण असते. त्यामुळे त्या माणसाला सुध्दा त्याचा काही लाभ होत नाही. असे वर्षानुवर्षे चालू राहते. आपल्या राज्यात टाऊन प्लॅनिंगची स्कीम साधारणपणे 1976 साली सुरु झाली आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते याला दुजोरा देत आहेत.

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 17:15

श्री. भास्कर जाधव....

ही स्कीम झाल्यापासून अद्यापपर्यन्त राज्यामध्ये ज्या एकूण टीपी स्कीम ठेवलेल्या आहेत त्यापैकी 34 टीपीस्कीम विकसित झाल्या. उर्वरित विकसित झाल्या नाहीत. 127 नियमाखाली ठेवलेले आरक्षण डेव्हलप करु शकलो नाही म्हणून आमची जागा आमच्या ताब्यात द्या अशा प्रकारची मागणी होते आणि त्यानुषंगाने कायद्यामध्ये देखील तरतूद होती. परंतु त्या तरतुदीचा मोठ्या प्रमाणावर गैरफायदा घेण्यात आला. 127 ची नोटीस देऊन नगरपालिकांनी त्यांना जसजसे शक्य होईल त्या प्रमाणे काही लोकांना जमिनी दिल्या.

संपूर्ण राज्याचा विचार करता एक नवीन धोरण आणण्याच्या दृष्टीने हे विधेयक आणलेले आहे. जेथे कायदेशीर टीपी स्कीम केली असेल किंवा डेव्हलपमेण्ट प्लॅन असेल तर त्यामध्ये ठेवलेल्या आरक्षणाची जी जागा असेल त्या जागेचा व्यवस्थित लेआऊट करुन तेथे रस्ते, पाणी आणि अन्य मूलभूत सुविधा देऊन, जशी सिडकोने जागा डेव्हलप केली त्याप्रमाणे, 50 टक्के जमीन मूळ मालकाला परत द्यायची अशी तरतूद आहे. परंतु नगरपालिका किंवा महानगरपालिकेकडे पैसे नसल्यामुळे वर्षानुवर्षे त्या जमिनीचा फायदा मालकाला होत नव्हता. तसेच त्या जमिनीवर रिझर्व्हेशन असल्यामुळे अनधिकृत बांधकामे होत होती. कोणीही कशाही पध्दतीने त्या जमिनींचा वापर करीत होता. म्हणून एखादी वेडीवाकडी जमीन असेल तर आजूबाजूची काही जमीन घेऊन ती जमीन चांगल्या प्रकारे विकसित करुन त्यातील 50 टक्के जागा मूळ मालकाला परत द्यायची आणि 50 टक्के जागेपैकी 10 टक्के जागा ज्यांना घरे नाहीत अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लोकांना, विस्थापितांना घरे बांधण्यासाठी ठेवायची आणि उर्वरित 40 टक्के जागा खेळाची मैदाने, बगीचे, खुली जागा, शाळा, दवाखाने किंवा सार्वजनिक वापरासाठी, सामाजिक सोईसुविधा निर्माण करण्यासाठी ठेवायची आहे. ही जागा त्या त्या कारणासाठी आरक्षित ठेवण्याचे काम तेथील स्थानिक संस्थांनी करावयाचे आहे. त्या ठिकाणी रस्ते, पाणी, लाईट इत्यादी सुविधा निर्माण करुन दिल्यानंतर जमिनीचा जो मूळ मालक असेल त्याच्याकडून कोणत्याही प्रकारचा पैसा घेतला जाणार नाही. उलट महानगरपालिकेने जी 50 टक्के जागा घेतलेली असेल त्या जागेचे रेडिरेकनर नुसार पैसे दिले जातील. त्याचे पैसे देणे बाकी असेल तर त्याचे समायोजन करण्याची तरतूद कायद्यामध्ये केलेली आहे. पूर्वी कायद्यामध्ये अशी तरतूद होती की ते क्षेत्र विकसित झाले

..2..

श्री. भास्कर जाधव...

असेल तरच टीपी स्कीम करता येत होती. आता त्याची आवश्यकता नाही अशा प्रकारची तरतूद विधेयकामध्ये केलेली आहे. या विधेयकाला सर्वांनी पाठिंबा द्यावा अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 17:15

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2011 चे वि.प.वि. क्रमांक 10 - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयकावर मी माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, कोणतेही येणारे विधेयक हे चांगलेच असते. परंतु अंमलबजावणी करताना त्या विधेयकातील तरतुदींचे अधिकारी वाटोळे करतात त्यावेळी हे विधेयक कशा पध्दतीचे होते हे कळते. हे विधेयक कोणत्या खात्याचे आहे असा प्रश्न मला सुरुवातीला पडलेला आहे. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना हा 1966चा कायदा आहे. शहराचे नियोजन व्यवस्थित असावे, लोकसंख्येनुसार त्या त्या भागात आरक्षण असावे, लोकांसाठी मूलभूत सुविधा असाव्यात, रस्ते, वीज, पाणी, शाळा, रुग्णालये, मलनिस्सारण प्रकल्प या सगळया गोष्टी नियोजनामध्ये येतात. हे विधेयक जिल्ह्याच्या नियोजनासबंधीचे आहे की शहराच्या नियोजनासंबंधीचे आहे असा प्रश्न मला पडला. कारण ग्रामीण आणि शहरी या दोन्ही भागासाठी हे विधेयक आहे. या ठिकाणी ग्राम विकास विभागाचे मंत्री महोदय उपस्थित आहेत. ते मुंबई शहराचे पालकमंत्री आहेत. नगरविकास राज्यमंत्र्यांनी भाषण केल्यानंतर या विधेयकाचा ग्रामीण भागाशी संबंध असल्यामुळे ग्रामविकास मंत्री बोलण्यासाठी उभे रहातील असे मला वाटले होते. परंतु त्यांच्याकडून काहीच प्रतिक्रिया आली नाही.

सभापती महोदय, शहरे वाढत आहेत, ग्रामीण भागातील शहरे देखील वाढत आहेत. नाला-सोपा-याचा विषय मोठा गंभीर झालेला आहे. शहरामध्ये 27-28 गावांचा समावेश झाला आहे. त्याबाबतीत असे करता येणार नाही असा उच्च न्यायालयाने निर्णय दिला. यामध्ये आपल्या विधी व न्याय विभागाचा संबंध येतो. आपले विधी व न्याय खाते किती कमकुवत आहे हे मी सांगण्याची गरज नाही. आतापर्यंन्त नगर रचनेमध्ये जी आरक्षणे निर्माण झाली त्याचा उपयोग झाला नाही असे मंत्री महोदयांनी सांगितले. मग मुंबईचा बट्याबोळ का झाला ? जी आरक्षणे झाली त्याचे पैसे देण्यासाठी महानगरपालिकेकडे पैसा नाही. महानगरपालिकेने केलेल्या आरक्षणामुळे मालकाला जमीन वापरता येत नाही. जसे ग्रामीण भागामध्ये प्रकल्पासाठी जमीन घेतली आणि शेतक-याच्या 7/12वर शिक्का मारला की प्रकल्प होत नाही आणि ती जमीन शेतक-यालाही वापरताही येत नाही. ग्रामीण भागातील जमिनीला तांब्याचा भाव असेल तर शहरातील जमिनीला सोन्याचा भाव

..4..



श्री. दिवाकर रावते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. परिणाम असा होतो की, जमीन मोकळी रहाते, मालक म्हणतो की, महानगरपालिकेने जमीन घेतलेली आहे, माझे काय करता बोला ? त्या जमिनीवर आरक्षण असल्यामुळे ती जमीन महानगरपालिकेच्या ताब्यात असते, परंतु त्या जमिनीचा मुहावजा दिलेला नसतो. त्यामुळे अशा बेवारस जमिनीवर बेकायदा बांधकामे होतात.

...नंतर श्री. भोगले....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/पूर्वी श्री.शिगम 17:25

श्री.दिवाकर रावते.........

शासनाकडे इच्छाशक्ती नसल्यामुळे आणि संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांनी योग्य ते लक्ष न दिल्यामुळे मुंबई शहराचा बट्ट्याबोळ झाला आहे. मुंबईमध्ये अत्यंत चांगल्या पध्दतीने टाऊन प्लॅन योजना झालेल्या आहेत. मी त्या योजनांचा अभ्यास केला आहे. उत्कृष्ट मैदानांपासून सगळ्या सोयी व्यवस्थितपणे उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. मुंबईमध्ये विजेचे सबस्टेशन बांधायचे असेल तरी त्यासाठी आरक्षण असावे लागते, त्याची गरज आहेच. परंतु अशा आरक्षित भूखंडांवर झोपड्या उभ्या राहिल्या आहेत. रस्त्यासाठी जमीन घेतली जाते. रस्ता महानगरपालिकेने ताब्यात घेतला आणि तो रुंद केला, परंतु तो ताब्यात दिल्याशिवाय विकास होत नाही. त्याचा मोबदला दिला जात नाही. त्या काळात एफएसआय पध्दत नव्हती. त्याचा एफएसआय वापरायचा असेल तर भूखंडाच्या 40 टक्के वापरता येत होता. 1988 साली टीडीआरची संकल्पना अस्तित्वात आली. त्या जमिनीचा चटई क्षेत्र निर्देशांक हस्तांतरित करण्याचा विषय आल्यानंतर या सगळ्या आरक्षणाचा बट्ट्याबोळ झाला. शहरातील जमिनींचा टीडीआर हस्तांतरणाचा अधिकार दिल्यानंतर तो फक्त उपनगरात वापरता येईल, म्हणजे मुंबई शहराच्या बेटावर वापरता येणार नाही. वांद्रे ते दहिसर आणि सायन ते मुलुंडपर्यंत तो टीडीआर वापरता येईल. म्हणजे एखादा भूखंड उद्यानासाठी आरक्षित असेल तर ते उद्यान बांधून हस्तांतर करायचे आणि मग त्या भूखंडाचा टीडीआर हस्तांतर अधिकार प्राप्त होईल. परंतु असे अजिबात घडलेले दिसत नाही. विकासकांनी टीडीआर विकला, तो वापरला गेला. परंतु आरक्षित भूखंड विकसित होऊन मिळाला नाही. यामुळे मुंबई शहराची विल्हेवाट लागली. हा टीडीआरचा विषय काही प्रमाणात नगरविकास राज्यमंत्री हाताळीत असले तरी काही प्रमाणात म्हाडाच्या संदर्भात गृहनिर्माण राज्यमंत्री देखील हा विषय हाताळतात. शासनाची या मुंबई शहराबद्दल निर्णायक इच्छाशक्ती काय आहे हे एकदा जाहीर झाले पाहिजे. इतक्या पळवाटा निर्माण केल्या आहेत की, त्या माध्यमातून एखाद्या नस्तीला मंजुरी मिळता मिळता इतका भ्रष्टाचार होतो की, तो विचार करण्यापलीकडे गेलेला आहे.

सभापती महोदय, एसआरए योजनेचा मूळ गाभा हा झोपडपट्ट्या नष्ट करणे हा होता. शासनाने ठाम निर्णय घेतला होता. या योजनेच्या माध्यमातून झोपडपट्टीधारकाला 225 चौ.फूट क्षेत्रफळाचे घर मोफत द्यायचे. कालांतराने 225 ऐवजी 269 चौ.फुटाचे घर आणि विकासकाला 2.5 ऐवजी 3 एफएसआय देण्याचा निर्णय घेण्यात आला. ही योजना राज्यात ज्या ज्या ठिकाणी

..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

राबविली जात आहे त्या त्या ठिकाणी हा निर्णय लागू करण्यात आला. हा विषय फार गंभीर बनलेला आहे. या योजनेतून मुंबई शहरामध्ये खून, गँगवार, अस्वच्छता मोठया प्रमाणात निर्माण होत आहे. या योजनेमध्ये विकासकावर एक अट लादण्यात आली आहे. योजना करावयाची असेल तर झोपडपट्टीधारकाला अमुक क्षेत्रफळाचे घर मोफत द्यावेच लागेल. या योजनेमध्ये काही बाबी चांगल्या आहेत. एका भूखंडावर 400 झोपड्या असतील तर त्यांचा विकास करीत असताना 50 टक्के भूखंड झोपडपट्टीधारकांसाठी आणि 50 टक्के भूखंड विक्रीयोग्य इमारतीच्या बांधकामासाठी वापरण्याची सवलत देण्यात आली आहे. 2/3 भूखंड झोपडपट्टीधारकांसाठी आणि 1/3 भूखंड विक्रीयोग्य इमारत बांधण्यासाठी वापरावा असे बंधन नाही. 50-50 टक्के प्रमाणात भूखंड आणि 3 एफएसआय वापरण्याची सवलत दिलेली आहे. 100 घरांच्या एका इमारतीमध्ये एक बालवाडी, एक दवाखाना आणि एक व्यायामशाळा/समाज मंदिर अशी तीन युनिटे बांधून द्यायची आहेत. ही अतिशय चांगली तरतूद केलेली आहे. सर्वात महत्वाची अट म्हणजे झ ोपडपट्टीधारकांची इमारत पूर्ण झाल्याशिवाय विक्रीयोग्य इमारतीच्या बांधकामाला सुरुवात करता येणार नाही. एखादा भूखंड पूर्णपणे रिक्त झाला असेल, सर्व झोपडीधारक अन्य ठिकाणी भाड्याने रहावयास गेले असतील तर झोपडीधारकांच्या इमारतीचे चार स्लॅब झाल्याशिवाय विक्रीयोग्य इमारतीच्या पायाचे बांधकाम करता येणार नाही. म्हणजे मोफत द्यावयाच्या इमारतीचे पाच स्लॅब उभे राहिल्यानंतर विक्रीयोग्य इमारतीचा पहिला स्लॅब पूर्ण करता येतो. उद्देश हाच आहे की, पुनर्वसन करावयाची इमारत प्रथम पूर्ण झाली पाहिजे. शासनाचा हा सिध्दांत अगदी योग्य आहे. सरकारचे धोरण ठाम आहे. झोपडीधारकांसाठी या योजनेंतर्गत जो निर्णय घेतला आहे तो पूर्ण केल्याशिवाय विकासकाला पुढे जाता येणार नाही. मग योजना का रखडल्या आहेत? एकदा निर्णय घेतल्याप्रमाणे शासनाकडे संबंधित वास्तुशास्त्रज्ञाने नकाशा सादर केला, तो नकाशा म्हाडा आणि अन्य यंत्रणेच्या अधिकाऱ्यांकडे जाऊन मान्यता मिळाली पाहिजे. ती फाईल ज्या ज्या टेबलवर जाते तेथे मंजुरीची किंमत फार मोठी आहे. तो विषय माझा नाही. तो व्यवसायाचा भाग आहे. त्याला इलाज नाही. मुंबई महानगरपालिकेमध्ये एक इंजिनिअर 2002 मध्ये नेमले गेले. जी वॉर्डमध्ये ते कार्यरत असताना मी त्यांच्याकडे गेलो होतो. त्यांच्याशी गप्पा मारल्यानंतर ते त्यांची व्यथा मला सांगू लागले. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी शिफारस केल्यानंतर अमुक कोटी रुपये

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

देऊन सेवेत आलो. एवढे मोठमोठे प्लॅन मंजुरीसाठी येतात, मुंबईमध्ये 100-100 मजल्याच्या इमारतींचे नकाशे एका ज्युनियर इंजिनिअरकडे आल्यानंतर त्यांची छाननी करणार आणि ती नस्ती पुढे जाणार, त्यामुळे त्याची किंमत मोजावी लागते. कोणी काय करावे हा विषय माझा नाही. योजनेला ताकदीने गती मिळाली पाहिजे. एवढ्या सगळ्या तरतुदी करुन झोपडीधारकांना मोफत घराची खात्री दिलेली असताना योजना पुढे का जात नाही? 70 टक्के भाडेकरुंनी सह्या दिल्यानंतर त्या विकासकाकडून बँक गॅरंटी घेऊन त्याला गतीने काम पूर्ण करण्यास सांगावे. झोपडीधारक कोणता विकासक हवा आणि कोणता विकासक नको हे का सांगतात? विकासकाला बांधकामाचा अधिकार दिल्यानंतर त्याच्याकडून कायद्याप्रमाणे झोपडीधारकांसाठी घरे बांधून घेणे ही सरकारची जबाबदारी आहे. काही बेकायदेशीर केले तर त्या विकासकाला तुरुंगात पाठवा. परंतु आज झोपडपट्टीधारकांमध्ये ग्रूप निर्माण होत आहेत. एक ग्रूप एक विकासक पकडतो आणि दुसरा ग्रूप दुसरा विकासक पकडतो. 200 कोटी रुपयांचा प्रकल्प असेल तर 5-25 लाख रुपये खिलवण्याकरिता विकासक तयार असतात. त्यातून झोपडपट्टयांचा विकास थांबला आहे. शासनाने निर्धार केला पाहिजे. 70 टक्के भाडेकरुंनी सह्या दिल्यानंतर काही तूट असेल तर संबंधितांवर गुन्हा दाखल करा. ही योजना शिवशाहीच्या काळात सुरु झाली, आघाडी सरकारच्या काळात ती विकसित होत आहे, परंतु गतीने पुढे जात नाही. याची कारणे शोधून काढली पाहिजेत. निर्धाराने ही योजना पुढे गेली पाहिजे.

पूर्वी 225 चौ.फुटाचे मोफत घर आणि 2.5 एफएसआय मंजूर करुन योजना सुरु झाली. एलओआय दिला आहे त्यांना देखील कालांतराने शासनाने जीआर काढून क्षेत्रफळामध्ये वाढ केली व एफएसआय 3 लागू केला. झोपडीधारकांना वाढीव क्षेत्रफळ द्यायचा निर्णय घेतला. त्यांनी छोट्या घरात का रहावे? 269 चौ.फूट क्षेत्रफळ केल्यामुळे घरात एक रुम वाढली. आम्ही त्या योजनेचे सभागृहात स्वागत केले होते.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ........

महोदय, अगोदर मंजूर झालेले जे "एलवाय" आहे ती दुरुस्ती होणार, ही दुरुस्ती टाकल्यानंतर सुध्दा तीन-तीन, चार-चार वर्षापर्यंत फाईल्स पुढे जात नसतील तर यामागील गणित कोणते हेच मला समजत नाही. मुंबईत अशी योजना राबविण्यासाठी जर आपली मानसिकता नसेल आणि अधिकाऱ्यांकडून फाईल्स पुढे सरकत नसतील तर हे योग्य नाही, त्यामुळे विकास होणार नाही. आता शासनाने यासाठी एक टेक्निकल समिती नेमली आहे. एक साधी गोष्ट आहे की आपण चटई क्षेत्र निर्देशांकामध्ये वाढ केली व त्याचा फायदा झोपडपट्टी धारकांना द्यावयाचा. पण मुबईत मोकळ्या जागा नसल्यामुळे मुंबईत जो विकास होणार आहे तो व्हर्टिकल स्वरुपाचा, आकाशाकडे झेपावणारा होणार आहे, हे आपल्याला स्वीकारावेच लागेल. पूर्वी मुंबईत आठ मजल्यांच्या इमारती दिसत होत्या त्या आता 10 ते 12 ते 22 मजल्यांच्या दिसतील. मिल कामगार 22 व्या मजल्यावर 225 चौरस फुटाचे घर घेऊन राहील व त्याला कदाचित लिफ्ट सुध्दा मिळणार नाही. या अनुषंगाने माझी अशी सूचना आहे तशी सूचना माननीय मुख्यमंत्र्यांनी सुध्दा केली की मुंबईत उंच इमारती बांधल्याशिवाय आता कोणताही पर्याय नाही. म्हणून या मिल कामगारांसाठी एसआरएसाठी बांधण्यात येणाऱ्या कंपोनंटचा विचार करावा. त्यामागचे कारण असे की, इमारतींची उंची वाढत जाईल त्यामुळे या मिल कामगारांना त्या इमारतीचा मेंटेनन्स परवडणार नाही. त्यासाठी कॉर्पस फंड निर्माण केला पाहिजे. त्या रकमेच्या व्याजावर या कामगारांना आपला मेंटेनन्स भागविता येईल. तसेच लिफ्टच्या संदर्भात कंपनीकडून पुढील 15 वर्षापर्यंतचा मेंटेनन्स मोफत करुन मिळेल अशी सोय करुन दिली तर याला चांगली चालना मिळेल. त्यामागील कारण असे की इमारत बांधायला वर्षानुवर्षे लागतात, त्यामुळे विकासाला गती मिळणार नाही याचाही विचार करावा अशी मी सूचना करतो.

माननीय मंत्री श्री. भास्कर जाधव यांची काम करण्याची धडाडी मला पूर्वीपासूनच माहिती आहे. ते या कामाला चालना नक्कीच देतील असा मला विश्वास आहे. जर याकडे पाहणार नसाल तर मग अशा प्रकारचे टाऊन प्लॅनिंग करुन काय करायचे हा प्रश्न निर्माण होतो. आज नाशिक, पुणे किंवा इतर महत्वाच्या शहरांमध्ये हा प्रश्न निर्माण होत आहे. पुण्याला तर मुंबईपेक्षा मोठी समस्या आहे. पण सभागृहात उपस्थित असलेले या विषयाचे दोन्ही मंत्री महोदय जाणकार

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ........

आहेत. माननीय गृह निर्माण राज्य मंत्र्यांच्या तर म्हाडासंबंधीचे सर्वच नियम व अटी तोंडपाठ आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांना आम्ही परवा सूचना केली होती. ते आमच्या पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष श्री. उध्दवजी यांना सांगत होते की, शासनाने जुन्या चाळींच्या विकासासंबंधीचा निर्णय घेतला आहे. पण जे अगोदर वाढून ठेवले आहे ते सरकारकडे आले पाहिजे. मग यासंबंधीच्या फाईलींचा कक्ष अधिकाऱ्यांपासून जो हेलपाटा होणार आहे ते सर्व झाल्यानंतर मंत्री महोदयांपर्यंत व माननीय मुख्यमंत्री यांच्यापर्यंत येण्यासाठी किती दिवस लागतील हे मात्र सांगता येत नाही. जर या कायद्याच्या अंतर्गत आपण योग्य प्रकारे काम केले नाही तर त्या व्यक्तिला सजा होईल, फौजदारी गुन्हे दाखल होतील अशी तरतूद सहकार कायद्यात केली त्याप्रमाणे येथेही करावी अशी माझी सूचना आहे. मला नम्रपणे सांगावयाचे आहे की या विधेयकानुसार जर शासनाने 1995 पर्यंतच्या झ ोपड्यांना मान्यता दिली असेल, आता 2000 सालापर्यंतच्या झोपड्यांनाही मान्यता देण्याचे शासनाने ठरविले पण त्याला कोर्टाची मान्यता नसल्याने तसे करु शकत नाही. मग 2000 सालापर्यंतचा निर्णय शासनाने घेतला तर त्यानंतरच्या झोपड्या पाडायचा विचार शासन करणार की नाही हा प्रश्न आहे. कारण हा निर्णय अंमलात आणला तर लोकांना समजेल की मुंबईत जाऊन झोपड्या उभारता येत नाही, पर्यायाने आपल्याला मोकळ्या जागा मिळतील.

महोदय, अकोला महापालिकेच्या संदर्भात तेथील नगरसेवकांनी आजच मला फोन केला. अकोला महापालिका बरखास्त करण्यासंबंधीची नोटीस देण्यात आली अशी चर्चाही झाली. त्यानुसार अकोला महापालिकेने काढलेले टेंडर रद्द झाले व त्यासंबंधी नवीन प्रक्रिया सुरु होईल. पण तरी देखील रद्द केलेले अगोदरचेच टेंडर मान्य करुन तोच कंत्राटदार नेमला व त्याला हे काम देण्याचा पुनर्विचार शासनाने करावा असा बेकायदेशीर ठराव केला आहे. अशा प्रकारे बरखास्तीची टांगती तलवार डोक्यावर असताना सुध्दा ती महापालिका असे काम करीत आहे. मी आमच्या नगरसेवकांना सांगितले की, आपल्याला ही योजना पाहिजे म्हणून विरोधात न जाता आपण तटस्थ भूमिका घ्यावी. नकारात्मक देता येत नाही कारण ही योजना पाहिजे म्हणून शासनाने निर्णय घेतला आहे व ती चांगली आहे. एकदा नियोजन आराखडा तयार केल्यानंतर मला वाटते तो 20 वर्षे चालतो. यामध्ये आपण हे काम साडेतीन वर्षात पूर्ण झाले पाहिजे, असा

.....3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ........

उल्लेख केला आहे.  पण किमान पाच वर्षांचा कालावधी तरी ठेवायला पाहिजे होता, पण तसे न करता आपण तो साडेतीन वर्षांचा काळ नमूद केला आहे.  तसेच असा आराखडा चुकीचा असू नये अथवा चुकीचा असू शकतो म्हणून शासनाकडे आल्यानंतर त्यात पुरेपूर बदल करण्याचा अधिकार शासनाला असतो.  मग अशा वेळेस "तेरा छोडता हू, उसको रखता हू" असे जमवाजमवीचे प्रकार सुध्दा होऊ शकतात.  एकदा शासनाकडे असा आराखडा आल्यानंतर जी सुधारणा असेल अथवा त्याला जोपर्यंत मंजुरी मिळत नाही तोपर्यंत महापालिकेला काहीच करता येत नाही.  त्यात आमुलाग्र बदल करण्याचा पूर्ण अधिकार शासनाला असतो.  माझी माननीय मुख्य मंत्र्यांकडून अपेक्षा आहे, माननीय ग्राम विकास मंत्री सुध्दा येथे उपस्थित आहेत.  या विधेयकात जिल्हा किंवा महानगरपालिकेच्या स्तरावर ही योजना करणे असे म्हटले आहे. शहराव्यतिरिक्त ग्रामीण भागातील आराखडा आपल्याकडे येणार पण तो आराखडा जिल्हा परिषद, पंचायत समिती की ग्राम पंचायत यापेकी कोण देणार, कोण पाठविणार हे स्पष्ट होत नाही.  गावाच्या वाढीसाठी बाहेर काही मोकळी जागा ठेवलेली असते.  त्या जागेचे नियोजन कसे करणार हा देखील एक विषय आहे पण त्याचे स्पष्टीकरण येथे नाही.  यामध्ये प्रामुख्याने आपण तीन भाग केलेले आहेत.  प्रथम संपूर्ण जिल्हापरिषदा व महानगरपालिका प्रादेशिक, त्यानंतर स्थानिक स्तरावर महानगरपालिका व नगरपरिषदांच्या अधिकारातील क्षेत्रांचा विकास करणे......

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

व तिसरे क्षेत्र स्तरावरील नगर रचना आहे. आपण बेटरमेंट चार्ज ठेवणार आहात की, नाही यासंदर्भातील अधिक माहिती मला आपल्याकडून जाणून घ्यावयाची आहे. आता आपण प्रत्येक विकासकाच्या मागे प्रिमियम लावला आहे. बेटरमेंट चार्ज हा सुविधा देण्यासाठी आहे. असे असतांना या व्यतिरिक्त आपण जो प्रिमियम घेत आहात त्याचे गणित मला तरी काही कळत नाही.

सभापती महोदय,टीडीआर आता संभाजी नगरला सुध्दा लावण्यात आलेला आहे. ग्रामीण भागात सुध्दा टीडीआरचा विषय येणार आहे. आपल्याकडून मला धोरणात्मक निर्णय अपेक्षित आहे तो असा आहे की, नालासोपा-यामध्ये किंवा त्याच्या आसपासच्या गावांमध्ये टोलेजंग इमारती उभ्या राहत आहेत. त्या भागाला चटई क्षेत्राची काही मर्यादा आहे की, नाही ? या ठिकाणी ग्राम पंचायत असल्यामुळे त्या ठिकाणी हायफाय इमारती उभ्या राहत आहेत. परंतु हा भाग ज्यावेळेस नगरपालिकेत येतो तेव्हा त्या भागाचा काही विकास झालेला नसतो. ज्याची जागा आहे तो इमारत बांधतो आणि विकतो. नवी मुंबईच्या पलीकडे गेले की हे दृश्य आपल्याला दिसून येते. त्यामुळे यासंदर्भात आपण काय नियोजन करणार आहात ? चटई क्षेत्र निर्देशांकाचे बंधन ग्रामपंचायतीकडे, पंचायत समितीकडे असणार आहे की, नाही ? याबाबतीतील मार्गदर्शन मिळाले तर चांगले होईल एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद. जयहिंद, जय महाराष्ट्र.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, विधान परिषद विधेयक क्रमांक 10 ला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. मूळ कायदा हा 1966 मधील आहे. नियोजनाची संकल्पना 1966 पासून वेगाने सुरु करण्याचा आपण प्रयत्न केला. आपण जे विधेयक आणले आहे त्यामधील कलम 64 हे क्रांतिकारक कलम आहे असे मी समजतो. या विधेयकात असे म्हटी आहे की,"कलम 64 मध्ये खंड(ग) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल. (एफ) परियोजनेखाली येणा-या एकूण क्षेत्राच्या दहा टक्के इतक्या मर्यादेपर्यंतची जमीन आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील सदस्यांसाठी आणि अल्प उत्पन्न गटासाठी व परियोजने अंतर्गत कब्जा काढून घेण्यात आलेल्या व्यक्तीसाठी, निवास व्यवस्थेची तरतूद करण्यासाठी, राखून ठेवणे" ही फार चांगल्या प्रकारची बाब आपण कलम 64 मध्ये आणलेली आहे. 64 क्रमांकाचे कलम क्रांतिकारक कलम आहे असे मी मानतो. आपण पुढे म्हटले आहे की, 40 टक्के जमीन ही रस्ते क्रीडांगणे, उपवने, बागा, मोकळया जागा, शाळा, दवाखाने, अग्निशमन दल, लोकोपयोगी जागा सामाजिक पायाभूत सुविधांसाठी ठेवलेल्या आहेत. मी माननीय राज्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, अशाच एका विधेयकावर बोलत असतांना मी सांगितले होते की, जगामध्ये काही शहरे अशी आहेत की, 20 टक्के जागांवर इमारती आहेत व 80 टक्के जागा मोकळी आहे. रस्ते,क्रीडांगणे, मोकळी जागा यासाठी 80 टक्के जागा मोकळी ठेवण्यात आलेली आहे व केवळ 20 टक्के जागावर इमारती आहेत. मुंबईचा विचार केला तर मुंबईमध्ये 90 टक्के जागांवर इमारती आहेत व 10 टक्केच जागा पायाभूत सुविधेसाठी ठेवलेली आहे. म्हणून माझी विनंती आहे की, हे करीत असतांना मुंबईचा आपण वेगळा विचार केला तर बरे होईल. मुंबईच्या जागेसाठी आपण 50 टक्क्याची मर्यादा टाकलेली आहे ती जास्त केली पाहिजे असे मला वाटते.

हा कायदा आपण संपूर्ण महाराष्ट्रासाठी आणलेला आहे. मुंबई एमएमआरडीए, नाशिक, पुणे, नागपूर, अमरावती, संपूर्ण नगरपालिका व जिल्हयांसाठी ही मर्यादा राहणार आहे. जिल्हयाच्या संदर्भात कंट्री प्लॅनिंग ही जी कन्सेप्ट आहे ती अनेक वर्षापासूनची आहे. आपण चांगला कायदा आणल्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. हा कायदा आणत असतांना आपण त्रिस्तरीय योजना आणली. संपूर्ण जिल्हा किंवा महानगर, स्थानिक स्तरावरील कोणत्याही प्रदेशाकरिता प्रादेशिक आणि क्षेत्र स्तरावरील योजनांचा समावेश असला पाहिजे.

..3..

श्री. अरुण गुजराथी...

आपण विधेयकाच्या उद्देश व कारणामध्ये म्हटले आहे की,"विकासाच्या प्रवाहात येणा-या कोणत्याही जमिनीवर किंवा जिच्यावर अगोदरच बांधकाम झाले आहे अशा जमिनीवर, विविध टप्प्यांवर कालमर्यादा विहित करुन, प्रारुप परियोजनेचे प्राथमिक परियोजनेत व अंतिम परियोजनेत पोट-विभागणी करुन विकास घडवून आणण्याकरिता आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी व अल्प उत्पन्न गटांसाठी जमिनीची तरतूद करुन आणि सुखसोयी व सोयी सुविधा यांच्या नियोजन प्राधिकरणाकडून विकास करुन विक्री करण्यासाठी, उक्त अधिनियमाच्या प्रकरण पाच मध्ये, नगररचना परियोजनांच्या संबंधित तरतुदीमध्ये, सुधारणा करणे इष्ट आहे, असे शासनाला वाटते." सभापती महोदय, यासंदर्भात अंमलबजावणी झाली तर नगरविकास व शहरी भागासाठी फार चांगले होईल. परंतु जर आपण अंमलबजावणी करु शकलो नाही तर हे विधेयक आणून त्याचा लाभ फारसा होईल असे वाटत नाही. संपूर्ण विकास झाल्यानंतर विकासकाला आपण विक्रीची परवानगी देणार असा अर्थ मला अभिप्रेत आहे. असे जर आपण करु शकलो तर या विधेयकाचा शहर विकासासाठी चांगल्या पध्दतीने लाभ होईल. यामध्ये आपण दोन संकल्पना आणलेल्या आहेत. प्रारंभिक परियोजना आणि अंतिम परियोजना. प्रारंभिक परियोजनेला 2 महिन्याच्या आत मंजुरी व अंतिम परियोजनेला 3 महिन्याच्या आत मंजुरी दिली जाणार आहे. दोन किंवा तीन महिन्यात आपण मंजुरी दिली नाही तर ती डिम्ड परमीशन समजली जाईल का ? याबाबत मंत्रीमहोदयांनी आपल्या उत्तरात खुलासा करावा ही विनंती आहे. आता जो कायदा आहे त्यामध्ये नगरपालिका किंवा महानगरपालिकेत आरक्षणाच्या ज्या जमिनी आहेत त्यामध्ये आरक्षणाची जमीन तुम्ही विकत घ्या अशी मालकाने नोटीस दिली तर ती जमीन 6 महिन्याच्या आत प्लॅनिंग ॲथोरिटीला विकत घ्यावी लागते. सहा महिन्याच्या आत जमीन विकत घेतली नाही तर त्या जमिनीवरील आरक्षण आपोआप मोकळे होत असते. ब-याच लोकांना यासंदर्भात माहिती नसल्यामुळे अशा प्रकारे नोटीस देणा-यांची संख्या फार कमी आहे. गेल्या 10 वर्षामध्ये केवळ 2-3 टक्के विकास झाला आहे. आरक्षणाच्या जमिनीवर 5 टक्क्यापेक्षा जास्त कोणी विकास केला आहे असे महाराष्ट्रात घडले नाही.

सभापती महोदय, मी मघाशी डिम्ड कायद्याच्या संदर्भात विचार मांडले आहेत तो विषय मूळ कायद्यामध्ये देखील आहे. जमीन ताब्यात नसल्यामुळे आरक्षण होत नाही. जमीन ताब्यात देण्याच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी...

संदर्भात अर्धी जागा तुम्ही घ्या व अर्ध्या जागेचा विकास प्लॅनिंग ॲथोरीटीच्या माध्यमातून करता येईल. विकास योजनेचे आराखडे वर्षानुवर्षे शासनाकडे पडून होते, वर्ष दोन वर्षे मंजुरी देखील मिळत नव्हती. 50 टक्क्यापर्यंत शहरी लोकसंख्या वाढते आहे त्यामुळे शहराच्या विकासासाठी जास्तीत जास्त लक्ष देण्याची आवश्यकता आहे. हे चांगले विधेयक आहे त्यामुळे या विधेयकाची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे होण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी मी जे दोन मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्यासंदर्भात आपल्या जवळ स्पष्टीकरण नसेल तर पुढील काळात यासंदर्भात सुधारणा करुन विधेयक आणता आले तर उपयोग होईल. आपण या ठिकाणी चांगल्या प्रकारचे विधेयक आणल्याबद्दल मी आपले पुन:श्च अभिनंदन करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विधान परिषद विधेयक क्रमांक 10 ला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. हे फार चांगल्या प्रकारचे विधेयक आहे. या अगोदर आपण प्रत्येक महानगरपालिकेत,नगरपालिकेत किंवा नगरपरिषदेत रिझर्व्हेशन केलेले आहे. परंतु रिझर्व्हेशन केल्यानंतर या जागा कधीच मिळत नव्हत्या. या जागा आपल्याला खरेदी कराव्या लागत होत्या. समजा एखाद्याने 127 ची नोटीस दिली आणि सहा महिन्यात ॲक्शन झाली तर ती जमीन फुकट द्यावी लागत होती. झोपडया होणे, अतिक्रमण होणे या कारणामुळे शहराचा विकास होत नव्हता. या विधेयकात इतकी सुंदर गोष्ट आहे की, पूर्वीच्या टाऊन स्कीममध्ये बेटरमेंट चार्जेस होते. यामध्ये आपण बेटरमेंट चार्जेस घेणार नाही तसेच 50 टक्के जागा ही मालकाला मिळणार असून बाकीची जागा प्लॅनिंग ॲथोरिटीला मिळणार आहे. टाऊन प्लॅनिंगमध्ये स्कीम्स केल्या तर आपल्याला सर्व रिझर्व्हेशन विकसित करता येतील.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय सावंत...

यामध्ये 50/50 टक्के जागा दिल्यामुळे नगरपालिकेला किंवा स्थानिक प्राधिकरणाला कोणताही खर्च येणार नाही. अशाप्रकारे विकासाचे नियोजन करीत असतांना त्यामध्ये जिल्हा धरण्यात आला आहे. यामध्ये जिल्हा धरीत असतांना मोठ मोठया गावांचासुध्दा समावेश केला पाहिजे. आज गावांमध्ये सुध्दा मोठया प्रमाणात शहरीकरण वाढले आहे. आज अनेक लोक लहान शहरामध्ये राहावयास येतात, त्या ठिकाणी चांगले रस्ते नसतात, त्यामुळे एनए प्लॉट न केल्यामुळे ते रस्ते नगरपालिकेकडे वर्ग केले जात नाहीत. याबाबत चांगला प्लॅन केल्यानंतर त्या भागाचा चांगल्यातऱ्हेने विकास होऊ शकतो. आज त्या ठिकाणी फायर फायटींगच्या गाडया जावू शकत नाहीत, कोणत्याही सुविधा करु शकत नाही.

सभापमती महोदय, या विधेयकान्वये बेटरमेंट चार्जेस घेतल्यानंतर हे काम करण्यासाठी शासनाला वेगळा फंड ठेवावा लागेल. पूर्वी आपण बेटरमेंट चार्जेस घेऊन त्यामधून विकासाची कामे करीत होतो. आता बेटरमेंट चार्जेस न घेता त्यांना 50 टक्के जागा परत देणार आहोत. पूर्वीच्या टाऊन प्लॅनिंग स्किममध्ये आपण जागा घेतल्यानंतर जे डिसहाऊस होते त्यांच्याकरिता 70 फूटाचे प्लॉट दिले जात होते, यामध्ये तुम्ही त्यांना घरे बांधून देणार आहात की छोटे प्लॉट पाडून देणार आहात हे स्पष्ट झाले नाही. त्याचप्रमाणे साडे तीन वर्षामध्ये आपण ही योजना करणार आहात ही चांगली गोष्ट आहे. मंत्रीमहोदयांना माहीत आहे की, त्यांच्या चिपळूणमधील किंवा रत्नागिरीमधील योजना त्यांनी पाहिल्या आहेत. त्या अजून देखील पूर्ण झालेल्या नाहीत. त्यामुळे एवढया गतीने जर काम होत असेल तर या सरकारला खरोखरच धन्यवाद दिले पाहिजेत. काही गावांमध्ये आपण ग्रोथ सेंटर करतो त्याप्रमाणे मोठ मोठया गावांमध्ये अजून नगरपालिका झालेल्या नाहीत त्याठिकाणी आपण नियोजन करावयास पाहिजे. हे नियोजन चांगल्या प्रकारे केले तर पुढील काळात होणारा वेडा वाकडा विकास आपल्याला थांबविता येईल. सभापती महोदय, हा विषय फक्त टाऊन प्लॅनिंग पुरता असल्यामुळे काही सन्माननीय सदस्यांनी एसआरए योजनेचा उल्लेख केला आहे. या ठिकाणी टीडीआर हा शब्द डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये वापरला जातो. नगरपालिकांना किंवा स्थानिक प्राधिकारी संस्थांना फुकट जागा मिळविण्यासाठी आपण टीडीआर देतो. या ठिकाणी कोणत्याही गावात योजना राबवितांना टीडीआरचा संबंध याठिकाणी येणार नाही त्यामुळे हाय डेन्सिटी घरे होणार नाहीत तर ती वेल प्लॅन होणार आहेत. त्या बाबतीत सरकारला जेवढे धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत एवढे बोलून व या विधेयकाला पाठिंबा देवून माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2011 चे विधान परिषद विधेयक क्रमांक 10 महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना या विधेयकावर बोलणे गरजेचे असल्यामुळे मी माझे विचार थोडक्यात मांडणार आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या उद्देश व कारणे यामध्ये म्हटले आहे की,"(एक) संपूर्ण जिल्ह्याकरिता किंवा महानगर प्रदेशाकरिता किंवा प्रादेशिक स्तरावरील कोणत्याही प्रदेशाकरिता प्रादेशिक योजना तयार करणे; (दोन) स्थानिक स्तरावरील महानगरपालिकेच्या आणि नगरपरिषदेच्या अधिकारितेतील क्षेत्राकरिता विकास योजना तयार करणे, (तीन) क्षेत्र स्तरावर नगररचना परियोजना तयार करणे. प्रादेशिक नियोजन मंडळाव्दारे प्रादेशिक योजना तयार करण्यात येतात आणि नियोजन प्राधिकरणाव्दारे विकास योजना व नगररचना परियोजना तयार करण्यात येतात. अधिनियमात एखाद्या "अधिसूचित क्षेत्राकरिता" विशेष नियोजन प्राधिकरणे आणि प्रस्तावित नवीन नगराकरिता निश्चित केलेल्या जागेसाठी "नवीन नगर विकास प्राधिकरण" घटीत करण्याची देखील तरतूद आहे. असे दिसून आले आहे की, जलद गतीने होणाऱ्या नागरीकरणामुळे मोठया शहरांमधील नागरी परिसीमांत प्रदेश हे, अनिर्बंध व अनियंत्रित रीतीने विकसित होत आहेत". या निमित्ताने या विधेयकाशी संबंधित असे चार मुद्दे मला मांडावयाचे आहेत. आज राज्यामध्ये मोठया प्रमाणावर नागरीकरण सुरु आहे. मुंबईच्या बाजूला ठाणे जिल्हा असून त्यांची लोकसंख्या 1 कोटी 20 लाख इतकी असून या जिल्ह्यामध्ये अनेक ग्रामपंचायती आहेत. त्या ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपालिकेमध्ये होऊ शकते इतकी अनिर्बंध वाढ झाली आहे. उदाहरण द्यावयाचे झाले तर भाईंदर महानगरपालिका होण्यापूर्वी ती एक ग्रामपंचायत होती, त्यानंतर तिचे नगरपालिकेमध्ये रुपांतर होऊन आता महानगरपालिका झाली आहे. अशाच प्रकारे ठाणे जिल्ह्यामध्ये काही मोठया ग्रामपंचायती आहेत त्यांच्या अखत्यारीत अनेक मोठ मोठे मॉल उभे राहिले आहेत. अनेक ग्रामपंचायतीची लोकसंख्या मोठया प्रमाणात वाढली आहे, तरीही त्या ग्रामपंचायती म्हणूनच अस्तित्वात आहेत. त्यामुळे त्या ग्रामपंचायतीचा ओबड धोबड पध्दतीने विकास होत आहे. त्या ग्रामपंचायतींनी परवानगी दिल्यानंतर त्यांच्या क्षेत्रामध्ये उंच उंच इमारती उभ्या राहिल्या आहेत. अशाप्रकारे संपूर्ण ठाणे जिल्ह्यामधील अनेक मोठया ग्रामपंचायतीमध्ये नागरीकरण झपाटयाने वाढू लागले आहे त्याबाबत आपण काय करणार आहात याचा खुलासा केला पाहिजे.

सभापती महोदय, जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीमध्ये आठ ग्रामपंचायती मोठया प्रमाणात वाढल्या आहेत त्यांची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर....

नगरपालिका करण्याबाबत आम्ही ठराव आणले आहेत. त्या ग्रामपंचायतींची अनिर्बंध वाढ झाल्यामुळे आज त्या ठिकाणी विकासाची कामे करावयास गेलो तर त्याचे योग्य पध्दतीने नियोजन होणार नाही. याबाबत आपण खुलासा करावा अशी विनंती करतो. डहाणू नगरपालिकेच्या विकासाच्या आराखडयाला शासनाने मंजुरी देण्याबाबत गेल्या चार वर्षापासून मी पाठपुरावा करीत होतो. ती मंजुरी अजूनपर्यंत दिली जात नाही. यामुळे डहाणू नगरपालिका क्षेत्राची वेडी वाकडी वाढ होत आहे. त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारे टाऊन प्लॅनिंग झालेले नाही. त्या संदर्भात विचार व्हावा असे मला सुचवावयाचे आहे.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : विधेयकांवरील चर्चा व सभागृहापुढील इतर कामकाज संपेपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, मुंबईमधील एसआरए योजनेबद्दल सांगितले गेले. त्याप्रमाणे ठाणे जिल्ह्यामध्ये एसआरटी योजना आहे. मध्यंतरी सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनामध्ये एक बैठक घेण्यात आली त्या बैठकीला सन्माननीय नगरविकास राज्यमंत्री सुध्दा उपस्थित होते. शहरी भागातील अधिकृत असलेल्या, परंतु मोडकळीस आलेल्या 30 ते 40 वर्षे जुन्या असलेल्या इमारतींच्या संदर्भात कोणताही निर्णय झालेला नाही. मुंबई शहरातील इमारतींसाठी आपण अनेक निर्णय घेतले, त्यांच्यासाठी एफएसआयमध्ये सुधारणा करण्यात आली. एमएमआरडीएच्या संदर्भात रेंटल हाऊसिंग योजना करण्याबाबत निर्णय झाला. ही योजना आपण ठाण्यामध्ये सुध्दा आणली आहे. परंतु या संदर्भात अजून कोणताही निर्णय झालेला नाही. या करिता आपण झोपडपट्टी सुधारणेसाठी आणि जुन्या इमारतींसाठी दोन समित्या निर्माण केल्या त्यापैकी श्री बेंजामीन साहेब एका समितीचे प्रमुख होते तर श्री. श्रीवास्तव साहेब हे दुसऱ्या समितीचे प्रमुख होते. त्या संदर्भात खुलासा झाला पाहिजे. वाढत्या नागरीकरणाला तोंड द्यावयाचे असेल तर या बाबत लवकर निर्णय घेतला पाहिजे.

शहरी भागातील अधिकृत असलेल्या परंतु जुन्या झालेल्या इमारती किंवा गृह निर्माण संस्थांच्या संदर्भात कोणतेही धोरण ठरविण्यात आलेले नाही. त्याचप्रमाणे 30 ते 40 वर्षापासून अनधिकृत असलेल्या इमारतींच्या संदर्भात अनेक बैठका झाल्या, परंतु त्या संदर्भात कोणतेही धोरण किंवा निर्णय शासनाच्या पातळीवर झालेला नाही. त्या इमारती आता पडावयास आलेल्या आहेत, त्या पावसाळयात पडल्यानंतर लोकांनी कुठे जायचे, काय करावयाचे या बाबत निश्चित

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर....

धोरण नसल्यामुळे निर्णय होत नाही. त्या बाबत खुलासा झाला पाहिजे. या बाबत आपण नेमके काय करणार आहात, ते काम कोणत्या पातळीवर आले हे आपण सांगावे. जलद गतीने होणाऱ्या नागरीकरणामुळे विकासाचे प्रश्न निर्माण झाले. शहराच्या पलीकडे ग्रामीण भागातील अनेक योजनांना वन खात्याची परवानगी नसल्यामुळे विकासाचे अनेक प्रकल्प अडून पडले आहेत. ते प्रकल्प होईपर्यंत त्या जमिनीवर अतिक्रमण होते, त्यानंतर ते अतिक्रमण उठविण्याचा प्रयत्न केल्यानंतर ते लोक कोर्टामध्ये जाऊन स्थगिती आदेश आणतात त्यामुळे तेथील विकास खुंटला जातो. त्याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे गरजेचे आहे. या करिता या विधेयकाची आवश्यकता होती व आपण ते आणले आहे त्याचे मी निश्चितपणे स्वागत करतो. त्याची अंमलबजावणी करीत असतांना मी जे काही मुद्दे याठिकाणी मांडले आहेत त्या संदर्भात खुलासा करावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, या ठिकाणी मांडण्यात आलेल्या विधेयकावर अनेक सन्माननीय सदस्यांना चांगल्या प्रकारे भावना व सूचना मांडावयाच्या होत्या, त्यांच्या भावना माझ्यापर्यंत पोहोचल्या आहेत, आपल्या भावनांचा मी आदर करतो. आपल्याकडे डेव्हलपमेंट प्लॅन आणि टाऊन प्लॅन अशा दोन प्रकारच्या योजना राबवितो. आपण या ठिकाणी टाऊन प्लॅनिंगमध्ये तरतूद करीत आहोत. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी सांगितले की, कलम 127 ची नोटिस देणे लोकांना माहित नसल्यामुळे बरीच प्रकरणे वाचली आहेत. नाहीतर कलम 127 ची नोटिस देवून अनेक लोकांना आपल्या जागा डेव्हलप न केल्यामुळे त्या परत घेता आल्या असत्या. मी त्यांना नम्रपणे सांगू इच्छितो की, त्यामध्ये शासनाने सुधारणा केली असून या बाबतीत पूर्वी नगरपालिकांना अधिकार होते त्यामध्ये पूर्वी सहा महिन्यांची मुदत होती. परंतु आता नोटिस दिल्यापासून एक वर्षाच्या आत जागा विकसित केली नाही तर ती जागा शासनाच्या मान्यतेने परत घेता येईल अशाप्रकारची तरतूद करण्यात आली आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव . . ..

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची दुसरी सूचना होती. त्यानुसार ही योजना प्रारंभिक योजना आणि अंतिम योजना असे करणार असून आपण यासाठी मुदत घातलेली आहे. यानुसार प्रारंभिक योजना ही दीड वर्षामध्ये पूर्ण करावी. त्याकरता एक आर्बीट्रेटर नेमला जाईल. याबाबत हरकती आणि सूचना मागविल्या जातील आणि या सर्व बाबी शासनाकडे आल्यानंतर त्याला 5-5, 10-10 वर्षे अंतिम मंजुरी मिळत नाही असा आपला अनुभव आहे, तो खरा आहे. परंतु आता दोन वर्षाच्या आत याला मंजुरी मिळाली पाहिजे अशा प्रकारे यामध्ये बंधन असल्याने आता याबाबतीत दोन वर्षाच्या आत मंजुरी मिळेल, आता ती बाब कोणालाही तशीच ठेवता येणार नाही ही पहिली गोष्ट झाली. त्याचबरोबर एखाद्या शहराचा डेव्हल्पमेंट प्लॅन 20 वर्षानंतर रिव्हाईज करावयाचा असतो. परंतु जेव्हा 20 वर्षानंतर तो प्लॅन रिव्हाईज करण्यासाठी घेतो आणि त्यावेळी ड्राफ्ट स्किम तयार केल्यानंतर देखील तो प्लॅन तीन-चार वर्षे रिव्हाईज केला जात नाही. त्यानंतर ही बाब टी.पी.कडे, ए.डी.टी.पी.कडून ती शासनाकडे येते आणि त्यामुळे याला मंजुरी मिळण्यासाठी 5-5, 10-10 वर्षे जातात. आपण यासंदर्भात मागील अधिवेशनामध्ये एक विधेयक मंजूर केलेले आहे की, आता टी.पी.कडील मुदत संपण्यापूर्वी एक वर्षभर अगोदर त्यांनी ड्राफ्ट प्लॅन तयार करावा आणि तो तयार केल्यानंतर डी.पी.ची मुदत संपल्यापासून साडेचार वर्षाच्या आत त्याला अंतिम मंजुरी देण्याच्या बाबतीत शासनाने सुध्दा स्वत:वर बंधन घालून घेतलेले आहे. त्यासंदर्भात आता लवकरच चांगल्या प्रकारचा निर्णय होईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, जगातील काही शहरांमध्ये 80 टक्के जागा मोकळी आणि 20 टक्के जागेवर इमारत असते. आपल्याकडे सुध्दा असा नियम आहे. मागच्या वेळेला मुंबईच्या संदर्भात चर्चा करीत असताना मी यासंबंधातील आकडेवारीबाबत उल्लेख केला होता. आज माझ्याकडे ती आकडेवारी नाही. परंतु प्रत्येक हजारी माणसामागे किती जागा मोकळी असावी हे प्रमाण आपल्या डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये निश्चित झालेले आहे. परंतु दुर्दैवाने त्याची 5 ते 6 टक्के सुध्दा अंमलबजावणी झालेली नाही ही वस्तुस्थिती नाकारण्याचे कारण नाही.

सभापती महोदय, आदरणीय श्री.दिवाकर रावते साहेबांनी सांगितले की, तुम्ही हे सर्वकाही शहरांसाठी करणार आहात की संपूर्ण जिल्ह्यांकरता करणार आहात, तर याबाबत येथे उल्लेख आहे. मागच्या वेळेला आपण क्षेत्रीय विकास प्राधिकरण निर्माण केलेले आहे. यामध्ये जिल्हाधिकारी, तेथील संरपंच, आमदार असतील,त्यावेळी यामध्ये आमदारांना घेण्यात आले नव्हते पण आमदारांना सुध्दा त्यामध्ये घेण्यात येईल असे प्रॉमीस केले होते.त्यानुसार प्लॅन तयार होईल. तसेच शहराची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव . . ..

किती वाढ झालेली असेल त्यावर अवंलबून राहून त्याप्रमाणे या योजनेअंतर्गत प्लॅन तयार केला जाईल आणि त्याची सुध्दा अंमलबजावणी केली जाईल अशा प्रकारे यामध्ये तरतूद केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.विजयराव सावंत असतील किंवा सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर असतील, त्यांनी याबाबत काही मुद्दे मांडले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी ठाणे शहरामध्ये ज्या अधिकृत इमारती आहेत, परंतु त्या जुन्या झालेल्या आहेत. तसेच ज्या अनधिकृत इमारती आहेत त्या देखील जुन्या झालेल्या आहेत त्याबाबत समितीने काय निर्णय घेतलेला आहे असा प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी सन्माननीय सदस्यांना एवढेच सांगेन की, मध्यंतरी नव्या मुंबईमध्ये एफ.एस.आय.वाढवून द्यावयास हवा होता, त्याबाबत शासनाने निर्णय घेतला. आता पुणे महानगरपालिकेच्या बाबतीत देखील शासनाने निर्णय घेतलेला आहे. ठाणे महानगरपालिकेच्या संदर्भातील निर्णय सुध्दा अंतिम स्वरुपामध्ये आहे. त्याबाबत सुध्दा लवकरच निर्णय घेतला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी अकोला महानगर-पालिकेचे उदाहरण दिले की, ती महानगरपालिका बरखास्त करण्याकरता शासनाने दिलेली नोटीस आणि त्यानंतर त्या महानगरपालिकेने जबरदस्तीने केलेला ठराव, याबाबत मी आताच माहिती घेतलेली आहे आणि ती बाब तत्काळ येथे मागवून घेत आहोत आणि जरी त्यांनी तशा प्रकारचा ठराव केला असला तरी त्याला मंजुरी दिली जाणार नाही हे मी आपल्याला सांगू इच्छितो. कारण पूर्वीचे टेंडर रद्दच केलेले आहे. त्यामुळे त्याच कॉन्ट्रॅक्टरला पुन्हा टेंडर देण्यासाठी ठराव केला असेल तर मी तो ठराव मागवून घेत आहे आणि त्याबाबत तत्काळ उपाययोजना करीत आहे.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : बरखास्तीबाबत काय करणार ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मघाशी मी टी.पी.स्किमबाबत सांगितले. याबाबत मी 1976 मध्ये बोललो होतो आणि आपणही याबाबत सांगितले होते.पण ही टी.पी.स्किम 1976 साली नाही तर बाम्बे टाऊन प्लॅनिंग ॲक्टप्रमाणे 1915 मध्ये पहिल्यांदा जाहीर झाली.त्यानंतर दुसरा कायदा 1954 मध्ये झाला.त्यानंतर एम.आर.टी.पी.ॲक्ट हा 1966 साली झाला.1915 साली स्थापन झालेल्या योजनेनुसार राज्यात फक्त 34 स्किम डेव्हलप झाल्या म्हणून त्याचा उपयोग होणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अनिल भोसले यांनी माझ्याकडे एक प्रश्न लिहून दिला होता की, टी.पी.करता कमीतकमी आणि जास्तीतजास्त किती जागा लागेल ? याबाबतीत मी





श्री.भास्कर जाधव . . ..

असुधारीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

सांगू इच्छितो की, यासाठी क्षेत्राचे बंधन नाही परंतु किमान 100 एकर क्षेत्र घेतल्यास नियोजन चांगल्या प्रकारचे होऊ शकते अशा प्रकारची अपेक्षा ठेवण्यात आली आहे.म्हणून शहराकरता आणि त्याच्या आजुबाजूला वाढणारी लोकसंख्या यासाठी उत्तम प्रकारचे ठराविक मुदतीमध्ये नियोजन करण्याकरता या विधेयकाचा निश्चितपणे उपयोग होईल, ज्याची आपण सर्वजण वाट पहात होता. म्हणून या विधेयकाला आपण सर्वांनी एकमुखाने पाठिंबा द्यावा. तसेच या विधेयकाच्या संदर्भात ज्यांनी मुद्दे उपस्थित केले नसतील, त्यांनी आपल्या लेखी स्वरुपामध्ये सूचना द्याव्यात, त्याचा योग्य त्या प्रकारे विचार केला जाईल. त्यामुळे सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांनी एकमुखाने हे विधेयक मंजूर करावे अशी मी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 16 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1,संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.प.वि. क्रमांक - 10 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 10 संमत झाले आहे.

-----

. . . .2 टी-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**<u>हरकतीच्या मुद्याबाबत</u>**

श्री एस.क्यू.ज़मा : सभापति महोदय, मेरा पॉईंट ऑफ ऑर्डर है. आपने यह बिल पास कर दिया है.इस बिल पर बोलने के लिए मैं बार बार हाथ ऊपर उठा रहा हूं.इस बिल पर बोलने के लिए पहले से मैं अनुमति मांग रहा हूं.मैं बार बार हाथ ऊपर उठा रहा हूं लेकिन इस बिल पर मुझे बोलने का मौका नहीं मिला है, यह मेरे साथ अन्याय है. बिल पर अपने विचार व्यक्त करना यह हमारा अधिकार है.मेरा कहना यह है कि आगे से ऐसा नहीं होना चाहिए, हमें बोलने दिया जाना चाहिए.क्योंकि यह बहुत महत्वपूर्ण बिल है.

. . . .2 टी-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी./मु.शी.**: आश्वासनांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "विधानपरिषदेच्या सन 2011 च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात दिनांक 14 मार्च 2011 ते 21 एप्रिल 2011 या कालावधीत मा.मंत्री/राज्यमंत्री महोदयांनी सभागृहात दिलेल्या एकूण 770 आश्वासनांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : आश्वासनांची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली आश्वासनांची यादी छापावी)

----

. . . .2 टी-6

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही



**पृ.शी./मु.शी.**: आश्वासनांवरील शासकीय कार्यवाहीचे विवरण सभागृहासमोर ठेवणे

श्री.भास्कर जाधव (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 1988 च्या पहिल्या अधिवेशनापासून ते सन 2011 च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनापर्यंत देण्यात आलेल्या आश्वासनांपैकी एकूण 402 आश्वासनांवरील पूर्तते संबंधीच्या कार्यवाहीच्या माहितीच्या विवरणपत्रांची यादी सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : विवरणपत्राची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : कृपया येथे सोबतचे विवरण पत्र छापावे.

-----

. . . .2 टी-7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.भास्कर जाधव (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील अधिसूचना सभागृहासमोर ठेवतो :-

(अ) "मुंबई ग्रामपंचायत (सरपंच व उप सरपंच) निवडणूक (सुधारणा) नियम, 2011( प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक ग्रापंनि, 2011/प्र.क्र.64/पंरा-2, दिनांकित 8 जून 2011 सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

----

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील अधिसूचना सभागृहासमोर ठेवतो.

(ब) "महाराष्ट्र जिल्हा परिषसदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभाती) आणि पंचायत समित्या (सभापती व उप सभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) (सुधारणा) नियम,2011 प्रसिध्द करणारी अंतिम अधिसूचना क्रमांक जिपनि, 2011/प्र.क्र.71/पंरा-2, दिनांकित 3 जून 2011 सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

----

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील (ग्रामविकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने जिल्हा परिषद ठाणे/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग / नाशिक / धुळे / नंदुरबार / जळगांव / अहमदनगर / पुणे / सातारा / सांगली / सोलापूर / कोल्हापूर / औरंगाबाद / जालना / परभणी / हिंगोली / बीड / नांदेड / उस्मानाबाद / लातूर / अमरावती / अकोला / वाशिम / बुलढाणा / यवतमाळ / नागपूर / वर्धा / भंडारा / गोंदिया / चंद्रपूर व गडचिरोली जिल्हा परिषदांचे सन 2009-2010 चे वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** (श्री. मोहन जोशी) : वार्षिक प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

---

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यावरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अडतिसावा अहवाल सन 2008-2009 सभागृहासमोर ठेवतो.

**तालिका सभापती** : लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : अंदाज समितीचा अहवाल सादर करणे

**तालिका सभापती** ( श्री. मोहन जोशी ) : अंदाज समितीचा नववा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

----

**सभागृहाच्या कामकाजासंबंधी**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, कामकाज संपविण्याची आपली घाई मी समजू शकतो. आज सकाळची चर्चा आणि एकूण वातावरण बघून आम्ही माननीय सभापतींना सांगितले की, आपण कामकाज करु या, आमची काही ना नाही. आता थोडा जरी क्रम चुकला तरी पीठासनावरुन आम्हाला सांगण्यात येते की, कामकाज सल्लागार समितीमध्ये अमुक ठरले आहे, अमक्या बाबतीत अमुक ठरले आहे आणि आम्ही ते ऐकतो. आता विधेयक मंजूर करावयाचे आहे हे मला मान्य आहे. पण सकाळी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिली होती त्यामुळे सभागृहाचे सगळे कामकाज स्थगित करुन आपण ती चर्चा घेतली. प्रश्नोत्तराऐवजी आपण ही चर्चा घेतली. ती चर्चा संपल्यानंतर आपण कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यासंबंधीचे कामकाज घ्यावयास पाहिजे होते आणि त्यानंतर विधेयके घ्यावयास पाहिजे होती. हा क्रम का बदलला हे मला कळत नाही. क्रम चुकल्यामुळे इच्छा नसताना काही लोकांना बसावे लागते. नियम 93 च्या सूचनेवरील निवेदनांबाबत काय केले, लक्षवेधी सूचनेच्या बाबतीत काय केले, विशेष उल्लेखाच्या बाबतीत काय केले, याबाबत आपण घोषणा करावयास पाहिजे. त्याची घोषणा झालेली नाही.

**तालिका सभापती** : नियम 93 च्या सूचनेवरील निवेदने आणि लक्षवेधी सूचना उद्या घेण्यात येतील.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. XL OF 2011

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNIVERSITIES ACT, 1994.)

श्री. डी. पी. सावंत ( उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि. स. वि. क्रमांक 40 - महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. डी. पी. सावंत : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि. स. वि.क्रमांक 40 महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हे विधेयक कशाच्या संदर्भात आणले आहे याबद्दल माननीय मंत्री महोदयांनी थोडक्यात सांगावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..4...

RDB/

श्री. राजेश टोपे ( उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय राज्यमंत्र्यांनी वि. स. वि. क्रमांक 40 विचारात घेण्यासाठी मांडलेले आहे. आपल्या राज्य शासनाच्या वतीने दर वर्षी कॉलेजेस वाटण्याची अंतिम तारीख कायद्यामध्ये 15 जून आहे. हे कामकाज करीत असताना उच्च न्यायालयाचा एक निकाल आला आणि त्या निकालामध्ये त्यांनी असे सांगितले की, कायम स्वरुपी विनाअनुदानित महाविद्यालयांचे वाटप करावयाचे असेल तर आणि आपण अनुदान देत नसाल तर हे काम आपल्या युनिव्हर्सिटीने करावे. न्यायालयाने अशा पध्दतीचा जो निकाल दिला त्या विरोधात आपण सर्वोच्च न्यायालयामध्ये गेलो आणि सुप्रीम कोर्टाने उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाला स्थगिती दिली. या सगळ्यामध्ये साधारणपणे महिना दीड महिना कालावधी गेला त्यामुळे 15 जून ही तारीख त्यामध्ये निघून गेली. आपण कायम स्वरुपी 15 जून हीच तारीख ठेवणार आहोत पण या वर्षापुरती सर्व विद्यापीठांच्या कुलगुरुची संमती घेऊन 180 दिवसांचा जो काही कालावधी अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी लागतो तो सगळा अभ्यासक्रम पूर्ण होईल याची अशी खात्री करुन आपण 15 जून ऐवजी 20 ऑगस्ट अशी तारीख करावी असा निर्णय घेतला आणि त्या संदर्भात या ठिकाणी विधेयक सभागृहासमोर आणलेले आहे. फक्त या वर्षी कोर्टाच्या झालेला निकाल आणि त्या निकालाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती देणे या सगळ्या गोष्टींमुळे आम्हाला निर्णय घेण्यास उशीर झाला. त्यामुळे मी सभागृहाला विनंती करतो की, या वर्षापुरते एक्स्टेंशन देण्यास मान्यता देण्यात यावी.

---

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, सन 2011 चे वि. स. वि. क्रमांक 40 - महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 मध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक माननीय मंत्री महोदयांनी सभागृहासमोर मांडलेले आहे. माननीय मंत्री महोदयांनी आपल्या भाषणात उद्देश व कारणे सांगितली. त्यांनी सांगितले की, ही सुधारणा 1 वर्षापुरती मर्यादित आहे. ही सुधारणा 1 वर्षापुरती मर्यादित आहे हे मान्य आहे पण कलम 82 च्या पोटकलम (3) मध्ये अशी तरतूद आहे की, "उच्च शिक्षणाचे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरु करण्यासाठी परवानगी मागणारे व्यवस्थापन ..." आज एखादे नवीन महाविद्यालय सुरु करावयाचे असेल तर किती अर्ज-विनंत्या कराव्या लागतात, किती पैसे खर्च करावे लागतात हे सगळ्यांना माहीत आहे. टेबलावरुन काय द्यावे लागते, टेबलाखालून काय द्यावे लागते या सगळ्या गोष्टी आपल्याला माहीत आहेत. मात्र ज्या परिसंस्था शासनाकडून कोणतेही सहाय्य किंवा अनुदान घेण्यासाठी इच्छुक नसतील, त्या प्रकरणी, अशा संस्थांना राज्य शासनाची परवानगी घेण्याचा प्रश्नच उद्‌भवणार नाही असा उल्लेख उद्देश व कारणामध्ये केलेला आहे. हा यातील मूळ गाभा आहे. जर आपण अनुदान देणार नसाल तर आपण काहीही करावयास मोकळे आहोत अशा प्रकारचा अर्थ यातून घ्वनित होतो.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील, रत्नागिरी जिल्ह्यातील किंवा मोरबा, ता. माणगांव, जिल्हा रायगड येथील काही लोक कोर्टामध्ये गेले. त्या सामाजिक संस्थेने कोर्टामध्ये रिट अर्ज दाखल केला. त्यावर कोर्टामध्ये निर्णय झाला. त्या निर्णयाला राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयामध्ये पुन्हा आव्हान दिलेले आहे. पहिला जो निर्णय झाला तो राज्य शासनाच्या विरोधात गेला. तो निर्णय अपेक्षित नव्हता म्हणून राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयामध्ये त्या निर्णयाला आव्हान दिले. मला अशी शंका आणि भीती आहे की, समजा सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला तर काय होणार ? या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात सांगावे. समजा एखादी संस्था 2010 मध्ये किंवा 2011 मध्ये सुरु झाली, त्यांचे ॲडमिशन झाले आणि उद्या जर निर्णय विरोधात गेला तर तर या ॲडमिशन घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनाचे काय होणार, हा प्रश्न आहे. हे एका वर्षापुरते अतिशय छोटे विधेयक दिसत असले तरी

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

यामध्ये विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या परिसंस्था किंवा शैक्षणिक संस्था उच्च शिक्षणासाठी महाविद्यालय काढण्यासाठी इन्फ्रास्ट्रक्चर तयार करणार, ॲडमिशन देणार, शिक्षक नेमणार आणि मग कोर्टाचा निर्णय जर विरोधात गेला तर काय होणार ? त्यामुळे या सगळ्या गोष्टी आपल्यासमोर आल्या पाहिजेत.

सभापती महोदय, दुसरी महत्वाची गोष्ट अशी की, आपण डिम्ड युनिव्हर्सिटीज काढल्या. आपण डिम्ड युनिव्हर्सिटीमध्ये सगळ्यांना परवानगी दिली. विविध स्पेशलाईज्ड विषय शिकविण्यासाठी आपण डिम्ड युनिव्हर्सिटीज काढल्या पण त्या ठिकाणी तसे काहीही झालेले नाही. आज या डिम्ड युनिव्हर्सिटीच्या छत्राखाली अनेक फॅकल्टीज सुरु आहेत. त्यांच्यावर आपले काय नियंत्रण आहे ? आज ते मनमानी फी घेत आहेत. त्या ठिकाणी गरिबांच्या मुलांना ॲडमिशन मिळत नाही. या ठिकाणी आपण जे वाक्य दिलेले आहे ते मला खटकले. ज्या परिसंस्था शासनाकडून कोणतेही सहाय्य घेणार नाहीत अशा परिसंस्थांवर शासनाचा कंट्रोल भविष्य काळामध्ये राहणार का ? एखाद्या मंत्री महोदयांनी किंवा सन्माननीय सदस्यांनी एखाद्याला ॲडमिशनसाठी चिठ्ठी दिली तर त्याला केराची टोपली दाखवली जाणार. त्यांनी कोणते कोर्सेस राबवावेत, कोणत्या प्रकारचा अभ्यासक्रम राबवावा यावर आपला काही तरी कंट्रोल पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

आपल्याकडे मान्यता नसलेले असे अनेक कोर्सेस आहेत.

मी एक उदाहरण सांगतो. आपल्या राज्यात शासनाने ॲनिमेशनच्या कोर्सला अजूनतरी मान्यता दिलेली नाही. या कोर्ससाठी कोण प्रवेश घेऊ शकतो ते ठरलेले नाही. बी.ए.,बी.कॉम. बी.एससी., बारावी यापैकी कोण प्रवेश घेऊ शकतो यासाठी शैक्षणिक अर्हता ठरविलेली नाही. पण अनेक संस्था आम्ही ॲनिमेशन शिकवितो अशा प्रकारच्या जाहिराती देऊन विद्यार्थ्यांकडून फी उकळत आहेत. अशा प्रकारच्या संस्थांवर नियंत्रण ठेवावयचे असेल तर शासनाने त्यांना मुक्तद्वार ठेवू नये. एक वर्षानंतर काय होणार आहे ते निश्चितपणे सांगावे. या विधेयकात 15 जून ते 20 ऑगस्ट अशी मुदत दिलेली आहे. आज 10 ऑगस्ट आहे, 20 ऑगस्टला किती दिवस राहिले आहेत ? केवळ 10 दिवसांसाठी हे विधेयक आणण्यात आले आहे. एवढा खटाटोप कशासाठी, त्याची नेमकी काय कारणे आहेत ते स्पष्ट होणे आवश्यक आहे. ज्या संस्था मान्यतेसाठी शासनाच्या दारात उभ्या आहेत. ज्यांना दार उघडून पाहिजे. त्या संस्था कोणाच्या आहेत ते स्पष्ट होणे आवश्यक आहे. कृपा करुन उच्च शिक्षण खात्यामध्ये अशा पध्दतीने कोणालाही पॅण्डोराचा बॉक्स उघडून देऊ नये. जेणे करुन त्यांना पाहिजे ते मिळू शकेल. मंत्री महोदयांकडून या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळावीत अशी मी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी वि.स.वि.क्रमांक 40 सभागृहात विचारार्थ मांडण्यात आले आहे. या विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, हे विधेयक वाचल्यानंतर महाविद्यालयांना मान्यता देण्याची शेवटची तारीख 14 ऑगस्ट, 2011 आहे असे दिसते. पण मंत्री महोदय मात्र 20 ऑगस्ट, 2011 अशी तारीख असल्याचे सांगत आहेत. आम्ही ही तारीख गृहित धरतो. दरवर्षी राज्यामध्ये नवीन महाविद्यालयांना 15 जूनपर्यंत मान्यता द्यावी, त्यानंतर कोणालाही मान्यता देऊ नये अशा प्रकारची कायद्यात तरतूद आहे. परंतु रायगडमधील एक शिक्षण संस्था हायकोर्टामध्ये गेल्यामुळे या सर्व प्रक्रियेला विलंब झाला असे या विधेयकाच्या उद्देश व कारणात नमूद केलेले आहे. मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. त्यांनी या बाबतीत कार्यतत्परता दाखविली आहे. आपण ज्या खुर्चीवर बसलो आहोत त्याचे त्यांना भान आहे. ज्याला क्रिएटिव्हिटी म्हणता येईल. त्यादृष्टीने आज महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचा उच्च शिक्षणाचा ओढा वाढला पाहिजे, त्यांची नोंदणी वाढली पाहिजे. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणामध्ये आले पाहिजे हा उद्देश ठेवून या वर्षापुरता मंत्री महोदयांनी हा निर्णय घेतलेला आहे. असा प्रकार दरवर्षी होणार नाही असेही त्यांचे म्हणणे आहे. फक्त या वर्षी विशेष बाब म्हणून विद्यार्थ्यांच्या हितासाठी या कायद्यात बदल करीत आहेत. हा विशाल दृष्टीकोन त्यांनी ठेवलेला आहे.

देशातील इतर राज्यातील उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची तुलना राज्यातील विद्यार्थ्यांबरोबर केली तर आपल्याकडे उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्याचे दिसून येते. ही संख्या वाढली पाहिजे असा उद्देशही याच्या पाठीमागे असावा असे मला वाटते. अत्यंत चांगला निर्णय त्यांनी घेतलेला आहे. दुसऱ्या मंत्र्यांनी पुढील वर्षी यावर निर्णय घेऊ असे कदाचित म्हटले असते. परंतु विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन एक वर्षासाठी का होईना त्यांनी हे सुधारणा विधेयक आणले आहे. म्हणून शिक्षण क्षेत्रातील एक कार्यकर्ता म्हणून मी त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, या निमित्ताने मी त्यांना विनंती करतो. नवीन महाविद्यालयांना मान्यता देत असताना यापूर्वी ज्या महाविद्यालयांना मान्यता दिलेली आहे त्या महाविद्यालयात किती विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे. तेथे किती विद्यार्थी शिक्षण घेत आहेत ? नवीन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

महाविद्यालयांसाठी करोडो रुपये खर्च केला जातो. मग शासकीय असतील किंवा खाजगी असतील. कला शाखेची असतील, विज्ञान शाखेची असतील किंवा वाणिज्य शाखेची असतील. ज्या महाविद्यालयासाठी लाखो रुपये खर्च झालेला असतो तेथे एखादाच विद्यार्थी प्रवेश घेतो. काही ठिकाणी दोनच विद्यार्थी शिक्षण घेत असल्याचे दिसून येते, मी हे पुराव्यानिशी बोलत आहे. नवीन महाविद्यालयांना परवानगी देत असताना अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांवर परिणाम होता कामा नये. जादा महाविद्यालये झाल्यामुळे शिक्षक जादा होत आहेत, त्यामुळे त्यांच्या नोकऱ्या अडचणीत आलेल्या आहेत. भविष्यात शासनाला याचाही विचार करावा लागेल. 20 ऑगस्ट, 2011 पर्यंत मुदत वाढविली असली तरी दिलेली मान्यता पुढील वर्षापासून सुरु होईल. या वर्षी मान्यता दिली असली तरी त्यांना पुढील वर्षापासून महाविद्यालय सुरु करता येईल. यामध्ये विद्यार्थ्यांचे हित जोपासले आहे असे मला वाटते. महाविद्यालये उशिरा सुरु झाली असल्यामुळे अभ्यासक्रम पूर्ण होऊ शकणार नाही. परंतु त्यांना हे माहीत आहे की, पुढील वर्षी आपल्याला मान्यता मिळणार आहे. राज्यातील उच्च शिक्षणाचा रेश्यो वाढविला पाहिजे यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. हा प्रयत्न करीत असताना या महाविद्यालयांना शासन अनुदान देणार आहे की नाही ? उद्देश व कारणात "कायम विना अनुदानित" असा शब्दप्रयोग केलेला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विज्ञानाचे ज्ञान द्यावयाचे असेल, किंवा कॉमर्स शाखेचे महाविद्यालय द्यावयाचे असेल तर ग्रामीण भागातील व्यवस्थापन कशारितीने चालणार आहे याचा विचार राज्यकर्ते म्हणून विचार करावा लागेल. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार व उच्च शिक्षण मिळाले पाहिजे हा शासनाचा विशाल दृष्टीकोन आहे त्याचा विचार एक तरुण व कार्यतत्पर मंत्री म्हणून त्यांनी करावा. या खात्याच्या दोन्ही मंत्री महोदयांना उच्च शिक्षणाची जाण आहे, कळवळा आहे. म्हणून पुढील वर्षापासून विद्यापीठाने बृहत् आराखडा तयार केला असला तरी शासकीय यंत्रणेला त्याचा आढावा ध्यावा लागेल. अस्तित्वात असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेतल्या नंतरच नवीन महाविद्यालयांना मान्यता द्यावी लागेल.

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

सभापती महोदय, शारीरिक शिक्षण व संगणक शास्त्राला अनुदान देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. 2001 साली कायम विना अनुदान धोरण शासनाने धोरण स्वीकारले आहे. त्यापूर्वीच्या अनुदानित महाविद्यालयात मग राज्य शास्त्र विषय असेल, समाज शास्त्र असेल, भूगोल शास्त्र असेल असे विषय सुध्दा कायम विना अनुदानितवर ठेवलेले आहेत. या महाविद्यालयात कायम विना अनुदान धोरण लागू नसताना आमचे या विषयाचे प्राध्यापक विना पगार तेथे काम करीत आहेत. याचाही विचार मंत्री महोदयांना करावा लागेल. मंत्री महोदयांनी तत्परतेने ही दुरुस्ती आणली आहे, ही चांगली बाब आहे. मी आपले अभिनंदन करतो. पण पुढील वर्षी महाविद्यालयांना मान्यता देत असताना सध्या अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची संख्या विचारात घ्यावी, त्याचा अभ्यास करावा व गरज असेल तरच नवीन महाविद्यालयांना मान्यता देताना उदात्त व उदार धोरण अंमलात आणावे अशी मी मागणी करतो आणि माझे भाषण संपवितो.

------

5.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री एस.क्यू.ज़मा (महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, कम्पेलिंग सिच्युएशन में सेक्शन 82 के मुताबिक उन्होंने एक वर्ष के लिए अनुमति लेना चाहा. 15 जून से विलंब हुआ और 22 जुलाई को ऑर्डर आया. एक साल के लिए किसी को भी परमिशन नहीं दे पाये. सम्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत जी, आपने कहा कि अगर सुप्रीम कोर्ट का फैसला अपनी सरकार के खिलाफ गया तो क्या होगा ? इसमें यही तो मुख्य मुद्दा है. सोसायटी कोर्ट में गई थी तो हाईकोर्ट का कहना है कि परमिशन की आवश्यकता नहीं है. मैं सम्माननीय सदस्य श्री रावते जी का ध्यान इस बात की ओर आकर्षित करना चाहूंगा कि हाईकोर्ट को यह कहते है कि हमारे प्राईव्हेट इन्स्टीटयुशन को, जिसको गवर्नमेंट को कोई अॅड नहीं देना है, कोई सपोर्ट नहीं करना है, उनको परमिशन देने के लिए यह क्लॉज गलत है, इसके लिए सरकार के पास परमिशन नहीं होनी चाहिए. यह मुद्दा हाईकोर्ट में भी चॅलेंज हुआ था. उसको सुप्रीम कोर्ट ने अभी स्टे दिया. सुप्रीम कोर्ट कहेगी कि सरकार को अधिकार ही नहीं है, परमिशन लेने की आवश्यकता ही नहीं है, कोई भी इसे खोल सकता है. यह तो हमारे राज्य के विद्यार्थियों के इन्ट्रेस के खिलाफ जाएगा. इसलिए अभी जो लिमिटेड परपज है कि 15 जून से विलंब हो गया, 20 अगस्त तक का समय दिया जाए. सम्माननीय सदस्य श्री विक्रम काले जी ने यहां पर बहुत सारे मुद्दे रखे है. यह सारी बातें बाद में आएगी. अभी इस बिल को पास करना बहुत ही अनिवार्य है, इसलिए मैं इस बिल का समर्थन करता हूं और अपना भाषण पूरा करता हूं.

-------------

इसके बाद श्री शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2011चे वि.स.वि. क्रमांक 40 - महाराष्ट्र विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, हे विधेयक कोणत्या तरी एका संस्थेच्या महाविद्यालयासाठी आणलेले असण्याची शक्यता आहे असे मला वाटते. हे विधेयक पास झाल्यानंतर त्या महाविद्यालयामध्ये प्रवेश देण्याचे काम सुरु होईल. या ठिकाणी गोंधळाचा कुणी तरी उल्लेख केला. आपण कॉमन वेल्थ संदर्भात बोलतो. आपल्या येथील लोकशाही ही ब्रिटीश पार्लमेण्टच्या धर्तीवर चालते. ब्रिटीश पार्लमेण्टमध्ये आणि आपल्या लोकसभेमध्येही गोंधळामध्ये विधेयके पास केली जात नाहीत. परंतु आपल्या महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. विधानसभेमध्ये आज गोंधळामध्ये 5 विधेयक मंजूर करण्यात आली. विधानसभेमध्ये विधेयके पास झाल्यानंतर ती लगेच विधानपरिषदेमध्ये आली. ती विधेयके वाचण्यासाठी देखील आम्हाला वेळ दिला जात नाही.

सभापती महोदय, आमच्या मराठवाड्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आहे. 1980 ते 1988 या काळात या विद्यापीठाचा कारभार चोख होता. परीक्षांचे निकाल लागण्याच्या बाबतीत महाराष्ट्रामध्ये हे विद्यापीठ पहिल्या क्रमांकावर होते. त्या बाबतीत मुंबई विद्यापीठालाही या विद्यापीठाने मागे टाकले होते. पण आता काय झाले ते कळत नाही. गेल्या 20-25 वर्षामध्ये या विद्यापीठाचा दर्जा खूप घसरला आहे. माननीय मंत्री महोदय हे मराठवाड्यातील आहेत. त्यांनी कुलगुरुंशी बोलून विद्यापीठाच्या संदर्भातील लहान लहान बाबींशी चर्चा करुन त्या विद्यापीठाचा दर्जा पूर्वी प्रमाणे चांगला करण्यामध्ये ज्या काही अडचणी येत असतील त्या दूर कराव्यात. एक म्हणजे मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासनामध्ये शिस्त राहिलेली नाही हे मंत्री महोदयांना मान्य करावे लागेल. तेथे रोज आंदोलने होत असतात. 365 दिवसापैकी 150 दिवस आंदोलने होत असतात. या विद्यापीठामध्ये विविध शैक्षणिक विभाग आहेत. त्या शैक्षणिक विभागातील प्रवेशाबाबत प्रचंड गोंधळ वाढत चालला आहे. अनेक फॅकल्टीजमध्ये प्राध्यापक आहेत परंतु शिक्षक नाहीत अशी परिस्थिती आहे. प्राध्यापकांना पगार द्याव्या लागतो. त्यामध्ये त्यांचा काही दोष नाही. शासनाने त्या फॅकल्टीजना मान्यता दिलेली असल्यामुळे प्राध्यापकांची नियुक्ती झाली. परंतु विद्यार्थीच नसल्यामुळे त्या फॅकल्टीज रिकाम्या आहेत. या विद्यापीठाअंतर्गत 14 अभियांत्रिकी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

शाळा आहेत. मराठवाड्याच्या 4 जिल्ह्यांची अवस्था अशी आहे की, अभियांत्रिकी शाळांमध्ये विद्यार्थी नाहीत.

आपण डीएड, बीएड कॉलेजची खिरापत वाटली. 10वी नंतर इलेक्ट्रोपॅथीला परवानगी दिली. इलेक्ट्रोपॅथी केलेले विद्यार्थी गळयामध्ये स्टेथस्कोप लावून फिरत आहेत. बीएड, डीएड कॉलेजची जशी खिरापत वाटली तशी अभियांत्रिकी शाळांची खिरापत मराठवाड्यात वाटली. आता त्या शाळांमध्ये विद्यार्थी नाहीत. तेव्हा अशा प्रकारे खिरापत वाटण्यावर निर्बंध आणणार की नाही, हा खरा प्रश्न आहे. या अभियांत्रिकी शाळांना स्वायत्ततेचा दर्जा दिलेला आहे. त्यांनी वेळेवर परीक्षा घेतल्या पाहिजे. मी जास्त काही सांगत नाही. परंतु कायद्यामध्ये अशी तरतूद आहे की 16 जूनला परीक्षा झाल्यानंतर 1 महिन्यामध्ये निकाल लागला पाहिजे. परंतु अजूनपर्यन्त निकाल लागलेला नाही. महाराष्ट्रातील अन्य सर्व विद्यापीठांच्या परीक्षांचे निकाल एक महिन्याच्या आत लागले. ज्या विद्यापीठांचे निकाल लागले त्या विद्यापीठातील सर्व मुले नोकरीला लागलेली आहेत. मात्र मराठवाडा विद्यापीठाच्या परीक्षांचे निकाल अद्याप न लागल्यामुळे ती मुले घरी बसलेली आहेत. विद्यापीठाच्या अनास्थेमुळे त्या विद्यार्थ्यांना नोकरीची संधी गमवावी लागत आहे. बेकारीमुळे हे तरुण फिरत बसतात. ही जबाबदारी कोणाची ? मराठवाडा विद्यापीठामध्ये अभियांत्रिकी, वैद्यकीय शिक्षणाच्या जागा वाढवून घेतल्या. त्या शिक्षणासाठी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यानंतर परीक्षांचे निकाल वेळेवर लागत नसतील तर विद्यार्थ्यांसाठी ही दुर्दैवाची बाब आहे. महाराष्ट्रातील इतर विद्यापीठातील परीक्षांचे निकाल 40 दिवसात लागले. जेथे जेथे व्हॅकन्सीज होत्या तेथे तेथे त्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांना नोकरी मिळाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठातील विद्यार्थ्यांना ती संधी परीक्षांचे निकाल न लागल्यामुळे मिळालेली नाही.

मराठवाडा विद्यापीठाला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव दिलेले आहे. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कर्तृत्वाला शोभेल असा या विद्यापीठाचा कारभार होणे गरजेचे आहे. या विद्यापीठाच्या कुलगुरुंचा विषय मंत्री महोदयांना माहीत आहे. तेथे अनेक गोष्टी विचित्रपणे चालत असतात. तेथील कुलगुरुंना फारच त्रास होत असतो. तेथे नेहमी विद्यार्थ्यांचा संघर्ष चालू असतो. अशा परिस्थितीमध्ये तेथील कुलगुरु विद्यापीठ चालवित असतात. मंत्री महोदय हे मराठवाड्यातील असल्यामुळे त्यांनी या मराठवाडा विद्यापीठाची सुधारणा केली तर ते मराठवाड्याच्या दृष्टीने

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

लौकिकास पात्र होतील आणि मराठवाड्यातील लोकांना देखील आनंद वाटेल. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर नवीन विद्यापीठाला मान्यता दिली आणि त्याबद्दल उच्च न्यायालयाने निर्णय दिला तर त्या बाबतीत काय करणार याचा मंत्री महोदयांनी खुलासा करावा एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2011चे वि.स.वि. क्रमांक 40- महाराष्ट्र विद्यापीठ (दुसरी सुधारणा) विधेयकासंबंधी माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी कलम 5 (अ) मधील तरतुदी संबंधी हे विधेयक आणलेले आहे असे सांगितले. छोटीशी तांत्रिक बाब निर्माण झालेली आहे. "14 ऑगस्ट 2011" असे छापलेले आहे त्याऐवजी "20 ऑगस्ट 2011" असे समजायचे आहे. आजची तारीख 10 ऑगस्ट आहे. 11 आणि 12 ऑगस्ट हे दोनच दिवस रहातात. 13 आणि 14 ऑगस्टला सुट्टी आलेली आहे. त्यामुळे ऑगस्टच्या 20 तारखेपर्यन्त मुदत वाढविण्याची आवश्यकता आहे. संबंधित संस्थाकडून कायम विनाअनुदान तत्वावर महाविद्यालये सुरु करण्यासाठी जे प्रस्ताव विद्यापीठाकडे येतात त्या प्रस्तावांची छाननी विद्यापीठाच्या माध्यमातून होते. ही सर्व तपासणी झाल्यानंतर सर्व प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी येतात. ते येत असताना महाविद्यालयाकडे असलेले इन्फ्रास्ट्रक्चर, संस्थेची नोंदणी, उपलब्ध जागा इत्यादी गोष्टींची पडताळणी करुन शिफारशीसह प्रस्ताव जेव्हा शासनाकडे येतात त्यावेळी शासनाकडून महाविद्यालय सुरु करण्यासंबंधीच्या प्रस्तावाला परवानगी दिली जाते.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/पूर्वी श्री.शिगम.... 18:45

श्री.रामनाथ मोते........

ही परवानगी वेळेवर दिली जावी आणि ती महाविद्यालये वेळेवर सुरु व्हावीत. याठिकाणी विद्यापीठ कायद्यामध्ये बदल प्रस्तावित केला आहे. न्यायालयाच्या निर्णयामुळे अडचण निर्माण झाली. त्यामुळे हा खटाटोप करावा लागला. जे प्रस्ताव शासनाकडे आलेले आहेत, न्यायालयीन प्रक्रियेमुळे या वर्षी ती महाविद्यालये सुरु होणे अपेक्षित होते किंवा शासनाने परवानगी देणे अपेक्षित होते, त्या महाविद्यालयांना शासनाने अद्याप मान्यता दिलेली नाही. माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी सांगितल्याप्रमाणे जरी आता शासनाने परवानगी दिली तरी महाविद्यालये पुढील वर्षी सुरु होतील या संकल्पनेशी मी सहमत नाही. कारण शासनाकडे आलेल्या प्रस्तावांना 15 जूनपर्यंतच परवानगी द्यायची आहे. याचा अर्थ 15 जूनपासून त्यांचे प्रवेश त्या त्या शैक्षणिक वर्षात सुरु होतील. या वर्षी विलंब झाला आहे. याचा अर्थ तांत्रिक बाब दुरुस्त करुन महाविद्यालयांना परवानगी देणार आहात. मूळ विषय हा या दुरुस्तीनंतर ज्या महाविद्यालयांना 20 ऑगस्टपर्यंत परवानगी दिली जाणार आहे ती महाविद्यालये माझ्या समजुतीप्रमाणे कदाचित शासनाचे वा मंत्री महोदयांचे मत वेगळे असू शकते, परंतु ही महाविद्यालये शासनाने परवानगी दिल्यानंतर 2011-2012 या वर्षापासूनच सुरु होतील. या संदर्भात खुलासा व्हावा अशा प्रकारची विनंती करतो.

सभापती महोदय, खरोखरच आपल्याला ज्या ठिकाणी महाविद्यालयांची आवश्यकता आहे त्या ठिकाणी परवानगी दिली पाहिजे. अनेक माननीय सदस्यांनी सांगितले की, महाविद्यालयांची संख्या भरपूर आहे परंतु विद्यार्थी संख्या कमी आहे. त्यामुळे महाविद्यालये बंद पडत आहेत. अशा परिस्थितीत ज्या ठिकाणी एक महाविद्यालय आवश्यक असताना चार महाविद्यालयांना मंजुरी दिली गेली असेल तर साहजिकच काही महाविद्यालयांना पुरेसे विद्यार्थी मिळणार नाहीत. ज्या ठिकाणी खरोखरच महाविद्यालयाची आवश्यकता आहे, खरोखरच उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची पुरेशी संख्या आहे परंतु महाविद्यालय मंजूर झालेले नाही अशा ठिकाणी नवीन महाविद्यालय मंजूर करणे आवश्यक असेल तरच त्या ठिकाणी शासनाने महाविद्यालयाला परवानगी दिली पाहिजे. त्या संदर्भात शालेय शिक्षण विभागाने ज्याप्रमाणे बृहत आराखडा तयार केला तसा महाविद्यालय स्तरावरील बृहत आराखडा तयार करुन जाहीर करावा. म्हणजे लोकांना कोणत्या ठिकाणी महाविद्यालयाची आवश्यकता आहे हे समजून येईल. ही परवानगी देत असताना ज्या ग्रामीण भागातील संस्था आहेत किंवा आदिवासी भागातील संस्था आहेत, ठाणे जिल्हयातील पाच ते सहा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते........

तालुके आदिवासी आहेत, अशा आदिवासी भागातील छोटेसे महाविद्यालय असेल, तेथे काही त्रुटी असल्या किंवा इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये कमतरता असली तरी आदिवासी भागातील मुले महाविद्यालयीन शिक्षणाची सोय झाली नाही तर उच्च शिक्षणापासून वंचित राहतील. अशा आदिवासी आणि ग्रामीण भागामध्ये नवीन महाविद्यालय मंजूर करीत असताना प्राधान्याने विचार व्हावा.

सभापती महोदय, नवीन महाविद्यालय सुरु झाल्यानंतर शासनाकडून अनुदान मिळणार नाही. न्यायालयाचा निकाल जो काही लागेल तो शासनाच्या विरुध्द लागला तरी संलग्नता मिळविताना विद्यापीठाची परवानगी त्यांना घ्यावीच लागेल. परंतु या महाविद्यालयात काम करणाऱ्या प्राध्यापकांना देखील चांगल्या प्रकारचे वेतन मिळेल, शासकीय नियमाप्रमाणे वेतन मिळेल अशा प्रकारचे हमीपत्र किंवा अंडरटेकिंग संबंधित महाविद्यालयाच्या संस्थेकडून घेणार आहात का? हमी पत्र घेतले तर कागदोपत्री पालन करतील हा एक भाग आहे. किमान अशी अट लादणे किंवा मान्यता देताना हा निकष बंधनकारक करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मध्यंतरी शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने अत्यंत महत्वाचा निर्णय घेतला. ग्रामीण भागात जी महाविद्यालये सुरु आहेत तेथे शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार किमान एका तालुक्यामध्ये एक महाविद्यालय अनुदान तत्वावर असले पाहिजे, किमान एक तरी फॅकल्टी अनुदानावर असली पाहिजे. त्या संदर्भातील आराखडा तयार केला आहे. कोणत्या ठिकाणी कोणत्या फॅकल्टीचा बॅकलॉग आहे हे तपासावयाचे आहे. कला शाखा, वाणिज्य शाखा आहे परंतु विज्ञान शाखा नाही अशा ठिकाणी किमान विज्ञान शाखा सुरु करण्यासाठी अनुदानावर परवानगी देता येईल. अशा प्रकारचा आराखडा शासनाने तयार केला आहे. त्या दृष्टीकोनातून शासन परवानगी देते. अशा प्रकारे कोणत्या भागातील विद्यार्थ्यांना 12 वी उत्तीर्ण झाल्यानंतर उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी महाविद्यालय मंजूर करणे आवश्यक आहे त्या दृष्टीने एक बृहत आराखडा तयार होणे आवश्यक आहे एवढे बोलून मी या विधेयकाचे समर्थन करुन माझे भाषण संपवितो.

---------

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/पूर्वी श्री.शिगम.... 18:45

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, शासनाने 1994 च्या विद्यापीठ कायद्यामध्ये सुधारणा आणलेली आहे. ही सुधारणा करणे आवश्यक आहे. न्यायालयीन निर्णयाच्या आधीन राहून या संदर्भात सुधारणा करणे आवश्यक ठरले आहे. मी आदरणीय उच्च शिक्षण मंत्र्यांचे दोन-तीन मुद्यांकडे लक्ष वेधू इच्छितो.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये कायम विनाअनुदान तत्वावर महाविद्यालये सुरु आहेत आणि भविष्यात नवीन महाविद्यालयांना परवानगी दिली जाणार आहे. एआयसीटीईचे रिमार्क्स, इंडियन मेडिकल कौन्सिलचे रिमार्क्स, एनसीईआरटीचे रिमार्क्स लक्षात घेता महाराष्ट्रातील ज्या महाविद्यालयांना आपण मान्यता देण्यास निघालो आहोत त्यामुळे दोन गोष्टी घडत आहेत, एक म्हणजे आताची त्यांची जी आंतर प्रवेश क्षमता आहे तेवढे विद्यार्थी त्या त्या महाविद्यालयांना मिळत नाहीत. त्या महाविद्यालयांना विद्यार्थ्यांच्या शोधात फिरावे लागते ही वस्तुस्थिती आहे. या सर्व संस्थांबाबत केंद्रीय संस्थांचे अहवाल आपल्या राज्याकडे प्राप्त होतात, त्यामध्ये जे रिमार्क्स असतात ते लक्षात घेतले तर महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाचा दर्जा कमालीच्या वेगाने ढासळत आहे असे दिसून येते. आज एका विशिष्ट परिस्थितीत ही सुधारणा आणली आहे, ती आणण्याची गरज निर्माण झाली आहे. मूळ 1962 चा कायदा, 1975 चा कायदा आणि 1994 चा कायदा महाराष्ट्रातील विद्यापीठांना लागू केलेला आहे. या सर्व कायद्यांच्या माध्यमातून लक्षात येते की, आज विद्यापीठामध्ये अस्तित्वात असलेली अधिकार मंडळे मग त्यात व्यवस्थापन परिषद असेल, विद्वत्ता परिषद असेल या सर्व अधिकार मंडळांनी विद्यापीठाच्या गुणवत्तेवर, विकासावर जेवढे नियंत्रण ठेवले पाहिजे तेवढे ती ठेवू शकली नाहीत. पुढील काळात गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने, नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने अशा प्रकारची सुधारणा आणण्याची गरज आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी महत्वाच्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधले आहे. त्या मुद्याची मी पुनरावृत्ती करु इच्छितो. या महाविद्यालयांमध्ये काम करणारा जो शिक्षक वर्ग आहे त्याच्या हातात किती मेहनताना दिला जातो, कागदोपत्री किती मिळतो आणि प्रत्यक्षात किती मिळतो यावर विद्यापीठाचे नियंत्रण नाही. शासनाचे तर या संदर्भात अजिबात नियंत्रण नाही. टिचिंग कम्युनिटीचे, शिक्षकांचे कमालीचे शोषण होत आहे. त्याचाही परिणाम शिक्षणाच्या गुणवत्तेवर होतो. शिक्षण संस्था या शैक्षणिक दृष्टीकोनातून चालविताना व्यापारी तंत्रातून, मनी मेकींग इन्स्टिट्यूट म्हणून चालविल्या जात आहेत.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/पूर्वी श्री.शिगम.... 18:45

श्री.भगवान साळुंखे.......

सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, नवीन महाविद्यालयांना परवानगी देत असताना बाजारु वृत्तीने पुढे येणारी मंडळी असतील त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे. महाविद्यालयांना मान्यता देत असताना 20 ऑगस्ट दरम्यान मान्यता देण्यात आल्यानंतर शासनाचे मंजुरी आदेश संबंधित संस्थेला व विद्यापीठाला पोहोचून महाविद्यालयाचे प्रत्यक्ष दार उघडून प्रवेश प्रक्रिया सुरु होण्यास सप्टेंबर महिना उजाडणार आहे. प्रत्यक्ष महाविद्यालय ऑक्टोबर महिन्यात सुरु होईल. त्या महिन्यात पहिले सत्र संपलेले असेल आणि शेवटच्या आठवड्यात सत्र परीक्षा सुरु होईल. प्राप्त परिस्थितीत काही महाविद्यालयांमध्ये सेमिस्टर सिस्टीम असते, तेथे सेमिस्टर परीक्षा घेतली जाते. काही अभ्यासक्रमासाठी वार्षिक परीक्षा घेतली जाते. असे दोन प्रकारचे अभ्यासक्रम असणारी बहुतेक महाविद्यालये आहेत. म्हणून सेमिस्टर सिस्टीमचा अभ्यासक्रम असेल तेथे पहिली सत्र परीक्षा ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यामध्ये सुरु होईल, अशा वेळी ही नव्याने मान्यता दिलेली महाविद्यालये सप्टेंबर महिन्यात सुरु होणार असतील तर पुढच्या महिन्याभरात अभ्यासक्रम कसा पूर्ण होईल? प्रॅक्टिकल्स कशा पूर्ण करणार आहात? हे सर्व अनाकलनीय आहे. ज्या ठिकाणी सेमिस्टर सिस्टीम डिसेंबरपर्यंत सुरु होते त्यांना तीन महिन्यांचा कालावधी मिळणार असल्यामुळे सेमिस्टरचा अभ्यासक्रम पूर्ण करता येईल. परंतु सत्र परीक्षा ऑक्टोबरमध्ये येणार आहे त्यांना ऑक्टोबरमध्ये मान्यता देऊ शकता........

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवानराव साळुंखे .....

पण कॉलेजेस चालू शकतील असे वातावरण नाही म्हणून पुढील वर्षी नव्याने परवानगी घेऊन कॉलेज चालवू शकतील अशी परिस्थिती होणार आहे. तसेच या कॉलेजेसची क्वॉलिटी कंट्रोल, त्यातील शिक्षकांचा अभाव आणि विद्यार्थ्यांकडून वसुली करण्यावर नियंत्रण या सर्व गोष्टींचा विचार होणे आवश्यक आहे, एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

-------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : महोदय, या विधेयकाच्या संदर्भात मला फक्त एक दोन गोष्टींचा खुलासा मंत्री महोदयांकडून होणे गरजेचे आहे असे वाटते. त्यात प्रथम इतक्या उशीरा कॉलेजला मान्यता दिल्यानंतर विद्यार्थी मिळतील काय हा पहिला भाग आहे. तसेच चांगल्या संस्थांमध्ये जी महाविद्यालये कायम विना अनुदानित तत्वावर मंजूर केली आहेत त्यामध्ये आताच पात्र शिक्षक मिळत नाहीत. तीन वर्षापूर्वी आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठात बीसीए व बीसीएस असे दोन कोर्सेस मान्य केले. त्यानुसार या दोन विषयासाठी जवळपास 15 हजार विद्यार्थी मिळाले. या विषयांसाठी विद्यापीठाच्या अंतर्गत असलेल्या सर्व महाविद्यालयात मिळून 300 शिक्षक पात्र दाखविण्यात आले. पण वार्षिक परीक्षा झाल्यानंतर जेव्हा पेपर तपासण्याची वेळ आली तेव्हा पात्र शिक्षक फक्त 9-10 एवढेच मिळाले व त्या विषयांचा निकाल लागण्यासाठी 9 महिन्यांचा कालावधी लागला याचाही विचार करण्याची गरज आहे. शासनाने काही विद्यापीठांना पी.जी. कोर्सेस दिले पण नुकतेच मराठवाड्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठात इलेक्शन झाले. मंत्री महोदय मराठवाड्याचे नेतृत्व करीत असल्याने त्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. पण शिक्षक प्रतिनिधींची निवडणूक झाली व ज्या 20 जागा होत्या पण चार विषयाला सिनेटला पात्र उमेदवारच मिळाले नाहीत. तसेच 16 विषय असे निघाले की, त्यासाठी पात्र शिक्षक मिळाले नाहीत. मग इतके दिवस दिलेले अनुदानित तत्वावरील कोर्सेस बंद करणार काय याचेही स्पष्टीकरण झाले पाहिजे. आपणच केलेल्या कायद्यानुसार विद्यापीठाच्या निवडणुकांसाठी पात्र शिक्षक मिळत नसतील तर विद्यापीठामध्ये शिकविण्यासाठी ते शिक्षक पात्र आहेत काय याचा विचार होणे आवश्यक आहे. असे असेल तर त्यांना आपण पगार का व कशासाठी देतो हे समजत नाही. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचा मराठवाड्याशी अगदी जवळून परिचय आहे. मराठवाड्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाला शिस्त नाही असे ते म्हणाले, हे खरे आहे. आमच्या विद्यापीठाचे कुलगुरु हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे आहेत पण त्यांचा प्रशासनाचा अनुभव मात्र शुन्य आहे हे त्यांच्या आजवरच्या कामगिरीवरुन दिसून येते. औरंगाबादच्या आजच्या लोकमतमध्ये बातमी आहे की, प्राणीशास्त्र विषयासाठी या विद्यापीठात यावर्षी 33 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आणि आपण त्यासाठी आपण 19 शिक्षकांना पगार देतो. शिक्षकेतर कर्मचारी वेगळेच आहेत. या सर्वांचा पगार 21 लाख रुपये देतो व विद्यार्थी मात्र फक्त

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण.......

33 आहेत. हे कशामुळे झाले तर प्रत्येक तालुक्या-तालुक्याला आपण किती कोर्सेस दिले आहेत आणि त्या कोर्सेससाठी पात्र शिक्षक नसल्यामुळे ही परिस्थिती उद्‌भवली आहे. यामध्ये राज्य शासनाची चूक आहे असे मी म्हणत नाही. ज्या पध्दतीने बृहत आराखडा बनवून देतो त्याची पुन्हा तज्ज्ञांकडून तपासणी होण्याची गरज आहे असेही मला सुचवावयाचे आहे. मंत्री महोदयांचा या विधेयकामागील हेतू अतिशय चांगला आहे कारण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे, पण ज्या बृहत आराखड्याच्या आधारावर आपण कॉलेजेस देतो तो आराखडा टास्क फोर्सकडून बनविण्याची गरज आहे. कारण असे बृहत आराखडे छाननी न करताच बनविण्यात आलेले असतात अशी माझी माहिती आहे.

महोदय, या निमित्ताने मी एक उदाहरण देऊ इच्छितो की, 1400 लोकवस्तीचे एक गांव आहे पण तेथे दोन महाविद्यालये दोन वर्षापूर्वी दिलेली आहेत. या महाविद्यालयांची इंटेक कपॅसिटी 1600 मुलांची आहे. जेव्हा कॉलेजमधून परीक्षेचे फॉर्म्स भरण्यात आले तेव्हा 1600 मुलांची क्षमता असलेल्या कॉलेजमध्ये फक्त 200 मुलांचीच बसण्याची व्यवस्था होती हे विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांच्या तपासणीच्या वेळेला लक्षात आले, तेव्हा ही बाब उघडकीस आली. अशा गोष्टींचाही विचार करावा. म्हणून छाननी करताना टास्क फोर्स स्थापन करुन त्यांच्यामार्फत अशी छाननी करावी. तसेच ज्याप्रमाणे सन 1994 च्या कायद्यानुसार अमर्याद अधिकार विद्यापीठांना दिलेले आहेत त्याचीही चिकित्सा होणे आवश्यक आहे. विद्यापीठांना इतके अधिकार दिल्यानंतर ती विद्यापीठे सक्षमरित्या चालतील काय, त्यांचा कॉलेजेसवर अंकुश राहील की नाही याचा सुध्दा विचार होणे आवश्यक आहे. मी शेवटी मंत्री महोदयांना विनंती करु इच्छितो की, हे कॉलेज सुध्दा आपण जरुर द्यावे, आमची हरकत नाही, पण पात्र शिक्षक मिळाल्याची पडताळणी करुनच ही परवानगी देण्यात यावी अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

--------



अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : महोदय, या विधेयकावर सभागृहात ज्येष्ठ सदस्य सन्माननीय सर्वश्री. दिवाकर रावते, रामनाथ मोते, विक्रम काळे, सतीश चव्हाण, भगवानराव साळुंखे या सर्वांनी आपले विचार व्यक्त केले. हे विधेयक येथे का आणले याबाबतीत मी सुरुवातीलाच खुलासा केला. एका केसमध्ये झालेल्या उशिरामुळे हा बदल आपण करीत आहोत. अधिक स्पष्टतेसाठी इतकेच सांगू इच्छितो की, विधेयकात 14 ऑगस्ट जी तारीख आहे त्याऐवजी 20 ऑगस्ट अशी वाचावी व विधानसभेत या सुधारणेसह हे विधेयक मंजूर करण्यात आले आहे. त्याचबरोबर सर्वांनाच असा प्रश्न पडला आहे की, यासाठी उशीर झाला. यासंदर्भात मी सांगणार आहे की, अनेक ठिकाणी कॉलेजेस सुरु करण्यासाठी आपल्यातूनच मागणी असते. दुर्गम भागात असेल किंवा अनेक वेळेला ग्रामीण भागात देखील अशी महाविद्यालये सुरु व्हावीत अशी अपेक्षा असते. त्या अनुषंगाने हे विधेयक आज आणले आहे. पण ही सर्व महाविद्यालये पूर्ण भरतील काय अशी शंका सुध्दा घेण्यात आली. मी सांगू इच्छितो की, नक्कीच उशीर झाल्यामुळे पाहिजे तशी परिस्थिती राहणार नाही म्हणून ही परवानगी आपण दोन वर्षासाठी देत आहोत. यावर्षी जरी महाविद्यालय सुरु झाले नाही तरी पुढील वर्षी ते चालू होऊ शकते. थोडक्यात मी इतकेच सांगू इच्छितो की, येथे चर्चा करताना बऱ्याच धोरणात्मक गोष्टींवर चर्चा झालेली आहे.

आपल्या देशाच्या फेडरल गव्हर्नमेंटने सुध्दा यासंदर्भात "सॅम पित्रोदा" यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित केली होती. याला आपण नॅशनल कॉलेज कमिशन म्हणतो. त्यांचा अहवाल मंत्रिमंडळाने स्वीकारला. या अहवालात इव्हॅल्युएशन, एक्सलन्स आणि इन्क्लुजन्स अशी त्रिसूत्री दिलेली आहे. या त्रिसूत्रीच्या माध्यमातून या उच्च शिक्षणाच्या विषयाचा आपण विचार करीत आहोत.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे .......

शिक्षणाचा विस्तार, शिक्षणाचा दर्जा व समाजातील सर्व घटकांना शिक्षणाचा हक्क मिळाला पाहिजे, त्यांना उच्च शिक्षण मिळाले पाहिजे, या त्रिसूत्रीतून केंद्र सरकारने व राज्य शासनाने शिक्षणाचे धोरण आखलेले आहे. आपल्या राज्याचा ग्रॉस एनरोलमेंट रेश्यो 13 टक्के आहे व देशाचा 11 टक्के आहे. दहावी,बारावी झाल्यानंतर म्हणजे वय वर्षे 18 ते 23 यामध्ये 13 टक्के विद्यार्थी पदवीपर्यंत पोहचतात. आपल्या राज्यात विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षण घेण्याचे प्रमाण 13 टक्के असून हेच देशात प्रमाण 11 टक्के आहे. सन 2022 पर्यंत उच्च शिक्षणाचे प्रमाण हे किमान 20 टक्के झाले पाहिजे. यासाठी शासनाने धोरणे राबवणे आवश्यक आहे. ग्रॉस एन्रोलमेंट रेश्यो वाढविणे आवश्यक आहे. परंतु शिक्षणाचा विस्तार करीत असतांना शिक्षणाचा दर्जा कोणत्याही परिस्थितीत घसरता कामा नये,तसेच समाजातील सर्व घटकांना शिक्षणाची सोय उपलब्ध झाली पाहिजे,हा त्या मागील मुख्य उद्देश आहे.

सभापती महोदय, मागच्या काळापर्यंत विद्यापीठ ज्या काही शिफारशी करीत होते, त्याला आपण परवानग्या देत होतो. विद्यापीठाने नकारार्थी शिफारशी केल्या तरी त्याला आम्ही परवानग्या देत होतो. सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावनांची गांभीर्याने नोंदी घेण्यात आल्या असून या संदर्भात आम्ही स्ट्रीक्ट गाईडलाईन्स तयार केल्या आहेत. सभागृहाला मला एवढेच सांगावयाचे आहे की, स्ट्रीक्ट गाईडलाईन्समध्ये एकूण 26 मुद्दे अंतर्भूत आहेत. परंतु त्यातील 3 मुद्यांचाच उल्लेख मी या ठिकाणी करणार आहे. 5 एकर जमीन असलीच पाहिजे, असे बंधनकारक केले आहे. मूलभूत सुविधा उपलब्ध नसतांना कोणी ऐऱ्या-गैऱ्याने महाविद्यालय सुरु करु नये, यासाठी आर्थिक परिस्थिती चांगली आहे का, हे पाहण्यासाठी 5 लाख रुपयांचा डीडी अनिवार्य केलेला आहे. त्याच बरोबर एखाद्याने भाडयाने इमारत घेतली असेल तर त्याच्या रजिस्ट्रेशन डॉक्युमेंटची अट घालून दिली असून विद्यापीठाला या सर्व स्ट्रीक्ट गाईडलाईन्स पाळाव्या लागणार आहेत. त्यामुळेच विद्यापीठांचे शिफारस करण्याचे प्रमाण सुध्दा खूप कमी झाले आहे. विद्यापीठ कायद्यानुसार, बृहत आराखडा तयार करण्याची जबाबदारी विद्यापीठाची आहे. विद्यापीठ बृहत आराखडा तयार करते. साधारणपणे 30 ऑक्टोबर पर्यंत अर्ज मागवले जातात. आमच्या गाईडलाईन्स प्रमाणे तपासणी करुन

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे .......

शिफारशी करण्याचा प्रोसिजरल भाग आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत म्हणाले की, चेहरे बघून काम होते, टेबलाखालून दिल्यानंतर काम होते. परंतु मी माझ्या विभागापुरते सांगू इच्छितो की, जे प्रस्ताव गाईडलाईनमध्ये बसतात व ज्यांनी शिफारस केली आहे मग ते कोणत्याही पक्षाचे असो किंवा कोणीही असले तरी त्यांना मान्यता दिली जाते. अभ्यासक्रम कोणता असावा हा विषय विद्यापीठांचा असतो. विद्यापीठात कोणत्या अभ्यासक्रमाला चालना द्यावयाची आहे, याचा निर्णय विद्यापीठ करते व त्यासंदर्भात बृहत आराखडा तयार केला जातो. बृहत आराखडया प्रमाणे विद्यापीठ शिफारस करते व गाईडलाईन प्रमाणे आम्ही मान्यता देण्याचे काम करीत असतो.

सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे तसेच सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी विचारणा केली आहे की, रिक्त जागा किती आहेत व किती कॉलेजांना मान्यता दिली पाहिजेत. विद्यार्थ्यांची इन्टेक कॅपेसीटी जेवढी असेल तेवढी भरावी, अशी अपेक्षा राज्य शासनाची निश्चितपणे नाही. अशी अपेक्षा ठेवली तर आदिवासी, दुर्गम तसेच डोंगरी भागामध्ये 120 विद्यार्थ्यांची तुकडी असते त्या भागात केवळ 40-50 विद्यार्थी मिळू शकतील म्हणून त्या ठिकाणी कॉलेज दिले जाऊ नये काय ? एखादी संस्था अनुदानावर आणावयाची असेल तर त्यासाठी तुकडीची उपस्थिती 50 टक्के ठेवलेली आहे. मला एवढेच सांगावयाचे आहे की, आज 100 टक्के रिक्त जागा आणि इन्टेक कॅपेसीटी याची तुलना करुन कॉलेज द्यावे, असा शासनाचा काहीही विचार नाही. याचा अर्थ सरसकट कोणालाही कॉलेजेस द्यावयाचे असे नाही, हे मला या निमित्ताने सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, वाटपामध्ये पारदर्शकता ठेवली जाणार आहे तसेच दर्जाच्या संदर्भात तडजोड करण्याचा शासनाचा अजिबात हेतू नाही. अलीकडच्या काळात कॉलेजेसचा की परफॉर्मींग इंडेक्सचा पॅरामिटर आम्ही दिलेला आहे. प्रत्येक कॉलेजने यापुढे ॲक्रिडीएशन करुन घेतले पाहिजे. कोणत्या दर्जाचे कॉलेज आहे, त्यासंदर्भात त्या कॉलेजने ॲक्रिडीएशन केले पाहिजे असे आम्ही अनुदानित कॉलेजांना सांगितले असून त्यांनी तसे केले नाही तर त्यांचे अनुदान थांबविण्यात येईल, अशा सूचना देखील आम्ही दिलेल्या आहेत. कायम विना अनुदानित तत्वावरील



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे .......

कॉलेजांना सुध्दा ॲक्रिडीएशन करणे अनिवार्य केले आहे. प्राचार्यांच्या परफॉर्मन्स अप्रायझल संदर्भात नवीन सर्क्युलर काढलेले आहे. त्यामुळे मी आपणाला सांगू इच्छितो की, दर्जाच्या संदर्भात आम्ही निश्चितपणे दक्ष आहोत.

सन्माननीय सदस्य श्री. भगवान साळुंखे यांनी गुणवत्तेच्या व नियंत्रणाच्या संदर्भात मुद्दे उपस्थित केलेले आहेत. यासंदर्भात मी एवढेच सांगू इच्छितो की, उच्च शिक्षणाचे कायम स्वरुपी धोरण ठरवण्याच्या संदर्भात 3 समित्या गठीत केलेल्या आहेत. दि.16 ऑगस्ट, 2011 रोजी माननीय राज्यपाल महोदयाच्या उपस्थितीत जेव्हीसीची बैठक घेतली जाणार असून रिपोर्ट सादर केला जाणार आहे. डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी गठीत केलेली असून दुसरी कमिटी श्री. राम ताकवले यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठाचे विभाजन करावयाचे की, नवीन कॅंपसेस तयार करावयाचे यासाठी गठीत केली आहे. तिसरी कमिटी श्री.निगवेकरांच्या अध्यक्षतेखाली गठीत केली असून या कमिटीपुढे विद्यापीठ कायदे व त्यातील तरतुदीचा विषय आहे. विद्यापीठ कायदा हा जुना कायदा असल्यामुळे, त्यातील अनेक तरतुदी बदलवण्याची आवश्यकता आहे. या सर्व तरतुदींचा अभ्यास करुन उच्च शिक्षणामध्ये जेवढे काही अधिनियम आहेत त्याचा अभ्यास करुन त्यामध्ये सुधारणा करण्याचे काम निगवेकरांची कमिटी करीत असते. हा अहवाल 16 ऑगस्ट, 2011 रोजी सादर झाल्यानंतर त्यामध्ये महत्वाचे धोरणात्मक बदल केले जातील. मग तो प्राध्यापकांच्या पगाराचा विषय असेल, दर्जाच्या संदर्भातील विषय असेल या सगळया गोष्टींची निश्चितपणे काळजी घेण्यात येईल, असा विश्वास मी व्यक्त करु इच्छितो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी पात्र शिक्षकांचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. सध्या पात्र शिक्षकांचा मोठा अभाव आहे, ही वस्तुस्थिती आहे. नेट,सेट व पीएच.डी. पात्र शिक्षक कसे मिळतील, याबाबतीत नवीन धोरणात्मक पाऊले उचलणे आवश्यक आहे. अधिकाधिक विद्यार्थी नेट,सेट परीक्षा पास होण्यासाठी विद्यापीठांवर जबाबदारी टाकली आहे. विद्यापीठांनी या परीक्षांचे जास्तीत जास्त कोचींग विद्यार्थ्यांना देण्याची आवश्यकता आहे. नेट,सेट परीक्षा पास होऊन आपल्या भागात अधिकाधिक मान्यताप्राप्त शिक्षक कसे मिळतील, यासंदर्भात आम्ही प्रयत्न करीत आहोत.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे...

त्यामुळे माझा सांगण्याचा मुद्दा हा आहे की, सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या मुद्दयांबाबत निश्चितपणे विचार करण्यात येईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी मुद्या मांडला आहे, त्या बद्दल निश्चितपणे विचार करु. आपण अभियांत्रिकी महाविद्यालया संदर्भांत मुद्या उपस्थित केला. एआयसीटी ही एक अपेक्स संस्था असून ती परवानगी देण्याचे काम करते व आम्ही नाममात्र सही करण्याचे काम करतो. ओआयसीटीकडे प्रस्ताव गेल्यानंतर सर्व प्रकारच्या पात्रता पाहून ती संस्था मंजुरी देत असते. एक गोष्ट खरी आहे की, अलिकडे इंजिनिअरींग कॉलेजमध्ये जागा रिक्त राहण्याचे प्रमाण खूप वाढले आहे. त्यामुळे यापुढील काळात इंजिनिअरींग कॉलेज आणि एमबीए कॉलेजना लगाम घालण्याची आवश्यकता आहे. राज्य शासन म्हणून अशी भूमिका घेण्याची आवश्यकता आहे की, आता सॅच्युरेशन पॉईंट आलेला आहे, त्यामुळे यापुढे नवीन इंजिनिअरींग कॉलेजला परवानगी देण्यात येऊ नये याबाबत राज्य शासन येणाऱ्या काळात एआयसीटीला निश्चितपणे सूचना करील. अशाप्रकारचा विश्वास मी याठिकाणी व्यक्त करतो. कायद्यातील तरतुदीप्रमाणे 45 दिवसात निकाल लागला पाहिजे. या तरतुदीची अंमलबजावणी जी विद्यापीठे करीत नसतील त्यांच्या बाबत चौकशी करुन कडक कारवाई करण्यात येईल अशाप्रकारचा विश्वास मला व्यक्त करावयाचा आहे. या सर्व दृष्टीने विद्यापीठाचा दर्जा चांगला कसा राहील व त्यांचे एक्सपान्शन कसे होईल व त्यामधून समाजातील सर्व घटकांना शिक्षण कसे मिळेल या अनुषंगाने आम्ही पुढील पावले उचलणार आहोत. अशाप्रकारचा विश्वास व्यक्त करुन सभागृहाने या विधेयकाला मान्यता द्यावी अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि. क्रमांक 40 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाल.

**तालिका सभापती** : सन 2011 चे वि.स.वि. क्रमांक 40 संमत झाले आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>सभागृहाच्या कामकाजासंबंधी</u>**

**तालिका सभापती** : आजच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमामध्ये दाखविण्यात आलेले नियम 260 अन्वयेचे दोन प्रस्ताव व अर्धा तास चर्चेच्या सूचना पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येच्या संदर्भातील चर्चा उद्या घेण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे आमचा अंतिम आठवडा प्रस्ताव केव्हा घेणार?

**तालिका सभापती** : तो उद्या संध्याकाळी घेण्यात येईल.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 11 ऑगस्ट, 2011 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन: भरेल.

सकाळी 10.00 ते 11.45 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. सदर बैठकीमध्ये सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर व इतर विधान परिषद सन्माननीय सदस्य यांच्या म.वि.प. नियम 260 अन्वये "महाराष्ट्रातील कोरडी व ओली दुष्काळजन्य परिस्थिती" या विषयावरील प्रस्तावावर चर्चा घेण्यात येईल. त्या नंतर दुपारी 12.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री 7 वाजून 19 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 11.8.2011 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही